पूर्व गोलार्धाचे भूकेंद्र :
भारत

य. श्री. परांजपे

पूर्व गोलार्धाचे भूकेंद्र- भारत

व्हीनस व्याख्यानमाला : पुष्प ६ वे

पूर्व गोलार्धाचे भूकेंद्र
भारत

(मॅकिंडर यांच्या मर्मभूमि-सिद्धान्तावर आधारित)

*

मेजर जनरल य. श्री. परांजपे

मूल्य : रु. ७·००

व्हीनस प्रकाशन : पुणे

आवृत्ती पहिली : जुलै १९६९

□ □

चित्रकार : कुलकर्णी

□ □

ब्लॉक्स : किर्लोस्कर प्रेस, पुणे ९.

□ □

मूल्य : रुपये सात फक्त

□ □

प्रकाशक

स. कृ. पाध्ये

व्हीनस प्रकाशन

तपश्चर्या

३८१ क शनिवार पेठ : पुणे ३०

□ □

मुद्रक

मु. शं. किर्लोस्कर

किर्लोस्कर प्रेस

वीर सावरकरनगर : पुणे ९.

निवेदन

व्हीनस प्रकाशन व्याख्यानमालेचे सहावे पुष्प आज प्रकाशित होत आहे. मार्च १९६३ मध्ये व्हीनस प्रकाशन या संस्थेचा रौप्य महोत्सव साजरा झाला. त्याच वेळी आणि त्या निमित्ताने या प्रकाशन संस्थेने असे ठरविले होते की, केवळ एवढा उत्सव साजरा करून न थांबता दरवर्षी एखादे ज्ञानसत्र चालवून वाङ्मयीन कार्य सातत्याने चालवीत राहावे. या कार्याचे मुख्य रूप व्याख्यानमालेचे असावे, परंतु त्या व्याख्यानांना काही चिरस्थायी स्वरूप राहावे म्हणून ती पुस्तकरूपानेही प्रकाशित करावीत.

त्यानुसार या व्याख्यानमालेचे पहिल्या वर्षीचे (१९६४) वक्ते होते श्री. सेतुमाधवराव पगडी. त्यांचा विषय होता. ' हिंदवी स्वराज्य आणि मोगल' ! दुसऱ्या वर्षी (१९६५) डॉ. शं. दा. पेंडसे यांनी ' वैदिक वाङ्मयातील भागवतधर्माचा विकास' या विषयावर व्याख्यानपुष्प गुंफले. तिसऱ्या वर्षी (१९६६) डॉ. ना. र. देशपांडे यांनी ' भारतीय राजकारण : विकास आणि समस्या ' या विषयावर व्याख्याने देऊन व्याख्यानमाला यशस्वी केली. चौथ्या वर्षी (१९६७) 'कालिदास-दर्शन' या विषयावर डॉ. गो. के. भट यांनी व्याख्यानमाला गुंफली. पाचव्या वर्षी १९६८ सुप्रसिद्ध उद्योगपती श्री. शंतनुराव किर्लोस्कर यांनी व्याख्याने दिली. त्यांचा विषय होता ' जेट युगातील मराठी माणूस'.

व्याख्यानमालेचे सहावे पुष्प मे. ज. श्री. य. परांजपे हे ' पूर्व गोलार्धाचे भू-केंद्र : भारत ' या विषयावर (आज २८ ते ३० मार्च १९६९) सादर करीत आहेत. यापूर्वीच्या व्याख्यान-ग्रंथांचे मराठी वाचकांनी जसे उत्स्फूर्त स्वागत केले, तसेच याही ग्रंथाचे ते स्वागत करतील असा आम्हांला आत्मविश्वास आहे.

रा. श्री. जोग
अध्यक्ष
व्हीनस प्रकाशन व्याख्यान समिती

ग्रंथ परिचय

मेजर-जनरल य. श्री. परांजपे यांचे नाव युद्धशास्त्रावरील एक अभ्यासू व विद्वान लेखक म्हणून मराठी वाचकांना एव्हाना सुपरिचित झालेले आहे. त्यांच्या प्रस्तुत प्रबंधाला प्रास्ताविकादाखल मी काही लिहावे अशी इच्छा त्यांनी प्रदर्शित केली यात मी माझा गौरव झाला असे मानतो. कारण मे. ज. परांजपे यांनी ज्या सिद्धान्ताचा परिचय व परामर्ष ह्या प्रबंधाद्वारे वाचकांच्या समोर सादर केलेला आहे; त्या संबंधी काही साधकबाधक विधाने करण्याचा अधिकार वा अभ्यास माझ्यापाशी नाही. परंतु प्रतिपाद्य विषयात मला रस आहे आणि मी किंचित् प्रमाणात का होईना विचक्षण वाचक आहे म्हणून त्यानी मला प्रस्तावना लिहिण्याची सूचना करण्याचे ठरवले असावे अशी मी स्वतःची समजूत करून घेतली आणि हे चार शब्द लिहावयास बसलो.

एकूण १६० पृष्ठांच्या ह्या प्रबंधात लेखकाने आपल्या प्रतिपादनाची मांडणी करताना १९०४ साली इंग्रज भूगोलशास्त्रज्ञ मॅकिंडर यांनी जो मर्म-भूमी सिद्धान्त सांगितला त्याला मध्यवर्ती कल्पून रचना केलेली आहे. ज्याच्यावर सूर्य कधी मावळत नसे अशा जगातील अतिबलाढ्य ब्रिटिश साम्राज्याच्या हातचे प्रभुत्व उत्तरोत्तर मावळत जाणार आणि युरेशियाच्या म्हणजे अटलँटिक-पासून पॅसिफिक महासागरापर्यंत पूर्वपश्चिम व आर्क्टिकपासून कॅस्पिअन–काळ्या समुद्रापर्यंत, दक्षिणोत्तर पसरलेल्या भूमीच्या हृदयस्थानी असलेल्या प्रदेशावर ज्याचे स्वामित्व राहील तो, हळूहळू ह्या धडाला हस्तपादादिक अवयवांप्रमाणे चिकटलेल्या किनारपट्टीच्या आणि द्वीपकल्पाच्या देशांवर प्रभुत्व प्रस्थापित करील. तदनंतर ह्या सवंध भूभागाला वलयांकित करणाऱ्या सागरावर आपला धाक बसवील आणि त्यानंतरच्या अवस्थेत सगळ्या जगाला आपल्या कवेत आवळील असे चित्र त्याना दिसत होते.

मॅकिंडर १९४७ साली निवर्तले, म्हणजे त्यांचा सिद्धान्त जवळ जवळ चाळीस-पंचेचाळीस वर्षे युद्ध-भूगोल-शास्त्रज्ञांसमोर होता. साहाजकच

त्याच्यावर चर्चा झाली, मतभेद नोंदवले गेले. मॅकिंडर ज्याला मर्मभूमी म्हणतो त्या व्यतिरिक्त उत्तर अमेरिका व दक्षिण अमेरिका असा दक्षिणोत्तर पसरलेला भूभाग कल्पिल्यास अमेरिकेत संघराज्याला त्याची मर्मभूमी का मानू नये, असाही प्रश्न उत्पन्न झाला. आरमाराचे सामर्थ्य अथवा महत्त्व कमी झाले पण त्याची जागा विमानदल घेऊ शकणार नाही काय ? आणि जर घेऊ शकणार असेल तर विमानांचे उत्पादन प्रचंड प्रमाणावर करू शकणाऱ्या अमेरिकन संघराज्याने युरेशियाच्या किनारपट्टीचा घेरा जर आपल्या कह्यात ठेवला तर जगाचे प्रभुपद उपभोगण्याच्या कामी त्याला काय अडचण आहे, असा प्रश्न गैरवाजवी कसा म्हणता येईल ? युरेशियाच्या भूमिपटाचे मर्मस्थान रशियाच का मानावे ? चीनने त्या पदाची लिप्सा का धरू नये ? आणि भूगोलाचाच विचार जर केला आणि पूर्व गोलार्धातील जेवढा भाग लोक-वस्तीचा आहे, जवळपास तेवढा त्या गोलार्धपैकी विषुववृत्तावरील अर्धुकात समाविष्ट झालेला आहे हे जर लक्षात घेतले; तर त्याचे भूकेंद्र सौराष्ट्रात येते म्हणून भारतदेखील ह्या गोलार्धाची मर्मभूमी होऊ शकेल असे जर कोणी प्रतिपादन केले तर ते तरी निराधार काय म्हणून मानावे ?

अर्थात् हे असले प्रश्न उपस्थित होणे त्याच राष्ट्रात शक्य असते की जे सजीव असते. आपला जीव (व नाकही !) मुठीत धरून जे राष्ट्र कसेबसे जगत राहते त्याला चंद्रावर जाण्याची वाट विचारण्याचे ज्याप्रमाणे कारण नाही, त्याचप्रमाणे मर्मभूमी सिद्धान्ताचा ऊहापोह करण्याचेही कारण नाही ! पण मे. ज. परांजपे हे आशावादी दिसतात. काही महत्त्वाचे विचार, शुद्ध तर्कवादाच्या आधाराने मांडून, ज्या घटना डोळ्यासमोर घडत आहेत त्यांच्या मुळाशी जाऊन विचारवंतांच्या मतावर चढलेली परंपरागत, चाकोरीबंद विचारांची राख फुंकराने उडवून, परत कर्तृत्वाचा निखारा फुलवता येईल अशा विश्वासाने ते लिहीत– बोलत असतात. त्यांत भोंगळ ऐतिहासिक अभि-मानाला ते जसे थारा देत नाहीत, त्याचप्रमाणे रशियासारखे राष्ट्र मॅकिंडरने मांडलेल्या सिद्धान्ताचा बरहुकूम वर्तत असता व पूर्व गोलार्धात तरी, 'समुद्र पर्यन्तायां पृथिवीम एक राष्ट्' करण्याची आकांक्षा बाळगू लागल्याचे पुरावे मिळत असतां, तो साम्यवादी देश तेव्हा, त्याला कसा साम्राज्यवादाचा मळ

चिकटवावा, अशा भाबडेपणालाही ते थारा देत नाहीत. शास्त्रपूत, तर्कपूत व साधार असेल ते प्रतिपादन करण्याचा बाणा 'सैनिकाच्या स्वाक्षरीं'तल्या प्रमाणे त्यानी या प्रबंधातही राखलेला दिसेल. प्रस्तुत प्रबंधातील विवेचन सुबोध व उजळ करण्याच्या हेतूने मे. ज. परांजपे यानी जे दोन नकाशे शेवटी जोडलेले आहेत ते त्यांच्या साक्षेपी वृत्तीची आणखी साक्ष देतील. शिवाय पूर्व व पश्चिम गोलार्धांमधील मर्मभूमी नेमकी कोठे आहे, त्यांचा विस्तार किती, त्यांचे प्रभाव-क्षेत्र कोणते व उत्तर ध्रुवावरून जाणारा वैमानिक मार्ग लक्षात घेतल्यास त्या परस्परांच्या किती सन्निध आहेत त्याची कल्पना येईल. कै. कॅ. मोडक आणि मेजर चाफेकर यांनी महाराष्ट्रात युद्ध ह्या विषयाला रोमांचवादामधून उचलून शास्त्रीय विषयाच्या बैठकीवर आणण्याचा जो सतत प्रयत्न केला त्याचाच वसा मे. ज. परांजपे मोठ्या अधिकारवाणीने चालवीत आहेत. ही आमच्या दृष्टीने सुदैवाची गोष्ट होय. मराठी मनुष्य स्वतःला युयुत्सू, लढाऊ समजतो. पण मराठी साहित्यात युद्धशास्त्रावर किंवा युद्धावर शास्त्रीय दृष्टीने लिहलेले फार म्हणजे फारच थोडे लिखाण उपलब्ध असल्यामुळे मराठी वाचकांना हा विषय बहुतांशी अपरिचितच म्हटला पाहिजे. म्हणून ह्या प्रबंधामधील सगळे विवेचन सर्वसामान्य वाचकांना जर न झेपणारे वाटले तर त्यांनी पुस्तकातील १३ वे प्रकरण तरी वाचावेच. अवघ्या तीन पानांच्या ह्या प्रकरणात लेखकाच्या प्रबंधाचे मर्म येऊन गेले आहे, असे मला वाटते. प्रबंध लिहिताना मे. ज. परांजपे यांनी आवश्यक ती नवी शब्दावलीही प्रयत्नपूर्वक बनविलेली असून ती मराठी शब्दसंपत्तीमध्ये भर घालणारी ठरावी.

जनरलसाहेबांनी स्वतःकडे लहानपणा घेऊन महाराष्ट्रातील विद्वानांनी ह्या विषयावर अधिक अभ्यासपूर्ण लिहावे हा या हेतूनेच आपण प्रबंध लिहिण्यास उद्युक्त झालो असल्याचे सांगितले आहे. महाराष्ट्रातील विद्वानांना हे एक-प्रकारे आव्हान होय. ते स्वीकारून मॅकिंडर आणि तत्सम भूगोल-युद्ध-शास्त्र-ज्ञांच्या विचारांचा मरामर्ष घेण्यास ते सिद्ध होतील अशी आपण सगळेच आशा करू या.

हा महत्त्वपूर्ण प्रबंध लिहिल्याबद्दल जनरलसाहेबांचे आभार मानताना त्यांनी हे विचार इंग्रजी भाषेमधूनही वाचकाना उपलब्ध करून द्यावे अशी विनंती करण्याचा मोह होतो. महाराष्ट्राबाहेरसुद्धा हे विचार जाण्याची फार गरज आहे.

२० जुलै १९६९ ना. ग. गोरे

शुद्धिपत्रक

पान	ओळ	अशुद्ध	शुद्ध
१८	खालून ६	भू गोलशास्त्रज्ञ	भूगोलशास्त्रज्ञ
२३	वरून ११	गळिते	जळिते
५१	वरून १०	त्यांनी	त्यांना
५३	खालून १०	कालवा खुला	कालवा खुला झाल्यास
५५	शेवटची	बरीच	बरीच नास–
६१	वरून १४	फायफाँग	हायफाँग
७०	वरून १	पद्धतीच्या बाबतीत साम्यवाद प्रसाराच्या	साम्यवाद प्रसाराच्या पद्धतीच्या बाबतीत.
९४	वरून २	असले ी	असलेली
९५	वरून १	बलव नात	बलवानात
	वरुन २	बहुतेका	बहुतेक
	वरून १६	यरोपीय	युरोपीय
९९	शेवटची	किनारभृमी	किनारभूमी

गेली बावीस वर्षे विसर पडलेले
अेक अत्यंत विचारप्रवर्तक विधान :

" आम्ही आशियाचे आहोत व आशियाची जनता आम्हाला अितरांपेक्षा अधिक जवळची वाटते.... भारताची (भौगोलिक) स्थिती अशी आहे की तो पश्चिम, दक्षिण व आग्नेय आशियाच्या कीलस्थानी आहे.... *पुरातन काळी आमची संस्कृती त्या सर्व देशांत पसरली होती आणि ते अनेक कारणास्तव भारताकडे येत असत. ते ऋणानुबंध पुन्हा प्रस्थापित केले जात आहेत आणि भविष्यकालात भारत आणि आग्नेय आशिया यांत अधिक जवळीक झालेली दिसेल.... "*

जवाहरलाल नेहरू यांनी ७ सप्टेंबर १९४६ रोजी, हंगामी सरकारचा नेता म्हणून, राष्ट्राला उद्देशून केलेल्या आकाशवाणीवरील भाषणातील उतारा.

१

प्रास्ताविक

श्री. पाध्ये यांनी त्यांच्या 'व्हीनस' प्रकाशनच्या दरवर्षीच्या कार्यक्रमावरहुकूम या वर्षी कोणत्यातरी विषयावर तीन व्याख्याने देण्याचा मला आग्रह केला. ती व्याख्याने नंतर पुस्तकरूपाने प्रसिद्ध केली जातील असे सांगून, उगाचच बेजबाबदारपणे काहीतरी बोलू नका असा अव्यक्त इशाराही त्यांनी त्याबरोबरच दिला. व्याख्याने द्या म्हणणे सोपे आहे, पण लागोपाठ तीन व्याख्याने द्यावयाची व तीही प्रसिद्ध होण्याची भीती मनात असताना! तेव्हा

मला प्रश्न पडला की बोलावयाचे कशावर ? असा कोणताच विषय मला आढळेना की ज्यावर तीन तास मी अधिकारवाणीने बोलू शकेन. श्री. पाध्यांनी त्यावर लगेच तोडगा काढला; ते म्हणाले, "युद्ध व संरक्षण हा तुमचा विषय आहे, तेव्हा त्यावरच बोला म्हणजे झाले." युद्ध कसे करावयाचे ते तीन भाषणांत सांगता येणार नाही. शिवाय काही थोडेबहुत सांगू शकलो तरी त्याचा पुण्यातील श्रोत्यांना खरोखर उपयोग काय? संरक्षणाबद्दल बोलावयाचे म्हणजे देशाच्या राजनीतीपासून सुरुवात करावयास हवी. राजनीतीचे ज्ञान मला चारचौघांसारखेच वरवरचे व उथळ आहे. अर्थातच संरक्षणासारख्या विषयावर लंबेचवडे सनसनाटी भाषण करता येईल. त्यात आपले त्रिदल नेते करीत आहेत ते सर्व चुकीचे आहे. मी शहाणा सांगतो तेच काय ते योग्य आहे. आपले सरकार देशरक्षणाच्या बाबतीत कुचकामी आहे इत्यादी वाक्ये घातली की श्रोत्यांच्या सध्याच्या मन:स्थितीत त्यांना थोड्या गुदगुल्या होतील. चार वर्तमानपत्रांतून त्याचे थोडेबहुत अतिशयोक्ती करून उतारे येतील. पण तेही योग्य नाही. मग बोलावयाचे काय हा प्रश्न तसाच राहिला.

त्यावर बराच विचार केल्यावर वाटले की संरक्षणक्षेत्राशी एखाद्या नवीन विषयाची सांगड घालावी, कारण राष्ट्राच्या संरक्षणाशी संबंधित विषयांचे क्षेत्र अती विस्तृत आहे आणि त्या क्षेत्रात वावरताना त्या सर्वांची तोंडओळख होते. यापूर्वी मी युद्धाचा व संरक्षणयंत्रणेचा संबंध अर्थशास्त्राशी व राज्यशास्त्राशी किती निकट आहे हे दाखविण्यासाठी दोनतीन भाषणे केली आहेत, लेखही लिहिले आहेत. या वेळी संरक्षणाची सिद्धता व राष्ट्राची संरक्षणनीती, त्या राष्ट्राच्या व भोवतालच्या भूखंडांच्या भौगोलिक स्वरूपावर व त्या स्वरूपाची पाहणी करताना निघणाऱ्या निकषांवर कशी अवलंबून असते याबद्दल माझे विचार मांडण्याचे ठरविले. पूर्वी युद्धाच्या अर्थशास्त्राशी किंवा राज्यशास्त्राशी असलेल्या संबंधाबद्दल मी जे काही बोललो किंवा लिहिले, त्या वेळी मला त्या

दोन्ही शास्त्रांचे फारसे ज्ञान होते असे नाही; तर त्याविषयी बोलून त्या त्या शास्त्रांच्या पंडितांना त्यावर विचार करून लिहिण्यास काहीतरी कारण सापडावे म्हणून. तसा त्यांचा काही परिणाम महाराष्ट्रात जरी झाला नसला तरी एकसारखा त्यासाठी प्रयत्न करीत राहणे मात्र मला अवश्य वाटते. केव्हातरी, कोणीतरी, काही-तरी लिहीलच अशी मला आशा आहे. म्हणून आता युद्धविषयक भूगोलशास्त्राबद्दल मी बोलणार आहे. तेही मी भूगोलशास्त्रात पारंगत आहे म्हणून नव्हे, तर भूगोलशास्त्र-पंडितांनी यावर विचार करून, त्यांचे ज्ञान संरक्षणसमस्यांस लागू करून त्याचा फायदा आपणा सर्वांस करून देण्यासाठी त्यास उद्युक्त करावे या उद्देशाने. तोही सफल होतो की नाही हे काळच सांगेल.

जीन् गोटमान् आपल्या लिखाणात म्हणतात,*

"आपण राहतो ते जग म्हणजे भिन्नभिन्न प्रकारे विभागलेला असा एक भूविस्तार आहे. पृथ्वीच्या पृष्ठाची फाळणी अनेक कारणांनी झाली आहे; राजकीय स्वामित्वामुळे, भूमीच्या ठेवणीमुळे तसेच आर्थिक व सांस्कृतिक भेदांमुळे. त्यायोगे अस्तित्वात आलेले राजकीय विभाग (जगात आहेत) हाच तर आंतरराष्ट्रीय संबंधांच्या शास्त्राचा अस्तित्वहेतू (raison d'etre) आहे. त्याचप्रमाणे पृथ्वीच्या पृष्ठाची तिच्या भिन्न भूस्वरूपामुळे ही जी विभागणी झाली आहे, ती भूगोलशास्त्राच्या अभ्यासाचा अस्तित्व-हेतू मानता येईल. पृथ्वी ही सर्वत्र एकरूपी– एखाद्या बिलियर्डच्या चेंडूसारखी गुळगुळीत– असती तर भूगोलशास्त्र असे एक वेगळे शास्त्रच अस्तित्वात आले नसते आणि त्यांवरील पडलेल्या विभागांचे आंतरराष्ट्रीय संबंधही सुकर झाले असते."

---

* "Politics and Geographical Relations" या डग्लस् जॅक्सन् यांनी संपादिलेल्या पुस्तकातील गोटमान् यांच्या "World Politics 1951" या लेखातील उतारा. पान २०.

त्याचप्रमाणे हॅरल्ड् व मार्गरेट् स्प्राउट् म्हणतात,*" राज्याच्या कल्पनेतच भूमी हा एक अवश्य घटक आहे. प्रत्येक राष्ट्र-राज्याचा (nation-state) पाया भूमी हाच असतो. भूगोलशास्त्राच्या भाषेत सांगावयाचे म्हणजे पृथ्वीपृष्ठावरील भूक्षेत्राचाच तो एक तुकडा असतो. आंतरराष्ट्रीय व्यवहारात होणाऱ्या विरोधात, संघर्षात, प्रतिकारात किंवा लढ्यात त्या त्या राष्ट्राचे स्थान, विस्तार आणि त्यांच्यातील परस्पर अंतरांमुळे एकमेकांवर होणाऱ्या प्रक्रिया वगैरे, कालानुरूप सदा बदलते घटक (variable factors) असतात. अशा मानवेतर घटकांच्या अस्तित्वाची आणि त्यांच्या मर्यादांची जाणीव राजकारणींना त्यांच्या मसलतींच्या वेळी असावी लागते आणि तशी ती असल्यास त्यांनी ठरविलेल्या अंतिम राजनीतीवर तिचे गहन परिणाम होतात."

पृथ्वीवरील मानव व मानवेतर घटक यांच्या संबंधात आणि मानवांनी इतर घटकांच्या केलेल्या उपयोगात किंवा त्यापासून त्यांस मिळालेल्या फायद्यात आजच्या तांत्रिक व यांत्रिक प्रगतीमुळे फरक पडलेला आहे आणि यापुढेही तो तसाच पडत जाणार आहे. अशक्य वाटणाऱ्या गोष्टी शक्य होऊ लागल्या आहेत. युरोप व हिंदुस्थान यांतील प्रवासाचा काल एके काळी कित्येक महिने होता तो आता काही तासांवर आला आहे. तेव्हा राष्ट्रीय बळाचे त्वरित केंद्रीकरण दूरवरच्या प्रदेशांत करणे सुकर झाले आहे व त्याच्या आघातांची तीव्रता व क्षेत्रेही वाढली आहेत. उत्तर किंवा दक्षिण ध्रुवाभोवतालचा बर्फमय प्रदेश मानवास अगम्य व वस्तीस असह्य वाटत असे, तो आता तसा राहिलेला नाही. विमानमार्गे त्यावरून व पाणबुड्यांच्या साहाय्याने तेथील बर्फाच्छादनाच्या खाली समुद्रात संचार करणे सुलभ व शक्य झाले आहे. एके काळी दोन वेगळ्या

---

* त्याच ग्रंथात, "Geography and International Politics in an Era of Revolutionary Change", हॅरल्ड् व मार्गरेट् स्प्राउट् यांचा लेख.

गोलार्धांत दाखविलेले आशिया व उत्तर अमेरिका हे खंड अती दूर वाटत. ते आता उत्तर ध्रुवावरून एकमेकांशी निकटवर्ती झाले आहेत. पृथ्वीच्या नकाशातील दोन गोलार्ध वेगळे दाखविल्याने व त्यांमधील अंतर हजारो मैल दिसत असल्याने त्यातील राष्ट्रांच्या आशाआकांक्षांचे परिणाम पूर्वी एकमेकांस फारसे जाणवत नसत. आता ते अंतर आधुनिक क्षेपणास्त्रांमुळे १५ ते २० मिनिटांच्या पल्ल्यात आले आहे. या सर्व कारणांनी पृथ्वीच्या कानाकोपऱ्यात झालेल्या घटनांचे पडसाद सर्व जगभर उमटतात व त्यांची प्रतिक्रिया कधीकधी प्रखर झालेली दिसून येते. तेव्हा, 'अमुक एक भू-भाग आपल्यापासून दूर आहे. त्याशी आपला संबंध काय?' असे म्हणणे आता सयुक्तिक म्हणता येणार नाही.

पृथ्वी ही शेषाच्या डोक्यावर ठेवलेला चपटचा आकाराचा एक भार आहे, या कल्पनेच्या काळापासून, मानवनिर्मित उपग्रह ज्या भोवती घिरटचा घालीत आहेत अशा आजच्या पृथ्वीगोलाच्या कल्पनेत केवढा तरी फरक झालेला आहे. अर्थात तितकाच तो आता पूर्वीच्या व आजच्या भूगोलशास्त्राच्या अभ्यासक्षेत्रात झालेला आहे. आणि आधुनिक काळातील भूगोलशास्त्राचे ज्ञान म्हणजे अनेकविध देशांच्या भू-स्वरूपाची, वातावरणाची, जल-स्थलांची, पिकांची किंवा खनिजांची केवळ आकडेवारी किंवा तपशील माहीत असणे असा नसून त्या अनेकविध भौगोलिक घटकांचा, त्यांच्या कमीअधिक प्रमाणात असलेल्या उपस्थितीचा त्या त्या राष्ट्रांच्या कार्यक्षमतेवर, तेथील जनतेच्या स्वभावधर्मावर आणि त्या देशांच्या आपसातील सांस्कृतिक, राजकीय व आर्थिक संबंधांवर काय परिणाम होतात याची चिकित्सा करून त्यापासून धडे घेतले तरच त्याबद्दलच्या ज्ञानाचा योग्य उपयोग झाला असे म्हणता येईल. हाच राजकीय-भूगोलशास्त्राचा मुख्य हेतू मानला जातो.

या विषयाचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास कसा करावयाचा हे रिचर्ड् हार्टशॉर्न् यांनी आपल्या एका लेखात स्पष्ट केले आहे.

त्याचा मथितार्थ असा*–

राजकीय भूगोलशास्त्राच्या अभ्यासकांनी संबंधित भू-क्षेत्राचे सूक्ष्म निरीक्षण केले पाहिजे. त्या क्षेत्राच्या राजकीय समस्यांशी संबंधित अशा सर्व भूगोलशास्त्रीय कसोट्या लावून त्या क्षेत्राच्या अनेक विभागांतील समानता किंवा भेद जाणून घेतले पाहिजेत. प्रत्येक कसोटी लावताना त्यांचे तुलनात्मक परीक्षण करून, त्यांच्यातील सलोख्याची किंवा संघर्षाची कारणे शोधून काढली पाहिजेत. ऐतिहासिक भूगोलशास्त्रानुरूप त्या राष्ट्रांचा अभ्यास करून त्यांच्यातील बऱ्यावाईट संबंधांची कार्यकारणे शाबीत केली पाहिजेत. त्यावरूनच त्यांच्यातील भावी संबंधांची व त्यांच्या तीव्रतेची कल्पना येऊ शकेल.

राष्ट्राची संरक्षणनीती ही त्या राष्ट्राच्या राजनीतीवर सर्वस्वी आधारलेली असते. तेव्हां राजकीय भूगोलशास्त्राने काढलेले निष्कर्ष हे संरक्षणनीतीतील निर्णयांच्या बाबतीत तेवढेच लागू पडतात. फार काय, संरक्षणाच्या बाबतीत भूगोलशास्त्राची आणखी एक शाखा लष्करी–भूगोलशास्त्र (Military Geography) ही आहे. तिचाही अभ्यास आज इतर सर्व देशांत कसोशीने होत आहे. त्याची व्याख्या थोडक्यात करता येईल ती अशी–

'ज्या भू-क्षेत्रात राष्ट्राचे स्थान आहे तेथील भौगोलिक घटकांच्या विशाल युद्धपटावर (grand strategy) किंवा राष्ट्रीय युद्ध-पटावर (national war strategy) किंवा रणकौशल्यावर (tactics) होणाऱ्या परिणामांचे शास्त्रीय पृथक्करण करून, त्यापासून राष्ट्राच्या संरक्षणात्मक योजनांबाबतीत आणि युद्धसामर्थ्याबाबतीत योग्य अनुमाने काढणारे शास्त्र.'

यावरून दिसून, येईल की राजकीय किंवा लष्करी भूगोल-शास्त्रे ही दोन्ही अनेक बाबतींत राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र यांच्या

---

* त्याच ग्रंथात, "What is Political Geography ?" हा रिचर्ड हार्टशॉर्न यांचा लेख.

सीमा उल्लंघितात. खरे असे की ही व इतरही समाजशास्त्रे एकमेकांशी इतकी निगडित आहेत किंवा एकमेकांत इतकी गुंतलेली आहेत की, त्यांच्या सीमा ठरविताच येत नाहीत. युद्ध ही एक समाजाची सामुदायिक आणि साहसी घटना आहे. राष्ट्रसंरक्षण म्हणजे शस्त्रबलाने आक्रमकाचा केलेला प्रतिकार व अखेर त्याचा नाश करण्याची शक्ती असे मानल्यास, ती शक्ती व तिची सिद्धता समाजशास्त्रांच्या अभ्यासाने व साहाय्यानेच उभी करता येईल.

१

विषय-प्रवेश

कोणत्याही दोन बिंदूंमधील अंतर मापण्याची दोन प्रमाणे असतात. पहिले त्यामधील लांबीच्या मापनाने, आणि दुसरे कालाच्या मापनाने. बैलगाडी किंवा घोडा हीच ते अंतर काटण्याची साधने असताना ‘देहली दूर अस्त’ अशी एक म्हण वापरात आली पण दळणवळणाच्या आधुनिक साधनांमुळे त्या म्हणीला काही अर्थच उरलेला नाही. आता पृथ्वीवरील दोन स्थलांमधील अंतर हे किलोमीटरमध्ये मांडण्यापेक्षा तेथे पोचण्यास किती मिनिटे

किंवा तास लागतील या भाषेत सांगणे अधिक सयुक्तिक होईल. अगदी साधे उदाहरण घ्यावयाचे तर मुंबई व त्या भोवतालचे औद्योगिक क्षेत्र हे ल्हासापासून सरळ रेषेत अंदाजे २२०० किलोमीटर आहे. आपल्याला ते खूपच दूर वाटण्याचा संभव आहे. कारण आधुनिक विमानांच्या किंवा क्षेपणास्त्रांच्या वेगाचे चटकन आकलन होत नाही. तेच जर असे म्हटले की ल्हासापासून आधुनिक बॉम्बर विमानाने मुंबई अडीच तासांत गाठता येईल किंवा क्षेपणास्त्राने तेथे १० मिनिटांत आघात करता येईल, की लगेच त्या दोन्ही स्थानांची सन्निधता लक्षात येते. तेच सत्य एका बाजूस हनॉय किंवा सायगावच्या व दुसऱ्या बाजूस सुवेझ व एडनच्या बाबतीतही लागू पडते. याचा अर्थ असा की, त्या स्थळी होणाऱ्या राजकीय घडामोडींचे पडसाद आपल्या देशात उठावयास आता फारसा काळ लागणार नाही; आणि याची जाणीव अशा कालमापनानेच येऊ शकते.

हे लक्षात घेता या व्याख्यानांच्या विषयातील "पूर्वगोलार्ध" हा शब्द आधुनिक तांत्रिक प्रगतीच्या कालात पृथ्वीला आलेल्या संकुचित स्वरूपात योग्य वाटत नाही. कारण पूर्व व पश्चिम गोलार्ध आता कालमापनाने फारसे दूर नाहीत. फार काय, उत्तर ध्रुवाच्या मार्गे तर ते अत्यंत निकट झाले आहेत. परंतु पृथ्वीचा नकाशा रेखाटताना अजूनही हे दोन गोलार्ध काढण्याचा प्रघात आहे. भारताच्या विशिष्ट स्थानाचे महत्त्व पूर्व गोलार्धात विशेष दिसून येते व अनुषंगाने ते थोडेबहुत पश्चिम गोलार्धातही आहे. परंतु ज्या गोलार्धात त्याचे महत्त्व अधिकतर आहे त्याचाच उल्लेख येथे केला आहे; एवढेच.

अशा प्रकारचा दोन गोलार्ध दाखविणारा नकाशा पुढे ठेवला आणि त्यावर पूर्व गोलार्धाचा मध्यबिंदू शोधला तर तो मालदीव बेटांच्या अंदाजे २५० मैल नैर्ऋत्येस आहे असे दिसून येईल. परंतु या गोलार्धात दक्षिण अक्षांश ४५ च्या दक्षिणेस, दक्षिण ध्रुवाभोवतालचा अंटार्क्टिकाचा प्रदेश वगळल्यास, भूमी दिसतच नाही आणि हा जलमय भाग, तेथे भौगोलिकदृष्ट्या

स्थित असे काही नसल्यामुळे, वगळला तर उर्वरित गोलार्धाचा मध्यबिंदू सौराष्ट्रातील जामनगर शहराच्या जवळपास येतो. (पू. रेखांश ७० व उ. अक्षांश २२½). तेव्हा सर्वसाधारणपणे भारत हा देश पूर्व गोलार्धातील अखिल भू-भागाच्या मध्यबिंदूस्थानी आहे, असे म्हणावयास हरकत नाही. त्यामुळे व यापुढे विवरण केलेल्या इतर कारणांमुळे भारताला भौगोलिक व राजकीयदृष्टचा विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे, आणि ते दिवसानुदिवस वाढतच जाणार आहे.

दुसऱ्या महायुद्धापूर्वी आफ्रिका व आशिया खंडांतील बहुतेक प्रदेश युरोपीय राष्ट्रांच्या साम्राज्यात होते, त्या वेळी त्या खंडांतील काही प्रदेशांना इतरांहून अधिक महत्त्व आले असले तर ते त्या त्या साम्राज्यांच्या रक्षणार्थ मनुष्यबलाचे साठे, साम्राज्यान्तर्गत दळण-वळणामधील महत्त्वाचे दुवे, राज्यकर्त्या साम्राज्यवाद्यांच्या औद्योगिक उत्पादनासाठी कच्चा माल पुरविणारे किंवा त्यांच्या उत्पादित मालासाठी प्रचंड बाजारपेठा या दृष्टीने काय ते होते. जगाचे राजकारण म्हणजे युरोपीय राष्ट्रांचे आपसातील राजकारण असेच समीकरण मांडले जाई. आर्थिकदृष्टचा युरोपीय व पश्चिम गोलार्धातील विकसित देश यामधील व्यापारी संबंधच अधिक फायद्याचे असल्याने जागतिक व्यापारही युरोप आणि उत्तर व काही अंशी दक्षिण अमेरिका यांच्यातच अधिक भरभराटीस आलेला होता. हा व्यापार समुद्रमार्गाने युरोपाभोवतालचे भूवेष्टित समुद्र व अटलांटिक महासागर यांतूनच मुख्यत्वेकरून चाले. पूर्वेकडील देशाशी होणारा व्यापारही अटलांटिक व भूमध्यसमुद्र यांतूनच जाऊन नंतर सुवेझमार्गे हिंदी महासागरात उतरे. दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी किंवा तत्पूर्वी उत्पन्न होणारे राजकीय संघर्षही युरोपीय राष्ट्रे व काही अंशी अमेरिका यांमधील बऱ्यावाईट संबंधांतून व आर्थिक अहमहमिकेतून उत्पन्न होत. त्यात १९०० सालापासून जपानचा समावेश झाला असला तरी जगाचा राजकीय इतिहास हा युरोपीय राष्ट्रांचा इतिहास अशीच सर्वसाधारण परिस्थिती होती.

त्या काळी ब्रिटनला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झालेले होते. त्यांचे प्रचंड जागतिक साम्राज्य, आर्थिक व्यवहारावरील पकड, युरोप खंडात त्यांनी अवलंबिलेली शक्तिसमतोल-नीती आणि त्यांचे समुद्रावरील स्वामित्व ही त्याची काही कारणे असली तरी, त्यांचे भौगोलिक स्थान हे त्याच्या मुळाशी होते. पुन्हा एकदा जगाच्या नकाशाकडे नजर फिरविली व वर वर्णिलेल्या भूभागाचे परीक्षण केले तर युरोपातील राजकीय, आर्थिक व औद्योगिकदृष्टचा प्रगत भाग व त्यांच्यामधील व्यापारी दळण-वळणाचे मार्ग बहुतांशी उ. अक्षांश ७० ते २५ व पूर्व रेखांश ४० ते पश्चिम रेखांश ८० या चौकटीत बसतात. त्या चौकटीचा मध्य-बिंदू (प. रेखांश २५ उ. अक्षांश ४७½) ब्रिटिश बेटांपासून ५०० मैलांवर आहे आणि त्या बिंदूपासून जवळची भूमी ब्रिटन हीच आहे. त्याचप्रमाणे ग्रीनिच् हा मध्यबिंदू धरून पृथ्वीच्या अर्ध-गोलाचा नकाशा काढला तर त्यात जगातील अधिकतम भूभाग येतात असे दिसून येईल. उत्तर युरोपातील प्रगत राष्ट्रांच्या समुद्र-किनाऱ्यापासून पश्चिमेस अटलांटिक महासागराकडे जाणारे सर्व जलमार्ग, ब्रिटनच्या भौगोलिक स्थितीमुळे, त्या बेटांच्या जवळून जातात. युरोपातीलच एक पण युरोपापासून एका समुद्राच्या खाडी-मुळे अलग असे हे राष्ट्र, स्वतः आक्रमणापासून सुरक्षित राहून, इतर राष्ट्रांच्या व्यापाराची गळचेपी सहज करू शकत असे. भूवेष्टित भूमध्यसमुद्रातून जगाशी होणारा व्यापारही सुवेझच्या कालव्यातून किंवा जिब्राल्टरच्या सामुद्रधुनीतूनच होत असल्याने व ही दोन्ही ठाणी ब्रिटनच्याच ताब्यात असल्याने, त्या व्यापारावरही ब्रिटनला दबाव आणता येत असे. असो, हे सांगण्याचा उद्देश असा की, जगाच्या भू-भागाचे ब्रिटन हे एक केंद्र झालेले होते व त्याचा त्यांनी अनेक प्रकारे फायदा गेल्या तीन-चार शतके पूर्णपणे घेतला.

दुसऱ्या महायुद्धानंतर प्रथम भारत व पाकिस्तान व नंतर इतर अनेक ब्रिटिश साम्राज्यांतर्गत देश स्वतंत्र झाल्यावर ब्रिटनची जगाच्या दळणवळणावरची त्याचप्रमाणे त्यांच्या साम्राज्याच्या

सुरक्षिततेवरील पकड कमी होत गेली. त्यांची आर्थिक स्थितीही खालावली व त्या राष्ट्रास पूर्वीसारखे महत्त्व आता राहिलेले नाही. दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिका व रशिया यांच्या वाढलेल्या राजकीय, औद्योगिक व शस्त्रबलाशी स्पर्धा करणे त्यास अशक्य झाले आहे. भोवतालच्या समुद्ररूपी खंदकामुळे पूर्वी लाभत असलेली सुरक्षिततेची भावना सध्याच्या वैमानिक व अणुयुगात त्यांच्यात असू शकत नाही. त्याबरोबरच आफ्रिका व आशिया खंडांतील प्रदेश स्वतंत्र झाल्यानंतर व बलाढ्य साम्यवादी चीन अस्तित्वात आल्यानंतर जागतिक क्षेत्रातील घडामोडींचा गुरुत्वमध्य युरोपात न राहता तो हळूहळू पूर्वेकडे आशियाच्या रोखाने हलू लागला आहे. जागतिक संघर्षाची केंद्रे आता मुख्यतः आशिया खंडात आणि हिंदी महासागराच्या भोवती स्थिर होण्याची शक्यता वाढली आहे. त्यामुळे जागतिक पटावरील राजकीय खेळ आता पश्चिम आशिया, आग्नेय आशिया आणि भारताच्या उत्तरेकडील मध्य आशियाच्या भागात खेळले जाणार हे स्पष्ट होऊ लागले आहे.

या संदर्भात सुरुवातीस सांगितल्याप्रमाणे आपल्या देशाच्या महत्त्वाच्या भौगोलिक स्थितीची जाणीव आपणा सर्वांस असणे महत्त्वाचे झाले आहे. जगातील राजकीय व्यवहारातील युजगतित्वता (manoeuverability) किंवा राष्ट्राराष्ट्रांतील देवाण-घेवाणीच्या बाबतीत घ्यावयाची दृढ किंवा कमकुवत भूमिका अशा जाणिवेतूनच उत्पन्न होऊ शकते. देशाची आर्थिक सुबत्ता किंवा तिचे राजकीय व युद्धपटावरील महत्त्व हे बहुतांशी त्या देशाच्या भौगोलिक रूपलक्षणांवरच अवलंबून असते. त्याचप्रमाणे त्या पटांवर डाव खेळत असणाऱ्या इतर राष्ट्रांना त्या देशाच्या महत्त्वपूर्ण स्थितीची, त्याच्या विकासक्षमतेची व त्यामुळे उत्पन्न होणाऱ्या राष्ट्रबलाची पूर्ण कल्पना असल्यामुळे, स्वहितासाठी परस्परांसमवेत किंवा परस्परविरोधी केलेल्या राजकीय चालीत त्या देशास गुंतविण्याचे, त्याचे सहकार्य मिळविण्याचे किंवा तो आड येत असल्यास त्यास शह देण्याचे प्रयत्न वेळोवेळी होणे अपरि-

हार्य असते. अशा वेळी कोणाशी, कोठे व कोणत्या बाबतीत सहकार्य करावयाचे, कोणास दूर ठेवावयाचे अथवा कोणास विरोध करावयाचा हे ठरविताना, स्वत:ची भौगोलिक स्थिती व तिचे महत्त्व याचे आकलन झाले पाहिजे. तरच अशा व्यवहारात स्वहितासाठी योग्य असा पवित्रा घेता येतो. यासाठीच आपल्यासारख्या पूर्व गोलार्धात मध्यवर्ती असलेल्या राष्ट्राने राजकीय-भूगोलशास्त्राच्या आणि लष्करी-भूगोलशास्त्राच्या संदर्भात आपल्या नजरेतून भोवतालच्या जगाचे चित्र कसे दिसते याचे सूक्ष्म निरीक्षण करणे अवश्य आहे.

हा विषय तासातासाच्या दोन किंवा तीन व्याख्यानांत संपविण्यासारखा नाही. शिवाय त्यासाठी भूगोलशास्त्राचे विशेषत: त्याच्या राजकीय व लष्करी शाखांचे ज्ञान असणे अवश्य आहे. माझ्यासारख्या भूगोलशास्त्राची केवळ ओझरती ओळख असणाऱ्या सैनिकाने त्यावर अधिकारवाणीने भाषणे करणे योग्य नाही हे मी मानतो. पण आम्हा सैनिकांना युद्धविषयाशी संबंधित अशा इतर विषयांत लुडबूड करण्याची संधी मिळाली की त्याचा आम्ही शक्य तेवढा फायदा घेत असतो. म्हणूनच ही व्याख्याने देण्याचे मी कबूल केले. अर्थातच मी जे काही सांगणार आहे ते भारताच्या व भारताशी संबंध येणाऱ्या भू-खंडाच्या राजकीय व लष्करी भूगोलशास्त्रविषयक परीक्षणाचा ओनामाच आहे. मला महत्त्वाचे वाटणारे काही मुद्दे मी मांडणार आहे. त्याशी सर्व भूगोलशास्त्रज्ञ सहमत होतीलच असे नाही. पण तसे झाल्यास त्यांनी त्यावर अभ्यास करून आम्हा अजाण लोकांस योग्य मार्गदर्शन करावे हीच माझी त्यांना विनंती आहे. फार काय त्यासाठीच मी ही व्याख्याने देत आहे असे म्हणावयास हरकत नाही.

३

युरेशिया खंड

भूगोलशास्त्रान्वये पूर्व गोलार्धात चार भू-खंड आहेत असे आपण मानतो – युरोप, आशिया, आफ्रिका व ऑस्ट्रेलिया. त्यांपैकी आफ्रिका आणि ऑस्ट्रेलिया हे नकाशात इतर भू-प्रदेशांपासून वेगळे असलेले स्पष्टपणे दिसून येतात. परंतु युरोप आणि आशिया हे मात्र एक-मेकांस जुडलेले आहेत. त्यांची विभागणी करणारी सीमारेषा सर्वसाधारणपणे उरल पर्व-ताच्या रोखाने आहे. पण तो पर्वत त्या रेषेच्या अर्ध्याअधिक उत्तर भागापुरताच मर्यादित आहे.

तिचा दक्षिणेकडील शेकडो मैलांचा हिस्सा उरल पर्वत सोडून कोणत्याही विशिष्ट भौगोलिक रूपरेखेशी (geographical features) न मिळता, अखेरीस कॅस्पियन् समुद्रास जाऊन मिळतो. उरल पर्वताची रांगही तिच्या दक्षिणेकडील भागात फारशी उंच नाही; आपल्या सह्याद्रीएवढी कशीवशी असेल. तेव्हा जगाने शेकडो वर्षे मानलेल्या या दोन खंडांची विभागणी एकूण भूमिरचनेच्या दृष्टीने कृत्रिमच वाटते. यावरून असे म्हणता येईल की, ही सीमारेषा नैसर्गिक, भौगोलिक रूपरेखांऐवजी पूर्वीच्या काळी त्या वेळच्या राजकीय व सांस्कृतिक परिस्थितीनुरूप भूगोलशास्त्रज्ञांनी ठरविली असावी.

प्राचीन काळी दळणवळणाची साधने अत्यंत अपुरी व मंदगामी असल्याने एकमेकांपासून दूर असलेल्या लोकांचे परस्परांशी फारसे संबंध येत नसत. अशा वेळी त्या निरनिराळ्या भूभागांत जी भिन्न भिन्न सांस्कृतिक उत्क्रांती किंवा प्रगती झाली ती दूरवर प्रसार पावली नाही व त्यांच्या एकमेकांवर विशेष प्रतिक्रियाही झाल्या नाहीत. त्यापैकीच पश्चिम युरोपीय संस्कृती एक होती. नौकानयनाची प्रगती होऊन पाश्चिमात्य लोक जगभर पसरले व त्यांनी आपली साम्राज्ये प्रस्थापित करून आपल्या संस्कृतीची छाप स्थानिक जनतेवर पाडली. पण भूमिमार्गे त्या संस्कृतीचा फैलाव मध्य-युरोपाच्या पूर्वेस विशेषसा झाला नाही. पीटर द् ग्रेटच्या वेळेपावेतो रशियातसुद्धा पश्चिम युरोपीय संस्कृतीचा फारसा शिरकाव झाला नव्हता. तेव्हा व त्यानंतरही रशियाची जनता मागासलेलीच होती व त्यांना इतर युरोपीय हे पौर्वात्यच म्हणत. त्याला एक कारण असेही होते की तेथील जमातीत मोंगल रक्त मिसळलेले होते. परंतु हळूहळू रशियाच्या राजघराण्याचा व अमीरउमरावांचा संबंध रोटीबेटी व्यवहारामुळे युरोपीय राजघराण्यांशी जडला. त्यांची सरकारदरबारची भाषाही फ्रेंच झाली. शिवाय १७ व्या व १८ व्या शतकात व नंतर नेपोलियनच्या काळात युरोपीय राजकारणात व युद्धातही रशियाने महत्त्वपूर्ण भाग घेतल्यामुळे त्यांचे संबंध

पाश्चात्त्यांशी अधिक आले व त्या देशाची गणना युरोपीय राष्ट्रांत होऊ लागली. अर्थातच त्या वेळी त्यांच्या पूर्ण स्वामित्वाखाली असलेल्या भू-प्रदेशाची पूर्वेकडील हद्द हीच युरोपची सरहद्द मानली गेली. त्या पलीकडे मोंगल, चीनी व इस्लामी संस्कृतीचे प्राबल्य होते म्हणून तो प्रदेश आशियात गणला गेला.

पश्चिम युरोपीय राष्ट्रांनी, त्यांच्या दर्यावरील साहसामुळे, आपापल्या साम्राज्यांचा प्रसार युरोपाबाहेर स्वदेशापासून दूर-वरच्या भूभागात केला. रशियाची जनता कधीच फारशी दर्यावर्दी कलेत तरबेज झाली नाही. कारण रशियाचे समुद्रकिनारे एकतर उत्तरेस बर्फाच्छादित असत किंवा बाल्टिक व काळ्या समुद्रा-सारख्या भूवेष्टित समुद्रावर होते. शिवाय उरल पर्वतापलीकडे स्वत:चे साम्राज्य वाढविण्यास त्यांना केवढा तरी वाव होता. त्यांनी त्या दिशेनेच आपल्या साम्राज्य-विस्तारास सुरुवात केली. १६ व्या व १७ व्या शतकांत कोसॅक लोकांनी स्वाऱ्या करून सैबेरियात आपले स्वामित्व प्रस्थापित केले व ते पॅसिफिक समुद्रापर्यंत पोचले. पण तेथे ते फारसे स्थायिक झाले नाहीत. तसा खास प्रयत्न १९ व्या शतकाच्या मध्यात झाला व रशियाचे साम्राज्य पोलंडपासून पूर्वेस पॅसिफिकपर्यंत व आर्क्टिक समुद्रापासून दक्षिणेस अफगाणि-स्तान व इराणपर्यंत पसरले. हे झारशाहीत वाढविलेले साम्राज्य १९१७ च्या राज्यक्रांतीनंतर सोव्हिएट समाजवादी संयुक्त गण-राज्य म्हणून अधिक दृढ केले गेले. पण ते सर्व रशियाचे 'साम्राज्य' आहे हे विसरता कामा नये.

हा आशियाई प्रदेश अविकसित होता, पण तेथे प्रचंड नैसर्गिक संपत्ती होती. हळूहळू त्या विविध संपत्तीच्या उत्खननास सुरुवात झाली आणि त्यावर अवलंबित उद्योगधंदे उभे होऊ लागले. परि-णामी युरोपीय रशियातील लोक आता बहुसंख्येने आशियाई भागात स्थायिक होऊ लागले. त्याशिवाय हजारो राजकीय कैदीही त्या कामासाठी तेथे जबरीने पाठविले गेले. दुसऱ्या महायुद्धाच्या सुरुवातीस तर युरोपीय रशियातील अनेक कारखाने, जर्मनांच्या

हाती पडू नयेत म्हणून, उरल पर्वताच्या पूर्वेस हालविले गेले. या सर्व घटनांमुळे रशियाची अर्धपाश्चात्त्य संस्कृती आणि त्याबरोबरच साम्यवादी तत्त्वज्ञान त्यांच्या अखिल साम्राज्यात पसरले. दुसऱ्या महायुद्धानंतर रशियात झालेल्या तांत्रिक प्रगतीमुळे उरलच्या पूर्वेस औद्योगिक विकास अधिकच भरभराटीस आला. तेव्हापासून त्यात दर वर्षी अधिकाधिक भरच पडत आहे.

रशियाने अण्वस्त्रांचे उत्पादन केल्यानंतर त्या अण्वस्त्रांच्या सुरक्षेसाठी व अमेरिकेवर करावयाच्या आघात-प्रत्याघाताच्या सुलभतेसाठी त्या अस्त्रांची भूमिगत वळदे (silos) मॉस्कोच्या पूर्वेपासून, बायकल सरोवरापर्यंत ट्रान्स-सैबेरियन रेल्वेमार्गाच्या दुतर्फा एका लांब भू-पट्ट्यात बांधली गेली. त्यांचे उड्डाणमार्ग बहुतांशी उत्तर-ध्रुव प्रदेशावरून आहेत.

अशा रीतीने उरल पर्वताच्या रोखाने, कृत्रिमरीत्या दुभंगलेल्या रशियाच्या साम्राज्याचा प्रचंड भू-विस्तार एकरूप झाला. आतापर्यंत ज्या कारणास्तव तो पर्वत युरोप व आशिया या खंडांना विभागणारा म्हणून मानला गेला होता ती कारणेच नाहीशी झाली आणि युरोप व आशिया खंडांची अनैसर्गिक विभागणी आपोआपच नष्ट झाली.

अर्थातच वर्षानुवर्षे अभ्यासल्या गेलेल्या भूगोलशास्त्राच्या पुस्तकात तसा बदल अजून झालेला नाही. पण आपण जरी त्यास तसे आज म्हणत नसलो तरी युरोप व आशिया हे दोन वेगळे खंड न राहता त्यांचा आता युरेशिया या नामे एकच खंड झालेला आहे व व्यवहार्य दृष्टीने तसा तो मानणे अपरिहार्य आहे. तसेच आज अनेक भू गोलशास्त्रज्ञ मानतात.

या विशाल खंडाचा मध्यवर्ती भूविस्तार (central land–mass) स्थूलमानाने उत्तरेस आर्क्टिक महासागर, पूर्वेस पू. रेखांश १४० व नंतर पॅसिफिक महासागराचा किनारा, दक्षिणेस उ. अक्षांश ३० नंतर हिमालय व तेथून ब्रह्मदेश, लाओस व व्हिएटनामच्या उत्तर सरहद्दीवरील पर्वतराशी आणि

पश्चिमेस पूर्व रेखांश ३० असा आहे. या भू-विस्तारास तीन दिशांस लहानमोठी द्वीपकल्पे जुडलेली आहेत ती अशी–१४० रेखांशाच्या पूर्वेचा सैबेरिया, कोरिया, आग्नेय आशिया (ब्रह्मदेश, थायलॅण्ड, मलाया व व्हिएटनाम), भारत, अरबस्तान, मध्य व पश्चिम युरोप आणि स्कॅन्डिनेव्हिया. आणि त्याभोवती जपान, फार्मोसा, जावा-सुमात्रा-बोर्नियो आदी द्वीपसमूह, सिलोन व ब्रिटन ही महत्त्वाची बेटे आहेत.

वर वर्णिलेल्या मध्यवर्ती भू-विस्ताराचे (द्वीपकल्पे सोडून) जवळजवळ ६/१० क्षेत्रफळ आउटर मंगोलियासह रशिया व चीन या दोन कट्टर साम्यवादी राष्ट्रांनी व्यापलेले आहे व त्या क्षेत्रात त्यापैकी ११/१२ लोकसंख्या राहते. त्या व्यतिरिक्त त्या भू-विस्तारातील इतर देश–इराण, तुर्कस्तान व त्याच्या दक्षिणेस असलेली सिरिया, लेबॅनॉन वगैरे लहान लहान राज्ये आणि अफगाणिस्तान-हे त्या दोन राक्षसी राष्ट्रांच्या मानाने अत्यंत बलहीन आहेत व त्याचे होणारे परिणाम त्यांना सहन करणे भाग आहे.

त्याचप्रमाणे हा भूविस्तार व त्याभोवतालची द्वीपकल्पे व बेटे यांचा एकच खंड मानला तर त्यातील मध्यवर्ती राष्ट्रांनी त्या द्वीपकल्पांच्या व बेटांच्या रोखाने आपले साम्राज्य वाढविण्याच्या, राजकीय दबाव आणण्याच्या किंवा आपल्या तत्त्वज्ञानाचा प्रसार करण्याच्या दृष्टीने टाकलेली पावले ही एकाच शरीराच्या अनेक अवयवांप्रमाणे एकमेकांवर परिणाम करतील हे उघड आहे. अमुक एक घटना पश्चिम युरोपात किंवा अरबस्तानात किंवा आग्नेय आशियात झाली तर त्याशी इतर अवयवांचा काही संबंध नाही असे म्हणणे चुकीचे होईल. कारण मूळ शरीरात जेव्हा काही बरेवाइट होते अथवा एखादा अवयव रोगग्रस्त होतो, तेव्हा त्याचीच संसर्गजन्य बाधा कालांतराने इतर अवयवांस जाणवणे क्रमप्राप्त असते.

हा जोडखंड केवळ क्षेत्रफळाने विस्तृत आहे किंवा त्यात

जगातील $\frac{3}{4}$ लोकसंख्या राहते एवढेच नाही तर त्यात इजिप्तचा अंतर्भाव केल्यास, या खंडातच भूमध्य समुद्राभोवती इराकमध्ये, भारतात व चीन आदी देशांत प्राचीन संस्कृती उदयास आल्या. त्यांचा सभोवतालच्या प्रदेशात विस्तार होत असता आपसात युद्धेही झाली. हिंदू, बुद्ध, क्रिस्ती व इस्लामी धर्मांची जन्मस्थाने येथेच आहेत. आधुनिक काळात याच खंडातील, विशेषत: पश्चिम युरोपीय, मानवांनी जगातील सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक किंवा औद्योगिक क्षेत्रांत पुढाकार घेऊन आघाडी मिळविलेली आहे. पश्चिम गोलार्धात, ऑस्ट्रेलियात किंवा दक्षिणेकडील आफ्रिकेत याच खंडातील लोकांनी स्थायिक होऊन पाश्चात्त्य संस्कृतीचा व जीवनपद्धतीचा प्रसार केलेला आहे. त्यांनी मागासलेल्या स्थानिक जनतेवर केलेल्या जबरीचा किंवा त्यांच्या उच्छादनाचा इतिहास लज्जास्पद असला तरी, आधुनिकीकरणाचा अर्थ युरोपीय राष्ट्रांप्रमाणे आपली सार्वत्रिक प्रगती करणे असाच काहीसा केला जातो. जगातील राजकीय पद्धती किंवा सध्याचे ज्वलंत तत्त्ववादही याच खंडात उगम पावले आहेत.

या व अशा कारणांमुळे युरेशिया खंडातील विचारांचा प्रभाव जगात कानाकोपऱ्यात पडलेला दिसून येतो. यापुढेही तेथे काय घडते याला अती महत्त्व आलेले आहे. तसेच युरेशियातील एखादे राष्ट्र अतिप्रबल झाले तर त्याचे आघात या खंडातच नव्हे तर पूर्वगोलार्धात इतरत्र व अखेरीस पश्चिम गोलार्धावरही होतील यांत शंका नाही.

५

मॅकिंडर यांचा मर्मभूमी सिध्दान्त

या परिस्थितीचे विस्तृत विवेचन करण्यापूर्वी अथवा तसे ते करण्यासाठीच या ठिकाणी थोडेसे विषयांतर करू आणि काही जगप्रसिद्ध भूगोलशास्त्रज्ञांनी या भूखंडाबाबत काय तत्त्वे मांडली आहेत त्याकडे लक्ष वळवू. त्यांपैकी मॅकिडर (१८६१-१९४७) हे एक इंग्रज भूगोलशास्त्रज्ञ होऊन गेले. त्यांच्या मर्मभूमीच्या सिद्धान्ताने (Theory of Heartland) इतर भूगोलशास्त्रज्ञांत व राज्यशास्त्रज्ञांत बरीच खळबळ उडाली.

इतरांनी त्या सिद्धान्तावर बरेच टीकात्मक लिखाण केले आहे व तसे अजनही होत आहे. मॅकिंडरनी केलेली सर्वच विधाने आज आपल्यास पटली नाहीत तरी एवढे मात्र कबूल करावे लागेल की, राजकीय व्यवहाराच्या किंवा संरक्षण योजनांच्या बाबतीत आपली नीती ठरविताना भूगोलशास्त्राच्या सखोल अभ्यासाची गरज लागते हे त्यांनी जगास पटवून दिले. त्यांनी १९०४ साली आपल्या या विशिष्ट सिद्धान्ताबद्दलचे विचार प्रथम मांडले व त्या वेळच्या ब्रिटनच्या जगातील सर्वबलिष्ठतेच्या भावनेच्या वातावरणात ते अत्यंत क्रांतिकारक समजले गेले. आरमारी सामर्थ्यात त्या वेळी ब्रिटनचा हात धरणारे जगात दुसरे राष्ट्र नव्हते. त्यायोगे त्यांनी केवळ आपले साम्राज्यच वाढविले होते असे नाही तर युरोपातील इतर राष्ट्रांनाही त्यांच्या मैत्रीवर आणि सद्हेतूंवर अवलंबून राहावे लागे. समुद्रावरील सामर्थ्य हे कोणत्याही व कोठेही होणाऱ्या युद्धाच्या यशाची गुरुकिल्ली आहे अशी सार्वत्रिक कल्पना होती. त्या कल्पनेस व त्यामुळे असलेल्या ब्रिटनच्या आत्मविश्वासास मॅकिंडर यांच्या सिद्धान्ताने धक्का दिला. मॅकिंडरांनी त्यांच्या सिद्धान्ताला पूरक असे जे विचार मांडले त्यांचा सारांश येथे देत आहे.

(१) ब्रिटनने गेल्या दोनतीनशे वर्षांत उभारलेल्या समुद्र-बलाचे महत्त्व त्यांना कमी होताना दिसत होते. युरोप खंडात औद्योगिक विकास झपाट्याने होत होता व तेथील वाढत्या व वेगवान वाहतूकसाधनांमुळे तेथे भूमिजन्य राष्ट्रबलाची (आर्थिक व लष्करी) वृद्धी होत होती. त्या काळापर्यंत युरोपीय युद्धे ही युद्धमान राष्ट्रांचे समुद्रबळ व भूमिबळ यांमधील संघर्ष समजले जात. समुद्रबळाने प्रतिपक्षाची कोंडी करून त्यास जेरीस आणणे हाच यशाचा मार्ग ब्रिटन नेहमी अवलंबीत असे. पण हे समुद्रबलाचे श्रेष्ठत्व फार काळ टिकणार नाही अशी मॅकिंडर यांची खात्री झाली होती.

(२) पश्चिम युरोपीय राष्ट्रांविरुद्ध सागरावरील घेर देऊन केलेली कोंडी शक्य झाली असली (आणि पुढे दोन्ही महा-

युद्धांत ती तशी झाली) तरी युरोपीय रशिया व त्याच्या पूर्वेकडे त्यांना असा भूभाग नजरेस आला की त्यावर समुद्रबलाने घातलेल्या घेराचा काहीही परिणाम होणार नाही. समुद्रमार्गे उतरविलेल्या सेनेला किंवा भूमिमार्गे पुढे वढणाऱ्या सेनेला त्या भूभागाच्या प्रचंड विस्तारामुळे त्याविरुद्ध यश मिळणे अशक्य दिसू लागले. या भागाला त्यांनी "जागतिक राजकारणातील कील-प्रदेश" (pivot area of world politics) असे नाव दिले.

त्यांच्याच शब्दांत सांगावयाचे तर– त्यांनी लिहिले : "या २० व्या शतकाच्या अखेरीपूर्वीच आशियात रेल्वेमार्गांचे जाळे पसरेल. रशियाचे साम्राज्य व मंगोलिया हा भूभाग इतका प्रशस्त आहे, तेथे लोकसंख्या, गहू, कापूस, गळिते (तेल आदी) व धातू यांची उत्पादनक्षमता एवढी प्रचंड आहे की त्या जागी इतरांपासून अलिप्त असे एक आर्थिकदृष्टचा स्वतंत्र व नवे जगच उभे होईल. समुद्रमार्गे होणारा व्यापार तेथे शिरकाव करू शकणार नाही." प्राचीन इतिहास-कालीन चंगीझखानाच्या मोंगल साम्राज्याशी त्यांनी याची तुलना केली.

(३) या कीलप्रदेशातील नद्या त्या प्रदेशाच्या मध्यभागी उगम पावून एकतर उत्तरेस वर्फाच्छादित आर्क्टिक समुद्रास मिळतात किंवा भूवेष्टित कॅस्पियन, उरल इत्यादी महासरोवरांस मिळतात. त्यांपैकी उत्तरेचा समुद्र जवळजवळ वर्षभर गोठलेलाच असतो. तेव्हा समुद्रवलशाली राष्ट्रांना नदीवाटेसुद्धा या कील-प्रदेशात शिरकाव करता येणार नाही. (अर्थात १९०४ साली लिहिलेल्या या सिद्धान्तात वायुदलाचे महत्त्व त्यांनी लक्षात घेतले नाही. त्याचप्रमाणे चीनमध्ये तेथील नदीवाटे पाश्चिमात्य राष्ट्रांच्या युद्धनौकांनी जो संचार केला, तसा कालांतराने अशक्य होईल हेही त्यांना त्या वेळी सुचले नसावे.)

(४) असा स्वयंपूर्ण व सुसंरक्षित "कील प्रदेश" उत्पन्न झाल्यावर तो फिन्लंड, नॉर्वे, स्वीडन, पोलंड, बाल्कन राष्ट्रे, इराक, इराण व हिंदुस्थान या देशांवर दबाव आणण्यास सुरुवात करील.

(५) अशा परिस्थितीत या कील प्रदेश-शासक राष्ट्राने आपले समुद्रबलही वाढविले आणि या कील प्रदेशाच्या काठांवरील राष्ट्रांवर आपली पकड बसविली तर, मॅकिंडर यांच्या मते, " जगाचे साम्राज्य त्यांच्या डोळ्यांसमोर दिसू लागेल."

(६) परंतु यासाठी रशियात मनुष्यबलाची, विशेषत: तांत्रिकदृष्टचा प्रगत मनुष्यबलाची कमतरता मॅकिंडर यांना, (१९०४ साली रशियात औद्योगिक विकास फारसा झालेला नसल्याने,) दिसली असावी. म्हणून त्यांनी लिहिले : " या सर्व कृतीत जर जर्मनी रशियाशी सहभागी झाला, तर ते जगाचे साम्राज्य शक्य होईल."

१९१९ साली पहिले महायुद्ध संपल्यावर व रशियात राज्यक्रांती झाल्यावर मॅकिंडरनी त्यांच्या वरील सिद्धान्ताच्या पुष्टचर्थ पुन्हा लेख लिहिले. त्यांत त्यानी म्हटले आहे : " जर्मनीचा पाडाव झाला आहे खरा, पण जर का जर्मनी जिंकता (व रशियावर त्याचे स्वामित्व येते) तर जर्मनीने आपले समुद्रबळ जागतिक क्षेत्रात अजिक्य केले असते."

पहिले महायुद्ध हे समुद्रबलशाली राष्ट्रे व भूबलशाली राष्ट्रे यांतील निर्णायक सामना होता असे त्यांचे म्हणणे पडले. १९४३ साली स्टालिनग्राडच्या लढाईनंतर दुसऱ्या महायुद्धाच्या काळात, त्यांनी आपल्या सिद्धान्ताला पुन्हा वाचा फोडली. त्या वेळी जर्मनीने युरोपीय रशियाचा बराचसा भाग जरी पादाक्रांत केला होता तरीसुद्धा केवळ पूर्व रशियाच्या, म्हणजे कीलप्रदेशाच्या, शक्तीवरच रशियाने जर्मनीला परतवून लावण्यास सुरुवात केली होती. आणि त्यांना रशिया व जर्मनी यांच्या युतीने काय झाले असते, या त्यांच्या मूळ कल्पनेतील सत्य अधिकच स्पष्टपणे दिसू लागले. त्याबाबत १९४३ साली त्यांनी लिहिले : " जर कां रशिया हा जर्मनीचा विजेता झाला तर तो (रशिया) जगांतील अत्यंत प्रभावी भूबलशाली राष्ट्र होईल." त्या काळी अमेरिकेचे व ब्रिटनचे सैन्य युरोपात

उतरले नव्हते. आणि अखेर जर्मनीची विभागणी होईल याचीही कल्पना त्यांना नव्हती. केवळ पूर्व जर्मनीचा व इतर पूर्व युरोपीय राष्ट्रांचा तावा घेतल्यावरसुद्धा आज रशिया हा भूवलाच्या वावतीत जगातील एक वलवत्तर राष्ट्र झाला आहे यावद्दल दुमत नाही. तेव्हा मॅकिंडर याचा मूळ सिद्धान्त चुकीचा नव्हता असे कबूल करणे भाग आहे.

मॅकिंडरनी १९०४ च्या आपल्या लेखात वापरलेला "कील-प्रदेश" हा शब्दप्रयोग त्यांनी नंतर वदलून त्या ऐवजी "मर्मभूमी" (Heart–land) हा शब्द प्रचारात आणला. त्याचप्रमाणे पूर्व-गोलार्धातील युरेशिया व आफ्रिका यासह त्यांनी त्यास "जगद्वीप" (World island) असे नाव दिले. त्याचप्रमाणे मर्मभूमीभोवती असलेल्या लगतच्या युरेशियाच्या भूपट्टीस त्यांनी "किनार-भूमी" (Rim-land) अशी संज्ञा दिली. १९०४ पासून १९४३ पर्यंत त्यांनी केलेल्या लिखाणात या कीलप्रदेशाचे किंवा नंतर नाव दिलेल्या मर्मभूमीचे क्षेत्र त्यांनी हळहळू वाढविले. पण ते मात्र तेवढेसे पटत नाही. कारण त्यात जवळजवळ सर्व युरेशियाच अंतर्भुत केला. त्याची कल्पना येण्यासाठी त्यांनी सुरुवातीस मानलेली मर्मभूमी व किनारभूमी ही नकाशा क्र. २ मध्ये दाखविली आहे. असो, या विवरणानंतर मॅकिंडर यांनी जो जगप्रसिद्ध सिद्धान्त मांडला तो असा–

जो कोणी पूर्व युरोपावर स्वामित्व करील तो मर्मभूमीचा अधिपती होईल.

जो कोणी मर्मभूमीवर स्वामित्व करील तो जगद्वीपाचा अधिपती होईल.

जो कोणी जगद्वीपावर स्वामित्व करील तो जगाचा अधिपती होईल.

अनेक भूगोलशास्त्रज्ञांनी या सिद्धान्ताला आक्षेप घेतलेले आहेत. त्याचप्रमाणे या सिद्धान्तावर आधारित किंवा त्याशी सह-मताचे विचारही मांडलेले आहेत. जर्मनीमध्ये पहिल्या महायुद्धात

लढलेले एक अधिकारी जनरल हाउस्होफर् हे त्या युद्धानंतर एका युनिव्हर्सिटीत प्राध्यापक झाले. त्यांनी भू-राज्यशास्त्रावर (geopolitics) पुस्तके लिहिली. त्यांच्यावर मॅकिंडरच्या सिद्धान्ताचा बराच प्रभाव पडला होता. हिटलरप्रणीत नात्सी विस्तार-वादाला पोषक असे ते लिखाण होते. यावरून जर्मनीची अधिक वसनक्षेत्र (lebensraum) मिळविण्याची धडपड व त्यासाठी रशियाविरुद्ध केलेली स्वारी ही मॅकिंडरच्या सिद्धान्ताप्रमाणेच पूर्व युरोपवर स्वामित्व प्रस्थापून अखेरीस जगाचे आधिपत्य मिळ-विण्यासाठीच होती, असे म्हणावयास हरकत नाही.

मॅकिंडर यांच्याप्रमाणेच १९४४ साली स्पिक्मन् यांनी वरील सिद्धान्त घेऊन त्याला निराळेच वळण दिले. ते अमेरिकन आहेत. त्यांना समुद्रबलापेक्षा व वायुबलापेक्षा भूबलाला अधिक महत्त्व दिलेले पटले नाही. त्यांचे मत त्यांनी मांडले ते असे : “ जो कोणी किनारभूमीवर ताबा ठेवील तो युरेशियाचा अधिपती होईल आणि जो कोणी युरेशियावर ताबा ठेवील तो जगाचा अधिपती होईल.” १९४४ साली त्यांनी असे प्रतिपादन केले की, युनायटेड स्टेट्स सोव्हिएट् युनियन व ब्रिटन यांना मॅकिंडरप्रणीत किनारभूमीवर ताबा ठेवण्याची आवश्यकता भासेल. आणि या किनारभूमीमधील परस्परसंबंध व आपसातील दळणवळण समुद्रबलाच्या साहाय्यानेच शक्य असल्यामुळे समुद्रबलशाली राष्ट्रांस मर्मभूमीवर चहूकडून दबाव आणता येईल. स्पिक्मन् यांच्या विचारांचा प्रभाव अमे-रिकेच्या जागतिक युद्धपट-योजनांवर पडून त्यांनी त्यांच्या पर-राष्ट्रीय नीतीची आखणी केली किंवा स्वतंत्रपणे दुसऱ्या महायुद्धा-नंतर जी वस्तुस्थिती होती त्यामुळे किनारभूमीवरील राष्ट्रांसह त्यांनी संरक्षण-गट उभे केले हे सांगणे कठीण आहे, पण त्या दोन्हीं-तील मूळ कल्पना समान आहेत.

मॅकिंडर-सिद्धान्ताविरुद्ध सर्वांत मोठा आक्षेप घेतला जातो तो असा की दिवसानुदिवस अधिकाधिक वेगवान, दूरगामी व भारवाहू होत जाणाऱ्या विमानदलाच्या संहारक्षमतेचा किंवा

प्रक्षेपणास्त्रांमुळे होणाऱ्या विध्वंसाचा त्यांनी विचार केला नव्हता. आधुनिक युद्धाचे संहारक्षेत्र त्यामुळे इतके वाढले आहे की, जगात असा भूप्रदेश किंवा समुद्र नाही की जो त्या आयुधांच्या कक्षेत येत नाही. समुद्रवलापासून व भूमिवलापासून सुरक्षित वाटणारा प्रदेश आता अवकाशवलामुळे अतिभेद्य झालेला आहे. त्यामुळे जगात कोठेही पूर्णपणे सुरक्षित असा कील-प्रदेश किंवा मर्मभूमी शिल्लकच राहिलेली नाही. या नवीन अवकाशगामी अस्त्रांनी मध्यभागी राहून चार दिशांस विखुरलेला मारा करण्यापेक्षा, घेरा घालून मध्यभागी असलेल्या प्रतिस्पर्ध्यावर केंद्रित मारा करणे अधिक कार्यसाधक असते.

दुसरा एक आक्षेप असा घेतला जातो की, मॅकिंडरांच्या काळी (१९०४ साली) भूगोलशास्त्रज्ञ जगाचा नकाशा बघत तो मर्केटर प्रक्षेपणाने (Mercator projection) एका सपाट पृष्ठावर काढलेला असे. प्रत्यक्ष पृथ्वीगोलावर नजर फिरविली व उत्तर ध्रुवाच्यावरून पृथ्वीकडे पाहिले तर उत्तर अमेरिका व युरेशियातील ही मॅकिंडर-प्रणीत मर्मभूमी हे दोन्ही प्रदेश लहानशा आर्क्टिक महासागराच्या विरुद्ध किनाऱ्यावर एकमेकांपासून जवळ आहेत असे दिसून येईल. तो महासागर इतका लहान आहे की त्याला ध्रुव-भूमध्यसमुद्र असे नाव अधिक सार्थ होईल. तेथील हवामानामुळे एके काळी हाल-चालीस अशक्य वाटणारा हा भाग आता तांत्रिक प्रगतीमुळे सर्व प्रकारच्या दळणवळणास खुला झालेला आहे. विमाने व पाणबुड्या तेथे सहज संचार करू लागल्या आहेत. बर्फ फोडणाऱ्या नौकांच्या साह्याने बंदरात जाण्यायेण्याचे मार्ग खुले करता येतात. त्याचप्रमाणे पूर्वगोलार्धात मॅकिंडरप्रणीत एक मर्मभूमी आहे असे जर मानले, तर तशीच उत्तर अमेरिकेतही कॅनडा व युनायटेड स्टेट्स यांसह एक मर्मभूमी आहे असे कबूल करावे लागेल. आणि लोकसंख्या, नैसर्गिक संपत्ती, तांत्रिक विकास व उत्पादनक्षमता या सर्व दृष्टीने युरेशियाच्या मर्मभूमीपेक्षा ती अधिक समृद्ध व जागतिक राजकीय पटावर व युद्धपटावर अधिक प्रभावी व जास्त महत्त्वाची

आहे असे मानावे लागेल.

हे खरे असले तरी आज रशिया व अमेरिका यांच्या अण्वस्त्राच्या अतिहनन-सामर्थ्यामुळे (over-kill capabiliy) जो भयसमतोल उत्पन्न झाला आहे, त्यामुळे या दोन्ही मर्मभूमी, त्यांच्या किनारभूमींच्या क्षेत्रात वर्चस्व मिळविण्याच्या स्पर्धेसाठी एकमेकांवर प्रहार करून आत्मघात करून घेतील हे संभवत नाही. अण्वस्त्रांव्यतिरिक्त केलेल्या वायुवलाच्या पूर्वरूढ (conventional) आघातांचे पर्यवसान अखेर अण्वस्त्राघातात होण्याचा संभवही वराच असल्याने तोही होणे असंभाव्य आहे. तेव्हा युरेशियाची मर्मभूमी किंवा अमेरिकेतील मर्मभूमी या दोन्ही तात्त्विकदृष्टचा भेद्य असल्या तरी प्रत्यक्षात तसा प्रहार कोणी करणार नाही असे कबूल करावे लागते. निदान ते असंभाव्य आहे असे मानण्यास हरकत नाही. फार काय, या भयसमतोलाचे परिणाम असे झालेले आहेत की रशिया व अमेरिका ही दोन्ही राष्ट्रे एकमेकांसमोर युद्धपवित्रा घेऊन उभी होणे (direct confrontation), अर्थातच त्यांच्या स्वतःच्या सुरक्षिततेस अत्यंत वर्मी लागणारा किंवा घातक धोका उद्‌भवेपर्यंत, शक्य नाही.आणि तसा धोका उत्पन्न करण्यास, हा भयसमतोल टिकून आहे तो पावेतो, त्या दोघांपैकी कोणीही धजणार नाही.

असो, याचा अर्थ असा की मॅकिंडरप्रणीत मर्मभूमी ही सध्याच्या अण्वस्त्र कालातही बरीच सुरक्षित आहे आणि, रशियाने अमेरिकेशी प्रत्यक्ष सामना करावा लागेल असे कोणतेही साहस केले नाही तर, त्या मर्मभूमीच्या आधाराने त्यावाहेर सर्व दिशांस विस्तार करण्यास, राजकीय दबाव आणून इतरांस आपले अंकित वनविण्यास किंवा आपल्या विशिष्ट तत्त्वप्रणालीचा प्रसार करण्यास त्याला पूर्ण मुभा मिळाली आहे. म्हणजे मॅकिंडरचा सिद्धान्त आज विशेषच लागू पडत आहे; असे म्हणावे लागेल. आणि जसजशी त्या मर्मभूमीतील लोकसंख्या वाढून, तेथील नैसर्गिक संपत्तीचा पूर्ण उपयोग करून तेथील तांत्रिक उत्पादन वाढेल व रेल्वे आदी

दळणवळणाची साधने अधिक प्रमाणात उपलब्ध होतील, तसतशी “ जगद्वीपा ”वर (युरेशिया व आफ्रिका) आपली सत्ता प्रस्थापित करण्याचे रशियाचे प्रयत्न अधिकाधिक कसोशीने व योजनापूर्ण होऊ लागतील. त्यावरहुकूम मर्मभूमीवरील राज्यकर्त्यांचा, म्हणजे रशियाचा, दबाव आजही चारी दिशांस भासू लागला आहे.

दोन महायुद्धांमधील काळात मॅकिंडर यांच्या सिद्धान्ताचे एक अभ्यासक जनरल हाउसहोफर् हे जर्मनीत होऊन गेले; हे पूर्वी सांगितलेच. त्यांनी मांडलेल्या तत्त्वांमुळे नात्सी जर्मनीने जगाच्या साम्राज्यासाठी प्रयत्न केले. रशियात असा एखादा हाउस्-होफर् झाला आहे किंवा नाही हे नकळे. पण स्टालिन् यांच्या दुसऱ्या महायुद्धातील राजकीय आकांक्षावर व उद्दिष्टांवर मॅकिंडर यांच्या सिद्धान्ताची छाप पडली असावी असे वाटते. अर्थात रशियात त्याची कबुली कोणी देणार नाही. तसा सिद्धान्त एखाद्या पॉपोव्हस्कीने मॅकिंडरांपूर्वीच रशियात मांडला होता असेही कदाचित ते म्हणतील. काही असो, त्या सिद्धान्तावरहुकूम रशियाची पावले कशी पडत आहेत ते पाहणे आज महत्त्वाचे आहे. त्याचा आपण विचार करू.

मध्य युरोपीय राष्ट्रांवरील ताबा

दुसऱ्या महायुद्धकाली जर्मनीविरुद्ध आक्रमण करण्याच्या वेळी पूर्वेकडील व पश्चिमेकडील मित्रसेनांची विभाजक रेषा (dividing line) एल्बे नदी असावी असे याल्टाच्या परिषदेत ठरविले गेले आणि त्या नदीच्या पूर्वेकडील सर्व युरोपीय राष्ट्रे साहजिकच रशियाच्या प्रभाव–कक्षेत (sphere of influence) सामील केली गेली. खरे म्हटले तर जर्मनीची अखेरची पूर्व व पश्चिम जर्मनीत विभागणी एल्बे नदीच्या अनेक मैल पश्चिमेसच झाली. त्या योजनेमागे स्टालिन् हेच सूत्रधार होते. चर्चिल यांनी

जरी त्यास तीव्र विरोध दर्शविला असला तरी रूझवेल्ट यांचे वजन स्टालिनच्या बाजूने पडल्यामुळे त्यांचे काही चालले नाही.

मध्य युरोपात १९५६ साली हंगेरीतील जनतेचे रशियाने केलेले कर्दन आणि आता १९६८ साली च्छेकोस्लोव्हाकियावरील आक्रमण आणि इतर फुटीर साम्यवादी यांविरुद्धही तसे करण्याची त्यांनी दिलेली तंबी ही युद्धपश्चात् स्टालिनवादी योजनेवरहुकूम या सर्व राष्ट्रास आपल्या प्रभावळीत जबरीने ठेवण्यासाठीच आहे हे दिसून येईल.

हा सर्व मुलूख रशियाला नेटो संघटनेविरुद्ध आघात-शोषक (buffer) म्हणून उपयुक्त असला तरी त्यामागे पूर्व युरोपीय राष्ट्रांविरुद्ध केलेली प्रत्येक आक्रमक कृती ही मॅकिंडरच्या सिद्धान्ता-प्रमाणे पुढे टाकलेले एक एक पाऊल आहे असाही करता येतो. निदान संपूर्ण जर्मनी नाही तर अर्धा जर्मनी व इतर मध्य युरोपीय राष्ट्रांची तरी एकजूट त्यामुळे साधते. आणि त्यांच्या शासनाखालील मर्मभूमीच्या बलवर्धनाला ती पूरक होते. (मर्मभूमीबद्दल मॅकिंडर यांचे पूरक विचार क्र. ६ पाहा) पश्चिम जर्मनीमध्ये नात्सीवाद पुन्हा येऊ पाहात आहे व त्याविरुद्ध बल वापरण्याचा रशियाचा हक्क आहे अशी रशियन नेत्यांची भाषाही तेच दर्शविते.

भोवतालच्या राष्ट्रांवरील दबाव

मॅकिंडरनी लिहिले होते की ही मर्मभूमी प्रबल झाल्यावर शेजाऱ्यांविरुद्ध तिच्या दबावास प्रारंभ होईल. त्यांनी दिलेल्या राष्ट्रांच्या यादीपैकी युगोस्लाव्हिया हे सुरुवातीस रशियाच्या अंकितांपैकीच एक होते. पण मार्शल टिटो जरा कडवे असल्यामुळे, स्टालिन यांच्या अरेरावीस कंटाळून त्यानी आपल्या राष्ट्रास रशियाच्या जांबुवंती मिठीतून सोडविले. ग्रीसविरुद्ध साम्यवादी

बंडाचा प्रयोग १९४८ साली झाला. तुर्कस्तानविरुद्ध रशियाचा दबाव अधूनमधून चालू आहेच. ग्रीस, तुर्कस्तान व युगोस्लाव्हिया या राष्ट्रांशिवाय इतर बाल्कन राष्ट्रे गेल्या महायुद्धानंतर रशियाच्या प्रभावळीतच आलेली आहेत. फिनलंड जरी स्वतंत्र असले तरी ते बिचारे राष्ट्र बरेचसे रशियाच्या तंत्रानेच आज वागत आहे, इराक, इराण व हिंदुस्थानला लष्करी किंवा इतर मदत करून व आर्थिक मदतीच्या आमिषाने रशिया आपल्या प्रभावळीत आणीत आहे. तेव्हा या बाबतीतही त्याच्या राजकीय कृती मॅकिंडरच्या सिद्धान्ताशी जुळत्या आहेत. आता तर रशियाचा दबाव या राष्ट्रांच्याही पलीकडे असलेल्या आशिया व आफ्रिका खंडांतील प्रदेशावर पडू लागला आहे. उदा. सिरिया, इजिप्त, यमन, सोमालिया, उत्तर व्हिएटनाम इ. (मॅकिंडर यांचे पूरक विचार क्र. ४)

समुद्रबळाची वाढ

"या मर्मभूमीवरील राज्यकर्त्यांचे बल जगातील इतर बलशाली राष्ट्रास शह देण्याजोगते झाल्यावर, त्याची नजर आपले समुद्रबळ वाढविण्याकडे वळेल आणि तसे झाले म्हणजे जगाचे साम्राज्य त्यांच्या डोळ्यासमोर दिसू लागेल" असे मॅकिंडरनी लिहिले. अगदी त्याबरहुकूम रशियाने आपले समुद्रबळ गेल्या काही वर्षांत झपाट्याने वाढविण्यास सुरुवात केली आहे. (पूरक-विचार क्र. ५.)

आजपर्यंत थोडेबहुत निष्क्रिय असलेले त्यांचे आरमार उत्तरेस पेट्सामो व मुरमान्स्क, बाल्टिक व काळासमुद्र त्याचप्रमाणे पूर्वेस रशियाची पॅसिफिक महासागरावरील बंदरे (व्ह्लॉडिव्हॉस्टॉक व पेट्रोपॉव्हलोस्क) या त्यांच्या किनाऱ्याच्या आसपासच्या क्षेत्रातच क्रियाशील होते. पण आता ते पूर्व भूमध्यसमुद्र, हिंदी महासागर

इत्यादीत आपल्या बलाची जाणीव करून देऊ लागले आहे. इजिप्तच्या सध्याच्या असहाय अवस्थेचा फायदा घेऊन अलेक्झांड्रिया बंदराच्या आधारावर रशियाच्या आरमाराचा एक मोठा काफिला पूर्व भूमध्यसमुद्रात कायमचे ठाण देऊन उभा आहे; तर भारता-बरोबरच्या मैत्रीचे प्रतीक म्हणून त्यांच्या पॅसिफिक काफिल्यातील काही नौका मुंबई, मद्रास इ. बंदरांस भेट देऊन गेल्या आहेत. शिवाय त्यांच्या गाठीभेटी इराणच्या आखातात व तांबड्या समुद्रात यमनला सुरू आहेत. त्या हळूहळू वाढत जातील यात शंका नाही. १९७१ नंतर सिंगापूर सोडून ब्रिटिश आरमार कायमचे युरोपीय क्षेत्रात परत जाणार हे ब्रिटनने घोषित केल्यानंतर, हिंदी महासागरात समुद्रबलाच्या दृष्टीने एक पोकळी उत्पन्न होणार आहे याची जाणीव सर्वांस आहे. या संदर्भात या गाठीभेटी आहेत यात काडीचीही शंका नाही. आपण ते कितीही नाकारले किंवा पाहण्याचे टाळले तरी, स्थानिक राष्ट्रांची आरमारे यापुढे अनेक वर्षे तरी कमकुवत राहणार असल्याने, ती पोकळी भरण्यासाठी स्थानिक राष्ट्रांपैकी कोणीच सध्या सज्ज नाही. आणि निसर्गात पोकळी राहू शकत नसल्यामुळे फक्त ती कोणी भरावयाची हा प्रश्न इतरांनीच ठरवावयाचा आहे.

रशियाची आरमार बांधणी गेल्या काही वर्षांत त्यासाठी झपाट्याने सुरू झाली आहे व त्यांनी आता विमानवाहू युद्धनौकाही बांधावयास सुरुवात केली आहे असे समजते. या सर्वांचा साकल्याने विचार केल्यास हे उघड आहे की हिंदी महासागरावर वर्चस्व ठेवण्यासाठी रशियाचा प्रयत्न सुरू झालेला आहे. त्यात त्यांना यश येईल किंवा नाही हे कालांतराने दिसून येईल.

साम्यवादविरोधी गटाचे सीमाबद्धतेचे प्रयत्न

रशियाच्या साम्राज्यांतर्गत मर्मभूमीचे महत्त्व जाणून त्या राष्ट्राच्या प्रसार-लालसेला व त्याच्या प्रभावळीतील इतरांना

त्यांच्या सीमांतच रोखण्यासाठी म्हणजे त्यास सीमाबद्ध करण्यासाठी (containment) अमेरिका व त्यासह इतर साम्यवाद–विरोधी गट प्रयत्न करीत आहेत. त्या मर्मभूमीभोवतालची किनारभूमी व त्या पलीकडील बेटे यासह अनेक संयुक्त आघाड्या बनवून हा प्रयत्न चाललेला आहे. नेटो, सेंटो किंवा सीटो या संरक्षण संघटना, जपान, दक्षिण कोरिया इत्यादी राष्ट्रांशी अमेरिकेचे परस्पर संरक्षण करार हे सर्व त्या प्रीत्यर्थच आहेत. मॅकिंडर यांच्या सिद्धान्ताऐवजी स्पिक्मन् यांच्या सिद्धान्ताची छाया त्यावर पडली आहे असे वाटते. त्यांच्या मते– " किनारभूमीवर जो ताबा ठेवील तो युरेशियाचा व अखेरीस जगाचा अधिपती होईल." जगाचे आधिपत्य जरी त्यामुळे लाभले नाही तरी आधिपत्यासाठी प्रयत्न करीत असलेल्या मर्मभूमी-शासक राष्ट्राला तरी त्याच्या सीमेत स्थानबद्ध करावे हा त्या मागील हेतू स्पष्ट दिसतो. पण तो विशेषसा सफल होत नाही असेही दिसते आहे. आज तरी किनारपट्टीच्या देशात मर्मभूमी-राजवटीचे शिरकाव अधिक सफल होत आहेत. तेव्हा स्पिक्मन् यांच्या सिद्धान्ताऐवजी मॅकिंडर यांच्या सिद्धान्तातच अधिक तथ्य आहेसे दिसते.

अंतर्गत-रेषा व बहिर्गत-रेषा– त्यांचे फायदे-तोटे

युद्ध-पटकौशल्यात (war strategy) सर्वांत महत्त्वाची बाब युजगतिस्वातंत्र्य (freedom of manoeuvre) ही आहे. युद्धापूर्वी सैन्याच्या संकलनाच्या वेळी नियोजित ठिकाणी, नियोजित शक्ती, नियोजित वेळी उभी करण्यासाठी आणि त्यानंतर त्या सेनेला आवश्यक रसद पोचविण्यासाठी किंवा प्रत्यक्ष लढा सुरू झाल्यावरही अशा " गतीला " प्राधान्य असते. शत्रूच्या विरुद्ध नियोजित ठिकाणी पोहचावयास गती तर हवीच पण अंतरही शक्यतो कमी असणे आवश्यक असते. गतीसाठी अवश्य वेग हा, काय वाहतूक-साधने उपलब्ध आहेत त्यावर अवलंबून असतो. अंतर हे सेनेच्या स्थाना-पासून नियोजित युद्धक्षेत्र किती दूर आहे त्यावर अवलंबून असते.

मध्यवर्ती भौगोलिक स्थितीतील राष्ट्र व त्याभोवतालची त्याला विरोध करणारी राष्ट्रे यांमध्ये युजगतीच्या बाबतीत मध्यवर्ती राष्ट्रास उघड फायदा मिळतो. एखाद्या वर्तुळाच्या आत असलेल्या आणि त्याच्या परिघाबाहेरील अशा या दोन प्रकारच्या राष्ट्रांशी त्यांची तुलना करता येईल. वर्तुळात कोठेही पोहोचावयाचे असले तरी त्या वर्तुळाच्या व्यासापेक्षा अधिक अंतर कधीच काटावे लागत नाही. या उलट परिघावरील कोणत्याही बिंदूपासून दुसऱ्या बिंदू-पर्यंत परिघाबाहेरच्या मार्गाने अंतर बहुधा अधिक असते. यालाच लष्करी भाषेत अनुक्रमे "अंतर्गत रेषांवरील क्रिया" (operations on interior lines) व "बहिर्गत रेषांवरील क्रिया" (operations on exterior lines) असे म्हणतात. अर्थातच त्यासाठी त्या मध्यवर्ती राष्ट्रातील वाहतूक साधनांची (रेल्वे मार्ग, सड़का इ.) सर्व दिशांस पोचण्यासाठी युद्धपट योजनेबरहुकूम वाढ झाली असली पाहिजे. तशी ती झालेली असेल तर बहिर्गत शत्रूच्या कोणत्याही दिशेकडून येणाऱ्या धोक्याविरुद्ध मध्यवर्ती राष्ट्राला सैन्यबलाचे केंद्रीकरण अत्यंत त्वरित करता येते; एवढेच नव्हे तर एकाहून अधिक दिशांनी होणाऱ्या आक्रमणाविरुद्धही सैन्य सहज हलविता येते.

केवळ आधुनिक विमानांच्या वेगामुळे अशा घेरलेल्या राष्ट्राला स्वसंरक्षणासाठी आपले विमानदल व इतर संरक्षक साधने विखरून ठेवावी लागतात. वैमानिक हल्ल्यास मात्र असा मध्यवर्ती देश अधिक भेद्य असतो. रशियाची साम्राज्यांतर्गत मर्मभूमी ही अशीच मध्यवर्ती आहे. आणि जरी ती चारी दिशांकडून येणाऱ्या हवाई हल्ल्यास भेद्य असली तरी त्यामुळे अंतर्गत रेषांचे इतर फायदे तिला मिळतात. या प्रदेशातील वाहतूक साधने शक्य तो वाढविण्याचा व वेगवान करण्याचा प्रयत्न रशियाने गेल्या पन्नास वर्षांत केला आहे. अनेक रेल्वेमार्ग व सडका यांचे जाळे तेथे उत्पन्न केले आहे. वैमानिक वाहतुकीसाठी विमान-तळ उभारले आहेत आणि विशेषतः ट्रान्ससैबेरियन रेल्वेमार्ग दुहेरी

व काही ठिकाणी तिहेरी व चौहेरी केला आहे. अनेक रेल्वेचे फाटे चीनच्या, अफगाणिस्तानच्या व इराणच्या सरहद्दीपर्यंत येऊन भिडले आहेत. युरोपीय रशियातील मॉस्कोप्रमाणेच उरल पर्वताच्या पूर्वेस स्वेर्डलोव्ह्स्क हे या रेल्वेमार्गाचे मर्मभूमीतील महत्त्वाचे केंद्र झाले आहे. या उलट युरेशियाच्या अनेक द्वीपकल्पांचे आपसातील दळणवळण युरेशियाच्या परिघाबाहेरील लांबवर समुद्रमार्गानेच होऊ शकते. वैमानिक वाहतूक युद्धकाली लागणाऱ्या सामग्रीस पुरी पडणार नाही. शिवाय अशा विमानांच्या उड्डाणास इतर देश मज्जाव करू शकतात. असो, हे सर्व सांगण्याचा उद्देश असा की मॅकिंडर यांच्या सिद्धान्ताप्रमाणे या मर्मभूमीत वाहतुकीच्या गती-साठी योग्य त्या योजना आखून त्या भागास रशियाने बलशाली बनविले आहे. आता या जागतिक परिस्थितीचे परिणाम युरेशिया खंडाच्या पूर्वी वर्णिलेल्या द्वीपकल्पांवर म्हणजे मॅकिंडरप्रणीत मर्म-भूमीच्या भोवतालच्या किनारभूमीवर व त्याही पलीकडील बेटांवर व जलविस्तारांवर होत आहेत. त्यासाठी उत्तरेकडून सुरुवात करून डाव्या वळशाने प्रत्येक भूप्रदेशाचे निरीक्षण करून त्या ठिकाणी मॅकिंडर सिद्धान्तावरहुकूम काय घटना होत आहेत याचा शोध घेऊ.

५

ध्रुव— भूमध्यसमुद्राचा प्रदेश व पश्चिम युरोप

याला खरोखर आर्क्टिक महासागर म्हणतात, पण भूमध्य समुद्राप्रमाणेच दोन्ही बाजूंस आशिया व उत्तर अमेरिका खंड व अनेक लहान-मोठी बेटे असलेला तो एक भू-वेष्टित समुद्र आहे, हे पूर्वी सांगितलेच. आधुनिक तांत्रिक प्रगतीमुळे भूपृष्ठावरील आणि समुद्रांतर्गत वाहतुकीसाठी तो खुला झाला आहे. त्यामुळे कॅनडाच्या उत्तरेकडील बेटे व त्यामागील कॅनडा व यु. स्टेट्स यांच्या आघात-कक्षेत आपण परीक्षणास घेतलेली रशियांतर्गत

मर्मभूमी येते. पहिले दोन्ही देश नेटो संघटनेत असल्यामुळे मर्मभूमीतील राष्ट्रबलाचा संहार हा नेटोच्या युद्धपट-योजनेतील एक महत्त्वाचा भाग समजला पाहिजे. परंतु नेटोच्या क्षेत्रात संघर्ष होऊन त्या संघर्षाचे रूपांतर परस्पर अण्वस्त्राघातात होईल हे सध्याच्या भयसमतोलामुळे अशक्य नसले तरी असंभाव्य आहे हेही आपण पाहिले आहे.

अशा समतोलाचा एक फायदा झाला आहे, तो म्हणजे ही मर्मभूमी भेद्य असल्याची जाणीव रशियास पूर्णपणे आलेली आहे व नेटोक्षेत्रात तर नव्हेच पण इतरही क्षेत्रांत बळेच व उघड आक्रमण करून यु.स्टेट्सविरुद्ध समोरासमोर पवित्रा (direct confrontation) घेण्याचे रशिया टाळत आहे. तीच स्थिती यु. स्टेट्सचीही आहे. कारण ते राष्ट्रही तितकेच भेद्य आहे. त्यामुळे जगाच्या राजकीय पटावर जे डाव खेळले जात आहेत ते, तसा पवित्रा घेण्याचा प्रसंग येऊ नये एवढ्यापुरतेच. प्रत्यक्ष आक्रमणाला वाव नसल्यामुळे स्थानिक राष्ट्रांमधील आपापसांतील संघर्षाचा फायदा घेऊन किंवा त्या त्या राष्ट्रातील अंतर्गत अस्वास्थ्याला भडकावयास इंधन घालून, एका गटास दुसऱ्याविरुद्ध उठाव करण्यास उत्तेजन देऊन अथवा त्यांना शस्त्रास्त्रांची मदत करून, हस्ते-परहस्ते आपले वजन प्रस्थापित करण्याचे प्रयत्न होत आहेत. याची उदाहरणे आज जगात उघड दिसत आहेतच. त्याबद्दलचा व पुढे होणाऱ्या त्याच प्रकारच्या घट-नांचा ऊहापोह त्या त्या क्षेत्राची पाहणी करताना केलेला आहे.

फिनलंड व इतर बाल्टिक राष्ट्रे

जर्मनीने गेल्या महायुद्धात रशियाशी युद्ध सुरू करण्यापूर्वी रशियाने फिनलंडवर स्वारी केली होती. सुरुवातीस आलेल्या अपयशा-नंतर केवळ सैन्यभाराने रशियाने अखेरीस फिनलंडचा पराभव केला आणि त्यांचे आर्क्टिक महासागरावरील पेट्सामो बंदर व त्यांस पूरक अशी त्यामागील काही भूमी, लादोगा सरोवराच्या उत्तरे-

कडील काही प्रदेश आणि व्हायबोर्ग हे बंदर १९४० साली झालेल्या मॉस्कोच्या तहानंतर रशियाने आपल्या साम्राज्यास जोडले. दुसऱ्या महायुद्धात जर्मनीचा पराभव झाल्यानंतर एस्टोनिया, लॅटव्हिया व लिथुएनिया ही बाल्टिक समुद्रावरील स्वतंत्र राष्ट्रे खालसा करून रशियाने गिळंकृत केली. व पूर्व जर्मनीतील क्योनिग्जबर्ग (आता नवे नाव कालिनिन्ग्राड) हे बंदरही आपल्या स्वामित्वाखाली आणले. यामागे हिवाळ्यात बर्फविरहित बंदरे मिळविण्याचा (पेट्सामो हे उत्तरेस असूनही गल्फस्ट्रीमच्या उष्ण समुद्रप्रवाहामुळे इतर बंदरांपेक्षा कमी थिजते) आणि बाल्टिक समुद्राच्या पश्चिम मुखापासून तो व्हायबोर्ग बंदरापर्यंत त्या समुद्राचा पूर्व-किनारा आपल्या ताब्यात आणण्याचा उद्देश उघड होतो. त्यामुळे त्या दोन्ही समुद्रात रशियाच्या नाविक दलाचे संचारस्वातंत्र्य व वर्चस्व साधते. पूर्व जर्मनी व पोलंड ही रशियाची मांडलिक संस्थाने झाल्यामुळे बाल्टिक समुद्रात आता रशियाच्या आरमारास शह देणारी शक्तीच शिल्लक राहिलेली नाही. मॅकिंडरप्रणीत मर्मभूमीच्या राज्यकर्त्यांनी आपल्या आरमाराची वाढ केल्यास जागतिक स्वामित्वाकडे त्याचे पाऊल कसे पडत जाईल याचे हे एक उदाहरण आहे. बाल्टिक समुद्राचा ताबा आता संपूर्णपणे रशियाच्या हाती आहे आणि तो त्यापासून हिरावून घेण्याची शक्ती मध्य युरोपातील सध्याच्या राजकीय परिस्थितीत कोणाचीच नाही.

स्कँडिनेव्हिया व पश्चिम युरोप द्वीपकल्प

ही दोन्ही द्वीपकल्पे विचारार्थ एकत्र घेण्याचे कारण असे की, स्कँडिनेव्हियातील स्वीडन व प. युरोपातील फ्रान्स* व स्वित्झर्लंड वगळता दोन्ही द्वीपकल्पांतील सर्व राष्ट्रे संरक्षणदृष्टया नेटोच्या संरक्षणकरारात सामील आहेत. स्वीडनने जरी सुरुवातीपासून नेटोत

* फ्रान्स गतवर्षीच नेटोतून बाहेर पडला आहे याचे कारण, जनरल द गोल यांच्या व्यक्तिमत्त्वाशी निगडित आहे; फ्रेंच जनतेच्या इच्छेशी

जाण्याचे वरकरणी नाकारले असले (तेही रशियास उगीच डिवचू नये म्हणून) व तो देश आपणांस तटस्थ किंवा अलिप्त म्हणवीत असला, तरी त्या राष्ट्राचे स्वातंत्र्यरक्षण हे नेटो संघटनेस अत्यावश्यक आहे. स्वीडनविरुद्ध रशियाने आणलेला कोणताही दबाव नेटो राष्ट्रे सर्व शक्तीने हाणून पाडतील यात शंका नाही. स्वीडनला याची खात्री आहे. फिनलंडच्या बाबतीत नेटोला ती भूमिका घेता येणार नाही. रशियाने फिनलंडला स्वतंत्र ठेविले आहे तेही नेटो राष्ट्रे व उत्तर रशिया यांमधील एक आघातशोषक राष्ट्र (buffer state) यासाठी त्याचा उपयोग होईल म्हणून.

नेटो संघटनेमुळे या दोन्ही द्वीपकल्पांत रशियाची प्रसारेच्छा मध्ययुरोपातील नवसाम्यवादी राष्ट्रांपुरतीच सीमाबद्ध (contained) झालेली आहे. नेटो करारांतर्गत कोणत्याही राष्ट्राविरुद्ध रशियाने चढाई केल्यास नेटो सेना अण्वस्त्रे वापरील अशी सक्त ताकीद दिलेली असल्यामुळे, सध्या तरी रशियाच्या शस्त्रबलाला प्रतिबंध (deterrence) झालेला आहे. पश्चिम युरोपात व स्कँडिनेव्हियात कोठेही तत्त्ववादी क्रांती न होता सध्याची राजकीय परिस्थिती कायम राहिली तर, साधारणत: स्वीडन-नॉर्वेपासून ग्रीस व तुर्कस्थानपर्यंत मर्मभूमिशासक रशियाची प्रसारेच्छा रोखली जाईल. म्हणूनच सध्या तेथे स्थैर्य आहे.

त्याचप्रमाणे युगोस्लाव्हियाही रशियाच्या भक्ष्यस्थानी पडू न देणे व रशियाच्या आरमारासाठी एड्रियाटिक समुद्रात आधार-

---

नाही. बाहेर पडूनही स्वतंत्रपणे नेटोच्या संरक्षण योजनेत भाग घेण्याची इच्छा फ्रान्सने व्यक्त केलेली आहे. या राष्ट्राला आपसूकच नेटोकडून संरक्षण मिळत आहे; पण नेटोच्या युद्धात पडावयाचे की नाही याबद्दलचे स्वातंत्र्य त्यांनी हाती ठेवले आहे. युद्धकाली त्यास बाहेर राहणे कठीण आहे. चेकोस्लोव्हाकियात रशिया घुसल्यापासून नेटोच्या संरक्षण-चर्चेत फ्रान्स पुन्हा भाग घेऊ लागला आहे.

स्थाने (bases) न मिळू देणे, हेही नेटो संघटनेचे उद्दिष्ट असल्याने त्या राष्ट्रावरही नेटोचे अघोषित व अदृश्य संरक्षण-छत्र पसरलेले आहे.* महायुद्धानंतर लौकरच स्टालिन्शी टीटोचा बेबनाव झाला त्या वेळी त्याची प्रचीती युगोस्लाव्हियास आलेली आहे. आज युगोस्लाव्हिया रशियाशी इतरांपेक्षा जरा फटकून वागण्याची (स्वतःस अलिप्त म्हणत असताना) हिंमत करतो, याचे कारण त्यास या छत्राची पूर्ण जाणीव आहे. नेटोविरुद्ध रशियाच्या नेतृत्वाखाली मध्य युरोपीय राष्ट्रांच्या (अथवा रशियाच्या प्रभावळीतील मांडलिकांचा) वॉरसा करार झालेला असला तरी त्यामुळे अधूनमधून बर्लिनचा प्रश्न चिघळविण्यापलीकडे किंवा जर्मनीविरुद्ध दोषारोप करण्यापलीकडे सध्या तरी त्यांची मजल जाईल असे वाटत नाही.

त्याशिवाय मध्य युरोपीय राष्ट्रांतही रशियाची जरब झुगारून देण्याचे प्रयत्न एकसारखे होत आहेत. १९५६ साली हंगेरी आणि गतवर्षी च्छेकोस्लोव्हाकिया यांत नुकतीच (१९६८) सेना पाठवून, रशियाने आपल्या साम्राज्यवादी भूमिकेची ग्वाही दिली. रुमानियाच्या व काही अंशी पोलंड आणि पूर्व जर्मनीच्याही जनतेच्या मनात रशियाचे जू झुगारून देण्याच्या भावना दिसून येत आहेत. ते अंकुर मुळातच खुडून टाकणे रशियास अवश्य आहे आणि तसे तो करीत आहे.

ह्या संदर्भात भावी घटना कशा होतील हे जरी आज ठामपणे सांगता आले नाही तरी सद्यःस्थितीत मॅकिंडरच्या सिद्धान्ताप्रमाणे संपूर्ण जर्मनी नाही तर निदान अर्धा जर्मनी व इतर पूर्व युरोपीय राष्ट्रे रशियाच्या कह्यात आहेत, आणि जगाच्या साम्राज्याप्रीत्यर्थ

---

* मा. टीटोनी च्छेकोस्लोव्हाकियाबद्दल आपले मत स्पष्ट मांडल्यापासून रशियाने युगोस्लाव्हियाविरोधी प्रचार सुरू केला व त्याविरुद्ध ते शस्त्रक्रिया करतील की काय अशी भीती आहे. वर दिलेल्या कारणासाठीच १८ ऑगस्ट १९६८ ला यु. स्टेट्सचे श्री. कात्सेन्बाख्, परराष्ट्रखात्याचे दुय्यम सचीव, यांनी मा. टीटो यांची भेट घेतली.

रशियाची वाटचाल सुरू झाली आहे असे म्हणावयास हरकत नाही. पण त्यासाठी ती राष्ट्रे रशियाची मांडलिक म्हणून जबरीने ठेवणे अवश्य आहे.

पृथ्वीवरील विसाव्या शतकातील हा एक नवा 'साम्यवादी साम्राज्यवाद' आहे. त्यावरहुकूम "साम्यवादी राष्ट्रांत फूट पडत असल्यास त्यास जरूर पडल्यास बलानेही साम्यवादास जखडून ठेवणे हे आमचे कर्तव्य आहे." अशा अर्थाची घोषणा रशियाने उघडपणे केलेली आहे. रशियाने त्यास आता "समाजवादी राष्ट्र-कुल" अशी संज्ञा दिली आहे. तेव्हा च्छेकोस्लोव्हाकियावरील आक्रमणाबद्दल आपल्याला आश्चर्य वाटावयाचे कारणच नाही. या शोककथेने आता एका नव्या साम्यवादी साम्राज्यशाहीलाच सुरुवात झाली आहे.

शीतयुद्धाच्या गटनेत्यांमध्ये भयसमतोल आहे तोपर्यंत आपण विचार करीत असलेल्या दोन्ही द्वीपकल्पांत विशेष राजकीय बदल होणे शक्य दिसत नाही. त्यांच्यापैकी प्रत्येकात अतिहनन सामर्थ्य (overkill capability) आल्यानंतर एकाजवळ दुसऱ्या-पेक्षा दुप्पट अस्त्रे आहेत किंवा कोणी किती उपग्रह सोडले याच्या तपशिलाला फारसे महत्त्व राहात नाही. पण यापैकी एकाने सध्याची तांत्रिक ज्ञानसीमा उल्लंघून (technological breakthrough) अधिक घातकी, नावीन्यपूर्ण अस्त्रे किंवा सध्याच्या अस्त्रांविरुद्ध प्रभावी संरक्षक आयुधे निर्माण केली तरच हा भयसमतोल बिघडेल. तसे झाले तर त्या राष्ट्राची राजकीयपटावरील व युद्धपटावरील युजगतिशीलता वाढेल व दुसऱ्यास त्यापुढे नमावे लागेल. नेटो व वार्सा कराराच्या बाबतीत याचीच दोन्ही राष्ट्रगट वाट पाहात आहेत असे दिसते. पण त्याबरोबरच या आपसातील शस्त्रशर्यतीची भयानकता जाणून सध्या आण्विक आक्रमक व संरक्षक अस्त्रांवर समझोत्याने आळा घालण्याचेही प्रयत्न चालू आहेत.

६

पश्चिम आशियातील किनारभूमी व अरब द्वीपकल्प

मॅकिंडरप्रणीत किनारभूमीतच युरेशियाची द्वीपकल्पे येतात. त्यांपैकी पश्चिम आशियातील प्रदेशाला आजकालच्या जागतिक अहमहमिकेच्या संदर्भात आगळे महत्त्व आलेले आहे. पूर्वी सांगितल्याप्रमाणे राजकीय संघर्षाचा गुरुत्वमध्य युरोपातून आशिया खंडाकडे सरकत चालला आहे. कारण स्कँडिनेव्हिया व पश्चिम युरोपच्या क्षेत्रात आता मागेपुढे सरकावयास जागतिक गटनेत्यांस वावच राहिलेला नाही. या उलट आशियातील व लगतच्या आफ्रिका

खंडातील प्रदेश नवस्वतंत्र व बहुतांशी अस्थिर असल्यामुळे तेथे राजकीय झिरपणीला व दबावाला मोकळीक मिळालेली आहे. त्यामुळे जागतिक शीतयुद्धाच्या गटनेत्यांचे प्रयत्न त्या भागात आपापले वजन प्रस्थापित करण्यासाठी चाललेले दिसतात.

या प्रदेशांसंबंधी काही भौगोलिक सत्ये व तेथील राजकीय घटना महत्त्वाच्या व विचार करण्यासारख्या आहेत. पश्चिम आशिया किंवा ज्याला पाश्चिमात्य मिड्‌ल्‌-ईस्ट म्हणतात, त्यात आफ्रिका खंडातील इजिप्तचा समावेश करणे अपरिहार्य आहे. त्याचप्रमाणे त्याशी सुदान, एथिओपिया व सोमालिया या राष्ट्रांचाही निकट संबंध येतो. अरब ही मानवजात तुर्कस्थानच्या दक्षिणेस संपूर्ण अरब द्वीपकल्पात व पश्चिमेस मोरोक्कोपर्यंत भूमध्यसमुद्राच्या किनाऱ्यावर पसरली आहे. सुदानीही आपल्याला अरबच समजतात. एके काळी अरबांनी हा सर्व मुलूख पादाक्रांत केला होता व ते हिंदुस्थानपर्यंतही आले होते. प्राचीन कालापासून ते दर्यावर्दी आहेत, आणि त्यांच्या समुद्रभ्रमणात ते मलाया–इंडोनेशियापर्यंत पोचले व त्याठिकाणी त्यांनी आपली राज्येही स्थापिली व मुसलमानी धर्मप्रसार केला. परंतु जगाच्या सांस्कृतिक, सामाजिक व तांत्रिक प्रगतीत ते नंतर मागे पडले व त्यांचा राजकीय अध:पात झाला. तुर्कांनी १४ व्या शतकानंतर आपला राज्यप्रसार केल्यानंतर त्यांचा बहुतेक प्रदेश तुर्की साम्राज्यात गेला. पहिल्या महायुद्धानंतर पाश्चिमात्य राष्ट्रांनी तुर्कांचा पराभव केल्यावर, त्यांची जागा घेतली व हा सर्व अरबव्याप्त प्रदेश ब्रिटन, फ्रान्स व इटली यांनी विभागून आपल्या छत्राखाली घेतला.

१९१७ साली लॉर्ड बॉलफोर यांनी घोषणा करून पॅलेस्टाइन-मध्ये यहुदी धार्मिकांसाठी 'स्वगृह-भूमी' (home-land) देण्याचे कबूल केले. स्वगृह याचा अर्थ काय हे मात्र स्पष्ट केले नाही. यहुद्यांनी अर्थातच याचा अर्थ यहुद्यांचे 'स्वराष्ट्र' असा केला, आणि तसे ते राष्ट्र आता इझराइल या नावाने तेथे प्रस्थापित झाले आहे. त्यांना ही अरबभूमी दान केल्याबद्दल अरबांच्या मनात अत्यंत कटू

भावना जागृत झाल्या आहेत व इझराइलचा पूर्ण नाश हे जणू अरबांचे ब्रीदवाक्य झाले आहे. आज तेथे उत्पन्न झालेले कूटप्रश्न त्यामुळेच सर्व जगाला भेडसावीत आहेत.

या प्रदेशासंबंधी चार भौगोलिक सत्ये महत्त्वाची आहेत. पहिले असे की, या प्रदेशात त्रिखंडांचा (म्हणजे युरोप, आशिया हे खंड वेगळे समजल्यास, त्यांचा आफ्रिकेसह) संगम होतो आणि त्यामुळे त्या तिन्ही खंडांतील राजकीय घटनांचे, आर्थिक व्यवहारांचे त्याचप्रमाणे सामाजिक व सांस्कृतिक प्रक्रियांचे हे एक सांघिक-स्थान पूर्वीपासून झालेले आहे.

संपूर्णतया दर्यावरील मार्गांचा शोध होण्यापूर्वी (१५ व्या शतकाच्या अखेरीपूर्वी) पूर्व गोलार्धाच्या भूभागांमधील दळणवळण युरोपातून इजिप्त किंवा सध्याच्या सिरियादी भूमध्यसमुद्रावरील देशावाटे, अनुक्रमे तांबड्या समुद्रावरील बंदरांत किंवा बसऱ्या-पर्यंत खुष्कीच्या मार्गाने चाले. चीनला जाण्याच्या खुष्कीच्या मार्गा-तही हे देश होते. सुवेझ कालवा खोदला गेल्यावर युरोपीय राष्ट्रांत त्यांच्या आशियाई व पूर्व आफ्रिकेतील साम्राज्यांशी असणारे संबंध त्या कालव्यातूनच ठेवले जात. त्यामुळे या भागाचे महत्त्व अधिकच वाढले व तेथे आपले वजन ठेवण्यासाठी साम्राज्यवाद्यांचा प्रयत्न जोरात चालू झाला. इजिप्तवर आपले वर्चस्व ठेवून त्या पाश्चात्त्यांपैकी इंग्रजांनी तो साधला. सुवेझ कालवा अस्तित्वात नसताही या दळणवळणाच्या केंद्राचे महत्त्व नेपोलियन जाणून होता. व त्याची इजिप्तवरील स्वारी ही ब्रिटिशांचे आशियाशी असणारे दळणवळण तोडून टाकण्यासाठीच केलेली होती. दुसऱ्या महायुद्धा-नंतर मात्र ही स्थिती पालटली असली तरी इजिप्त व इतर राष्ट्रे स्वतंत्र झाल्यावरही सुवेझवरचा पाश्चिमात्यांचा ताबा पूर्णपणे नाहीसा करण्यासाठी इजिप्तला युद्धास तोंड द्यावे लागले.

याशिवाय विमान वाहतुकीला गेल्या काही वर्षांत आलेल्या महत्त्वामुळे आणि युरोप ते मध्य व पूर्व आशियाप्रमाणे ऑस्ट्रेलिया-कडे जाणारे वायुमार्गही याच भूमीवरील आकाशातून जात असल्या-

मुळे हा भाग सर्व प्रकारच्या दळणवळणाचे केंद्रस्थान बनले. कायरो, बेरूट, दमास्कस, बघदाद, बसरा व अधिक दक्षिणेस धारान इत्यादी शहरे या मार्गावरील महत्त्वाचे हवाईतळ झाले. त्या विमानांचे तेथील देशावरून उड्डाण व त्यांना पुरविले जाणारे तेल-वंगणादी साहित्य तेथील राज्यांच्या इच्छेवर अवलंबून आहे. त्यांच्या सहकार्याशिवाय मुलकी दळणवळण किंवा लष्करी वाहतूक या विभागावरून चालू शकत नाही. दक्षिण आफ्रिकेस वळसा घालणारा जलमार्गच काय तो शिल्लक राहतो.

दुसरे असे की, भूमध्यसमुद्र आणि तांबडा समुद्र यांस जोडणाऱ्या सुवेझच्या कालव्यातून जाणारा जलमार्ग या अरब राष्ट्रांच्यामध्ये असलेला चिंचोळ्या तांबड्या समुद्रातून, नंतर बाब-एल्-मांडेबच्या सामुद्रधुनीद्वारा, एडनचे आखात व अखेरीस हिंदी महासागरात उतरतो. या मार्गावरील शांतिकालीन व विशेषत: युद्धकालीन वाहतूक यांच्या दोन्ही किनाऱ्यांवरील राष्ट्रांच्या राजकीय कलांवर अवलंबून आहे. त्यांच्या आरमारांकडून किंवा हवाईदलांकडून विरोध झाल्यास ती पूर्ण बंद पाडता येणे शक्य आहे. ज्याप्रमाणे इझराइलचे आयलाट् बंदर इजिप्तने शर्म-एल्-शेख येथे तोफांचे मोर्चे उभारून बंद पाडले तशीच बाब-एल्-मांडेबची सामुद्रधुनी पेरिम बेटावर तोफा ठेवून बंद पाडता येईल. हे अर्थातच पेरिम बेट कोणाच्या हाती आहे व त्यांचा राजकीय तत्त्ववाद काय आहे यावर अवलंबून असेल. याच कारणाने यमन व एडन येथे कोणाचे स्वामित्व येते याला अतिमहत्त्व आले आहे.

हा मार्ग जर रोखला गेला तर युरेशियाच्या पश्चिमेकडील द्वीपकल्पांचे दक्षिणेकडील किंवा पूर्वेकडील द्वीपकल्पांशी होणारे दळणवळण पुन्हा दक्षिण आफ्रिकेला वळसा घालून करणे भाग पडून त्यास तीन आठवड्यांचा अधिक काळ* लागेल, आणि

* अरब इझराइल युद्धापासून सुवेझ कालवा बंद झालेला आहे. तो केव्हा उघडला जाईल हे आज सांगता येणे कठीण आहे. द. आफ्रिकेला वळसा घालून चाललेल्या व्यापारामुळे भारतालाही दरवर्षी व्यापार-वाहतुकीवर अडीच ते तीन कोटी रुपये अधिक खर्च करावे लागत आहेत.

नेटो, सेंटो व सिअॅटो संरक्षण करारामधील राष्ट्रांचा आपसातील मिलाप व त्यांच्या समाइक योजना यावर त्याचे गंभीर परिणाम होतील.

तिसरी बाब अशी की, या सर्व मुलखात सिरिया, लेबॅनॉन व इजिप्त यांमध्ये जी काय थोडी शैक्षणिक व सामाजिक प्रगती झालेली आहे ती सोडल्यास, तेथील बहुतेक लोकसंख्या मागासलेली, अशिक्षित व कडवी धर्मवेडी आहे. त्यांच्यात शिया व सुनी आणि इतरही निरनिराळ्या जमाती व कुळी यामुळे भेदभाव आहेत. अरबांच्या गेल्या शेकडो वर्षांच्या इतिहासात ते कधीही एकत्र आलेले नाहीत. इजिप्तचे नासर यांच्या मनात या सर्व अरबांना इजिप्तच्या छत्राखाली एकत्र आणण्याची आकांक्षा आहे. पण या उलट सौदी अरेबियाच्या फैजलांच्या मनातही ती तशीच आहे. त्या प्रदेशात नव्याने मूळ धरू पाहणाऱ्या अरब राष्ट्रवादाची भूमिका समाजवादी आहे. या उलट पूर्वापार चालत आलेली सौदी अरब राजेशाही व सरंजामशाही त्यास कट्टर विरोध करील यात शंका नाही. आजही इजिप्त व सौदी अरब यांचे संबंध अत्यंत कटू आहेत ते यामुळेच. या प्रदेशातील राज्यांचे फक्त एकाच बाबतीत निदान वरकरणी तरी एकमत होते, आणि ते म्हणजे इझराइलशी कडव्या शत्रुत्वाबद्दल. पण त्यात खरे इझराइल-द्वेष्टे असे थोडेसेच आहेत. मौज अशी की, यापैकी कोणाही अरबराष्ट्र-नेत्याने जर इझराइलविरोधी भूमिका घेतली नाही तर अरब नेता म्हणून त्याला मान्यताच मिळणार नाही. याकरिता ते सर्वच इझराइल-द्वेषाची भाषा नेहमी वापरतात. प्रत्यक्ष क्रिया मात्र तशी करतातच असे नाही.

त्यामुळेच अरब राष्ट्रे व इझराइल यांचा गेली ५० वर्षे द्वेष-युक्त व कठोर संघर्ष चाललेला आहे. त्याचा फायदा पूर्वी सांगितल्या-प्रमाणे बडी राष्ट्रे घेत आहेत. जागतिक अहमहमिकेत त्यांना दोन्हीकडून एकमेकांविरुद्ध राजकीय पटावरील प्यादी म्हणून सरकविले जाते. खरोखर एकमेकांविरुद्ध संरक्षणासाठी त्यापैकी

कोणालाच एवढी प्रचंड सेनादले वाढविण्याची आवश्यकता नाही. त्यांच्या राष्ट्रीय उत्पन्नाचा शेकडा ९ ते १६ हिस्सा ती राष्ट्रे संरक्षणावर खर्च करीत आहेत. त्या त्या राष्ट्रांच्या विकासासाठी तो खर्च झाला तर त्यातच सर्वांचे अधिक भले होईल, पण भडकलेल्या व इतरांनी भडकविलेल्या भावनांच्या वातावरणात तर्कशुद्ध विचार होणे त्या ठिकाणी अशक्य आहे.

अखेरचे आणि अतिमहत्त्वाचे भौगोलिक सत्य असे की, हा मुलूख तेलखाणींचे आगर आहे. जगातील एकूण भूमिगत तेल-साठ्यापैकी आजच्या अंदाजाप्रमाणे दोनतृतीयांश साठा पश्चिम आशियायी राष्ट्रांच्या प्रदेशात आहे. आणि जागतिक उत्पादनापैकी तेलाचे एकतृतीयांश उत्पादन येथे होते. त्याशिवाय इजिप्तमध्ये व उत्तर आफ्रिकेतील अरब राष्ट्रांतही तेलाचे नवीन साठे सापडत आहेत.

पश्चिम युरोपातील बहुतेक राष्ट्रे तसेच हिंदुस्थान व जपान या तेलावर मुख्यत: अवलंबून आहेत. याचे राजकीय क्षेत्रात तीव्र परिणाम होतात. देशातील उद्योग व कारखाने, सर्व प्रकारची वाहतूकसाधने आणि त्यामुळेच युद्धातील गतिशीलता यासाठी भूतेलजन्य (पेट्रोलपासून सर्व प्रकारच्या वंगणांपर्यंत) पदार्थांची आवश्यकता असते. युद्धसज्जतेसाठी प्रयत्न करणारी जगातील सर्व राष्ट्रे तेलासाठी हपापलेली असतात. युद्धपूर्व कालात व युद्धकाली वाढणाऱ्या तेलाच्या वापरासाठी त्यांचा पुरवठा अव्याहत चालू राहणे अवश्य असते.

या प्रदेशातील तेलाच्या खाणी प्रगत पाश्चात्त्य राष्ट्रांच्या साहाय्यानेच खोदल्या गेल्या व त्यांनीच तेथे तेलशुद्धीकरणाचे कारखाने काढले. जरी त्यांपैकी काही अरब देशांनी त्या तेलखाणी व तेलकारखाने यांचे राष्ट्रीयीकरण केले असले तरी, तेलाची ने आण व तेलाचा व्यापार हा अजूनही सर्वतोपरी पाश्चिमात्य राष्ट्रांच्याच हाती आहे. युद्धास अत्यावश्यक अशा या जळिताचे उत्पादन व त्यानंतर त्याच्यावरील ताबा आपल्या हाती असावा,

विशेषतः तो संभाव्य शत्रूच्या हाती जाऊ नये या उद्देशाने पाश्चिमात्य व रशिया यांचे प्रयत्न अहर्निश चाललेले आहेत. रशियाचा प्रयत्न त्या भागातून पाश्चिमात्यांना हुसकून लावावयाचा असून त्याउलट पाश्चात्त्यांचा प्रयत्न तेथे रशियास घुसू न देण्याचा आहे.

या भाषणात राजकीय प्रश्नांबद्दल फारशी चर्चा करण्याचा माझा उद्देश नाही. त्यामुळे अरब-इझरायली संघर्ष किंवा युद्धे व त्यांची कारणपरंपरा याबद्दल येथे ऊहापोह मी करीत नाही. केवळ या ठिकाणी सत्य वस्तुस्थिती काय आहे तेवढेच आपण पाहू.

झारशाहीपासून रशियाचे पश्चिम आशियात शिरकाव करण्याचे प्रयत्न चालू होते. पण ब्रिटन व फ्रान्स यांनी ते हाणून पाडले. परंतु गेल्या महायुद्धानंतर स्वतंत्र झाल्यावर इजिप्तच्या सुवेझ कालवा कंपनी राष्ट्रीय करण्याच्या प्रयत्नास पाश्चिमात्यांनी केलेला विरोध, अमेरिकेने आस्वान बंधारा बांधण्यासाठी मदत न करण्याचा घेतलेला निर्णय, या व इतर गोष्टींचा रशियाने पूर्ण फायदा घेतला. ब्रिटन व फ्रान्सने १९५६ साली सुवेझवर स्वारी केली त्या वेळी रशियाने त्या दोन्ही राष्ट्रांस दिलेला निर्वाणीचा धाक आणि त्याबरोबरच अमेरिकनांनी तेथील आक्रमकास न दिलेला पाठिंबा, यामुळे रशियाचे या भागातील प्रस्थ, तेथील नवोदित राष्ट्रांचे त्राते या भूमिकेत, अतोनात वाढले.

पूर्वी सांगितल्याप्रमाणे अशा वेळी कोणत्याही प्रदेशात आपले बस्तान बसविण्यासाठी एका गटाला दुसऱ्याविरुद्ध मदत करणे हा एक मार्ग असतो. या प्रदेशातील सर्वच राष्ट्रे युद्धसाहित्याच्या व आर्थिक विकासाच्या बाबतीत बरीचशी परावलंबी आहेत. त्यापैकी अरब गट तर पाश्चात्त्यांच्या अनेक वर्षांच्या साम्राज्यशाहीला कंटाळलेला होता आणि आता तर सुवेझ कालव्याच्या वादावरून झालेल्या ब्रिटन-फ्रान्स यांच्या आक्रमणामुळे अरबांत पाश्चात्त्यांबद्दल द्वेष उत्पन्न झाला आहे. अशा परिस्थितीत कोणत्या गटास हाती घेऊन त्यासह या प्रदेशात शिरकाव करावयाचा याबद्दल रशिया-

समोर प्रश्नच अुरलेला नाही. त्याशिवाय इझराइल हे तर ब्रिटिशांसारख्या साम्राज्यवाद्यांनी या भागात लावलेले नवीन रोपटे व अमेरिकेने त्याला खतपाणी घातलेले, तेव्हा या भागात आपले आसन स्थिर करावयाचे असल्यास समाजवादी धोरणे असलेल्या नव्या अरब राष्ट्रवाद्यांना आर्थिक व त्याहूनही लष्करी मदत करून इझराइलचा जर बीमोड करता आला तर, सर्व अरब राष्ट्रे आपल्यास धन्यवाद देतील व आपले वजन अतोनात वाढेल या उमेदीने रशियाने मुक्त हस्ताने त्यास शस्त्रास्त्रांची मदत देण्यास सुरुवात केली. इजिप्त, सिरिया व नंतर यमन हे देश त्यांत प्रामुख्याने होते. अशी बातमी आहे की, इजिप्त व सिरिया शस्त्रास्त्राने बलवान झाल्यावर, ते युद्धात इझराइलचा संपूर्ण पराभव करतील याची खात्री वाटून रशियानेच "इझराइलने सिरियाविरुद्ध मोठे लष्कर त्यांच्या सरहद्दीवर संकलित केले आहे," अशी अफवा उठवून दिली. १९६७ चे सहा दिवसांचे युद्ध यामुळेच जुंपले. पण रशियाचा अंदाज पूर्णपणे चुकला व त्याची फसगत झाली. सहा दिवसांतच इजिप्तला दिलेली कोटचवधी रुबल्सची शस्त्रास्त्रे इझराइलकरवी नाश पावली. त्याचप्रमाणे सिरियाचा व जॉर्डनचाही पूर्ण पराभव झाला.

एकदा बसलेली पकड कोणी सहजासहजी सोडणे शक्य नसते. राष्ट्रीय हितसंबंधासाठी, साम्राज्य-विस्तारासाठी आणि साम्यवाद-प्रसारासाठी काही कोटी रुबल्सची किंमत देणे महाग नाही. साहजिकच इजिप्तला शस्त्रास्त्रांचे दान पुन्हा सुरू झाले व त्याबरोबरच रशियाचे तीन हजार लष्करी शिक्षक इजिप्तच्या संरक्षणदलांच्या प्रशिक्षणाप्रीत्यर्थ तेथे पोचले. सिरियात तसे ते पूर्वीच होते. पोर्ट-सैद व अलेक्झांड्रिया या आरमारी बंदरांचा वापर इजिप्तने त्याची परतफेड म्हणून रशियनांना खुला केला. आता रशियाने भूमध्य समुद्रात आणलेल्या आरमारी काफिल्याची ती बंदरे उत्कृष्ट आधार-स्थाने झाली आहेत. हा रशियाचा आरमारी काफिला भूमध्य समुद्रात कायमचा ठाण देऊन आहे.

अरब-इस्राइल वाद आता यूनोपुढे आहे व तो सोडविण्याचे प्रयत्न गेल्या जवळजवळ दोन वर्षांत सफल झालेले नाहीत. आता रशियासुद्धा हा वाद शक्य तो लवकर मिटावा व त्या प्रदेशांतील राष्ट्रांत काहीतरी समझोता व्हावा याच्या मागे आहे. त्यासाठी अरबांनाही देवाण-घेवाण करावयास लावण्याचे सामर्थ्य रशियाच्या हाती आहे. अशी समझोत्याची भूमिका रशिया हळूहळू का घेत आहे याकडेही लक्ष दिले पाहिजे.

कारण उघड आहे आणि तेही भौगोलिक आहे. युद्धात अरब राष्ट्रे जिंकतील ही आशा रशियास सध्या तरी नाही. आणि तसे नसल्यास इस्राइलशी समझोता करूनच त्यास सुवेझ कालव्यापासून मागे हटविता येईल. तोपर्यंत तो कालवा बंदच राहणार; हे रशियाच्या जागतिक योजनेत बसत नाही. कालवा खुला होऊन त्यातून भूमध्य समुद्र, तांबडा समुद्र व पुढे हिंदीमहासागर यातील दळणवळण चालू होत नाही तोपर्यंत रशियाचे भूमध्य समुद्रातील आरमार त्या समुद्रातच काय ते संचारू शकते. रशियावादी यमन, दक्षिण यमन (एडन आदी) किंवा सोमालिया यांच्याशी असलेले रशियाचे संबंध दृढ करण्यासाठी तांबड्या समुद्रात त्यांच्या आरमाराचा संचार अवश्य आहे. आर्थिक व हार्दिक पाठवळाबरोबर आपल्या शक्तीचे प्रदर्शन करणेही अवश्य असते. त्याचप्रमाणे इराणच्या आखाताच्या भोवतालच्या तेल-उत्पादक प्रदेशावरही तोपर्यंत दबाव आणता येणार नाही. हिंदी महासागरात येण्यासाठी व्ह्लाडिव्हॉस्टॉक बंदरावर आधारलेले पॅसिफिक महासागरातील रशियाचे आरमार फार दूर पडते. अर्थातच रशियाच्या काळ्या व भूमध्य समुद्रातील आरमाराचा पॅसिफिक महासागरातील आरमारांशी युरेशियाला घेर देऊन जर हिंदी महासागरात संयोग झाला तर रशियाच्या दृष्टीने बहारच होणार आहे. अखेरीस हिंदी महासागरावरील ताबा म्हणजे भारतावरील ताबा.

त्यासाठीच अमेरिका, ब्रिटन इत्यादींना सुवेझ कालवा आताच

खुला व्हावा असे वाटत नसल्यास त्यात आश्चर्य नाही. त्यातून होणारी तेलाची वाहतूक त्यांच्या फायद्याची असली तरी, अलीकडे दहावीस लाख टनांच्या तेलवाहू बोटी बांधल्या गेल्यापासून, आफ्रिकेस वळसा देऊन जाण्याने तेलाच्या किमतीत किंवा प्रमाणात फरक पडत नाही. या बोटी सुवेझमधून जाऊही शकत नाहीत. वरील-प्रमाणे हा नवा धोका दिसू लागल्यामुळे १९७१ नंतर ब्रिटन सिंगापुरा-तून आपले आरमार काढून घेईलच याची खात्री नाही. सिंगा-पूरलाही तसे त्यांनी जाणे आवडलेले नाही. कदाचित सिंगापूरचे आरमारी आधारस्थान, आस्ट्रेलिया व न्यू झीलंड यांच्या समाइक आरमारास, त्यांनी अधिक युद्धनौका देऊन, इंग्रज वहाल करतील हीही शक्यता आहे व बहुधा सिंगापूरचे सरकार त्यास मान्यताही देईल.

मॅकिंडर सिद्धान्ताप्रमाणे मर्मस्थानीय राष्ट्राने आपले आर-मारी बल वाढविल्यास त्याचे काय परिणाम होतात याचा हा आणखी एक स्पष्ट दाखला आहे.

भूमध्य समुद्राकाठच्या व एडनपर्यंत तांबड्या समुद्रावरील अरब राष्ट्रांवर रशियाचा पगडा बसला आहे. पण पाश्चिमात्यांनी अजून सर्व अरब द्वीपकल्प त्यांच्या हाती जाऊ दिलेले नाही. सौदी-अरबस्तानाला मदत करून, व इतर तेल-उत्पादक राज्यांच्या शेखांना दिलासा देत त्यांनी या राष्ट्रांना अरब राष्ट्रवादापासून व रशियापासून दूर ठेवले आहे. पण राजेशाही, शेखशाही व सर्वसाधारणतः सरंजामशाही आता इतिहासजमा झालेली राज्यपद्धती आहे. त्या राज्यांच्या जनतेच्या इच्छेविरुद्ध ती परिस्थिती किती दिवस टिकेल याची शंका आहे. तेव्हा पाश्चात्त्यांची पकड ढिली होऊन हळूहळू हे संपूर्ण अरब द्वीपकल्प रशियाच्या भक्ष्यस्थानी पडणार की काय, अशी शंका मनांत येऊन जाते. तसे झाल्यास त्याचे पडसाद इराणमध्ये, पाकिस्तानात व भारतात उमटतील. या घटना शांतचित्ताने बाजूस सारण्यासारख्या नाहीत. त्यावर करडी नजर ठेवणे आवश्यक आहे.

या संदर्भात एक गोष्ट विचार करण्यासारखी आहे. इजिप्तला रशियाची मदत मिळत आली आहे त्यास बराच काळ झाला. गेल्या अरब-इझराइल युद्धापूर्वी इजिप्त, म्हणजे वैयक्तिकरीत्या स्वत: नासर, आपले मतस्वातंत्र्य काही प्रमाणांत तरी टिकवून होते व त्यामुळे त्यांस अलिप्ततावादी म्हणणे अगदीच अप्रस्तुत वाटत नसे. पण त्या युद्धानंतर ती परिस्थिती पूर्ण पालटली आहे. रशियाचे पूर्व-भमध्य समुद्रातील आरमारी बस्तान, त्याचे अलेक्झांड्रिया व पोर्ट सैद बंदरांमध्ये आधारस्थाने म्हणून वास्तव्य, रशियाच्या तीनचार हजार सेनाशिक्षकांचे त्या देशात अस्तित्व आणि आता रशियाच्या साहाय्याशिवाय इजिप्तची अत्यंत हलाखीची आर्थिक परिस्थिती, यामुळे नासरना राजकीय मतस्वातंत्र्य किंवा कृति-स्वातंत्र्य शिल्लकच राहिलेले नाही.

च्छेकोस्लोव्हाकियावरील रशियाच्या आक्रमणानंतर जवळ-जवळ सर्व जगाने रशियाचा धि:क्कार केला. जगातील अलिप्तता-वाद्यांचे नायक म्हणून गणल्या जाणाऱ्या युगोस्लाव्हिया, इजिप्त व भारत या त्रिकुटापैकी, युगोस्लाव्हियाने तर आपली मते रशियाविरुद्ध अत्यंत तीव्रतेने मांडली. फार काय, आपणसुद्धा घाबरत घाबरत का होईना, जनतेच्या आग्रहामुळे ती रशियाची कृती योग्य नव्हे एवढे तरी म्हणण्याचा धीर केला. पण इजिप्तने त्याबद्दल एक चकार शब्द उच्चारला नाही. याचे जर पृथक्करण केले तर असे म्हणता येईल की, जसजसे एखादे राष्ट्र रशियाच्या गळी पडते किंवा त्याच्या आहारी जाते, तसतसे त्याचे राजकीय स्वातंत्र्य, मतस्वातंत्र्य व क्रियास्वातंत्र्य नष्ट होत जाते. मदत घेत असतानाही टीका केलेली पाश्चिमात्यास थोडीबहुत चालून जाते पण रशियाला ती यत्किंचितही खपत नाही. याची किंचित झळ आपल्यासही लागली. आपल्या लोकसभेत रशियावर झालेल्या टीकेनंतर व तेथे पसार झालेल्या ठरावानंतर, काही दिवसांतच रशियाचे दुय्यम अध्यक्ष फेऱ्युविन् यांच्या नेतृत्वाखाली राजकीय वाटाघाटीसाठी आलेल्या प्रतिनिधी मंडळासह आपली चर्चा झाली. त्या वेळी त्यांचे अत्यंत ताठर धोरण

हे आपण केलेल्या किंचित टीकेची प्रतिक्रिया होती, असे दिसून आले. ते कदाचित नंतर निवळले असतील, पण त्यामार्गे त्यानी, गैरवाजवी टीका केलीत तर काय परिणाम होतील याची जाणीव आपल्यास करून दिली आहे हे विसरता कामा नये. भावी काळात काय होणे शक्य आहे याचा बोध त्यापासून होतो.

अरब द्वीपकल्पाच्या या परीक्षणापासून हे उघड होत आहे की मर्मभूमिशासक रशियाचा दबाव तेथे अत्यंत तीव्रतेने जाणवू लागला आहे. आणि त्यात सध्या तरी त्यांना बरेच यश येत आहे. इझराइलचा लहानसा (रशियाच्या बलाच्या दृष्टीने) अडसर, अमेरिकेला जास्त न डिवचता, जर बाजूस सारता आला तर त्यांच्या प्रभावक्षेत्रात हा सर्व मुलुख फारसा प्रयास न करता पडेल. इझराइलला असलेला अमेरिकेचा पाठिंबा व त्यानंतर सौदी-अरबांना दिली जाणारी अमेरिकेची व ब्रिटिशांची मदत आणि त्यामुळे नासरविरुद्ध अरब नेतृत्वासाठी उभे राहण्याची त्यामध्ये आलेली शक्ती, या दोनच घटना रशियाच्या या द्वीपकल्पावरील स्वामित्वाला सध्या आडकाठ्या आहेत. तसेच सुवेझ कालवा खुला हिंदी महासागरात भावी युद्धाच्या ढगांची छाया पसरेल यांत शंका नाही. त्यात जो जिंकेल तो जगद्वीपावर राज्य करील.

योग्य क्रमाने यानंतरचे युरेशियाचे चौथे द्वीपकल्प भारत हे आहे. पण त्या भूमीचाच विचार आपल्याला प्रामुख्याने करावयाचा असल्याने, आपण ती सध्या वगळू व आग्नेय-आशियाच्या (ब्रह्मदेश, मलाया, थायलॅन्ड, व्हिएटनाम) द्वीपकल्पाकडे वळू. या व इतर द्वीपकल्पांतील व किनारभूमीतील राजकीय उलाढालीपासून काय बोध होतात ते लक्षात घेतल्यावर, मगच भारताच्या भौगोलिक स्थानाचा व तो पूर्वगोलार्धाचे भूकेंद्र कसा त्याचा ऊहापोह करू.

७

आग्नेय आशियाचे द्वीपकल्प

हिमालयाचा अतिपूर्वेकडील फाटा, चीनच्या युनान प्रांताच्या दक्षिणेकडील पर्वत व अखेरीस लाओस व व्हिएटनामच्या सरहद्दीवरील पर्वतांच्या रांगा यामुळे हे द्वीपकल्प युरेशियाच्या मध्यवर्ती भूविस्तारापासून (central land-mass) अलग झालेले दिसते. या पर्वतांची उंची पश्चिमेस साधारणतः १५ ते १६ हजार फुटांपासून पूर्वेकडे ५ हजार ते ६ हजार फुटांपर्यंत कमी होत जाते. त्यातून खिडी व पाऊलवाटा अनेक असल्या तरी पक्के बांधलेले

रस्ते किंवा रेल्वे मार्ग तुरळकच आहेत. दुसऱ्या महायुद्धापूर्वी चीन-जपान युद्ध चालू असताना चांग-कै-शेक यांच्या चीनी सेनेला युद्ध साहित्याची मदत अमेरिकादी राष्ट्रे करीत असत. चीनच्या किनाऱ्यावरील बंदरे जपानच्या हाती असल्यामुळे, त्या मदतीसाठी दोनच मार्ग शिल्लक होते. पहिला, फ्रेंच इंडोचायना म्हणजे सध्याच्या व्हिएटनामवाटे– हनॉयहून कुनमिंग किंवा नानिंगला रेल्वेमार्गाने व तेथून चुंगकिंगला– आणि दुसरा ब्रह्मदेशातील रंगून-मंडाले-लाशियो-कुनमिंग या रस्त्याने. दुसऱ्या महायुद्धात जर्मनीने फ्रान्सचा पाडाव केल्यावर व्हिशी राजवटीखालील इंडोचायनाचा कबजा जपानने १९४१ सालीच केला. जपान युद्धात पडल्यावर त्यांच्या पहिल्या धडकीतच त्याने थायलॅन्ड व ब्रह्मदेश जिंकून १९४२ साली दुसरा मार्गही बंद पाडला. १९४४ मध्ये जपानला ब्रह्मदेशातून हकालण्यासाठी हिंदी व चीनी लष्करांनी ब्रह्मदेशावर स्वारी केली. त्या वेळी उत्तर ब्रह्मदेशात पुढे वढत असलेल्या सेनेच्या मागे आसाममधील लीडोपासून मिचीना– लाशिओ हा रस्ता बांधावयास सुरुवात झाली व तो मंडाले-कुनमिंग मार्गास लाशिओजवळ जोडला गेला. त्यानंतर या द्वीपकल्पाशी चीनला जोडणारे दळणवळणाचे इतर मार्ग बांधले गेलेले नाहीत.

त्यामुळे आजही दक्षिण चीन व या द्वीपकल्पातील अनेक नवस्वतंत्र राष्ट्रे यातील दळणवळण हनॉयपासून चीनमध्ये जाणारा रेल्वे मार्ग व मंडाले-कुनमिंग रस्ता या मार्गेच मुख्यत्वेकरून चालू शकते. जड वाहतुकीसाठी इतर मार्ग योग्य नाहीत. त्यापैकी मंडाले-कुनमिंग किंवा लीडो-लाशियो-कुनमिंग हा रस्ता कशा स्थितीत आहे याची माहिती मला नाही. चीनच्या हद्दीत त्यांनी तो डागडुजी करून बऱ्या स्थितीत ठेवला असावा. ब्रह्मदेशातील त्याचे भाग कदाचित पडझड झालेल्या अवस्थेत असण्याचा संभव आहे. तसेच कुनमिंग किंवा नानिंग हे रेल्वेमार्ग उत्तर व्हिएटनामला चीन व रशियाची लष्करी मदत पोचविण्यासाठी आजही वापरले जातात. त्यांची अमेरिकेच्या हवाई हल्ल्यामुळे बरीच नास-

धूस झालेली असेल. परंतु एकदा रस्ता किंवा रेल्वेमार्ग बांधला गेला, त्यासाठी पूल उभारले गेले की थोडच्या श्रमाने त्याची दुरुस्ती करून तो वापरात आणता येतो. त्यांपैकी ब्रह्मदेशातून लीडोला पोचणारा रस्ता भारतात आपल्या उत्तर सीमांवरील संरक्षण-सेनांच्या बगलेवर येऊन मिळतो त्याची योग्य ती दखल घेणे आवश्यक आहे.

भौगोलिकदृष्टया कोणत्याही भूभागाचा अभ्यास करताना तेथील लोकसंख्या, तिची सांस्कृतिक व शैक्षणिक प्रगती, तेथील नैसर्गिक संपत्ती व तिचा उपयोग करून झालेला औद्योगिक विकास वगैरे अनेक गोष्टींचा त्यात समावेश होणे अवश्य असते. वेळेच्या अभावी आजच्या भाषणात त्यात खोलपर्यंत शिरणे शक्य नाही; पण काही महत्त्वाच्या बाबी येथे लक्षात घ्याव्या लागतील.

या भागातील लोक मोंगल चेहरेपट्टीचे आहेत. या द्वीपकल्पाच्या अर्ध्या भागात म्हणजे थायलॅन्डपर्यंत भारतीय संस्कृती पसरलेली होती व व्हिएटनाममध्ये तशीच चीनी संस्कृती होती हे खरे आहे, पण त्या संस्कृतींच्या उगमस्थानांशी त्यांचे संबंध आजही दृढ आहेत असे नाही. त्या भागातील लोकांचे चेहरे मोंगल छापाचे असले तरी त्यातही अनेक वंश, जाती, धर्म, व स्थानिक चालीरीती आहेत. उदाहरणार्थ ब्रह्मदेशच घ्या. ब्रिटिशांनी ब्रह्मदेशास स्वातंत्र्य दिले त्या वेळी भारताप्रमाणेच आपल्या स्वामित्वाखाली आणलेली सर्व भूमी, त्यांनी "हा ब्रह्मदेश आता तुमचा" असे जणू सांगून, तेथील राजकीय नेत्यांच्या स्वाधीन केली. पण तेथील जनता एकवंशीय नाही व ती सर्व एकाच राज्यछत्राखाली कधीच नव्हती. आपण ज्यांना ब्रह्मी म्हणून ओळखतो, ते लोक इरावती व चिंद्विन् नद्यांच्या खोऱ्यात मुख्यत: मंडाले ते रंगूनपर्यंत स्थायिक झालेले आहेत. पण उत्तरेकडील डोंगराळ भागात काचीन व ब्रह्मी नागा आहेत. त्याखाली भारतीय सीमेजवळ ब्रह्मी लुशाई किंवा मिझो व चिन् आहेत. पूर्वेकडील डोंगरात शान व कारेन आहेत. त्यांपैकी काही तिबेटी वंशाचे आहेत; काहीत चीनी रक्त आहे; तर काहीत थाई आहे. त्या सर्व वेगवेगळ्या वंशीयांची एकूण लोकसंख्या मध्य ब्रह्मदेशच्या

ब्रह्मी लोकांइतकीच किंवा थोडी अधिकच भरेल. परकीय ब्रिटिश सत्ता निघून गेल्यानंतर या वहुतेक जमातींना आपली स्वतंत्र राज्ये हवी होती. त्यापैकी अनेकांनी ब्रिटिशांच्या बाजूने जपान्यांना ब्रह्मदेशातून घालविण्यास सशस्त्र मदतही केली. त्याच्या मोबदल्यात त्यांना आपापले स्वातंत्र्य न मिळता रंगूनच्या एका केंद्रीय राजवटीखाली ठेवले गेले. याचा त्यांना राग आहे आणि त्याविरुद्ध त्यांनी जवळजवळ उघड सशस्त्र बंडे उभारली आहेत. तोच प्रकार कमी अधिक प्रमाणात भारतातील पूर्वेकडील टोळयांत, उत्तर थायलॅन्डमध्ये व व्हिएटनामच्या डोंगराळ मुलखात चाललेला आहे. तो योग्य की अयोग्य हा प्रश्न वेगळा ! पण ही सत्य परिस्थिती आहे.

भारतापासून व्हिएटनामपर्यंत ज्या राष्ट्रीय सीमा आहेत त्यांच्या दोन्ही बाजूस त्यांपैकी अनेक एकवंशीय टोळ्या स्थायिक झालेल्या आहेत. भारत व ब्रह्मदेशात नागा व मिझो आहेत. तसेच काचीन व शान चीनमध्येही आहेत. कारेन हे थायलॅन्ड व ब्रह्मदेशात आहेत. त्यांना एकत्र यावेसे वाटल्यास आश्चर्य नाही. याशिवाय मलायात, थायलॅन्डमध्ये व विशेषतः सिंगापूरच्या चिमुकल्या राज्यात चीनी वस्ती वरीच आहे. या सर्व राज्यात बहुजन जरी इस्लामी किंवा बुद्ध असले तरी त्यांत परधर्मीय, परवंशीय मोठ्या प्रमाणात असल्याने, ती राज्ये एकरूप राष्ट्रे झालेली नाहीत. त्याचे परिणाम विभक्तिकरणात (balkanization) होऊन धोक्याचे होण्याचा संभव आहे. कारण तशी फूट पाडण्यासाठी साम्यवादी टपलेले आहेत व चीनकडून त्यास बंडांसाठी शस्त्रांची मदत मिळत आहे.

चीनने कुनमिंग येथे, ब्रह्मी हद्दीपासून २५० मैलावर व चीनमधील काचीन व शान जमातींच्या वस्तीजवळ, एक "अल्पसंख्य जनता संशोधन केंद्र" (Minority People's Research Centre) उघडले आहे. त्यामध्ये भारत, ब्रह्मदेश, थायलॅन्ड इत्यादी राज्यांतील अल्पसंख्य टोळयांचा व त्यांना उठावास साहाय्य कसे करावयाचे याचा अभ्यास चालतो आणि त्यास मदत योजनापूर्वक होते. आपले

विचार मात्र नागा लोकांमध्ये " किरिस्तांव मिशनरी काम करतात म्हणून उठाव होतो " या पलीकडे फारसे जात नाहीत. या गहन प्रश्नाला असे अति-सुलभ रूप देणे फायद्याचे असते, कारण मग त्याचा काही विशेष अभ्यास करावयाची आवश्यकताच भासत नाही.

हा विषय अर्थातच मोठा अभ्यसनीय आहे हे सांगण्याची गरज नाही. केवळ आपल्या नागा, मिझो किंवा कुकी लोकांपुरत्या या समस्या संकुचित नाहीत, तर हा आग्नेय आशियाचा व्यापक प्रश्न आहे, याची दखल आपण घ्यावयास हवी आणि त्या दृष्टीने त्यांच्या सोडवणुकीचे मार्ग शोधावयास हवेत. केवळ लष्करीबळाने त्याचप्रमाणे मिशनऱ्यांना घालवूनही त्या सुटणे अशक्य आहे.

असो, या भागातील जनतेची शैक्षणिक प्रगती फारशी झालेली नाही. आणि नैसर्गिक संपत्ती त्यापैकी काही भागात बरीच असली तरी त्याचा उपयोग करून घेण्याचे तांत्रिक ज्ञान पुरेसे नसल्याने, औद्योगिक विकासही फारसा झालेला नाही. उदाहरणार्थ, जगातील उत्पादनापैकी ४० टक्के नैसर्गिक रबर मलायात होते व त्याशिवाय ४० टक्के लगतच्या इंडोनेशियात होते. ब्रह्मदेशात तेलाच्या खाणी आहेत; अणुशक्तीसाठी उपयुक्त थोरियम थायलॅन्ड व मलायात सापडते. निकल, जस्त व टिन त्याचप्रमाणे पोलादाच्या लोहमिश्रणासाठी आवश्यक टंगस्टेन् व टिटेनियम् या प्रदेशात, विशेषतः ब्रह्मदेश व मलायात बऱ्याच प्रमाणात आढळते. आपल्या भारतात न सापडणाऱ्या पण आपणास अवश्य असलेल्या अनेक खनिज धातू या जवळच्या द्वीपकल्पात उत्पन्न होतात, ही गोष्ट महत्त्वाची आहे.

परंतु या द्वीपकल्पाचे विशेष महत्त्व त्याच्या स्थानामुळे, त्याच्या आकारामुळे, त्याच्या भोवतालच्या द्वीपसमूहांच्या सान्निध्यामुळे आलेले आहे.

एके काळी, काही लक्ष वर्षांपूर्वी युरेशिया, त्याच्या आग्नेय दिशेकडील अगणित बेटे व ऑस्ट्रेलिया हा एक अखंड भूप्रदेश होता असे भूस्तरविज्ञानी सांगतात. ते काही असो, पण आपल्या अंदमान बेटांपासून सुमात्रा ते न्यूगिनी व अखेर ऑस्ट्रेलियापर्यंत हजारो

लहानमोठी बेटे एकमेकांपासून जवळजवळ असलेली दिसतात. या द्वीपकल्पाच्या दक्षिणेचे टोक (भूशिर) सुमात्रा बेटापासून केवळ ५० किलोमीटरवर आहे. इंडोनेशियाच्या द्वीपमय राष्ट्रात ते एखाद्या कट्यारीप्रमाणे घुसलेले आहे. हिंदी महासागर व पॅसिफिक महासागर यांमधील सागरी वाहतुकीचा सर्वांत जवळचा व मुख्य मार्ग मलाया व सुमात्रा यांमधील मलायाच्या सामुद्रधुनीतून जातो. त्याच्या वाटेवरच सिंगापूर हे अत्यंत उत्कृष्ट बंदर आहे व त्या सामुद्रधुनीत ते युद्ध-पटदष्टचा मोक्याच्या ठिकाणी आहे. ते बंदर ज्याच्या हाती असेल तो त्या एका मार्गावरच नव्हे तर जवळच्या द्वीपसमुदायापैकी बेटाबेटांमधील बऱ्याचशा सामुद्रधुन्यांवर देखरेख ठेवू शकतो.

मलायापासून सुमात्रा, जाव्हा व इतर अनंत बेटे यांतील अंतर फारसे नसल्यामुळे, प्रबळ आरमाराची मदत नसताही, आक्रमक भूसेनेस एकामागून एक ती गिळंकृत करता येण्यासारखी आहेत. बेटाबेटावरून उड्या घेत (island hopping)ते सफल होऊ शकते. तीच सुलभता एखाद्या तत्त्ववादाच्या प्रसारासाठीही असू शकते. या द्वीपकल्पात व विशेषतः मलाया-सिंगापूरमध्ये ज्या तत्त्ववादाचे प्रावल्य होईल त्याची लागण व नंतर त्याचा प्रसार या द्वीपसमूहात सहज होऊ शकतो. त्याबरोबरच जर तसा प्रसार घडवून आणण्यासाठी उद्युक्त असणाऱ्या राष्ट्रापाशी आरमारी सामर्थ्य असेल व त्याने सिंगापूरचा तावा घेतला असेल तर, बेटाबेटांवरील लष्करी वा तत्त्ववादीय उड्या अधिक सुलभ होतील. मलायात साम्यवाद पसरला आणि सिंगापूर हे एखाद्या साम्यवादी राष्ट्राच्या आरमाराचे आधारस्थान झाले तर आज इंडोनेशियात साम्यवादीयांविरुद्ध चाललेली मोहीम बंद करावी लागेल. एवढेच नव्हे तर तेथील साम्यवादीयांना त्यापासून उत्तेजन मिळून त्यांच्या उठावाला पुन्हा भरती येईल व ती ऑस्ट्रेलियापर्यंत पोहोचेल.

राजकीय क्षेत्रात ज्याला " डॉमिनो थियरी " म्हणतात त्यावर कोणाचा विश्वास असो वा नसो; साम्यवादासारख्या तत्त्ववादाच्या कारवायांचा–मग त्या झिरपणवजा असोत, अंतर्गत उठा-

वाच्या असोत किंवा प्रत्यक्ष आक्रमणाच्या असोत– एखाद्या राष्ट्रात प्रादुर्भाव झाला व त्याला रोखण्यास त्याशी तुल्य प्रतिकार-बल त्याच्या मार्गात उभे केले तरी, त्याच्या पलीकडे त्याची चाल सुरू होते व तेथे तशीच प्रतिकारी शक्ती उभी करावी लागते. हा प्रकार एकापुढे एक असा सारखा वाढत असतो. उदाहरणार्थ– दक्षिण व्हिएटनाममध्ये तत्त्ववादाच्या दोन्ही प्रतिस्पर्ध्यांनी समबल उभे केले की, साम्यवादी ते शेजारच्या लाओसमध्ये व थायलॅन्डमध्ये पसरवितील. तेथे त्याविरुद्ध तेवढेच बल उभे करावे लागेल व असा हा खेळ हळूहळू ब्रह्मदेश, मलाया, इंडोनेशिया व नंतर भारतातही पसरेल. अशी परिस्थिती आज या द्वीपकल्पात उत्पन्न झाली आहे; यांत शंका नाही.*

पौर्वात्य राष्ट्रांत, त्यांच्या अविकसित अवस्थेत, सामाजिक स्तरांतील आर्थिक भेदभाव व तज्जन्य असंतुष्टता व संघर्ष यामुळे एकूण परिस्थिती साम्यवादास पुष्टी देणारी असते. विकसित राष्ट्रांत– पूर्व व पश्चिम जर्मनी, हंगेरी व ऑस्ट्रिया या दोन्ही जोडींमध्ये–तसे होण्याचा संभव कमी असतो; कारण कामगार

---

*'डॉमिनो थिअरी' हा अमेरिकेमधील लिखाणात वापरला जाणारा शब्द-प्रयोग आहे. डॉमिनोचा खेळ हा मॉजाँगसारखा असतो. त्यात फाशां–सारख्या पण दोन भागांत विभागलेल्या पटट्या असतात व प्रत्येक भागावर एक पासून सहा ठिपके असतात. खेळणाऱ्यांनी आपल्या हाती असलेल्या पट्ट्यांपैकी प्रतिस्पर्ध्याने लावलेल्या पट्टीच्या खुल्या भागा-वरील ठिपक्यांशी जुळणारी पट्टी लावावयाची, पहिल्या पट्टीचा दुसरा अर्धा भाग मोकळा असतो. प्रतिस्पर्धी त्यास जुळणारी पट्टी लावतो व ही पट्ट्यांची रांग वेडीवाकडी, एकमेकापुढे सारख्या ठिपक्यांच्या, म्हणजे तुल्यबल, पट्ट्या लावीत वाढत जाते. तसाच काहीसा हा राजकीय खेळ विरुद्ध तत्त्ववादीयांमध्ये चालतो, असा या शब्दप्रयोगाचा अर्थ असावा असा माझा समज आहे. त्याचे योग्य स्पष्टीकरण मला कोणाकडूनही मिळालेले नाही.

वर्गाची आर्थिक परिस्थिती व व्यक्तिस्वातंत्र्य साम्यवादेतर राष्ट्रांतच साम्यवादी राष्ट्रांपेक्षा अधिक समाधानकारक असते. साम्यवादीयां-वरच याचा उलट परिणाम होऊ शकतो. तसा हंगेरी आणि च्छेको-स्लोव्हाकिया यात झाला. रशियाने त्यांच्यावर केलेली आक्रमणे या " डॉमिनो थियरी " चा पडलेला उलटा प्रभाव टाळण्यासाठीच असे म्हणावे लागेल.

या सर्व दृष्टींनी दक्षिण व्हिएटनाममध्ये अखेरीस समझोता कसा होतो याला फार महत्त्व आले आहे. दक्षिण व्हिएटनाममधील सध्याची राजवट जाऊन तेथे उत्तर व्हिएटनामच्या सरशीमुळे साम्यवादीय राजवट आली तर या द्वीपकल्पाच्या राजकीय व तत्त्ववादीय समतोलात फरक पडेल. उत्तर व्हिएटनामला रशियानेच सर्व प्रकारची युद्धसाहित्याची मदत चीनपेक्षा अधिक केलेली आहे. त्याचा मोबदला म्हणून आणि अमेरिकेच्या नैऋत्य पॅसिफिकमधील ७ व्या आरमारास शह म्हणून आपली हुए, फायफॉग व सायगाव ही बंदरे रशियाच्या आरमारास आधारस्थाने म्हणून खुली केली (इजिप्तने आपली पोर्ट-सैद व अलेक्झांड्रिया बंदरे रशियासाठी आधारस्थाने दिली त्याप्रमाणेच) तर त्याचा परिणाम सिंगापूरवर होईल. रशियाने दक्षिण चीनी समुद्रात आपले ठाण मांडल्यावर सिंगापूर व हिंदी महासागर काही दूर नाहीत; व इंग्रजांनी सुवेझच्या पूर्वेकडून आपला पाय काढून घेतल्यामुळे हिंदी महासागरात उत्पन्न होणारी पोकळी जर स्थानिक राष्ट्रांकडून भरली गेली नाही, तर प्रत्यक्ष सिंगापूरमध्ये आपला आरमारी तळ न ठेवताहीं, रशियाच्या पॅसिफिक आरमारास हिंदी महासागराचे पूर्वेचे दार सताड उघडे होणार आहे.

आपण अरब द्वीपकल्पाचा विचार करताना भाकित केलेले आहे की, रशियाच्या पूर्व भूमध्यसमुद्रातील आरमाराला सुवेझ कालव्यातून तांबडया समुद्रातील मार्ग खुला झाला व एडनसारखे बंदर आधारस्थान म्हणून मिळाले की त्याचा हिंदी महासागरात पश्चिमेकडून प्रवेश सहज-सुलभ होईल. त्याचप्रमाणे त्यांच्या

पॅसिफिक आरमाराला व्हिएटनाममधील आणि कदाचित सिंगापूर वा इंडोनेशियातील बंदरे आधारस्थाने लाभली तर पूर्वेकडूनही प्रवेश तितकाच सोपा होईल. अशा रीतीने रशियाच्या या दोन आरमारांचे संगमस्थान हिंदी महासागरात असेल. आणि हिंदी महासागर व त्याच्या किनाऱ्यावरील देश एक प्रकारे या चिमटयाच्या दोन पात्यांत सापडतील. (नकाशा क्र. १) ते केव्हा होणार व अशा संगमासाठी या महासागराच्या क्षेत्रात एखाद्या आधारस्थानाची आवश्यकता रशियास भासेल की काय हाच प्रश्न आहे. असे झाल्यास अरबस्थानापासून व्हिएटनामपर्यंत आणि मर्मभूमीपासून तो इंडो-नेशियापर्यंत सर्व राष्ट्रे या मर्मभूमिशासक रशियाच्या प्रभावळीत येतील. केवळ चीनच काय तो त्यास थोडाबहुत विरोध करू शकेल, पण त्याभोवती हा चौफेर घेरा बसल्यावर त्यासही नमावे लागेल. मॅकिंडरच्या सिद्धान्तातील मर्मभूमिशासक राष्ट्राच्या आरमारी बळवृद्धीच्या जागतिक उद्दिष्टाची ही अंतिम पूर्ती आहे.

मर्मभूमिशासक रशियाला यात आडकाठी चीनचीच दिसते हे वर म्हटलेच आहे. पण तीही चीन व रशिया यांच्या नेत्यांच्या आपसातील मतभेदांमुळे व त्या दोन प्रचंड राष्ट्रांमधील जागतिक साम्यवादाच्या नेतृत्वाच्या अहमहमिकेमुळे उत्पन्न झाली आहे. ते मतभेद सध्या पराकोटीला गेले असले तरी सध्याच्या नेत्यांच्या मृत्यूमुळे किंवा खांदेपालटीमुळे त्यांची तीव्रता कमी झाल्यास, त्यांच्यात सहकाराचीही शक्यता आहे. चीनला उत्तरेकडे आपले प्रभावक्षेत्र वाढविण्यास वावच नाही. व तसा वाव रशियाने, त्यांचे सहकार्य मिळावे म्हणून, दक्षिणेकडे देऊ केला आणि समजा ब्रह्मदेश, थायलॅन्ड, मलाया इत्यादी मुलूख चीनच्या प्रभावक्षेत्रात देण्याचे रशियाने मानले, तर आग्नेय आशियाच्या द्वीपकल्पातील सर्व राष्ट्रांना चीनच्या साम्राज्यात विलीन व्हावे लागेल यात शंका नाही. याकरता सध्या चीनच्या प्रसारेच्छेचे परिणाम या द्वीपकल्पातील त्याशी संलग्न क्षेत्रात कसे होत आहेत ते पाहू.

चीनची उत्तर व्हिएटनामवरील पकड कमी झालेली आहे म्हणून सध्या त्याचे या द्वीपकल्पातील लक्ष्यराष्ट्र ब्रह्मदेश आहे असे दिसते. त्याचेही कारण भौगोलिक आहे. दक्षिण चीनवाटे या आग्नेय द्वीपकल्पात येण्यासाठी व्हिएटनाम सोडता, दुसरा मार्ग युनानमधून ब्रह्मदेशातच उतरतो. चीन व थायलॅन्डयांमध्ये समाइक सीमा अस्तित्वात नाही. शिवाय थायलॅन्ड, सिॲटो करारातील राष्ट्र आहे व तेथे अमेरिकेची काही सेना व हवाईदल जय्यत तयार आहे. त्यामानाने ब्रह्मदेश हा एक अलिप्त व लष्करीदृष्टचा दुबळा देश आहे. इरावती वगैरे नद्यांची खोरी सोडली तर उत्तरेकडील व पूर्वेकडील डोंगरी इलाख्यांत रंगूनच्या सरकारचा अधिकार फारसा चालत नाही, तेव्हा त्या भागात युनानमधून आपले हस्तक पाठवून चीनधार्जिणा प्रसार तेथील जमातीत करता येतो. तेथे सध्या साम्यवादाचा प्रसार केला जात नाही; कारण तो तेथे सध्या खपणार नाही. तेथील भिन्न वंशीय लोकांत रंगूनच्या सत्तेविरुद्ध उठाव करून वांशिक स्वातंत्र्यासाठी तो केला जात आहे. त्यायोगे लहानलहान राज्ये उत्पन्न झाल्यास ती कधीच स्वजीवी (viable) होऊ शकणार नाहीत. तेव्हा ती केव्हाही गिळंकृत करता येण्यासारखी होतील. कशाही रीतीने लक्ष्यराष्ट्राच्या केंद्रीय सत्तेला खिळखिळे करावयाचे हाच अशा प्रचारामागे उद्देश असतो. त्यानंतर पुढील कार्यक्रम सुकर होतो.

यापेक्षाही महत्त्वाची बाब अशी आहे की, दक्षिण आशियातील राष्ट्रांत, लोकसंख्या व औद्योगिक प्रगतीच्या दृष्टीने चीनला शह देऊ शकणारा एकच देश आहे; तो म्हणजे भारत. भारत-चीन सीमा भौगोलिकदृष्टचा युद्धास विकट आहे व या दोन राष्ट्रांमधील शस्त्र-संघर्ष हिमालयातील ज्ञात खिडींच्या आसपासच होऊ शकतात. चीनच्या अजस्त्र सेनेचा पुरेपूर फायदा तेथे अनेक कारणांनी चीनला घेता येत नाही. उत्तर ब्रह्मदेशात उतरून; तेथील व भारताच्या पूर्व सरहद्दीवरील नागा आदी लोकांच्या सहकार्याने व अनुमतीने जर त्यांना भारताच्या पूर्व सीमेशी भिडता आले तर तेथील संभाव्य

संघर्ष-क्षेत्राचे भौगोलिक स्वरूप तेवढे विकट असणार नाही. तेथे अधिक सेनासंख्येने व विस्तृत क्षेत्रात युद्ध करता येईल. पण हे सर्व उत्तर ब्रह्मदेश व आपल्या देशातील नागा आदी लोकांत ब्रह्मदेश-विरोधी व भारतविरोधी भावना अती तीव्र झाल्यावरच सुलभ होईल. तसे चीनचे प्रयत्न चालू आहेत.

सध्या ब्रह्मदेशात, अशा टोळ्यांच्या उठावांशी सामना देण्यास, ब्रम्ही लष्करास अमेरिका व रशिया दोघेही मदत करीत आहेत. त्यांपैकी अमेरिका करतो ती साम्यवादास शह म्हणून व रशिया करतो ती हा भाग स्वतःच्या प्रभावळीत यावा व चीनच्या प्रभावळीत जाऊ नये म्हणून. तेथील राजवट त्या मदतीचा उपयोग करून आपली सत्ता सर्व ब्रह्मदेशात प्रस्थापित करू शकेल की नाही, याची शंका आहे. पूर्वी सांगितल्याप्रमाणे अंतर्गत उठाव केवळ शस्त्रबलाने दडपता येत नाहीत. त्यांची भूमिका राजकीय व आर्थिक असते. तेव्हा शस्त्रबलाबरोबरच त्यांचे राजकीय परिवर्तन व आर्थिक उन्नती हाती घेतली तरच उठावाच्या ज्वाला शमतात.

यावरून उघड होईल की या आग्नेय आशियातील द्वीपकल्पातही मुख्यत्वे मर्मभूमिशासक रशियाच आपले हातपाय पसरण्याचा कसोशीने प्रयत्न करीत आहे आणि अरब द्वीपकल्पाप्रमाणे याही द्वीपकल्पात त्याच्या या प्रयत्नास शक्यतो हाणून पाडण्याचे प्रयत्न या द्वीपकल्पातील राष्ट्रांकरवी किंवा इतर आशियाई राष्ट्रांकडून न होता, ते एका बाहेरील बलवान सत्तेकडून होत आहेत. या भागात रशियाशी स्पर्धा करणारे युरेशियातील दुसरे राष्ट्र चीन आहे, पण त्याचे प्रसार कार्य, रशियाशी युद्धसाहित्याच्या बाबतीत स्पर्धा अशक्य असल्याने, सध्या थोडे मर्यादित झालेले आहे. आपण मात्र या द्वीपकल्पाकडे एक निष्क्रिय प्रेक्षक म्हणूनच बघत आलो आहोत. अलिप्ततेचा आपण जो अर्थ लावतो त्याशी ते सुसंगतच आहे, पण त्याचे घोर परिणाम उत्तर ब्रह्मदेशात चीनने आपले बस्तान बसविल्यावरच आपल्या नजरेस येऊ लागतील. त्यानंतर त्यास आळा घालणे अत्यंत बिकट किंवा अशक्य होईल.

८

किनार-भूमीतील प्रबळ राष्ट्र- चीन

पूर्वी सांगितलेच की युरेशिया खंडातील मॅकिंडरप्रणीत मर्मभूमी ही उत्तरेस आर्क्टिक महासागर तसेच कॅस्पियन, उरल, बालकन् व लापनोर या भूवेष्टित समुद्रांकडे किंवा सरोवरांकडे वाहणाऱ्या नद्यांच्या पाणलोटांच्या सीमांवर आधारलेली आहे (नकाशा क्र. २ पाहा.) त्यावरहुकूम चीनच्या साम्राज्याचे पश्चिमेकडील सिंकियांग व वायव्येकडील तिएन्-शान हे प्रदेश त्यात मोडतात. परंतु यांग-त्सी-कियांग किंवा होहॅन्गहो या नद्या पॅसिफिक समुद्रास मिळत

असल्याने त्यांची आणि त्यांच्या उपनद्यांची खोरी व त्यामधील प्रदेश हा त्या मर्मभूमीच्या बाहेर तिच्या किनारपट्टीत येतो.

वेळेच्या अभावी आपण इराण, अफगाणिस्तान इत्यादी लहान राष्ट्रांबद्दलचा विचार टाळला आहे, पण नवचीन हे एक आकाराने प्रचंड, लोकसंख्येने अजस्र, नैसर्गिक संपत्तीत समृद्ध व लष्करीदृष्टचा बलवान राष्ट्र असल्याने त्यावर मर्मभूमिशासक रशियाचा प्रभाव पडला आहे की नाही? असल्यास तो कितपत आहे; नसल्यास त्याची कारणे काय? आणि त्यास आपल्या प्रभा-वळीत आणण्याच्या रशियाच्या प्रयत्नांचे परिणाम काय झाले? या प्रश्नांची उत्तरे शोधणे अवश्य आहे. आणि त्यामुळे रशियाच्या परराष्ट्र धोरणात, त्याच्या इतरत्र चालू असलेल्या प्रभाव-प्रयत्नांत किंवा शीतयुद्धातील अमेरिकेशी येणाऱ्या संबंधात काय फरक पडला आहे तेही पाहिले पाहिजे.

दुसऱ्या महायुद्धाच्या पूर्वीपासून जपानच्या पराभवासाठी चांग-कै-शेक व साम्यवादीय माओ-त्से-तुंग यांनी सहकार्य करावयाचे ठरविले होते. पण जपानचा पराभव झाल्यावरोबर रशियाने माओच्या सैन्याला, जपानने मंचूरियात खाली ठेवलेली सर्व शस्त्रास्त्रे देऊन व इतरही मदत करून चीनमध्ये साम्यवादासाठी लढा देण्यास सुसज्ज केले. १९४९ साली माओनी सर्व चीन पादाक्रांत करून चांग-कै-शेकना चीनवाहेर फॉर्मोसा बेटात जाण्यास भाग पाडले.

त्यानंतर रशिया व चीन ही एकमेकांस पूरक अशी बलिष्ठ साम्यवादी जोडी युरेशियात खडी झाली होती व त्याचे परिणाम काय होतील याची चिंता इतर राष्ट्रांच्या मनात उत्पन्न झाली होती. पण त्यांच्या समाइक विस्तारेच्छेला आळा पडेल अशा दोन कमतरता त्यांच्यात त्या वेळी होत्या. पहिली अशी की, कित्येक शतकांनंतर एका प्रबळ शासनाखाली एकसंध झालेल्या या नव-चीनला औद्योगिक विकासासाठी अनेक वर्षांचा अवधी हवा होता. त्यासाठी रशिया त्यास मदत करीत असला तरी, स्वतः रशियाही महायुद्धात झालेल्या हानीतून नुकताच बाहेर पडत होता. दुसरी

अशी की, रशियाजवळ त्या वेळी अण्वस्त्रे नव्हती. साम्यवादेतर राष्ट्रांचा नेता यु. स्टेट्स याने मात्र अण्वस्त्रांचा थोडाबहुत साठा केलेला होता. त्यामुळे युरेशियाच्या मध्यभागी उभ्या झालेल्या या साम्यवादी राष्ट्रद्वयास आपल्या सरहद्दीबाहेर साहसी आक्रमणे करण्यास वाव मिळाला नाही. रशियाने १९४८ साली इराणचा अझरबैजान हा प्रदेश व्यापून पुढे पाऊल टाकण्याचा प्रयत्न केला पण अमेरिका व ब्रिटन यांनी दिलेल्या धाकापुढे त्यांना मान तुकवावी लागली व आपले सैन्य मागे घ्यावे लागले. ग्रीसच्या राजवटीविरुद्ध साम्यवादी उठावास मदत करून रशियाचे भूमध्यसमुद्रापर्यंत विस्तार करण्याचे प्रयत्नही ग्रीसला मिळालेल्या पाश्चिमात्यांच्या मदतीमुळे असफल झाले. स्वतः अण्वस्त्रे बनवून त्यांचा साठा होईपर्यंत अशी साहसे करणे व्यर्थ आहे, याची जाणीव रशियास झाली. १९४९ साली अणुबॉम्बचा पहिला स्फोट करून व १९५४ साली स्वतःचा हैड्रोजन बॉम्ब उडवून रशियाने अमेरिकेविरुद्ध आपली प्रतिकारशक्ती वाढविली. तरी अजून या नवीन अस्त्रांचा साठा किंवा त्यासाठी अवश्य प्रक्षेपक आयुधे तयार नव्हती.

पाचसहा वर्षांत ती उणीव भरल्यावरही अण्वस्त्रयुद्धात होणाऱ्या परस्परांच्या भीषण संहाराची कल्पना त्यास आल्यामुळे अमेरिकेच्या हितसंबंधास धोका येईल अशा कोणत्याही कृत्यात भाग घेण्याची रशियाची तयारी झाली नाही, आणि अजूनही नाही. केवळ स्वसंरक्षणार्थ व आवश्यक स्वहित संबंधांच्या रक्षणार्थ अण्वस्त्रे वापरण्यास मात्र आता रशिया सिद्ध झाला. त्याचप्रमाणे आपल्या नव्या मित्रराष्ट्रालाही– चीनलाही–पाश्चात्त्यांनी आक्रमण केल्यास मदत करण्याचे व अवश्य झाल्यास त्याच्या शत्रूविरुद्ध अण्वस्त्रेही वापरण्याचे आश्वासन रशियाने दिले. परंतु प्रत्यक्ष अण्वस्त्रे चीन्यांच्या हाती देण्यास त्याने स्पष्ट नकार दिला. त्यात रशियाने हा आपला पहिला अपमान केल्याचे चीनला लागले.

१९५५ पर्यंत चीनला आपल्या देशात सर्व स्थिरस्थावर करण्यास व रशियाच्या सढळ तांत्रिक मदतीमुळे थोडीबहुत औद्यो-

गिक प्रगती करण्यास वेळ मिळाला होता. त्या कालात स्टालिनचा मृत्यू होऊन (१९५३) क्रुश्चोव्ह त्या जागी आले होते व स्टालिनची धोरणे त्यानी अनेक गोष्टींत वदलली होती. त्यावरहुकूम पाश्चिमात्य राष्ट्रांशी संघर्ष धुमसत न ठेवता सहजीवनाचे तत्त्व त्यानी वरकरणी तरी मान्य केले होते. चीनला मात्र आता फॉर्मोसा बेटातून (तायवान) चांग-कै-शेक यांच्या राजवटीस हाकलून ते बेट आपल्या राज्यास जोडण्याची वेळ आली असे वाटले. आणि रशियाने दिलेल्या मदतीच्या आश्वासनांचा फायदा घेण्याचे त्याने ठरविले. ही रशियाच्या मैत्रीच्या कसोटीची वेळ होती, कारण चीनजवळ तायवानचे रक्षण करणाऱ्या यु. स्टेट्सच्या आरमाराशी किंवा त्यांच्या हवाईदलाशी मुकावला करण्याजोगे वल नव्हते. तेव्हा अगदी किनाऱ्यालगतच्या मात्सू व क्वेमॉय बेटांवर, ती अखेरीस काबीज करण्याच्या उद्देशाने, त्याने तोफा डागावयास सुरुवात केली. यु. स्टेट्सशी त्यामुळे युद्ध झाल्यास रशिया मदत करील अशी त्यांची आशा होती. परंतु क्रुश्चोव्हनी त्यास अमेरिकेस उगीच डिवचून युद्ध सुरू न करण्याचा इशारा दिला. रशियाच्या मदतीवर अवलंबून राहिल्यास तोंडघाशी पडण्याचा प्रसंग येतो; तसेच आपल्या स्वतःच्या परराष्ट्रनीतीत किंवा शेजाऱ्यांविरुद्ध केलेल्या कोणत्याही साहसात चीनला रशियाच्या परवानगीवर यापुढे विसंबून राहावे लागणार याची जाणीव त्यास बोचू लागली. हा चीनला दुसरा अपमान वाटला यात शंका नाही.

लोकसंख्येमुळे नव्हे तरी तांत्रिक प्रगतीमुळे व लेनिनकृत साम्यवादीय यशस्वी क्रांतीचे जन्मस्थान म्हणून "बडा भाई" वाटणाऱ्या रशियावद्दलचा चीनचा आदर आता नाहीसा झाला. साम्यवाद प्रसारासाठी सशस्त्र क्रांतीवर पूर्ण विश्वास ठेवणाऱ्या चीनला रशियाचे नवे सहजीवनाचे व सशस्त्र क्रांतीशिवाय साम्यवादप्रसाराचे धोरण पटेना. त्याशिवाय साम्यवाद हा जरी आंतरराष्ट्रीय सीमा मानत नसला तरी, एकदा राष्ट्रात साम्यवाद प्रस्थापित झाला म्हणजे स्थानिक जनतेत व त्यांच्या पुढाऱ्यांत राष्ट्रीयत्वाची भावना तीव्रतेने जागृत होते. त्यावरहुकूम चीन व रशिया

यांत दोन स्वतंत्र राष्ट्रे या भावनेतून साम्यवादाच्या जागतिक धोरणांबद्दल तेढ वाढू लागली आणि त्यांचे आपसातील दृढ झालेले संबंध शिथिल होऊ लागले. एकमेकांवर "लेकी बोले सुने लागे" अशा प्रकारची टीका अधूनमधून सुरू झाली.

या सर्व गोष्टी होत आहेत, तोच रशिया क्यूबामध्ये अण्वस्त्राचे तळ उभारत आहे याची माहिती अमेरिकेला मिळाली. रशिया व अमेरिका ही दोन्ही राष्ट्रे अण्वस्त्रसिद्ध झाल्यानंतरचा हा एकमेकांसमोर शत्रुभावाने पवित्रा घेण्यास लागण्याचा पहिलाच प्रसंग. अमेरिकेच्या सुरक्षा-व्यवस्थेला अत्यंत वर्मी घाव घालणारी ही घटना होती. अमेरिकेने अर्थातच त्यासाठी अण्वस्त्र युद्धही पत्करले असते. याची खात्री वाटू लागताच रशियाने माघार घेतली. लगेच "साम्राज्यवाद्यांशी" व "भांडवलशहांशी" युद्ध करण्यास रशिया भितो अशा प्रचाराची चीनने झोड उठविली. आता मात्र त्या राष्ट्रद्वयांचे पूर्णपणे फाटले. रशियाने आपली तांत्रिक मदत बंद केली व चीनच्या विकासासाठी पाठविलेले वैज्ञानिक परत बोलावून घेतले. शालजोडीतली टीका आता उघड व तीव्र होऊ लागली. आपसांतील सीमावाद वगैरे उकरून काढण्यास ऊत आला. आता तर रशियाने काही केले तरी चीन त्यावर टीकेचा भडीमार करतो. सहजीवनाच्या तत्त्वावर टीका होते; पाश्चिमात्यांशी समजुतीने घेतले तर दोष दिला जातो आणि त्या उलट च्छेकोस्लोव्हाकियासारखी कोणावर जबरी केली तरी त्यास नावे ठेविली जातात. तेव्हा माओ जिवंत आहेत तोपर्यंत तरी त्या दोन्ही देशांत दिलजमाई अशक्य दिसते.

हे सर्व जरा विस्तृतपणे सांगण्याचा उद्देश असा की, रशियाच्या साम्राज्याचा प्रभाव चीनरूपी किनार-भूमीच्या मार्गे पॅसिफिक महासागरापर्यंत पोहोचून ईशान्य सैबेरियापासून चीनच्या हायनान् बेटापर्यंत जवळजवळ अखंड समुद्रकिनारा व त्यावरील अनेक लहान-मोठी बंदरे मर्मभूमिशासक राष्ट्राच्या आरमाराला वापरासाठी खुली होण्याऐवजी ती आता, चीन साम्यवादी असला तरी,

मार्क्स-लेनिनप्रणीत पद्धतीच्या बाबतीत साम्यवाद प्रसाराच्या एका विरोधकाच्या हाती आहेत. त्यामुळे पॅसिफिक महासागराच्या पश्चिम किनाऱ्यावर वर्षभर बर्फविरहित असणारे बंदर, रशियाच्या आरमारासाठी अजून मिळालेले नाही. त्याशिवाय इतरही बाबतीत रशिया व चीन यांच्या सहकार्याने त्या दोन्ही देशातील अफाट नैसर्गिक संपत्तीचा विनियोग सामायिक विकासासाठी व राष्ट्रबलासाठी होण्याऐवजी त्यांचे विभाजन झाले आहे. आणि त्यापैकी प्रत्येकजण जागतिक राजकारणावर कार्यसाधक प्रभाव पाडण्याच्या दृष्टीने थोडा दुबळा राहिला आहे.

या आपसातील तेढीमुळे उत्तर कोरिया व उत्तर व्हिएटनाम यांना आपल्याकडे वळविण्याचे प्रयत्न दोघेही करीत आहेत, आणि परिणामी त्यांच्यातील दुफळी अधिकच वाढत आहे. उत्तर कोरिया किंवा व्हिएटनाम यांनाही जाणीव आहे की त्यांना युद्धोपयोगी सामग्रीची, विशेषत: अतितांत्रिक शस्त्रांची, मदत चीनपेक्षा रशियाच अधिक करू शकतो तेव्हा त्यांचा कलही, एकीकडे चीनशी सलगी ठेवून, रशियाच्या बाजूस वळला आहे. याचा अर्थ असा की, रशियाचा प्रभाव आता चीनची किनारपट्टी वगळून व त्यास वळसा देऊन कोरिया व आग्नेय आशियाचे द्वीपकल्प या ठिकाणी पाडला जात आहे. चीनच्या असहकारामुळे आग्नेय आशियास मदत करणे व शस्त्रास्त्रांचा पुरवठा करणे, यासाठी रशियास दूरच्या समुद्रमार्गे शस्त्रे पाठविण्याचा द्राविडी प्राणायाम करावा लागत असला तरी त्यास तो मान्य करावा लागत आहे.

या दोन साम्यवादी राष्ट्रांतील तेढ अशीच वाढत गेली, चीन वर्षानुवर्षे आपला औद्योगिक विकास करून प्रबल होत गेला तर, तेथील लोकसंख्या, जनतेची परिश्रमक्षमता व अत्यंत तीव्र राष्ट्रभक्ती, यामुळे वाढत जाणाऱ्या चीनी राष्ट्रबलाची दखल रशियास घ्यावी लागेल. त्याहूनही आता चीन अण्वस्त्रसिद्ध असल्याने रशियांतर्गत मर्मभूमीला एक अधिक जवळचा व अधिक साहसी अशा संभाव्य शत्रूचा धोका उत्पन्न झाला आहे.

चीन हा क्षेत्रफळाने विशाल देश आहे, पण तो पूर्वापार शेतीप्रधान असल्यामुळे तेथील बहुतेक लोकसंख्या पॅसिफिक महासागरास मिळणाऱ्या नद्यांच्या खोऱ्यात मंचूरियापासून शेझवान, क्वांगसी ते क्वांटुंग प्रांतापर्यंत पूर्वेकडील पट्ट्यात पसरलेली आहे. चीनने औद्योगिक विकासाला हात घातल्यापासून तोही या भागातच झालेला आहे. त्यांच्या सुदैवाने त्यासाठी लागणारी खनिज संपत्तीही याच भागात अधिक सापडते. आतील मंगोलियापासून तिबेटपर्यंतचा पश्चिमेकडील मुलूख त्या मानाने ओसाड आहे; एवढेच नव्हे तर उत्तरेस गोबी वाळवंटाचा पट्टा मंगोलियापासून सिंकियांगच्या पूर्व हद्दीपर्यंत पसरलेला आहे. त्यामुळे चीनच्या राष्ट्रबलवृद्धीची अवश्य साधने पॅसिफिक महासागराच्या किनाऱ्यापासून साधारणत: ६०० मैलांच्या पट्ट्यात केंद्रित झालेली आहेत.

या भूभागातील भावी राजकारणावर नजर ठेवून की काय, मंगोलियास चीनपासून वेगळा करून रशियाने त्यारूपे त्या प्रदेशाचे एक आघातशोषक राष्ट्र उभे केले आहे. मंगोलियाला लष्करी व व आर्थिक साहाय्य करून रशियाने आपल्या प्रभावळीत त्यास गोवले आहे. अशा रीतीने रशियांतर्गत मर्मभूमी चीनच्या भूसेनेच्या धोक्यापासून त्यांनी काही अंशी सुरक्षित केली आहे. चीनमधील सिंकियांग प्रांत मर्मभूमीत आहे खरा. पण त्यातील जनता व मध्य आशियातील किरगीझ व ताझिगीस्तान यांतील जनता यात वांशिक साम्य आहे. तेथील धर्म मुख्यत: इस्लाम आहे. तेव्हा चीनच्या सिंकियांगमध्ये रशियाने आपल्या बाजूने बराच मतप्रसार केलेला आहे असे दिसते.

यावरून उघड होईल की, मर्मभूमिशासक रशियाचा विस्तार चीनच्या किनारपट्टीबाहेर रोखला गेला आहे. एवढेच नव्हे तर चीनचे राष्ट्रबल वाढले तर त्यास चीनपासून धोका येण्याचा बराच संभव आहे. अर्थात याची जाणीव रशियाचा जागतिक क्षेत्रातील दुसरा स्पर्धक यु. स्टेट्स यासही आहे. या सर्व घटनांचे रशिया, चीन व यु. स्टेट्स यांच्यामधील परस्पर संबंधांवर गहन परिणाम

होत आहेत यात शंका नाही. आज जरी ते पूर्णपणे उघड झालेले नसले तरी त्या संदर्भात राजकीय पटावरील काही चालींची चाहूल लागू लागली आहे. अमेरिकेत असा एक मतप्रवाह सुरू झाला आहे की, आजपर्यंत अत्यंत तीव्रतेने चालविलेली चीनविरोधी राजनीती बदलून, चीनशी समजुतीने घ्यावे व रशियाविरोधी असलेल्या या महान राष्ट्राशी सलोख्याचे संबंध वाढवून, रशियाच्या पूर्वेकडील साम्राज्याला दक्षिणेकडून शह द्यावा. अजून अशी पावले उघडपणे कोणीच टाकलेली नाहीत हे खरे, पण ती कशी, केव्हा व कोठपर्यंत टाकावयाची हे अमेरिका व रशिया यांमधील पश्चिम युरोपीय द्वीपकल्पातील संबंधांवर, त्यांच्या आपसात होत असलेल्या समझोत्यावर (detente) व अण्वस्त्रांवर घालावयाच्या बंधनांच्या वाटाघाटीवर अवलंबून आहे. जर समझोत्याऐवजी त्यांच्यातील संबंध अधिक दुरावू लागले तर, चीनशी सलगीचा प्रयत्न अमेरिका करू लागेल असे समजण्यास जागा आहे. अर्थातच या संदर्भात चीन व यु. स्टेट्स यांच्या वॉरसा येथील राजदूतांमध्ये अधुनमधून बोलणी होत असतात पण त्यास फारशी प्रसिद्धी दिली जात नाही. त्यासाठी चीनला काय किंमत द्यावी लागेल ते आताच सांगता येणार नाही. परंतु जर अमेरिका व रशिया यांनी आज जगाला आपापल्या प्रभाव-क्षेत्रात वाटून घेतले आहे असे आपण समजलो, तर चीनलाही जगातील काही क्षेत्र वाटून द्यावे लागेल, आणि ते चीनच्या लगतचे आग्नेय आशियाचे क्षेत्र असण्याचाच संभव अधिक आहे. चीनच्या वाढत्या लोकसंख्येला आज ना उद्या बाहेर पडण्यासाठी कोठेतरी वसनक्षेत्र (lebensraum) अवश्य आहे. लोकसंख्येचा स्फोट जर होऊ दिला तर त्याचे पर्यवसान युद्धस्फोटात होईल. तेव्हा त्या स्फोटक द्रव्यास विखुरलेलेच बरे ! ते अर्थातच "हलवायाच्या घरावर तुळशीपत्र" असे दिसले तरी जागतिक राजकीय घडामोडीत अशी तुळशीपत्रे अगदी सहज ठेवली जातात आणि त्यात लहान लहान राष्ट्रांचे हितसंबंध ठोकरले जातात.

त्याविरुद्ध आरडाओरड करण्यातही अर्थ नसतो. त्याचा मुकावला त्या लहान राष्ट्रास स्ववलानेच करावा लागतो. पण असे वल दक्षिण आशियातील कोणत्याही एका राष्ट्रापाशी आज नाही आणि नजीकच्या भविष्यकालातही उत्पन्न होईल असे वाटत नाही. समाइकरीत्या अर्थातच त्यास बंधन घालणे शक्य आहे; पण तसे प्रयत्न सध्या तरी दक्षिण युरेशियातील स्थानिक राष्ट्रांकडून होताना दिसत नाहीत.

९

पॅसिफिक महासागरातील द्वीपकल्पे

कोरियाचे द्वीपकल्प

दुसऱ्या महायुद्धाच्या अखेरीस जगातील शत्रुराष्ट्रांच्या साम्राज्यातील प्रदेशांना दोस्त राष्ट्रांनी (तथाकथित) स्वतंत्र केले. त्यातच कोरियाचा समावेश झाला. जपानविरुद्ध युद्धात रशिया अगदी अखेरचे काही दिवस पडला. तो तसा पडला नसता तरी जपानचा पराभव फारसा दूर नव्हता. परंतु युद्धात पडून रशियाने त्यापासून आपला बराच फायदा करून घेतला. साम्राज्यशाही

राष्ट्रांच्या मांडलिकीतील बहुतेक प्रदेशात तेथील जनतेची इतकी पिळवणूक होत असे की, त्यांच्यात साम्यवादाचा प्रसार सोपा झालेला होता आणि अजूनही तो तसा आहे. मलाया, इंडोनेशिया, फ्रेंच इंडोचायना व कोरिया ही त्याची काही उदाहरणे आहेत. साम्यवाद हा एक साम्राज्यविरोधी तत्त्ववाद आहे व जगातील साम्यवादी राष्ट्रे ही साम्राज्यांतर्गत राष्ट्रांना सर्वतोपरी मदत करून त्यांच्या खांद्यावरील साम्राज्यशाहीचे जू झुगारून देण्यास मदत करतात, असा सर्वसाधारण समज साम्यवादीय करून देतात. १९५६ मध्ये हंगेरीविरुद्ध व त्यानंतर नुकत्याच झालेल्या रशियाच्या च्छेकोस्लोव्हाकियावरील आक्रमणामुळे साम्यवादी राष्ट्रेसुद्धा साम्राज्यशहाच आहेत याचे प्रत्यंतर लोकांना आले आहे. साम्यवादी स्वतःस समाजवादी म्हणतात व "समाजवादी राष्ट्रकुल" हा शब्दप्रयोग रशियाने या वर्षी च्छेकोस्लोव्हाकियावरील आक्रमणाच्या संदर्भात आपल्या आक्रमक कृतींच्या समर्थनार्थ वापरला. त्या राष्ट्रकुलातून बाहेर पडणे तर राहूच द्या, पण अंतर्गत राज्यशासनात त्या कुलातील राष्ट्रांनी साम्यवादी तत्त्वांचा वेगळा अर्थ लावला व तशी पावले टाकली, तरी त्यांना वठणीवर आणण्याचा हक्क त्या राष्ट्रकुलाच्या नायकास आहे असे त्यांनी उघड प्रतिपादन केले आहे. तसे चुकीचे पाऊल कोणी टाकले किंवा नाही हेही ठरवावयाचे अर्थात त्या कुलाच्या नायकानेच !

असो, रशियाला जपानच्या सैन्याशी फारसे युद्ध करावे लागलेच नाही. मंचूरिया व कोरियातील जपानी सेनेने आपली शस्त्रे लवकरच खाली ठेवली. रशियाची सेना भराभर मंचूरिया व्यापून कोरियात घुसली. दुसऱ्या बाजूने अमेरिकेचे सैन्यही दक्षिण कोरियात उतरले. त्या दोन्ही दोस्त सैन्यांत संघर्ष होऊ नये यासाठी अक्षांश ३९ ही त्यांच्यामधील विभाजक रेषा ठरली आणि कोरिया हा देश रशियाच्या व अमेरिकेच्या सेनांनी त्या रेषेपर्यंत प्रवेश करून दोन्ही बाजूंनी व्यापला.

दोस्त राष्ट्रांत ठरलेल्या महायुद्धपश्चात जागतिक व्यवस्थे-

प्रमाणे कोरियाला स्वतंत्र करावयाचे असले तरी ते कोणत्या राज्य-पद्धतीनुसार हा प्रश्न साहजिकच उभा राहिला– साम्यवादी की लोकशाही ? अर्थातच, अक्षांश ३९ च्या उत्तरेस साम्यवादीय व त्याच्या दक्षिणेस लोकशाही सत्ता प्रस्थापित झाली. आणि परिणामी तेथे एकाऐवजी दोन राज्ये मात्र उत्पन्न झाली. कोरिया एकच राष्ट्र आहे व त्या दोघांनी एकत्र यावे वगैरे नेहमीच्या ठराविक घोषणा झाल्या; पण १९४६ पासून आज १९६९ पर्यंत, तेवीस वर्षांत तसे काही साध्य झालेले नाही. आणखी अनेक वर्षे त्यात फरक होईल याचीही आशा दिसत नाही.

परस्परांच्या राज्यपद्धतीला तीव्र विरोध असलेली, एकाच राष्ट्रीय जनतेने उभी केलेली ही दोन राष्ट्रे सुखासमाधानाने एकत्र राहतील हे शक्य नव्हते. दक्षिण कोरियास जबरीने आपल्यास जोडण्यासाठी १९५० साली उत्तर कोरियाने (आणि ते चीन व रशियाने दिलेल्या फुशीमुळे होते यात शंका नाही.) दक्षिण कोरियावर स्वारी केली. यूनोने हे आक्रमण आहे असे मान्य करून यूनोची आंतरराष्ट्रीय सेना तेथे पाठविली. रशिया यूनोचा सभासद असतानाही त्याचे लष्कर यूनोच्या सेनेत तर नव्हतेच पण त्या उलट तो उत्तर कोरियास शस्त्रास्त्रांची मदत करीत होता. या युद्धाच्या तपशिलात किंवा तेथील राजकीय व लष्करी घटनांच्या वारकाव्यात पडण्याचे आपल्याला कारण नाही. एवढे समजले म्हणजे पुरे की चीनची सेना उत्तर कोरियाच्या बाजूने त्यात पडल्यावर तीन वर्षांवर युद्ध चालून दोन्ही कोरियामधील अक्षांश ३९ च्या रोखाने कोरियाचे विभाजन मानले जाऊन १९५३ मध्ये युद्धाची समाप्ती झाली. आजही या रेषेचा भंग वेळोवेळी होत असतो. उत्तर कोरियास शक्य झाल्यास दक्षिण कोरिया आपल्या साम्यवादी राज्यात जोडण्याचा आक्रमक प्रयत्न करणे त्याचप्रमाणे उत्तर कोरियास जिंकण्याचा दक्षिण कोरियाचाही तसाच उद्देश असणेही साहजिक आहे. तेथील परिस्थिती त्यामुळे गेल्या

१५–१६ वर्षे अत्यंत नाजूक झालेली आहे.

जपानच्या ताब्यातील इतर बेटेही दोस्तराष्ट्रांत वाटली गेली. दक्षिणेकडील अर्धे साखालिन बेट जपानचे होते ते रशियाने घेतले. फॉर्मोसा हे तायवान या नावाने चीनकडे– म्हणजे अखेरीस चांग-कै-शेक यांच्या चीनी राष्ट्रीय-सरकाराकडे– गेले. त्याचप्रमाणे पॅसिफिक समुद्रातील बोनिन्, मारियाना व कॅरोलिन् यातील बेटे अमेरिकेच्या हाती पडली. ती सध्या ठेव-प्रदेश, (trust territory) मानली जाऊन अमेरिकेच्या आरमाराची आधारस्थाने म्हणून वापरली जातात.

कोरियाच्या भौगोलिक स्थितीच्या महत्त्वाची पूर्ण कल्पना येण्यासाठी वरील महायुद्धजन्य राजकीय व भौगोलिक बदलांची माहिती असणे अवश्य आहे. मॅकिंडरप्रणीत मर्मभूमीला सीमाबद्ध करण्यासाठी स्पिक्मन्च्या सिद्धान्ताप्रमाणे किनारभूमी व लगतची बेटे आपल्या सुरक्षागटात ठेवावयाची असतील तर जपानचा द्वीपसमूह, फॉर्मोसा, दक्षिण कोरिया यांत रशियाचा प्रवेश न होऊ देणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे. दक्षिण कोरिया जर साम्यवादी गटाच्या हाती गेला– म्हणजे रशियाच्या हाती गेला– तर, तो प्रदेश जपानच्या समुद्रात एखाद्या कट्यारीसारखा घुसलेला असल्याने व तो दक्षिण जपानपासून १००–१२५ मैल अंतरावरच असल्याने, जपानच्या सुरक्षिततेला त्यापासून अतिशय धोका उत्पन्न होईल. जपान व अमेरिकेचा संरक्षणाबद्दल परस्पर मदतीचा तहनामा आहे. दक्षिण कोरियातील लोकशाही राजवट, तीस मदत देऊन टिकविली पाहिजे हे उघड आहे. युरेशियाच्या या द्वीपकल्पात जपानच्या समुद्राच्या पैलतीरी आपले पदस्थान (bridge-head) मजबूत ठेवणे आणि जपानच्या समुद्रातील आपले दळणवळण सुरक्षित व कायम ठेवणे अमेरिकेस अवश्य आहे.

सध्या जरी तेथील परिस्थिती साधारणतः स्थैर्याची वाटत असली तरी रशियाच्या वाढत्या समुद्रबळाला ती फायद्याची नाही. व्ह्लॉडिव्हॉस्टॉक् व पेट्रोपाव्हलोस्क् ही त्याची दोन मुख्य

आरमारी ठाणी या द्वीपकल्पाच्या उत्तरेस आहेत. त्यांपैकी पहिले जपानच्या समुद्राच्या उत्तर किनाऱ्यावर आहे. आणि युरोपीय रशियास जोडणाऱ्या सैबेरियन रेल्वेमार्गाचे ते पूर्वेकडील अंतिम स्थानक आहे. कामश्चाटकाच्या किनाऱ्यावरील पेट्रोपाव्हलोस्कला रेल्वे पोचत नाही व त्याशी दळणवळण व्ह्लॉडिव्हॉस्टॉकहून समुद्रमार्गेच चालते आणि तोही जलमार्ग जपानी बेटांजवळून जातो. दक्षिण कोरिया साम्यवादी झाल्यास– आणि तो रशियाच्याच मदतीने होणे शक्य आहे– रशियास अखंड कोरियाच्या संरक्षणाच्या नावाखाली पुसान्, इंचॉन् वगैरे बंदरे आरमारी तळासाठी वापरता येतील व त्यामुळे जपानच्या समुद्रावरील त्यांची पकड वाढेल व व्ह्लॉडिव्हॉस्टॉकपासून दक्षिणेस उत्तर-व्हिएटनाम व त्याहीपलीकडे जाणारे जलमार्ग युद्धकालात रशियाच्या आरमारास अधिक सुरक्षित व सुकर होतील.

यावरून दिसून येईल की मर्मभूमिशासक रशियाचा दवाव कोरियाच्या द्वीपकल्पावर आज जरी प्रत्यक्ष जाणवत नसला, तरी तो तसा केव्हातरी पुन्हा पडावयास सुरुवात होईल यात शंका नाही. पॅसिफिक महासागरातील रशिया व अमेरिका अधिक जपान यांच्या वलाच्या समतोलावर तेथील स्थैर्य सध्या अवलंबून आहे. तो विघडला तर तेथे राजकीय व तत्त्ववादीय वदल होणे अपरिहार्य आहे.

पूर्व सैबेरियाचे द्वीपकल्प

सर्वसाधारणतः पूर्व रेखांश १४० च्या पलीकडे सैबेरियाचा जो भूभाग आहे त्याच्या आकाराकडे पाहिले म्हणजे कामश्चाटकासह हे जवळजवळ भारताएवढेच मोठे एक द्वीपकल्प आहे असे दिसून येईल. त्या द्वीपकल्पाच्या पश्चिम सरहद्दीजवळून लेना नदी वाहते व आर्क्टिक महासागरास मिळते. या नदीच्या खोऱ्यात अनेक प्रकारची खनिज संपत्ती सापडली आहे व तेथे रशियाने बरीच

औद्योगिक उभारणी केलेली आहे.

या प्रचंड द्वीपकल्पाचेच एक उपद्वीपकल्प कामश्चाटका आहे व त्याच्या पॅसिफिक महासागरावरील पूर्व किनाऱ्यावर पेट्रोपाव्ह-लोस्क् हे एक बंदर व आरमारी ठाणे आहे.

हा मुलूख सर्वसाधारणतः वर्षातून ८ महिने वर्फाच्छादितच असतो व तेथे वस्तीही अतिशय तुरळक आहे. पण या द्वीपकल्पाला महत्त्व आले आहे याचे कारण त्याचे अत्यंत पूर्वेकडील भूशिर ईस्टकेप किंवा देश्नेव्ह केप आणि पश्चिम गोलार्धातील अलास्काचे अति पश्चिमेचे भूशिर, केप प्रिन्स् ऑफ वेल्स यामधील बेरिंगची सामुद्रधुनी ही केवळ २०० मैल रुंद आहे. अलास्का हा यु. स्टेट्सचा एक प्रांत आहे आणि रशियाचे साम्राज्य व यु. स्टेट्सचा प्रदेश हे एकमेकाशी अगदी जवळ भिडले आहेत ते केवळ या ठिकाणी.

अलास्का हा उत्तर अमेरिका खंडातील प्रदेश पूर्वी रशियाच्या साम्राज्यात होता. कोसॅक व इतर रशियाच्या जमातींनी पॅसिफिक महासागरापर्यंत रशियाचे साम्राज्य वाढविले त्या वेळी बेरिंगच्या अरुंद सामुद्रधुनीपलीकडे ते अलास्कातही गेले होते. क्रायमियातील युद्धाच्या वेळी ब्रिटिश आरमाराने तेथील रशियाच्या वसाहतींवर हल्ले केले. नौदलाच्या अभावी केव्हातरी हा प्रदेश आपल्यास घाल-वावा लागेल असे वाटून, १८६७ साली सर्व अलास्का प्रांत झार-शाहीखालील रशियाने अमेरिकेला ७२ लक्ष डॉलर्सला विकला. आता रशियाच्या साम्यवादी राज्यकर्त्यांना त्याबद्दल पश्चात्ताप होत असेल. कारण तो भाग आज रशियाच्या ताब्यात असता तर रशियाचे उत्तर अमेरिका खंडावर आपोआपच हे एक विस्तृत पदस्थान (bridge–head) शिल्लक असते आणि तेथून कॅनडा व यु. स्टेट्स या दोन्ही राष्ट्रांना त्यास शह देता आला असता.

य. स्टेट्सच्या हवाईदलाचे एकमाजी अधिकारी मेजर सेव्हेर्स्की* यांच्या मते : " तिसरे जागतिक युद्ध हे आकाशातच विशेषेकरून

* " Air Power; Key to Survival " by A. P. de Seversky (New York 1950)

होणार आहे. यु. स्टेट्सने आपल्या तिन्ही दलांची शक्ती रशियाहून अधिक वाढविण्याचा प्रयत्न करणे चुकीचे आहे. यु. स्टेट्सने भू-पृष्ठावरील व सागरावरील युद्धे टाळावी व आकाशातील युद्धावरच भर द्यावा." पण ते पुढे म्हणतात : " रशिया व यु. स्टेट्स यांच्या भूसेनांमधील पूर्वरूढ युद्धाची शक्यता फक्त बेरिंगच्या सामुद्रधुनीच्या आसपासच आहे." त्यांचे असे मत होण्याचे कारण रशिया व यु. स्टेट्स यांच्या प्रदेशातील येथील संलग्नता हा असावा. सेव्हेर्स्की हे हवाईदलातील अधिकारी होते व त्यांची मते थोडी एकतर्फी व त्यामुळे पूर्णपणे पटण्यासारखी नसली तरी एवढे मात्र खरे की, त्या दोन महाबलवान राष्ट्रात युद्ध झाल्यास, बेरिंग सामुद्रधुनीच्या दोन्ही बाजूंची पूर्व सैबेरिया आणि अलास्का ही द्वीपकल्पे युद्धक्षेत्रे होण्याचा विशेष संभव आहे.

ही परिस्थिती जाणून गेल्या काही वर्षांत रशिया व यु. स्टेट्स या दोन्ही राष्ट्रांनी आपापल्या द्वीपकल्पात त्या दृष्टीने योजनापूर्वक तयारी करण्यास सुरुवात केलेली आहे. या अत्यंत शीत व वर्षातून अनेक महिने बर्फाच्छादित असणाऱ्या प्रदेशात युद्ध झाल्यास अनेक प्रकारच्या नवनव्या युद्धसाहित्याची आवश्यकता भासेल. तसे ते योग्य संशोधनानंतर त्या दोन्ही राष्ट्रांत बनविले जात आहे. तसेच या भागात दोघांचेही प्रक्षेपणास्त्रांचे तळ असावेत.

पेट्रोपाव्हलोस्कहून सिॲटल् ४००० मैलांहून थोडे अधिक आहे. त्याचप्रमाणे अलास्कापासून रशियातील मर्मभूमीचा मध्यभाग तेवढ्याच अंतरावर आहे. अेकमेकांवरील अण्वाघातासाठी आंतरखंडीय प्रक्षेपणास्त्रांच्या पल्ल्यात ही अंतरे येतात.

हा द्वीपकल्पाचा प्रदेश रशियाच्या– म्हणजे मर्मभूमिशासक राष्ट्राच्या– स्वामित्वाखालीच असल्यामुळे तेथे दबाव आणण्याचा किंवा स्वतःचा प्रभाव पाडण्याचा प्रश्नच येत नाही. एवढेच लक्षात घेणे अवश्य आहे की भविष्यकालीन जागतिक युद्धात या प्रदेशास, पूर्वी कधी स्वप्नात देखील आले नसते एवढे महत्त्व आज आले आहे.

१०

युरेशियाभोवतालची द्वीपे व द्वीपसमूह

वायव्येकडील द्वीपसमूह

पुन्हा एकदा पूर्व गोलार्धाच्या नकाशाकडे नजर फिरविली की या खंडाच्या जवळ असलेला जपानचा द्वीपसमूह, फिलिपाइन्स, तायवान, बोर्निओ, जाव्हा, सुमात्रा, सिलोन, ग्रेट ब्रिटन व आयर्लंन्ड अशी अनेक बेटे नजरेस येतात. त्यांच्या पलीकडे विशेषत: आग्नेय दिशेस लहान मोठ्या अगदी जवळजवळ असलेल्या हजारो बेटांचा समूह ऑस्ट्रेलियाच्या महाद्वीपापर्यंत पोचतो. त्याही पलीकडे सॉलोमन,

कॅलिडोनिया व न्यूझीलंड हे द्वीपसमूह फारसे दूर नाहीत. मग युरेशिया खंडात कोणती बेटे अंतर्भूत करावयाची हा प्रश्न उभा राहतो. इंडोनेशिया व फिलिपाइन्स ही आशियाई राष्ट्रे असे आपण मानतो. इंडोनेशियाच्या राज्यात अर्धे न्यूगिनी बेट मोडते, तर त्याच बेटाचा पूर्वेकडील अर्धा भाग ऑस्ट्रेलियाच्या राज्यात आहे. तेथून ऑस्ट्रेलियाचे महाद्वीप केवळ दीडशे मलांच्या अंतरावर आहे. तेव्हा तेथेही ऑस्ट्रेलिया व युरेशिया खंडाची विभाजक रेषा काढली तरी ती कृत्रिम होईल.फार काय ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड व त्याच्या भोवतालची पॅसिफिक महासागरातील अनेक बेटे यांना ‘ ऑस्ट्रेलेशिया ’ (‘युरेशिया ’ या नावाप्रमाणेच) म्हणण्याचा प्रघात आहे. म्हणजे त्यांचा आशियाशी असलेला निकट संबंध भूगोलशास्त्रज्ञही मानतात असे दिसते.

राजकीय व लष्करी भूगोलशास्त्राच्या दृष्टीने या द्वीपमय विभागाचे परीक्षण करणे क्रमप्राप्त आहे. मलाया, सिंगापूरपासून ऑस्ट्रेलियापर्यंत ही बेटे इतकी जवळजवळ आहेत की, दोन पावलांत पृथ्वी-प्रदक्षिणा करणाऱ्या वामनावतारासारखा एखादा प्रचंड माणूस, सिंगापूरपासून ऑस्ट्रेलियातील केप यॉर्क भूशिरापर्यंत त्या अनेक बेटांवर एकामागून एक पाय ठेवत सहज पोहोचेल. तोच प्रकार तत्त्वप्रसाराच्या बाबतीत किंवा लष्करी आक्रमणाने केलेल्या राज्यविस्ताराच्या बाबतीतही होऊ शकतो. म्हणूनच या बेटांच्या समूहांवर राज्य करणाऱ्यांना– म्हणजे फिलिपाइन्स, इंडोनेशिया व अखेरीस ऑस्ट्रेलिया व न्यूझीलंड यांना– आग्नेय आशियातील राजकारणावर लक्ष ठेवण्याची आवश्यकता भासते. आणि तेथे उद्‌भवणाऱ्या लष्करी बलाबलाची दखल घ्यावी लागते. फार काय, आज ऑस्ट्रेलियाच स्वतःस एक आशियाई राष्ट्र असे म्हणवून घेऊ लागला आहे. दक्षिण व्हिएटनाममध्ये अमेरिकेच्या लष्कराप्रमाणेच तेथील राजवटीच्या साहाय्यार्थ त्याने थोडेसेच का होईना पण आपले सैन्य पाठविले आहे. या आशियाई भागात साम्यवादप्रसार होऊन त्याची झळ हळूहळू बेटाबेटावरून त्यांच्यापर्यंत पोहचू नये

म्हणून आर्थिक व तांत्रिक मदत देण्याची तयारी तो दाखवीत आहे.

सिंगापूरमधील नाविक तळ बंद करून सुवेझच्या पूर्वेस कोणतीही जबाबदारी घेण्यास ब्रिटन तयार नाही याची जाणीव झाल्यापासून मलाया, सिंगापूर आणि ऑस्ट्रेलिया यांना या भागातील आरमारीदृष्टचा भकास होणाऱ्या परिस्थितीची कल्पना विशेष तीव्रतेने आलेली आहे. स्थानिक राष्ट्रांच्या नाविक बलाने ती पोकळी पूर्ण भरणे शक्य नाही हे उघड आहे. एकमेकांशी चाललेल्या अहमहमिकेमुळे जगातील बलवान राष्ट्रे आपापली प्रभाव-क्षेत्रे वाढविण्यासाठी धडपड करीत नसती तर जगात ठिकठिकाणी उत्पन्न होणाऱ्या पोकळ्या भरत बसण्याचे कारणच नव्हते. पण जागतिक श्रेष्ठत्वासाठी त्यांचे प्रयत्न चाललेले असताना कोठेही मोकळी होणारी जागा त्वरित भरून काढण्यासाठी ते सरसावतील व आज जगातील सर्व महासागरांत अत्यंत शांत असलेला हिंदी महासागर जागतिक संघर्षाचे क्षेत्र होईल यात शंका नाही.

यासाठीच आग्नेय आशियातील राष्ट्रांनी संघटित होऊन सिॲटो संघटनेच्या बाहेर एसियन् (ASEAN–Association of South East Asian Nations) संघटना उभारली. त्यांच्या आपसातील भूमिवादामुळे ती कितीशी सफल होणार आहे ते सांगता येणार नाही. मलायेशिया व फिलिपाइन्समध्ये बोर्नियोच्या सावा प्रदेशाबद्दल वाद आहे. त्याचप्रमाणे सिंगापूर, इंडोनेशिया व मलायेशिया यांतही अनेक बाबतींत संघर्ष आहेत. परंतु अशी वादाची कारणे शिल्लक असतानाही त्या राष्ट्रांनी एसियन् सारखी संघटना उभारण्याचा प्रयत्न केला आहे, हेच त्यांना वाटणाऱ्या धोक्याचे प्रतीक आहे. आपसातील लहानसहान वादास अधिक महत्त्व द्यावयाचे की त्यांच्यावर समाइकरीत्या येणाऱ्या बाहेरील आक्रमकी संकटांना तोंड देण्यासाठी आपसातील वाद मिटवावयाचे हा प्रश्न त्यांच्यापुढे आहे. निदान बाहेरील धोका वाढत जाईल तसतसा संघटनेचा मार्ग स्वीकारण्याकडे त्यांची प्रवृत्ती होत जाईल असे वाटते. भारताच्या अलिप्ततावादामुळे आणि त्या संघटनेला थोडाफार

लष्करी साहाय्याचा वास येत असल्याने त्या संघटनेत मिसळण्याची तयारी भारताने दाखविलेली नाही. त्या राष्ट्रांचीही आपल्याला सभासद करून घेण्याची इच्छा दिसत नाही. कदाचित रशियाला अशा प्रकारची साम्यवाद-विरोधी संघटना आवडत नाही हेही आपल्या नकाराचे कारण असेल. पण दक्षिण व आग्नेय आशियातील आपल्यासह लहानमोठ्या सर्व राष्ट्रांच्या स्वातंत्र्य-रक्षणासाठी तसे करणे पुढे आपल्यास भाग पडेल यात शंका नाही. त्यास उशीर न झाल्यास मिळविली !

इंडोनेशिया

हे संपूर्णतया द्वीपमय राष्ट्र पश्चिमेस सुमात्रापासून पूर्वेस न्यूगिनीपर्यंत पसरलेले आहे. त्यापैकी मलायेशियाचा उत्तर बोर्नियो, पोर्तुगीझांच्या सत्तेखालील अर्धे टायमोर बेट व ऑस्ट्रेलियाच्या अमलाखालचे पूर्व न्यूगिनी सोडून दिल्यास त्यांच्या या साम्राज्यात दोन हजारांहून अधिक बेटे आहेत.

त्याला साम्राज्य म्हणण्याचे कारण असे की, हा द्वीपसमूह १९४८ पर्यंत हॉलंडच्या साम्राज्यात होता. त्यापैकी जाव्हा हे एक बेटच थोडे विकसित आहे व त्याच्या खालोखाल सुमात्रा व वाली येतात. या राष्ट्राची एकूण लोकसंख्या जवळजवळ १० कोटी आहे आणि त्यात अनेक वंशीय लोक राहतात. बोर्नियो, सेलिबीज किंवा अति पूर्वेकडील न्यूगिनी यातील जनतेचा जाव्हा-सुमात्रामधील जनतेशी वांशिक, सांस्कृतिक किंवा धार्मिक असा काहीच संबंध नाही. जाव्हा-सुमात्रा ही बेटे बहुसंख्येने इस्लामी आहेत. वालीत हिंदू संस्कृती आहे. इतर बेटांची लोकसंख्या वन्य जमातींचीच आहे. डच राज्यकर्त्यांनी आपली साम्राज्यसत्ता जाव्हातील जनतेच्या स्वाधीन केली त्या वेळी ही इतर बेटे व त्यांतील जनताही त्यांना दान केली असे म्हणावयास हरकत नाही; तेव्हा त्यांचे मालक बदलले एवढेच. याचा परिणाम मात्र असा झाला आहे की त्या

राष्ट्रात एकात्मीयता नाही व पश्चिमेकडील बेटे सोडल्यास इतर लोक अत्यंत मागासलेले आहेत. त्यास आपल्या सेनाबलाने नमवून त्यावर राज्य करणे सध्या सोपे आहे व मध्यवर्ती सत्ता बलवान व स्थिर आहे तोपर्यंत ते शक्य होईल, परंतु क्रांतिकारक राजकीय संघर्ष उत्पन्न करण्यास येथील परिस्थिती सुयोग्य आहे. थोडेबहुत उठाव तेथे अधूनमधून होत असतात.

आग्नेय आशियातील इतर प्रदेशांप्रमाणेच या राष्ट्रातही लक्षावधी चीनी स्थायिक झालेले आहेत. त्यांपैकी अनेक चीनी मुलाम्याचे साम्यवादी आहेत. त्याचप्रमाणे परकीय सत्तेची एक प्रतिक्रिया म्हणून येथे स्थानिक जनतेतही सुप्त साम्यवादीय डच सत्तेच्या वेळेपासून अस्तित्वात आहेत. सुकार्नो हे सत्ताधीश असताना साम्यवादीयांचे बरेच प्रस्थ तेथे वाढले होते व तेथील सत्ता पूर्णपणे हाती घेण्यासाठी त्यांनी धडकीने (coup) सत्ताहरणाचा प्रयत्नही केला. त्यात अनेक उच्चपदस्थ सैनिकी अधिकारी मारले गेले. पण जनरल सुहार्तो यांनी त्यास यशस्वीरीत्या तोंड देऊन राज्य-कारभार आपल्या हाती घेतला. लगेच त्यांनी साम्यवादी पक्षा-विरुद्ध मोहीम काढून त्यांचे जवळजवळ शिरकाण केले, चीनी स्थायिकांवरही दहशत बसविली. व सुकार्नो यांना अध्यक्षपदावरून शिताफीने काढून टाकले. परंतु त्यामुळे साम्यवादाचे संपूर्ण निर्मूलन झाले आहे असे नाही. आणि त्यांना वाव मिळाल्यास ते पुन्हा उठाव करणे शक्य आहे.

या राष्ट्रात नैसर्गिक संपत्ती भरपूर आहे. रबर, भूतेल, जस्त, मॅन्गनीझ हे पदार्थ ते निर्यात करतात. अन्नाची आयात करावयाची त्यांना गरज नसावी. तरीसुद्धा या देशाची आर्थिक स्थिती फार खालावलेली आहे. सुकार्नो यांच्या विस्तारवादी धोरणामुळे मलायेशियाशी संघर्ष उत्पन्न होऊन राष्ट्रीय खर्चाचा बोजा अतोनात वाढला. त्यांना मिळणारी पाश्चिमात्यांची मदत त्यांच्या साम्यवादधार्जिण्या धोरणांमुळे बंद झाली. देशाची आर्थिक प्रगती खुंटली. अशा परिस्थितीतून सध्या सुहार्तो या देशाला तारून

नेण्याचा प्रयत्न करीत आहेत. ते सफल झाले तर ठीक; नाही तर साम्यवादीयांना उठावाचे बीज पेरण्यास एक सुपीक जमीन येथे उत्पन्न होईल. त्यास चीन व रशियाही साहाय्य करील. सुकार्नो यांच्या काळात उभारलेल्या त्यांच्या सेनादलात रशियाने दिलेली शस्त्रास्त्रे, नौका व विमाने आहेत. त्यांच्या दारुगोळ्यासाठी व डागडुजीसाठी, त्यांना रशियावर विसंबून राहावे लागते. अशा परिस्थितीत रशियाशी फटकून वागणेही त्यास शक्य झालेले नाही. या राष्ट्राचा राजकीय कल कोणत्या बाजूस जातो याला आग्नेय युरेशियाच्या आणि आपल्या दृष्टीनेही महत्त्व आहे. तेथे मर्मभूमिशासक रशियाचे महत्त्व वाढले तर, सुमात्रातील मेदान व जाव्हातील इतर बंदरे रशियाच्या आरमाराला वापरता येऊन सिंगापूरला त्यास शह देता येईल. १९६५ सालच्या भारत-पाक युद्धाच्या वेळी, एक मुस्लिम राष्ट्र म्हणून त्याने पाकिस्तानशी संगनमत केले होते. तसे आता सुहार्तो यांच्या राजवटीत पुन्हा झाल्यास, आपल्याला त्याचे परिणाम हिंदी महासागरात जाणवतील.

१० कोटी लोकसंख्येच्या या राष्ट्राच्या भविष्यकालीन राजकीय धोरणांना व अंतर्गत परिस्थितीला आज महत्त्व आलेले आहे. हे राष्ट्र धर्मवेडे बनले तर त्याचे परिणाम आपल्यावर होतील. ते विस्तारवादी झाले तर मलायेशिया, ऑस्ट्रेलिया यांना त्याचा ताप होईल. त्यांच्या हॉलंडविरुद्धच्या लढ्यात भारताकडून त्याना पूर्ण सहानुभूती मिळाली होती. आणि दोन्ही राष्ट्रे स्वतंत्र झाल्यावर आपले परस्पर संबंधही अती स्नेहाचे होते. पुढे सुकार्नो यांच्या कारकीर्दीत त्यावर विरजण पडले. ते पुन्हा घनिष्ठ करण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे.

आस्ट्रेलिया

हे एवढे प्रचंड बेट आहे की त्याला खंड अशीच संज्ञा

देतात. त्याचा विस्तार भारताच्या दुप्पट असला तरी त्याची लोकसंख्या केवळ एक कोटीच्या थोडी वर आहे आणि ती, थोडे स्थानिक आदिवासी सोडल्यास श्वेतवर्णीय व ब्रिटिश वंशाची आहे. हे ब्रिटिश राष्ट्रकुलातील एक स्वतंत्र राष्ट्र असले तरी गेल्या महायुद्धानंतर, विशेषतः ब्रिटनच्या साम्राज्यातील आशियाई प्रदेश स्वतंत्र झाल्यापासून, त्याचे ब्रिटनशी असलेले संबंध हळूहळू दुरावून ते यु. स्टेट्सशी अधिकाधिक घनिष्ठ होत चालले आहेत. कारणे उघड आहेत ; ती अशी –

१. ब्रिटन्च्या साम्राज्यातील आशिया व आफ्रिका यातील देश स्वतंत्र झाल्यापासून ब्रिटन व ऑस्ट्रेलियामधील दळणवळणाच्या साखळीतील वरेच दुवे नाहीसे झाले आहेत.

२. ब्रिटनच्या साम्राज्य-विरहित परिस्थितीत त्याचे राजकीय हितसंबंध युरोपमधील नेटो राष्ट्रे, अटलांटिक महासागर व भूमध्य समुद्र यांत केंद्रित झाले आहेत. त्यांशी आता ऑस्ट्रेलियाचा प्रत्यक्ष संबंध राहिलेला नाही.

३. ऑस्ट्रेलिया खंड, पूर्वेस पॅसिफिक महासागर व पश्चिमेस हिंदी महासागर यांमध्ये असल्यामुळे, त्या त्या महासागरांच्या किनाऱ्यावरील भूप्रदेशांशी तो अधिक संबंधित आहे– म्हणजे पूर्वेस अमेरिका खंडाशी, उत्तरेस चीन-जपानशी व पश्चिमेस इंडोनेशिया-मलाया-भारत या दक्षिण आशियाई भागाशी.

४. त्याची लोकसंख्या तुटपुंजी असल्यामुळे तांत्रिक व औद्योगिक क्षेत्रांत त्यांनी कितीही प्रगती केली तरी युद्धात त्यांना सेनावल फारसे उभारता येणार नाही. तेव्हा एखाद्या मोठ्या राष्ट्राच्या मदतीची आवश्यकता त्यास भासते.

५. शेजारचे इंडोनेशिया, जपान व चीन यांच्या लोकसंख्या त्यांच्या मानाने प्रचंड आहेत. त्यांच्या विस्तारेच्छेची ऑस्ट्रेलियास भीती वाटते. अशा परिस्थितीत त्याचे संबंध अमेरिकेशी अधिक दृढ करणे त्यास अपरिहार्य आहे. त्यासाठीच न्यूझीलंड समवेत त्यांनी अमेरिकेशी आंझुस् (ANZUS–Australia, New Zealand,

United States) हा समाइक संरक्षण करार केला आहे.

६. ऑस्ट्रेलियाच्या मते त्याने आता आपल्या वांशिक युरोपीय संबंधापेक्षा, आपल्यास आशियाई राष्ट्र म्हणवून त्यात लक्ष घालणे श्रेयस्कर मानले आहे. तीच थोडीबहुत परिस्थिती न्यूझीलंडचीसुद्धा आहे. अशा राजकीय व भौगोलिक परिस्थितीत त्या राष्ट्राला आपले संबंध साम्यवादेतर आशियाई राष्ट्रांशी निकट करणे अवश्य वाटते. आणि तसे तो कुशलतेने करीत आहे.

या आग्नेयेकडील द्वीपसमूहात काय होणार आहे याचा आजच अंदाज करणे कठीण आहे. कारण व्हिएटनाममधील युद्धाच्या समाप्तीनंतर तेथील अंतिम राजकारणावर ते पुष्कळसे अवलंबून आहे. पॅरिसला सध्या चाललेल्या चतुरंगी संवादातून काय निष्पन्न होते ते काळच सांगेल. पण जर साम्यवादीय राजवट दक्षिण व्हिएटनाममध्ये आली तर, थायलॅण्ड, मलाया, ब्रह्मदेश आणि त्यांच्या दक्षिणेकडील या द्वीपसमूहातील राज्यकर्त्यांस त्या नव्या परिस्थितीची गंभीर दखल घ्यावी लागेल व त्यापासून उद्भवणाऱ्या परिणामांना तोंड द्यावे लागेल. आपल्यालाही त्याची झळ किती लागेल याचा निदान तात्त्विक अभ्यास तरी आपण करणे अवश्य झाले आहे.

फार्मोसा अथवा तायवान

मूळ चीनमध्ये चॅन्ग-कै-शेक यांचा पराभव झाल्यावर त्यांनी, युद्धापूर्वी जपानी साम्राज्यात असलेल्या, फार्मोसा बेटाचा आश्रय घेतला व तेथे साम्यवादी राजवटीपासून सुरक्षित असे राज्य स्थापिले. तायवान हे त्या बेटाचे चीनी नाव.

यूनोच्या सुरक्षा समितीचे जे पाच कायम सदस्य आहेत त्यांपैकी, साम्यवादीयांनी चीन जिंकण्यापूर्वी, चीनही एक होता- साम्यवादी चीन यूनोचा सदस्य नाही तेव्हा अधिकृतरीत्या तायवान- मधील राष्ट्रीय चिनी सरकार हेच सुरक्षा समितीचे कायम सभासद

असे मानले जाते. ते योग्य आहे किंवा नाही हा एक प्रश्न जगापुढे आहे.

साम्यवादी चीनला अर्थातच या राष्ट्रवादी चीन सरकारच्या राज्यातील प्रदेश– तायवान आणि मात्सु-क्वेमॉय ही लहान बेटे– काबीज करण्याची इच्छा आहे. पण बेटांवर चढाई करण्यास अवश्य असे नाविक दल चीनपाशी नाही. तायवान व यु. स्टेट्स यांचा परस्पर संरक्षणाचा करार आहे. शिवाय तायवानचे नाविक व भूदल सुसज्ज आहे. तेव्हा उलट चीनलाच तायवानच्या संभाव्य स्वारीविरुद्ध स्वतःच्या संरक्षणासाठी आपले बरेचसे सैन्य, शांघाय ते कॅन्टन यामधील समुद्रपट्टीत ठेवावे लागते. तेथे चीनचे २८ पायदळ व चिलखती विभाग (divisions) अडकून पडले आहेत.

तायवान बेटांवरील विमानतळांचा व बंदरांचा उपयोग यु. स्टेट्सच्या विमानदलास व आरमारास करता येतो. शिवाय हे बेट फिलिपाइन्सचे लुझॉन बेट व चीनचा किनारा यामधील अरुंद समुद्रमार्गाच्या मुखाशी असल्याने, त्याचा उपयोग उत्तरेकडून दक्षिण चीन समुद्रात येणाऱ्या जलमार्गावर द्वारपाल म्हणूनही करता येतो. रशियाच्या पॅसिफिक आरमाराच्या दक्षिणेकडील शिरकावावर किंवा हनॉयशी होणाऱ्या व्यापारावर नजर ठेवता येते. अवश्य झाल्यास हा मार्ग रशियाच्या दक्षिणेकडील हालचालींना मज्जाव करण्यासाठी रोखताही येईल.

आपल्यावर चीनने १९६२ साली आक्रमण केल्यानंतर काही लोकांची मते अशी होती की, आपण तायवानशी मैत्री करून त्याकरवी चीनच्या पोटाकृती किनाऱ्याविरुद्ध दहशत उत्पन्न करावी. तशा दहशतीमुळे चीनच्या तिबेटातील सैन्यसंख्येवर खरोखर काहीही परिणाम होणार नाही. शिवाय यु. स्टेट्सच्या प्रत्यक्ष मदतीशिवाय तायवानच्या दहशतीलाही काही अर्थ नाही व तशी मदत करून चीनशी युद्ध सुरू करण्याची यु. स्टेट्सची तयारी नाही. परंतु जपान-ऑस्ट्रेलिया-भारत या विस्तृत लोकशाही त्रिकोणीक्षेत्रात तायवान येतो आणि तशीच एखादी सुरक्षा-यंत्रणा उभी झाली तर

त्यात त्या बेटावरील सुसज्ज दलांचा तिच्या योजनेत उपयोग करून घेता येईल. परंतु तशा यंत्रणेचा विचारही आज झालेला नाही.

फिलिपाइन्स

या दुसऱ्या द्वीपमय राष्ट्राच्या भौगोलिक स्थानामुळे उत्तरेस तायवान व दक्षिणेस बोर्नियो यांसह दक्षिण चीनी समुद्र वेढला जातो व पॅसिफिक महासागरापासून तो अलग झालेला दिसतो. ओकिनावा, फिलिपाइन्स व त्याच्या पूर्वेकडील बेटे यावर आधारलेले यु. स्टेट्सचे ७वे आरमार या जलविस्तारावर देखरेख करू शकते.

ही बेटे प्रथम स्पेनच्या व नंतर यु. स्टेट्सच्या सत्तेखाली होती. दुसऱ्या महायुद्धापूर्वी त्यांना स्वातंत्र्य मिळाले आणि त्यांचे यु. स्टेट्सशी संबंधमैत्रीचेच राहिले. जपानने गेल्या महायुद्धात ती बेटे काबीज केली होती पण अखेरीस त्याला तेथून हाकून लावण्यात आले व ती स्वतंत्र झाली. त्यानंतर त्यांचा यु. स्टेट्सशी संरक्षण करार झालेला आहे व त्याकरता अमेरिकेच्या दलांसाठी तेथे काही ठाणी दिलेली आहेत.

या राष्ट्रातही महायुद्धानंतर साम्यवादी उठाव झाला होता. "हुकबलाहाप" (थोडक्यात 'हुक') यांच्या या उठावाविरुद्ध त्यावेळचे अध्यक्ष माग्सेसे यांनी मोहीम काढून त्याचा पूर्ण मोड केला.

व्हिएटनाममधील यु. स्टेट्सच्या अपयशामुळे फिलिपाइन्स सरकारलाही प्रश्न पडला आहे की, त्यांच्यावर जर चीनचे किंवा इतर साम्यवादीय राष्ट्राचे आक्रमण झाले तर,सध्याच्या यु. स्टेट्सच्या नैराश्याच्या मनोधारणेच्या संदर्भात,ते त्यास कोठपर्यंत मदत करतील. तसे संरक्षण स्वसामर्थ्यानेच होऊ शकते अथवा स्थानिक राष्ट्रांसहच त्यास प्रतिकार करावा लागेल. त्या दृष्टीने एसियन् किंवा ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, जपान यासह त्या योजना फलदायी होतील. त्यांमागे यु. स्टेट्सच्या नौदलाचे साहाय्य असले म्हणजे पुरे. असे विचार त्यांच्याप्रमाणेच आता अनेक पूर्व आशियायी व द्वीपसमूहांमधील राष्ट्रांत सुरू झाले आहेत.

जपान

गेल्या वीस वर्षातील जपानची आर्थिक व औद्योगिक प्रगती अचंबा वाटण्यासारखी झालेली आहे. त्यांना अमेरिकेने आर्थिक मदत केली, त्याचप्रमाणे सेनादले न उभारता त्यांना दुसऱ्या महायुद्धानंतर पहिली दहा वर्षे स्वतःच्या संरक्षणासाठी काहीच खर्च करावा लागला नाही, हे जरी खरे असले तरी, केवळ त्यांच्या अतीव श्रमाने, चिकाटीने, तांत्रिक ज्ञानाने आणि दुसऱ्या महायुद्धात झालेल्या पराभवाचे जणू काही उट्टे काढण्याच्या जिद्दीने ते आज औद्योगिक व आर्थिक समृद्धतेत जगातील पहिल्या चार देशांपैकी एक आहेत. त्यात अधिक कौतुकास्पद हे आहे की, जपानमध्ये औद्योगिक उत्पादनासाठी लागणारा बहुतेक कच्चा माल त्यांना परदेशातून आणावा लागतो. इतकेही असून जगातील अनेक प्रगत देशांशी जागतिक बाजारपेठांत टक्कर देऊन, आंतरराष्ट्रीय व्यापारात ते अग्रेसर आहेत. त्यांचे राष्ट्रीय उत्पन्न एवढे वाढले आहे की, आता त्यांच्या त्रिदळात अडीच लक्ष सैनिक तसेच अद्ययावत व अतितांत्रिक युद्धसाहित्य असूनही, त्यावर त्यांचा खर्च त्यांच्या राष्ट्रीय उत्पन्नाच्या शेकडा एकहून कमी होत आहे. त्यांनी अण्वस्त्रे बनविली नसली तरी त्याची अणुशास्त्रातील प्रगती, ती केव्हाही त्वरित बनविण्याइतकी झालेली आहे. अण्वस्त्र उत्पादनासाठी व क्षेपणास्त्रासाठी लागणारा खर्च त्यांना सहज झेपण्यासारखा आहे.

असो, भौगोलिकदृष्ट्या जपानची बेटे युरेशिया खंडाच्या अगदी जवळ आहेत व विशेष म्हणजे चीनशी निकट आहेत. रशियाच्या पॅसिफिक किनाऱ्यापासूनही ती दूर नाहीत. फार काय, आता रशियाच्या हाती असलेले साखालिन बेट तर त्यांच्या होकायडो बेटापासून केवळ ६० किलोमीटरवर आहे.

अशा परिस्थितीत त्यांना दोन गोष्टी कराव्या लागत आहेत. पहिली रशिया किंवा चीन या दोघांशीही अतिमत्रीचे नसले तरी साधारणपणे शेजारधर्माचे संबंध ठेवावे लागतात. आणि दुसरी

अशी की स्वसंरक्षणासाठी दुसऱ्या युद्धानंतर यु. स्टेट्सशी केलेला सुरक्षा करार कायम ठेवावा लागतो. चीन अण्वस्त्रधारी झाल्यापासून आपल्यापेक्षाही त्यांना चीनची भीती अधिक वाटत आहे, कारण तीनचारशे मैल मर्यादेच्या अण्वस्त्र-बाणांनी त्यांच्यावर सहज आघात होऊ शकतात. तेथील १० कोटी लोकसंख्या त्यांच्या लहान लहान बेटांच्या मर्यादित क्षेत्रात अत्यंत दाटीने राहात असल्यामुळे, अण्वस्त्रांचे परिणामही त्यांच्यावर भीषण होतील. अणुयुद्धात त्या राष्ट्राचा संपूर्ण नाश होणे शक्य आहे. शिवाय त्यांना त्या अस्त्राचा पूर्वी अनुभवही अती भयंकर आलेला आहे.

जपानी लोक हे मानववंशाने चीन्यांसारखेच आहेत व त्यांची पूर्वापार संस्कृतीही चीन्यांसारखी आहे. त्यामुळे त्यांच्याशी सलोख्याने राहून ते चीनशी आपला व्यापार वाढवीत आहेत. चीन ही केवढी तरी मोठी बाजारपेठ त्यांच्या अगदी जवळ आहे. असे प्रयत्न सध्या खासगी क्षेत्रात होत असले तरी जपानी सरकार त्यास मूक उत्तेजन देते. परंतु त्यांच्या राष्ट्राचे रक्षण मात्र अमेरिकेच्या अण्वस्त्र छत्रानेच होऊ शकते याची त्यांना पूर्ण जाणीव आहे. त्यास अधूनमधून थोडा अंतर्गत विरोध दिसत असला तरी त्यांचे हित ते जाणतात.

गेल्या दोनतीन वर्षांपूर्वीपर्यंत जपान, जगाच्या राजकीय क्षेत्रात फारसा भाग घेत नसे आणि आपली सर्व शक्ती राष्ट्रविकासा-साठी खर्च करीत असे. पण चीनच्या वाढत्या प्राबल्यामुळे गेल्या काही वर्षांत, त्यांनी आग्नेय आशिया व दक्षिण आशिया यांतील राष्ट्रांशी औद्योगिक सहकार्य व आर्थिक साहाय्य इत्यादी मार्गांनी निकट संबंध जोडावयास सुरुवात केली आहे. त्यांच्या तांत्रिक ज्ञानाचा फायदा घेण्यासाठी, त्या राष्ट्रांचीही तयारी दिसू लागली आहे. फार काय, रशियाच्या अतिपूर्वेकडील भागात रशियाच्या सहकार्याने त्यांनी अनेक उद्योग व कारखाने सुरू केले आहेत.

रशिया व चीन ही दोन्ही राष्ट्रे जपानचे औद्योगिक कसब आणि तशी वेळ आल्यास त्यांचे युद्धसामर्थ्यही जाणतात. आणि

जरी जपान व अमेरिका यांच्यात संरक्षणात्मक तहनामा असला तरी त्याशी योग्य ते संबंध ठेवून त्याचा फायदा घेण्याचा प्रयत्न चीन व रशिया दोघेही करीत आहेत.

दक्षिण आशियाच्या तांत्रिक व औद्योगिक क्षेत्रातील अविकसित व म्हणून असहाय स्थितीत या पुढारलेल्या देशाचे महत्त्व आगळे आहे. गेल्या महायुद्धापासून तेथील जनतेला युद्धाबद्दल तिटकारा आला असला तरी, स्वतःच्या हितसंबंधाच्या रक्षणार्थ जपान युद्धात पडेल याबद्दल शंका वाटत नाही. आणि त्यातलाच एक जिव्हाळ्याचा हितसंबंध दक्षिण कोरियाच्या सुरक्षेच्या बाबतीत असू शकतो. तेथे जर साम्यवादी आक्रमण यशस्वी झाले तर त्यामुळे जपानी राष्ट्राला गंभीर धोका अुत्पन्न होईल. त्यासाठीच अमेरिकेला ते जवळ करून आहेत व अमेरिकेला आपल्या देशातील काही लष्करी ठाणी ते वापरू देतात. त्या आधारस्थानांच्या (bases) साहाय्यानेच कोरियातील आक्रमणास अमेरिका सुलभतेने आळा घालू शकतो. पॅसिफिक महासागराच्या पूर्व किनाऱ्यावर अेकछत्राखाली अखंड फळी उभी झाल्यास जपानमध्ये नव्याने प्रस्थापित झालेल्या लोकशाहीचा अंतच जवळ येईल यात शंका नाही.

सिलोन

भारताजवळील एक मोठे बेट व एक स्वतंत्र राष्ट्र या दृष्टीने आपण त्याकडे पाहिले पाहिजे. तेथील जनतेचा या देशाशी वांशिक, सांस्कृतिक आणि धार्मिक संबंध पुरातन व गाढ आहे. लष्करीदृष्ट्या जरी त्या राष्ट्रापासून आपल्याला भीती बाळगण्याचे कारण नसले तरी त्या बेटावर कोणाचा प्रभाव पडतो, तेथे कोणत्या तत्त्ववादाचा प्रसार होतो व त्याचा उपयोग आपल्याशी शत्रुत्व करणारी राष्ट्रे आपल्या विरुद्ध कसा करतात, याला विशेष महत्त्व आहे. केरळमध्ये व दक्षिण भारतात इतरत्र चीनी साम्यवाद व माओप्रणीत वाङ्मय सिलोनवाटे प्रसृत केले जाते अशा बातम्या ऐकावयास मिळतात.

तेथील बॅन्कांवाटे पैसा व इतर मार्गाने शस्त्रास्त्रे व घातकृत्यास आवश्यक असले ी स्फोटक साधने भारताच्या दक्षिणेकडील समुद्र-किनाऱ्यावर पोचविणे सोपे आहे. तसा प्रयत्न आपल्या शत्रूंकरवी होतो अशाही बातम्या वेळोवेळी येतात. त्यांत बरेच तथ्य असावे.

तेव्हा सिलोनचा अंतर्गत विकास कसा होतो व त्याचा राजकीय कल कोठे झुकतो, त्याशी आपले संबंध आपण कसे ठेवतो, आपल्या राज्यव्यवस्थेबद्दल व आपल्या राष्ट्रबलाबद्दल त्यांना काय वाटते या व अशा अनेक गोष्टींवर सिलोनी जनतेकडून आपल्या संभाव्य शत्रूस तेथे मिळणाऱ्या आधाराचे प्रमाण अवलंबून असेल. त्यांना आपली प्रगती अभिमानास्पद वाटली, आपला राज्यकारभार सुसूत्र चाललेला व स्थिर वाटला, आपले राष्ट्रबल परिणामकारक वाटले तर त्यांचा मानसिक व राजकीय कल आपल्या बाजूस व लोकशाही-कडे वळेल व तेथील राजकारणावर चीन आदी साम्यवादीयांची छाप पडणार नाही. तशी ती पडणे आपल्यास आपल्या अंतर्गत सुरक्षिततेच्या दृष्टीने धोक्याचे आहे.

सिलोनच्या विकासासाठी आपण येनकेनप्रकारे हातभार लावणे व त्याशी त्या बाबतीत संगनमत करणे अत्यंत अगत्याचे आहे. त्या दृष्टीने गेल्या काही महिन्यांपासून सिलोनसह आपल्या भोवतालच्या इतर राष्ट्रांबरोबर आपले औद्योगिक सहकार्याचे प्रयत्न होत आहेत ते स्वागतार्ह आहेत. कोणत्याही परदेशात राष्ट्रीय पैसा गुंतविला गेला की त्या देशाच्या सुरक्षिततेबद्दल तेथील व राजकारणाबद्दल आपुलकी वाटू लागते. आर्थिक व औद्योगिक सहकार्यातूनच पुढे राजकीय व लष्करी सहकार्य उत्पन्न होते.

ग्रेट ब्रिटन

या द्वीपसमुदायापैकी आयर्लंन्ड हे राष्ट्र जागतिक व्यवहारात फारसे पडत नसल्यामुळे आपण ग्रेट ब्रिटनचाच विचार करू. एके

काळी अत्यंत बलिष्ठ असलेले हे राष्ट्र आता जगातील बलवानात दुसऱ्या दर्जास पोचले आहे. त्यांच्या साम्राज्यातील बहुतेका सर्व प्रदेश आता स्वतंत्र झाल्यामुळे त्यांचे जगभर पसरलेले हितसंबंधही शिल्लक राहिलेले नाहीत. भारत व इतर राष्ट्रांसमवेत एका राष्ट्र-कुलाचा नायक, अशी जरी आज त्यांची भूमिका असली तरी त्या कुलातील परस्पर संबंध आज शिथिल होऊ लागले आहेत व त्या नायकाच्या अनेक राजनैतिक किंवा आर्थिक धोरणांशी त्यांतील अनेक कुलवासीय सहमत होतातच असे नाही.

गेल्या महायुद्धानंतर ब्रिटनने आपली अंतर्गत परिस्थिती सुधारली असली तरी जगात त्यांची पूर्वीची पत त्यांना प्राप्त होणे यानंतर शक्य दिसत नाही. त्यांच्या खालावलेल्या आर्थिक परि-स्थितीत अंगावर असलेल्या सध्याच्या जबाबदाऱ्याही ते राष्ट्र कमी करीत आहे. सुवेझच्या पूर्वेकडील त्यांच्या राष्ट्रबलाचे, सिंगापूरच्या आरमारी तळाच्या रूपाने असलेले अस्तित्वही त्यांनी काढून घेण्याचे ठरविले आहे व १९७१ मध्ये ते तसे करणार असल्याचे त्यांनी घोषित केले आहे. याचा अर्थ असा की, आता केवळ एक यरोपीय राष्ट्र बनून किंवा, आपल्या या परीक्षणाच्या संदर्भात सांगावयाचे म्हणजे, युरेशियाच्या पश्चिमेकडील द्वीपकल्पांपुरत्याच जबाबदाऱ्या घेऊन राहण्याची या राष्ट्राची तयारी आहे. राष्ट्रकुलातील इतर राष्ट्रांनी आपापल्या स्थानिक जबाबदाऱ्या सांभाळाव्या असेच त्यांचे म्हणणे दिसते.

वैमानिक प्रगती होण्यापूर्वी व त्यानंतर अण्वस्त्रे व त्यांच्या प्रक्षेपणाची साधने यांचे उत्पादन होण्यापूर्वी, युरोपातल्याच पण त्यापासून अलग अशा या बेटांना परकीय आक्रमणापासून संरक्षण लाभत असे. ते आता तसे राहिलेले नाही. येवढेच नव्हे तर या बेटांचे भूक्षेत्रफळही फारसे नसल्यामुळे त्याचा संपूर्ण विध्वंस करण्यासाठी कोणाही अण्वस्त्रसिद्ध शत्रु-राष्ट्राला फारसे प्रयास पडणार नाहीत. अशा या अतिभेद्य अवस्थेत स्वसंरक्षणार्थ त्यांना समाइक संरक्षण योजना उभारणे अत्यावश्यक आहे. आणि अण्वस्त्राविरुद्ध संरक्षण

हवे असल्यास जगातील दोन अण्वस्त्रसिद्ध महान राष्ट्रांपैकी एकाशी अत्यंत निकट संबंध ठेवणे त्यांच्या फायद्याचे आहे. स्वतःच्या दुबळ्या अण्वस्त्रबलावर अवलंबून त्यांना त्यापैकी एकाही राष्ट्राच्या आक्रमणास प्रतिबंध करणे शक्य नाही. तसे लोकशाही मदतनीस राष्ट्र अमेरिका हेच आहे.

नेटो या संरक्षण संघटणेची उत्पत्ती रशियाने अण्वस्त्रांचा स्फोट करण्यापूर्वीच झाली असली तरी तशी संघटना असावी यासाठी ब्रिटननेच पुढाकार घेतला होता, कारण अशा संघटनेशिवाय रशियाच्या पूर्वरूढ शस्त्रबलाविरुद्धही गेल्या महायुद्धानंतर, पश्चिम युरोपीय द्वीपकल्पातील कोणतेही एक राष्ट्र किंवा त्यांची स्थानिक समाइक संघटनादेखील प्रतिकार करण्यास समर्थ नव्हती. आता तर ही संघटना टिकविणे अधिकच अवश्य झालेले आहे. आणि त्यासाठी तेथील सर्व राष्ट्रांनी, इतर जागतिक जबाबदाऱ्या शिरावर न घेता, उत्पन्न होणाऱ्या संरक्षणसमस्यांना तोंड देण्यासाठी आपल्या निकटवर्ती भू व समुद्र-विभागातच आपल्या शक्तीचे केंद्रीकरण केले पाहिजे हे उघड आहे. तसे आता ब्रिटन करीत आहे.

अण्वस्त्र युद्ध झाले नाही किंवा तसे होण्याचा संभव नाही तोपर्यंतच्या काळात ब्रिटनच्या औद्योगिक व तांत्रिक प्रगतीचे पाठबळ नेटो संघटनेला मिळत आहे. त्यांचे आरमार, यु. स्टेट्स व रशिया सोडल्यास, इतरांपेक्षा बलवत्तर आहे व त्या राष्ट्राच्या भौगोलिक स्थितीमुळे समुद्रावरील मोक्याच्या स्थानाचा त्यांना फायदा मिळतो. उत्तर अटलांटिकमध्ये रशियाच्या आर्क्टिक महासागरातील आरमारावर व त्यांच्याच बाल्टिक समुद्रातील आरमाराच्या अटलांटिक महासागरास जोडणाऱ्या स्कागेराक सामुद्रधुनीच्या द्वारावर त्यांना नजर ठेवता येते. आता भूमध्यसमुद्रात रशियाचे आरमार उतरल्यापासून नेटो संघटनेच्या दक्षिण बगलेच्या रक्षणार्थ ब्रिटनच्या आरमारास अमेरिकेच्या व इटलीच्या नौदलास मदत करावी लागेल. नेटो संघटनेतून फ्रान्स बाहेर पडल्यामुळे त्या मदतीची आवश्यकता अधिक वाढली आहे. तेव्हा ब्रिटनचे नेटो

संघटनेतील स्थान महत्त्वाचे आहे; व ते तसे ठेवण्याचा त्यांचा मानस आहे. त्यांना इतर जबाबदाऱ्या कमी करणे त्यामुळे भाग पडत आहे.

याप्रमाणेच युरेशियाभोवतालच्या अनेक लहानमोठ्या बेटां-बद्दल व द्वीपसमूहांबद्दल चिकित्सा करता येईल पण वेळेच्या अभावी ती येथे करीत नाही.

११

आफ्रिका खंड

या खंडाचे भौगोलिक व राजकीय दृष्टचा तीन भाग करता येतात.

१. उत्तर आफ्रिका– साधारणतः उत्तर २० अक्षांशांच्या उत्तरेकडील भभाग.

२. मध्य आफ्रिका– उत्तर २० अक्षांश ते दक्षिण १० अक्षांशांपर्यंत आणि

३. दक्षिणेकडील आफ्रिका– दक्षिण १० अक्षांशांखालील भूप्रदेश.

उत्तर आफ्रिका

या तीन भागातील तफावत, वांशिक सांस्कृ-

तिक,ऐतिहासिक आणि वैकासिक अशा अनेक कारणांमुळे आहे. उत्तर आफ्रिकेत इजिप्तपासून मोरोक्कोपर्यंतचे भूमध्य समुद्राच्या किनाऱ्यावरचे प्रदेश येतात. तेथील लोक बरेच गौरवर्ण व अरब वंशाचे आहेत व त्यांच्यात ग्रीस, इटली, स्पेन इत्यादींतील अनेक युरोपीय वंशांचे रक्तमिश्रण झालेले आहे. तसेच त्यांचा धर्म सर्वसाधारणपणे मुस्लिम असला तरी त्यांच्यावर भूमध्य समुद्राच्या उत्तर किनाऱ्यावरील युरोपीय संस्कृतीचीही बरीच छाप पडलेली आहे. हजारो वर्षांपूर्वीपासून भूमध्य समुद्राभोवती असलेल्या सर्व भूप्रदेशात सागरी दळणवळण प्रस्थापित झालेले होते व त्यांचा इतिहासही एकमेकांशी संबंधित असा होता. तेथील पराक्रमी पुरुषांनी वेळोवेळी केलेला राज्यविस्तार त्या समुद्राच्या दोन्ही बाजूंच्या किनाऱ्यांवरच होई. भूमध्य समुद्राच्या उत्तरेस ख्रिस्ती राष्ट्रे व त्याच्या दक्षिणेस मुस्लिम राष्ट्रे अशी धार्मिक विभागणी गेल्या एक हजार वर्षांतीलच आहे. आजही उत्तर आफ्रिकेतील राष्ट्रांचे राजकीय व आर्थिक व्यवहार हे युरोपीय राष्ट्रांशीच अधिक चालतात; मध्य किंवा दक्षिण आफ्रिकेशी नव्हेत. त्याला आणखी एक कारण, या खंडात पूर्व-पश्चिम पसरलेले सहाराचे प्रचंड व अगम्य वाळवंट. त्यामुळे उत्तर आफ्रिकेतील जनतेचे संबंध दक्षिणेकडे खुष्कीच्या मार्गाने विशेष वाढलेच नाहीत. केवळ नाइल नदीच्या खोऱ्याच्या मार्गाने सुदान आणि एथिओपिया यांशी जे थोडे आले तेवढेच. आजही उत्तर व मध्य आफ्रिका यांतील भूपृष्ठावरील दळणवळणाचे मार्ग फारसे विकसित झालेले नाहीत.

गेल्या काही वर्षांत म्हणजे गेल्या महायुद्धानंतर, पाश्चात्त्यांची उत्तर आफ्रिकेवरील पकड ढिली झाल्यावर व विशेषतः सर्व अरब राष्ट्रांत अरब राष्ट्रीयत्वाची भावना प्रबळ झाल्यापासून या सर्व राष्ट्रांचे एक संयुक्त राज्य बनविण्याचे किंवा निदान एक संयुक्त संघटना बनविण्याचे प्रयत्न होत आहेत. याबद्दल माहिती " पश्चिम आशियातील किनार-भूमी व अरब द्वीपकल्प " या प्रकरणात

पूर्वी दिलेलीच आहे. (पान ४२.) अशा प्रकारच्या कोणत्याही राष्ट्रादुच्च (supra-national) संघटनेतील घटक राष्ट्रास काही बाबतीत आपले सार्वभौम हक्क काही प्रमाणात सोडावे लागतात. त्यास येथील लहानमोठी अरब राष्ट्रे तयार नाहीत. असो, गेल्या अरब-इझराइल युद्धापासून हा सर्व प्रदेश थोडाबहुत अस्थिरच आहे व अरबांतील मतभेद अधिक तीव्रतेने नजरेस येत आहेत.

इजिप्तवर १९५६ साली झालेले ब्रिटन्-फ्रान्स यांचे आक्रमण, आसवान धरणासाठी यु. स्टेट्स्ने नाकारलेली आर्थिक मदत व त्यांची व इतर पाश्चात्त्यांची इझराइलबद्दलची आपुलकी, या कारणांमुळे तेथील राजवटींमध्ये रशियाधार्जिणी भावना उत्पन्न झाली आहे खरी, पण आता तेथे रशियाच्या नवीन साम्यवादी साम्राज्यशाहीबद्दल संशयही बळावू लागला आहे. इजिप्त, सिरिया व यमन यांना पुरविलेल्या शस्त्रांचा पुन्हा दुरुपयोग होऊ नये म्हणून तेथील स्थानिक सेनास लष्करी शिक्षण देण्याच्या आमिषाने आज प्रत्येकी २ ते ३ हजारांपर्यंत रशियाचे सेनाशिक्षक या देशामध्ये आलेले आहेत व त्यांची पकड या देशावर घट्ट होऊ लागली आहे. रशियाच्या तेथील राजदूतांची वागणूकही त्यामुळे थोडी अरेरावीची झाली आहे असे कळते. अल्जेरियालाही लष्करी मदत देऊन रशिया तेथेही आपले प्रस्थ वाढवीत आहे. रशियाचे भूमध्य समुद्रातील आरमार आता त्या समुद्रात स्थायिक झाले आहे; आणि पोर्ट सैद, अलेक्झांड्रिया (व बहुधा अल्जेरियातील मर्स-एल्-कबीर) ही बंदरे आपली नाविक आधारस्थाने म्हणून ते वापरू लागले आहेत. यमनमधील होदैदा बंदरात धक्के वगैरे बांधून, तेही बंदर रशिया आपल्या आरमारासाठी सोईचे आधारस्थान बनवीत आहे. एवढा खर्च व आटापीटा केल्यानंतर रशिया आपले तेथील वर्चस्व कमी होऊ देईल हे संभवत नाही.

या सर्व गोष्टींचे परिणाम इजिप्तवर विशेषतः होऊ लागले आहेत व आपण रशियाच्या 'साम्राज्यात' तर जात नाही ना, अशी

शंकाही त्यांना आलेली दिसते. त्यासाठीच ब्रिटनशी अरब-इझराइली युद्धाच्या वेळी तोडलेले राजदूतीय संबंध त्यांनी पुन्हा प्रस्थापित केले आहेत. तसेच अमेरिकेशीही ते तसे करतील अशी चिन्हे दिसू लागली आहेत. परंतु या काळात अरब-इझराइल समझोता होऊन सुवेझचा कालवा खुला झाल्यास, त्यातून रशियाचे आरमार तांबड्या समुद्रात उतरून यमन व दक्षिण यमन येथे आपले वस्तान बसवील हे उघड आहे. तसे झाले म्हणजे या भागात बसविलेली पकड रशिया सहजासहजी सोडणार नाही. स्वतःच्या प्रभावक्षेत्रात हा सर्व प्रदेश ठेवण्याचा तो आटोकाट प्रयत्न करील.

ज्या प्रकारे युरेशियामध्ये त्याचे दबाव इतरत्र फलद्रूप होत आहेत, तसाच मर्मभूमी–राष्ट्राचा प्रवेश आफ्रिकेतही दक्षिणेस सोमालियापर्यंत होऊ लागला आहे. इजिप्त-अल्जेरियामध्ये त्यांनी प्रस्थापिलेल्या वैमानिक तळापासून नैजेरिया, घाना वगैरे देश हवाई पुरवठ्याच्या किंवा आघाताच्या कक्षेत येतात हेही लक्षात ठेवले पाहिजे. त्यायोगे वेळ आल्यास त्यांना लष्करी मदत पोचविणे सोपे होईल व राजकीय उठावास साहाय्यही सुलभतेने देता येईल.

मध्य आफ्रिका

याला पुष्कळदा "काळा–आफ्रिका" असे संबोधले जाते. त्या भूप्रदेशातील लोक कृष्णवर्णीय आहेत हेच त्या भागास तसे नाव देण्याचे कारण आहे असे नाही. हा प्रदेश सुमारे पाऊणशे वर्षांपूर्वी पाश्चात्त्यांनी आपसांत वाटून घेतला व त्याचा बराच मोठा हिस्सा ब्रिटन्‌ला मिळाला. त्यापूर्वी या मोठमोठ्या नद्या, सरोवरे, पर्वत आणि घनदाट जंगले असलेल्या भागात परदेशीयांनी फारसा प्रवेश केलेलाच नव्हता. अधूनमधून स्टॅनले-लिव्हिंगस्टन्‌सारखे काही धर्मोपदेशक व संशोधक तेथे गेलेले होते, पण त्या प्रदेशाबाबतीत फारसे ज्ञान कोणालाच नव्हते व तो जणू अंधकारात होता म्हणूनही त्याला काळा–आफ्रिका म्हणत.

आफ्रिकेची वाटणी झाल्यानंतर ज्या पाश्चिमात्य राष्ट्रांच्या कबजात त्यातील प्रदेश आले त्यातील जनतेला त्या त्या राष्ट्रांनी आपापल्या वंशद्वेषाच्या तीव्रतेच्या प्रमाणानुरूप बरेवाईट वागविले. त्याचप्रमाणे तेथील हवामानाप्रमाणे श्वेतवर्णीयांस राहण्यास योग्य अशा भागातील स्थानिक लोकांची उचलबांगडी करून तेथे त्यांनी आपली वस्तीही केली. केनयातील नैरोबी व आसपासच्या पठारावर इंग्रजांनी मोठमोठ्या शेतजमिनी मिळविल्या व तेथे ते स्थायिक झाले. परंतु त्यातल्या त्यात इतरांपेक्षा इंग्रज राज्यकर्ते बरे होते असे म्हणावे लागेल. कारण त्यांच्या साम्राज्यांतर्गत भूप्रदेशातच शिक्षणादी बाबतीत स्थानिक जनतेची थोडी बहुत तरी प्रगती झाली.केनया,तांझानिया वगैरे आजची नवी राष्ट्रे इतर मध्यआफ्रिकी राष्ट्रांपेक्षा अधिक पुढारलेली आहेत, आणि म्हणूनच त्यांच्यात इंग्रजांबद्दल किंवा पाश्चिमात्यांबद्दल तेवढी तेढही शिल्लक राहिलेली नाही. फार काय ब्रिटन्शी औद्योगिक सहकार्यास ते तयार आहेत. एके काळी फ्रान्स, बेल्जियम वगैरे राष्ट्रांच्या हाती असलेला मुलूख मात्र विशेष प्रगत झालेला नाही व तेथील राज्ये दुबळी आहेत.

सर्वसाधारणतः शिक्षणाचा अभाव, अननुभवी राज्यकारभारी, उपस्थित नैसर्गिक साधनसामग्रीचा तांत्रिक ज्ञानाच्या अभावामुळे योग्य उपयोग करून घेण्याची अपात्रता, अती मागासलेली जनता, अनेक जमाती व टोळ्या यांचा बनलेला समाज, अशा अनेक कारणांमुळे ह्या भूभागात स्वतंत्र झालेली अनेक लहानमोठी राष्ट्रे एकजीव व स्थिर तर झालेली नाहीतच तर स्वजीवीही (viable) नाहीत. त्यांना प्रगत राष्ट्रांकडून अनेक बाबतीत, विशेषतः युद्ध-साहित्याची, मदत घ्यावी लागते. अशा वेळी जागतिक शीतयुद्धाचे पडसाद त्या ठिकाणी सहज उमटतात. मागास जनता, आर्थिक हलाखी, अस्थिर राज्ययंत्रणा व परिणामी उत्पन्न होणारी असंतुष्टता यांमुळे त्यापैकी कित्येक राष्ट्रांमध्ये साम्यवादीय तत्त्ववादाची बीजे पेरण्यास सुपीक जमीन लाभलेली आहे. आणि त्याचा योग्य तो फायदा रशियाच नव्हे तर चीनही घेत आहे. अंतर्गत दळण-

वळणाची साधनेही तुटपुंजी असल्यामुळे, कांगो वगैरे देशांत मध्यवर्ती राज्यकर्त्यांना आपली जरवही सर्व देशभर बसविता येत नाही आणि त्यामुळे यादवीला प्रोत्साहन मिळते. तशी यादवी डाव्या-उजव्या राजकीय कलांच्या लोकांत सुरू व्हावी व मध्यवर्ती राज्ययंत्रणा खिळखिळी व्हावी हे तर साम्यवादीय राजनीतीचे एक विशेषांग आहे. कांगोतील रणधुमाळी, सध्या नैजीरियात बिआफ्राशी चालू असलेले यादवी युद्ध, वेळोवेळी लष्करी धडकीने (coup d'etat) होणारा राज्यनेतेपालट हे प्रकार तेथे चालू आहेत. लोकशाहीपेक्षा हुकूमशाहीच अशा अप्रगत राष्ट्रात टिकते असा तेथील अनुभव आहे. ती हुकूमशाही वहुधा लष्करी व्यक्तींची असते किंवा लष्कराने पाठवळ दिलेल्या व्यक्तींची असते. त्यातही एकास पदच्युत करून दुसऱ्याने सत्ता हाती घेण्याचे प्रयत्न निरनिराळ्या डाव्या-उजव्या राजकीय कलांच्या व्यक्तींकडून होत असतात. त्यामुळे आवश्यक अशा राष्ट्रविकासाला वेळच मिळत नाही.

या मध्य आफ्रिकेतील राष्ट्रांत एथिओपिया, केनया वगैरे तीनचारच देश असे आहेत की, त्यांत राजकीय स्थिरता आज नजरेस येत आहे. इतरत्र असलेल्या अस्थिरतेचा फायदा घेऊन त्यांना आपल्या प्रभावक्षेत्रात आणण्याचे प्रयत्न दोन्ही गटनेत्यांकडून होत आहेत. जर येथील जनतेच्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीत त्वरित सुधारणा झाली नाही तर साम्यवादी गटनेत्याला, म्हणजे रशियाला, तेथे चंचुप्रवेश व नंतर आपले आसन स्थिर करण्यास सफलता येईल यात शंका नाही. हाही एक आपल्या राज्यशास्त्रज्ञांना अभ्यास करण्याजोगा विषय आहे. कारण तसा तो सफल झाल्यास मॅकिंडरच्या सिद्धान्ताबरहुकूम, आफ्रिकेत आपला पगडा बसवून जग-द्वीपावर सत्ता गाजविण्याच्या धोरणास यश आले असेच त्यास म्हणावे लागेल. त्याचे परिणाम पूर्वेस हिंदी महासागर व त्याभोवतालच्या प्रदेशांवर व पश्चिमेस दक्षिण अमेरिकेवर होतील. आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्यापासून ब्राझिलचे पूर्वेकडील भूशिर सारे २००० मैल दूर आहे. शिवाय दक्षिण अमेरिकेतील

राष्ट्रेही राजकीय उठावाच्या तंत्रास भेद्य झालेली आहेत.

दक्षिणेकडील आफ्रिका

दक्षिण १० अक्षांशांच्या दक्षिणेकडील भूप्रदेशाला "दक्षिण-आफ्रिका" या नावाऐवजी "दक्षिणेकडील आफ्रिका" म्हटले आहे, कारण "दक्षिण-आफ्रिका" अशा नावाचे त्यापैकी एक स्वतंत्र राष्ट्र आहे. हा सर्व भूप्रदेश एकतर श्वेतवर्णीय साम्राज्यवाद्यांच्या साम्राज्यात आहे किंवा तेथे स्थायिक झालेल्या अल्पसंख्याक श्वेत-वर्णीयांनी आपली स्वतंत्र राज्ये निर्माण केली आहेत. पहिल्या प्रकारात पोर्तुगीजांच्या साम्राज्यातील अंगोला व मोझांबिक हे देश येतात तर दुसऱ्या प्रकारच्या राष्ट्रांत ऱ्होडेशिया व दक्षिण आफ्रिका येतात. नैर्ऋत्य आफ्रिका या नावाचा पहिल्या महायुद्धापूर्वी जर्मनीच्या साम्राज्यात असणारा प्रदेश, त्या युद्धानंतर राष्ट्र-संघाने (League of Nations) दक्षिण आफ्रिकेच्या हुकमती-खाली विकासाप्रीत्यर्थ ठेव-प्रदेश (mandated territory) म्हणून दिलेला होता. तोही त्या राष्ट्राने आता पूर्णपणे गिळंकृत केलेला आहे. तो त्यांच्याकडून सोडविण्याचे प्रयत्न यनोत असफल होताना दिसत आहेत.

बहुतेक सर्व युरोपीय साम्राज्यशहांनी गेल्या महायुद्धानंतर आपापली साम्राज्ये सोडली व ते प्रदेश स्वतंत्र झाले. पण पोर्तुगीझांनी तसे केलेले नाही आणि तसे ते आपण होऊन करतील अशी आशाही नाही. त्याचप्रमाणे ऱ्होडेशिया किंवा दक्षिण आफ्रिका येथील श्वेत राज्यकर्त्यांनी उभी केलेली राष्ट्रे आपली राज्यसत्ता, तेथील संख्येने अनेक पट असणाऱ्या स्थानिक कृष्णवर्णीय जनतेच्या स्वाधीन करतील अशीही शक्यता आज नाही. त्यासाठी एकतर युद्धच व्हावे लागेल किंवा केव्हातरी भविष्यकालात जागतिक परिस्थितीत अनपेक्षित पालट झाला, तरच त्याच्या दडपणाने हा प्रश्न सुटेल. सध्या त्या राज्यकर्त्यांवर गौरकायवंशीय राष्ट्रांकडून

त्यासाठी फारसे दडपण आणले जात नाही. त्याला कारणे आहेत.
इतर राष्ट्रांकडून यूनोमध्ये व इतरत्र तसे प्रयत्न होत असले तरी
त्यांच्याविरुद्ध काही आर्थिक वा लष्करी कारवाई करावयासाठी
त्यांपैकी कोणीच समर्थ नाही. रशियाही त्यावर कडक टीका करीत
असतो, पण त्यामागे त्यांना कृष्णवर्णीयांबद्दल फारसे प्रेम आहे
म्हणून नव्हे; तर पाश्चिमात्य राष्ट्रांशी दृढ संबंध असलेल्या
या राजवटींविरुद्ध आक्रोश करावयास एक विषय मिळतो व त्यामार्गे
जगातील दलित समाजांच्या बाजूने तो आहे हे त्यास प्रचारासाठी
दाखविता येते. कोठेही अंतर्गत संघर्ष उत्पन्न करणे व तेथील
राज्ययंत्रणेविरुद्ध उठावाच्या बाजूने मत देऊन, शक्य झाल्यास
त्या उठावास साहाय्य करणे ही साम्यवादातील एक प्रमुख
कार्यपद्धती आहे.

दुसरे कारण असे की, उत्तर आफ्रिकेतील आणि पश्चिम
आशियातील बरीच राष्ट्रे आता बहुतांशी रशियाच्या प्रभाव-
ळीत गेली असता आणि मध्य आफ्रिकेत बहुतेक राष्ट्रांत त्यांचा
चंचुप्रवेश झालेला असताना, दक्षिणेकडील आफ्रिकेचा प्रदेशच आज
असा आहे की, जेथे साम्यवादाचा दक्षतेने व बळाने प्रतिकार
करणाऱ्या राज्ययंत्रणा अस्तित्वात आहेत.

तिसरे कारण; पूर्व भूमध्य समुद्रात रशियाचे आरमार स्थायिक
झालेलें आहे आणि सुवेझचा कालवा दळणवळणासाठी मोकळा
झाल्यावर त्या आरमारास तांबडा समुद्र व एडनचे आखातही खुले
होईल. युरेशियाच्या पश्चिम द्वीपकल्पातील नेटो संघटनेतील राष्ट्रांचे
सेंटो किंवा सिॲटोमधील राष्ट्रांशी असलेले भूमध्य व तांबड्या
समुद्रमार्गावरील दळणवळण, त्यानंतर दोन अडीच हजार मैल
पावेतो, रशियाचे प्राबल्य असलेल्या समुद्रातून चालेल. शिवाय त्या
मार्गात सुवेझ व बाब-एल-मांडेबची सामुद्रधुनी ही दोन केव्हाही
बंद करता येण्यासारखी नलिका-द्वारे (bottle-necks) आहेत.
अशा परिस्थितीत, विशेषत: संघर्षकालात, आफ्रिकेला वळसा
घालून जाण्याचा मार्गच पाश्चात्त्य राष्ट्रांना अधिक सुरक्षित व

म्हणून फायद्याचा आहे. पण एवढ्या दूरच्या जलपर्यटणासाठी वाटेत इंधन, अन्न, गोडे पाणी किंवा अवश्य झाल्यास बोटींच्या डागडुजीसाठी योग्य अशी बंदरे अवश्य असतात.

आयबेरियाचा किनारा सोडल्यावर दक्षिण आफ्रिकेतील केप् टाउन्, पोर्ट एलिझाबेथ् व डरबन् हीच बंदरे रशियाच्या आघात-क्षेत्राबाहेर व त्यासाठी सोईची आहेत. आणि ती तशी सुरक्षित व खुली राहावी व तेथे विरोधी राजवट येऊ नये यासाठी पाश्चिमात्यांना काळजी घ्यावी लागते. स्थानिक कृष्णवर्णीय जनतेबद्दल कितीही जबर सहानुभूती वाटली, तरी त्यांच्या हाती सत्ता गेल्यावर तशी खात्री असू शकत नाही. तेव्हा सामोपचाराने तेथील सत्ताधाऱ्यांना आपल्या राज्ययंत्रणेत कृष्णवर्णीयांना हळूहळू योग्य ते स्थान देण्यास भाग पाडता आले तर चांगले, अशीच पाश्चिमात्यांची भूमिका असली तर त्यात आश्चर्य नाही. जगात अत्यंत तीव्र व परस्परघातक तत्त्ववादीय संघर्ष चालू असताना,त्यांच्या महाबलवान नेत्यांकडून लहानलहान राष्ट्रांच्या स्वातंत्र्याकडे किंवा वांशिक किंवा वर्णीय संघर्षाकडे कानाडोळा होतो. त्यांच्या जागतिक राजकीय पटावर किंवा युद्धपट-योजनात अशा काही गोष्टी बसत नाहीत. त्यापैकी एका गटाचा प्रभाव कमी झाला तर तेथे लगेच दुसरा घुसून त्यावर आपले छत्र उभारणार नाही याची खात्री देता येत नाही. प्रत्येक वांशिक राष्ट्राला स्वातंत्र्य मिळावे व त्यांनी आपापल्या विशिष्ट मगदुराप्रमाणे आपले राज्य चालवावे हे तात्त्विकदृष्ट्या योग्य असले तरी, त्यांच्या शेजाऱ्यांच्या व इतर बलाढ्य राष्ट्रांच्या विस्तारलालसेविरुद्ध त्यांना मदत लागतेच. ती इतर बलाढ्य व विकसित राष्ट्रेच देऊ शकतात. ती त्यात पडली की जागतिक तत्त्ववादी अहमहमिकेचा त्या ठिकाणी शिरकाव होतो. अशी आजची सत्य परिस्थिती आहे खरी आणि त्याला आज तरी परिणामकारक उपाय दिसत नाहीत.

आफ्रिका खंडाचे भौगोलिक व राजकीय प्रश्न इतके गहन आहेत की त्यावर तज्ज्ञांनी अभ्यास केल्यास ग्रंथ लिहिता येतील.

नासर यांचा अरब विस्तारवाद किंवा अरब संघटनेचा प्रयत्न, आफ्रिकी राष्ट्रसंघटना, स्थानिक जनतेचा दक्षिणेकडील साम्राज्यवादियांविरुद्ध असलेला तीव्र द्वेष या सर्वांचे अखेरीस काय परिणाम होतील ? त्या खंडात एखादे वंशीय युद्ध सुरू होईल किंवा काय ? त्यासाठी मध्य आफ्रिकेतील कृष्णवर्णीय राष्ट्रांची तयारी केव्हा व कोठपर्यंत होईल ? तसे युद्ध झाल्यास जगातील दोन्ही गटांतील राष्ट्रे त्यात कोठपर्यंत पडतील ? असे युद्ध टाळता येईल किंवा नाही ? युनोतील आफ्रिकी व आशियाई राष्ट्रे त्याकरता काय करू शकतील ? असे अनेक गूढ प्रश्न आहेत. त्याला उत्तरे सोपी नसली किंवा सहज सापडत नसली तरी त्यावर विचार व अभ्यास अवश्य आहे; कारण तेथील परिस्थितीचे पडसाद अखिल पूर्वगोलार्धातील राजकारणावर पडतील यात शंका नाही. आणि आपण त्या गोलार्धातच आहोत, एवढेच नाही तर, त्यापासून अरबी समुद्राच्या रुंदीएवढेच दूर, म्हणजे केवळ हजार-पंधराशे मैलांवर आहोत.

आफ्रिका खंडाची नैसर्गिक संपत्ती

उत्तर आफ्रिकेतील इजिप्तपासून अल्जेरियापर्यंतच्या प्रदेशात व काही अंशी सहारामध्ये सुद्धा भू-तेल मोठ्या प्रमाणात सापडत अहे. पण ते अजून अरब द्वीपकल्प किंवा इराणएवढे नाही. युद्धावश्य वस्तूंच्या दृष्टीने तेथे इतर उपयुक्त खनिजे नाहीत.

मध्य आफ्रिकेतील राष्ट्रात अजून काळजीपूर्वक भूगर्भ-संशोधन झालेले नाही; तरी तेथे काही महत्त्वाची खनिजे मोठ्या प्रमाणात सापडतात व त्यांची निर्यात केली जाते. उदाहरणार्थ, कांगोमध्ये कोबॉल्ट, रुआंडा-उरुंडीमध्ये टंगस्टेन या पोलाद बनविण्यास अवश्य धातू मिळतात. लोहेतर धातूंपैकी कांगोत (काटांगा प्रांतात) तांबे, कथील व जस्त तर नायजेरियात कथील बरेच आहे.

दक्षिणेकडील आफ्रिका तर खनिज धातूंच्या बाबतीत समृद्ध

आहे. ऱ्होडेशियात जगातील १५ टक्के तांबे, व १६ टक्के बेरिलियम्, मिळते तर दक्षिण आफ्रिकेत जागतिक उत्पादनापैकी अर्धेअधिक सोने व ४० टक्क्यांच्यावर प्लॅटिनम सापडते.

त्याशिवाय आफ्रिकेतील जंगलातून इमारती व इतर लाकूड यांचेही प्रचंड उत्पादन होते. त्याचप्रमाणे मध्य आफ्रिकेत रबरही काही प्रमाणात नैसर्गिकरीत्या मिळते. लायबेरियात त्याची लागवड केलेली आहे व त्याचे बरेच उत्पादन (जगातील २ %) होते.

येथील भूगर्भाची कसोशीने पाहणी झाल्यावर यापेक्षाही अनेक प्रकारची संपत्ती मिळण्याची शक्यता आहे. त्या दृष्टीनेही राजकीयदृष्ट्या आफ्रिकेचे महत्त्व वाढत जाणार आहे. आफ्रिकेचा पूर्व किनारा भारतापासून जवळ आहे व तेथील अनेक नैसर्गिक जिनसांची आपल्याला गरज आहे. आपल्या राजनीतीच्या आखणीत त्यांच्याशी होणाऱ्या संबंधांना त्यासाठीं प्राधान्य देणे अवश्य आहे.

१२

युनायटेड स्टेट्स् व पूर्व गोलार्ध

जगातील एक अत्यंत बलवान राष्ट्र व त्याने गेल्या महायुद्धापासून सर्व जगात प्रस्थापित केलेले संबंध या संदर्भात युनायटेड स्टेट्स्चा विचार करणे अवश्य आहे. या देशाची जनता ही मुख्यत्वेकरून युरोपीय वंशाचीच असल्यामुळे त्यांना युरोपातील देशांबद्दल विशेष आपुलकी वाटणे साहजिक आहे. तरीसुद्धा त्यांच्या स्वातंत्र्यानंतर त्यांनी युरोपीय राष्ट्रांशी केवळ सामाजिक व आर्थिक संबंधच ठेवले होते. मन्रो डॉक्ट्रिन् घोषित करून युरोपीय राष्ट्रांचे पश्चिम

गोलार्धात राजकीय आक्रमण त्यांनी रोखले होते. या सिद्धान्ताच्या पडद्यामागे राहून युरोपातील राजकीय वादावादीत न पडता त्यांनी एकलगवाद (isolationism) स्वीकारला होता. पण युरोपात एखादे राष्ट्र अतिप्रवळ झाले तर ते मन्रो सिद्धान्त झिडकारून लावील व त्यानंतर त्याशी यु. स्टेट्स्‌लाच मुकाबला करावा लागेल हे ते जाणून होते. पहिल्या किंवा दुसऱ्या महायुद्धात जर्मनी जिंकता तर तशी भीती होती. सुरुवातीस या दोन्ही युद्धांत न पडता त्यांनी जर्मनीविरुद्ध इतरांस आर्थिक व युद्धसाहित्याचे साहाय्य केले असले तरी अखेरीस युद्धात वहुधा पडावे लागेल याची त्यांना जाणीव होती. तात्कालिक कारणे काहीही असोत पण तसे ते अखेरीस घडलेही.

तरी पहिल्या महायुद्धानंतर त्यांनी पुन्हा एकलग राहण्याचेच ठरविले होते. त्या धोरणानुसार ते युरोपात जिनीव्हा येथे उभारलेल्या राष्ट्रसंघाचे (League of Nations) सभासदही झाले नाहीत. तसेच दुसऱ्या महायुद्धानंतरही युरोपात स्थिरस्थावर झाल्या-नंतर, ते युरोपातून आपला पाय पूर्णपणे मागे घेतील अशी चिन्हे दिसू लागली होती. परंतु युद्धसमाप्तीनंतर लगेच रशियाच्या विस्तारवादी प्रवृत्ती उघड होऊ लागल्या. इराण, ग्रीस व तुर्कस्तान यांविरुद्ध त्यांनी केलेल्या कारवाया आपण यापूर्वी विचारात घेतल्या आहेत. पूर्व युरोपीय राष्ट्रांवर तेथील साम्यवादीय पक्षास हाताशी घेऊन साम्यवादी राजवटी त्यांनी लादल्या. त्याचे पाय असेच पुढे पडत राहिल्यास पश्चिम युरोपीय राष्ट्रांवरही तसा प्रसंग तर येणार नाही अशी भीती उत्पन्न झाली होती. त्या वेळी महायुद्धात थकलीभागलेली लहानलहान युरोपीय राष्ट्रे रशियाच्या प्रचंड सेनाबलास प्रतिकार करण्यास असमर्थ होती. त्यांना पाठवळ देणे अवश्य होते व ते यु. स्टेट्स्‌ची सेनाच करू शकली असती. हे सर्व होत आहे तोच १९४८ च्या मध्यात रशियाने पश्चिम बर्लिन् शहराची नाकेबंदी केली. विमानमार्गे तेथे रसद पाठवन ती कशीबशी मोडून काढावी लागली.

या सर्व घटनांमुळे १९४९ मध्ये नेटो या संरक्षण संघटनेची

स्थापना झाली. त्यामागे त्या काळी यु. स्टेट्स्चे बळ व त्यांनी वनविलेली अण्वस्त्रे होती. अशा रीतीने एकेकाळचे हे परंपरागत एकलग राष्ट्र युरोपीय राजकारणात व संरक्षण योजनांत गुंतले गेले.

पूर्व युरेशियात दुसऱ्या महायुद्धापूर्वी यु. स्टेट्स्चा प्रत्यक्ष संबंध शिल्लक राहिलेला नव्हता. स्पेनपासून १९ व्या शतकात जिंकलेल्या फिलिपाइन्स बेटांना त्यांनी त्यापूर्वीच स्वातंत्र्य दिलेले होते. पण त्या नवस्वतंत्र राष्ट्राची सेना उभी होईपर्यंत अमेरिकेचे थोडे सैन्य त्या बेटात ठेवलेले होते. परंतु जपानच्या वाढत्या बलाकडे त्यांचे लक्ष होते आणि त्याने पॅसिफिक महासागरात अतिप्रबळ होऊ नये अशी त्यांची इच्छा होती. १९३५ सालापासून चाललेल्या चीन-जपान युद्धात यु. स्टेट्स् चीनला शस्त्रास्त्रांची हरप्रकारे मदत करीत होता. हे चिघळते युद्ध पुढे दुसऱ्या महायुद्धास अखेर जुडले.

पर्ल हार्बरवरील जपानच्या अचानक हल्ल्यानंतर यु. स्टेट्स्ला पॅसिफिक महासागरात व आशियाई युद्धक्षेत्रात अतिमोठ्या प्रमाणात भाग घ्यावा लागला. त्यानंतर १९५० साली त्यांना कोरियाच्या युद्धात पुन्हा उतरावे लागले. १९५४ साली इंडोचायनात फ्रेंचांचा पराभव झाल्यावर जिनीव्हा कराराप्रमाणे उत्तर व दक्षिण व्हिएटनाम हे दोन भाग झाले. त्यापैकी द. व्हिएटनामला आर्थिक व लष्करी मदत देऊन तेथे होऊ घातलेल्या साम्यवादीय प्रसाराला त्यांनी थोडा आळा घातला.

अशा रीतीने युरेशियातील निरनिराळ्या भागांत संभाव्य साम्यवादी झिरपणीस रोखण्यासाठी, हे एकवेळचे एकलग राष्ट्र जागतिक घडामोडीत ओढले गेले. त्यातूनच, स्पिक्मन् यांच्या सिद्धान्तानुरूप, बघदाद करार (इराक त्यातून फुटल्यावर नव्या नावाने सेंटो करार) व आग्नेय आशियात सिअटो करार उभे झाले. यु. स्टेट्स्ची कोठेही स्थानिक, राजकीय व संरक्षण क्षेत्रातील गुंतवणूक व संरक्षण-करार योग्य किंवा अयोग्य होते याबद्दल चर्चा न करता, मी असे मात्र म्हणेन की त्यामुळे साम्यवादीय प्रसाराला त्या त्या क्षेत्रात खुले मैदान न मिळून त्यास काही अंशी बांध नक्की

घातले गेले. त्यांतून फारशी झिरपणही झालीं नाही.

दक्षिण व्हिएटनाममधील यादवी युद्धामुळे यु. स्टेट्स्‌ला आलेला अनुभव मात्र अत्यंत कटू आहे. त्यांत झालेल्या खर्चाचे व मनुष्यहानीचे आघात त्या देशाच्या जनतेवर होत आहेत व परिणामी ते तसेच त्यांच्या परराष्ट्रनीतीवर होण्याचा संभव आहे. नवे आलेले अध्यक्ष निक्सन् यांनी त्यांच्या भावी राजनीतीबद्दल स्पष्ट धोरणे अजून जाहीर केलेली नाहीत, पण अध्यक्षीय निवडणुकीपूर्वी त्यांनी " फॉरेन् अफेअर्स "च्या ऑक्टोबर १९६७ च्या अंकात लिहिले होते :

" युद्धाचा कंटाळा, मित्रराष्ट्रांबद्दल निराशा, दिलेल्या मदतीबद्दल भ्रमनिरास आणि (स्वदेशातील) अंतर्गत परिस्थितीमुळे आलेली अस्थिरता यांमुळे अनेक अमेरिकन लोकांचा एकलगवादाकडे कल झुकत आहे. त्यात ते एकमेव नाहीत, तर अखिल पाश्चिमात्य जगात ही अंतर्मुख, संकुचित व एकलग होण्याची इच्छा दिसू लागली आहे. पण ही भयानक प्रवृत्ती आहे."

त्यांनी पुढे म्हटले की, ते या प्रवृत्तीशी सहमत नाहीत. त्यांचा भर आशियातील स्थानिक राष्ट्रांच्या स्वेच्छित क्रियाशीलतेला पाठबळ द्यावे असा दिसतो. त्याप्रीत्यर्थ स्थानिक राष्ट्रांची साम्यवादास रोखण्याची इच्छा कृतिरूपाने दिसावी; मगच आपण त्यामागे उभे राहावे असे त्यांचे राजनीतिसूत्र दिसते. पण तसा विरोध या भागात फारसा दिसून येत नाही व अमेरिकेचे पाठबळ अवश्य वाटले तरी तशी उघड कबुली कोणी देणार नाही. १९६२ साली आपल्यासारख्या अलिप्त राष्ट्रास त्यांनी चीनविरुद्ध, थोडी का होईना पण मदत केली, तसेच केनेडींनी नेहरूंच्या मागणीनुसार आपली एक विमानवाहक युद्धनौका बंगालच्या उपसागरात पाठविली होती. पण या बातमीचा आपण तावातावाने इन्कार करतो. ती नौका तशी आली असो किंवा नसो, त्यात एवढी शरमेची गोष्ट काय आहे हेच कळत नाही. दोन लोकशाही राष्ट्रांनी एका साम्यवादी आक्रमकाविरुद्ध एकमेकास संकटकाळी सर्व प्रकारे मदत करणे योग्यच आहे.

कँबोडियाचे राजपुत्र सिहानुक, हे वरवर अमेरिकाविरोधी असतानाही, नुकतेच आपल्या एका भाषणात म्हणाले : "आशियात पसरणाऱ्या साम्यवादाविरुद्ध, त्यास शह देण्यासाठी अमेरिकेच्या बळाचे (आशियातील) अस्तित्व अवश्य आहे." ते प्रसिद्ध होताच आपण त्याबद्दल आश्चर्य प्रगट केले. जणू काही आपण त्यासाठी त्यांच्या मदतीस धावून जाणार आहोत. स्वत: काही करावयाचे नाही व इतरांनी स्वसंरक्षणार्थ काही उपाय योजल्यास त्यास विरोध दाखवावयाचा, या धोरणाचा अर्थच कळत नाही.

पण यु. स्टेट्स्ची मदत नको अशी या भूखंडात सार्वत्रिक प्रवृत्ती दिसू लागल्यास जगातील पुढारलेल्या लोकशाही राष्ट्रांनी पाठबळ तरी कोणाला व कशासाठी द्यावयाचे ? अमेरिकेच्या ७ व्या आरमाराचा प्रचंड काफिला आज पॅसिफिकमधील बेटांवर आधारित असून दक्षिण चिनी समुद्रात वावरत आहे. द. युरेशियातील राष्ट्रांस तोही अनावश्यक वाटत असल्याची खात्री झाल्यास तो त्यांना मागे घेता येईल. अमेरिकेत तशी प्रतिक्रिया होण्यास वेळ लागणार नाही. दक्षिण व आग्नेय युरेशियातील राष्ट्रांचा अव्हेर करून चीनशी आपले संबंध सुधारावे असा वाढता सूर तेथे ऐकू येतच आहे. त्यासाठी चीनला दक्षिण प्रसाराची मुभा, अशा समझोत्याची किंमत म्हणून देण्यासही पुढेमागे ते तयार होतील. यु. स्टेट्स्च्या पॅसिफिकवरील वर्चस्वाला त्यामुळे इजा पोचणार नाही. पण व्ह्लाडिव्हॉस्टॉक-च्या दक्षिणेकडे डोळे लावून बसलेल्या रशियाच्या आरमारास मात्र सिंगापूरपर्यंतचा मार्ग मोकळा होईल.

यु. स्टेट्स्ची गेल्या महायुद्धापासून स्पिक्मन्च्या सिद्धान्तानुरूप किनार-भूमीच्या साहाय्याने रशियास सीमाबद्ध करण्याची धोरणे सफळ झालेली नाहीत. सुरुवातीस रशियाने सेनाबळ वापरून आक्रमणाची वृत्ती दाखविली. ती क्रुश्चोव्ह यांच्या आमदानीत बदलून त्या जागी शांततेच्या सहजीवनाचे (co-existence) तत्त्व त्यांनी मानले. बलाने आक्रमण न करता, यु. स्टेट्स्शी समोरासमोर युद्धपवित्रा घेण्याचे टाळत, त्यांनी अविकसित देशांत तत्त्ववादीय

झिरपणीचा मार्ग अवलंबिला. परावलंबी राष्ट्रांत तेथील स्थानिक जनतेकडूनच राष्ट्रे उलथून पाडता येतील व साम्यवादप्रसार करता येईल, याची त्यांना खात्री झाली. अशा परिस्थितीत अण्वस्त्रांनी सज्ज असलेला यु. स्टेट्स् ती अस्त्रे वापरणार तरी काय कारणास्तव व कुणाविरुद्ध ? तेव्हा त्यांना त्याबरोबरच पूर्वरूढ शस्त्रांनी लढणारे भूदल मोठ्या प्रमाणात उभे करावे लागले. पण त्या योगेसुद्धा, स्थानिक जनतेमध्ये जोपर्यंत साम्यवादास रोखण्याची तीव्र प्रेरणा नाही तोपर्यंत, अशी सेना मदतीस पाठवून काही सफल होत नाही असे दक्षिण व्हिएटनाममध्ये दिसून आले.

आज नेटो, सेंटो, सिअॅटो या संरक्षण-संघटना कायम असल्या तरी त्यांतील, विशेषत: सेंटोमधील राष्ट्रे रशियाशी आपले संबंध अधिकाधिक निकट करण्याचे प्रयत्न करीत आहेत व त्यांच्याकडून शस्त्रास्त्रांची मदतही घेत आहेत. हे सर्व पाहता, यु. स्टेट्स् सध्या दक्षिण आशियाच्या भूप्रदेशात केवळ एका प्रेक्षकाची भूमिका घेऊ लागला आहे. भारतातही काय होते आहे यावर, केवळ नजर ठेवून, सध्या तरी तो स्वस्थ आहे.

१३

पूर्व गोलार्धाची राजकीय परिस्थिती

अखेरीस भारताच्या भौगोलिक स्थानाच्या महत्त्वाचे परीक्षण करण्यापूर्वी आपण एकूण पूर्व गोलार्धाबद्दल राजकीय व लष्करी भूगोल-शास्त्राच्या संदर्भात आतापर्यंत जे विचार मांडले आहेत त्यापासून काय निष्कर्ष निघतात ते पाहू. आपण त्यासाठी मॅकिंडर यांचा सिद्धान्त सर्व-साधारणपणे आजही कसा लागू होत आहे ते पाहिले आहे, तेव्हा त्याचाच आधार घेऊन माझ्या मते निष्कर्ष निघतात ते असे :

१. मॅकिंडर-सिद्धान्त हा कालानुरूप

व तांत्रिक प्रगतिनुरूप थोडा फेरफार करून आज पूर्व गोलार्धातील सध्याच्या राजकीय व लष्करी परिस्थितीला अधिकच लागू होत आहे.

२. जगातील दोन महान राष्ट्रांमध्ये अण्वस्त्रयुद्ध असंभाव्य आहे असे धरून चालल्यास व त्यांच्यातील भीति-समतोलामुळे ती दोन राष्ट्रे एकमेकांसमोर युद्धपवित्रा घेण्याचे टाळत राहतील असे मानल्यास, रशियांतर्गत मर्मभूमी ही अभेद्यच मानावी लागेल आणि ते राष्ट्र अशा अभेद्य स्थानाच्या आधाराने आपले राजकीय व तत्त्ववादीय प्रभाव-क्षेत्र चारी दिशांस वाढवीत जाईल.

३. स्पिक्मन्च्या सिद्धान्ताप्रमाणे किनार-भूमीवरील राष्ट्रांसमवेत, जबरीने किंवा त्याच्या इच्छेविरुद्ध मिळविलेल्या सहकार्याने, या मर्मभूमिशासक मध्यवर्ती राष्ट्रास त्याच्या सीमाक्षेत्रात बद्ध करणे कठीण झालेले दिसत आहे. त्यामुळे पाश्चिमात्य लोकशाही राष्ट्रांचे तसे प्रयत्न निष्फल होत आहेत.

४. त्यासाठी किनार-भूमीवरील राष्ट्रांचे स्वेच्छेने सहकार्य मिळवून त्यासमवेत समाइक प्रयत्न स्थानिक राष्ट्रांकरवी झाला तरच तशा प्रतिबंधास थोडेफार यश येऊ शकेल. परंतु तेथील अविकसित व अस्थिर राजवटींच्या हातून तसे समाइक प्रयत्न होताना दिसत नाहीत. त्याची कारणे, एकतर, त्यांना त्या धोक्याची पुरती जाणीव झालेली नाही व दुसरे, तेथील जनतेचा त्यांच्या सध्याच्या आर्थिक परिस्थितीत साम्यवादास प्रखर तात्त्विक विरोध नाही. तिसरे असे की, त्यांच्यातील अनेक स्थानिक संघर्ष हे त्यांना या समाइक धोक्यापेक्षा अधिक महत्त्वाचे वाटत आहेत.

५. मॅकिंडर-सिद्धान्ताबरहुकुम रशिया आता आपले नौदल व त्याच्या साहाय्याने परराष्ट्रांच्या किनाऱ्यावर उतराव (landings) करण्यासाठी योग्य असे भू-जलगामी दल (amphibious forces) झपाट्याने उभारीत आहे. आतापर्यंत अशा प्रकारच्या लष्करी क्रियेचा (military operations) प्रयत्न त्यांनी कधीच केला नव्हता. गेल्या महायुद्धात व तदनंतर अमेरिका, ब्रिटन् व फ्रान्स यांनीच आपल्या सेना शत्रुक्षेत्राच्या

किनाऱ्यावर उतरविल्याची उदाहरणे आहेत. युरेशियातील एकसंध भू-क्षेत्रात असणाऱ्या व समुद्रपार साम्राज्य नसणाऱ्या रशियाला, अशा प्रकारच्या विशिष्ट-शिक्षित सेनेची गरज का भासावी ? कोणत्या किनाऱ्यावर व कशा परिस्थितीत त्याचा आपली सेना उतरविण्याचा विचार आहे ? हे प्रश्न महत्त्वाचे आहेत. यु. स्टेट्स्च्या विरुद्ध ती वापरून त्यांच्यापुढे पवित्रा घेण्यास ते सध्या तरी धजणार नाहीत. तेव्हा एक तर, त्या दलाचा उपयोग कोणत्याही राष्ट्रातील अंतर्गत यादवीच्या वेळी, त्यातील साम्यवादीय गटास मदत करण्यासाठी केला जाणे शक्य आहे. किंवा दुसरे असे की, आपल्या किनाऱ्यापासून कोठेही दूरवर आपली सेना उतरविण्याची शक्ती रशियाजवळ आहे, याची जाणीव युरेशिया व आफ्रिका या खंडांतील राष्ट्रांस करून देणे हा त्यामागील उद्देश असू शकतो.

याचा अर्थ असा की, रशिया आता आपल्या राष्ट्रबलाचे प्रक्षेपण पूर्व गोलार्धात कोठेही त्वरित करण्यास सिद्ध झाला आहे. तशी अपेक्षा इतर राष्ट्रांतील साम्यवादी स्वतःच्या साहाय्यासाठी करू शकतात व त्याची साम्यवादेतरांस दहशत वसू शकते.

६. रशियाच्या वाढत्या नौदलाच्या साहाय्याने युरेशियाला दोन्ही दिशांकडून घेर घालण्यासाठी, पूर्व गोलार्धातील जलविस्तारात त्याचा प्रवेश व्हावयास सुरुवात झाली आहे. सुवेझ कालवा खुला होताच रशियाचे नौदल पश्चिमेकडून हिंदी महासागरात पोचेल व पूर्व हिंदी महासागरात जर पोकळी निर्माण झाली तर त्याचा पूर्वेकडील बाहू सिंगापूरवाटे आत घुसून त्याच्या मिठीत हा सागर येईल. आजही रशियाचे छोटेसे आरमार या सागरात स्वैर संचार करीत आहे.

७. केवळ किनार-भूमीतच नव्हे तर त्या पलीकडे आफ्रिकेतील राष्ट्रांत आपला प्रभाव पाडण्याचे प्रयत्न रशिया सध्या करीत आहे. त्यांच्यापैकी भूमध्य समुद्रावरील व तांबड्या समुद्राच्या किनाऱ्यावरील बऱ्याच राष्ट्रांत त्याला यश मिळाले आहे.

८. मर्मभूमिशासक रशियाचा राजकीय व तत्त्ववादीय प्रसार जगद्वीपावरील बहुतेक राष्ट्रांत झाला की, "जगाचे साम्राज्य त्याला डोळ्यांसमोर दिसू लागेल" व त्यास त्यानंतर बंधन घालणे अशक्य होईल.

९. पूर्व गोलार्धात अशी सर्वव्यापी व एकमेव सत्ता प्रस्थापित झाल्यास जगातील संघर्षाचे स्वरूप, पूर्व गोलार्ध विरुद्ध पश्चिम गोलार्ध (कदाचित पश्चिम युरोपीय राष्ट्रांसह आपले तेथील पदस्थान कायम ठेवून) असे स्पष्ट दिसू लागेल. जगाची वाटणीही त्याप्रमाणे होईल. त्यांत त्या त्या गोलार्धातील इतर लहानमोठ्या राष्ट्रांना त्या महान राष्ट्रांचे मिंधे व्हावे लागेल.

१०. सध्याच्या दोन महान राष्ट्रांमध्ये अशी वाटणी होण्याच्या आड येण्यासारखे बलशाली राष्ट्र आज चीनच आहे आणि त्या वाटणीत चीनही या भूक्षेत्रातील आपला हिस्सा मागू लागेल आणि तसे झाल्यास –

११. या तीन अतिबलाढ्य राष्ट्रांतील परस्पर संबंध व एकमेकांस शह देण्याच्या राजकीय व लष्करी कारवाया कशा होतील हाच जगापुढे मोठा गूढ प्रश्न उभा होणार आहे. त्याच्या सोडवणुकीत इतर राष्ट्रांना स्वतंत्रपणे कोठेही वाव किंवा स्थान मिळेल असे आज तरी दिसत नाही.

१२. ही दिसून येणारी राजकीय परिस्थिती चिंताजनक आहे खरी; पण ती टाळावयाची असल्यास किंवा त्याविरुद्ध उपाययोजना करावयाची असल्यास, या होऊ घातलेल्या घटनांमुळे ज्या राष्ट्रांच्या लोकशाही पायाला किंवा प्रत्यक्ष स्वातंत्र्यालाच आज सुरुंग लागताना दिसत आहेत, त्यांनी एकत्रित होऊन त्याची दखल घेतली पाहिजे. पूर्व गोलार्धातील अनेक लहानमोठ्या राष्ट्रांवर नजर फिरविली तर, सध्याची नेटो संघटना सोडता, जगातील महान राष्ट्रांच्या प्रभाव-क्षेत्राच्या मगरमिठीतून सुटावयाचे असल्यास, या भूखंडात अशा रीतीने एकमताने संकलित होण्यासाठी स्वबलाचा दिलासा देऊन पुढारीपण घेण्याजोगे स्थानिक राष्ट्र आहे ते केवळ भारत.

१५

भारत- पूर्वार्ध

अखेरीस आपल्याला या देशाचाच विचार जागतिक, राजकीय व लष्करी भूगोलशास्त्र-दृष्ट्या करावयाचा आहे व आपल्या स्थानाचे महत्त्व काय आहे याचे मूल्यमापन करावयाचे आहे. आपण आता तेथपर्यंत येऊन पोचलो आहोत.

भारताला पूर्व गोलार्धातील राष्ट्रांत विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे ते या देशाच्या भौगोलिक स्थानामुळे, त्याच्या भूविस्तारामुळे, त्याच्या सीमांच्या रूपरेखांमुळे, निसर्गसंपत्तीमुळे आणि

लोकसंख्येमुळे. परंतु ते महत्त्व टिकविणे व त्याचा उपयोग करून घेणे हे येथील जनतेच्या सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक व औद्योगिक विकासावर, उपलब्ध निसर्गसंपत्तीचा परिपूर्ण उपयोग करून घेण्याच्या पात्रतेवर व अखेरीस आपले स्वातंत्र्य टिकविण्याच्या जिद्दीवर व त्याप्रीत्यर्थ करावयाच्या प्रतिकाराच्या तीव्र प्रेरणेवर अवलंबून आहे. निसर्गाने या देशाला पुष्कळच वरदान दिलेले आहे, पण त्याचा योग्य फायदा करून घेणे हे आपल्याच हाती आहे. आपल्या दुष्कृतींच्या पापांच्या बदल्यात, तोच निसर्ग आपल्यास तेवढेच घातक शापही देऊ शकतो. तेव्हा ते नैसर्गिक वरदान काय आहे ते जाणून त्यापासून आपले हित करून घ्यावयाचे असेल तर त्याची योग्य जाणीव झाली पाहिजे. काहींपासून अहित होत असेल तर त्याला उपाय शोधून काढले पाहिजेत. मगच आपल्याला अंतर्गत प्रगतीच्या योजना व त्यांचा वेग ठरविता येईल व त्यापासून उत्पन्न होणाऱ्या राष्ट्रबलावर आपले राजकीय निर्णय व आपले परराष्ट्रीय धोरण आधारता येईल.

भारताचे भौगोलिक स्थान व सीमा

पाकिस्तानसह अखंड हिंदुस्थानची भूमी ही युरेशियाच्या जोडखंडाच्या दक्षिणेस जुडलेले एक प्रचंड द्वीपकल्प आहे. जगातील तीन महान राष्ट्रांच्या मानाने त्याचे क्षेत्र लहान असले तरी आपल्या सीमांवरील काही आघात सहन करण्याएवढे व ते सहज शोषून घेण्याएवढे ते विशाल आहे. म्हणूनच हिंदुस्थानला कधी "उपखंड" (sub-continent) असेही संबोधितात. या द्वीपकल्पाची युरेशियाच्या मध्य-भूविस्ताराशी जोडणारी भू-सीमा तीन हजार मैलांहून अधिक लांबीची आहे. ती पश्चिमेपासून पूर्वेकडे अनुक्रमे सुलेमान रांग, हिंदुकुश, काराकोरम व नंतर हिमालय पर्वतांच्या सर्वसाधारण कण्याच्या अनुरोधाने जाते. ते पर्वत दुर्गम नसले तरी त्यातून येणाऱ्या वाटा व म्हणून त्या दिशेने येणारी आक्रमणे, काही

विशिष्ट व ज्ञात खिंडीच्या मार्गानेच येऊ शकतात. तेव्हा त्या सीमांच्या रूपरेखांमुळे या देशास पूर्ण संरक्षण मिळाले नाही तरी बऱ्याच अंशी ते मिळते. युरेशियाच्या इतर कोणत्याही द्वीपकल्पांना असे नैसर्गिक संरक्षण त्यांच्या भू-सीमांच्या बाबतीत मिळालेले नाही.

त्याचप्रमाणे हा उपखंड मूलत: एक द्वीपकल्प असल्यामुळे त्याचा अर्धाअधिक भूभाग एका चिंचोळचा होत जाणाऱ्या त्रिकोणाप्रमाणे हिंदी महासागरात अंदाजे बाराशे मैलांपर्यंत घुसलेला आहे व त्याच्या दक्षिणेस अगदी लगत जवळजवळ ३०० मैल लांबीचे सिलोन हे बेट आहे. म्हणजे एकूण चौदापंधराशे मैल लांबीपर्यंत ह्या भूमीचा भाग हिंदी महासागरास दुभागतो. त्याचे तीन परिणाम होतात :

१. या देशाची एकूण समुद्र किनाऱ्याची लांबी अतोनात वाढते व तिच्या संरक्षणाचे प्रश्न त्या प्रमाणात बिकट होतात.

२. उत्तर हिंदी महासागराचे दोन विभाग होऊन– अरबी समुद्र व बंगालचा उपसागर– त्यामधील परस्पर दळणवळण या द्वीपकल्पाला व सिलोनला वळसा देऊनच होऊ शकते व त्यामुळे आपल्या आरमाराचे बलही विभागले जाते. (त्यासाठी दोन स्वतंत्र आरमारी विभाग उभारण्याचा विचार चालू आहे.)

३. परंतु या उलट, आपल्या आरमाराचे बळ पुरेसे वाढविल्यास, युरेशियाच्या दक्षिण सीमांपासून तो विषुववृत्तापर्यंत हिंदीमहासागरावर नजर ठेवणे आपल्याला सुकर होऊ शकते.

एका बाजूस अरबस्तान व आफ्रिका खंड व दुसऱ्या बाजूस ब्रह्मदेश, मलाया व सुमात्रा असल्यामुळे अरबी समुद्र व बंगालचा उपसागर हे फारसे रुंद जलविस्तार नाहीत. पश्चिमेस ओमानचे आखात ७०० मैलांवर व एडनचे आखात १५०० मैलांवर आहे. बंगालच्या उपसागराची अधिकाधिक रुंदी अंदाजे १२५० मैलच आहे. त्याशिवाय दोन्ही समुद्रांत आपल्या मालकीची अनुक्रमे लखदीव व अंदमान-निकोबार बेटे आहेत. त्यामुळे आपल्या

स्वामित्वाखालील किनाऱ्यांपासून त्या दोन्ही समुद्रांच्या पलीकडील किनारा कोठेही सुमारे १००० मैलांच्या, म्हणजे आपल्या किनाऱ्यांवर आधारलेल्या नाविकदलाच्या कार्यकक्षेच्या बाहेर नाही.

थोडा पूर्वेतिहास

अखंड भारतास एकछत्राखाली आणणाऱ्या इंग्रजांचे राज्य प्रस्थापित होण्यापूर्वी या देशात एक राज्य नव्हते किंवा ते एक राष्ट्र आहे ही, काही व्यक्तिगत भावना सोडून दिल्यास, कल्पनाच कोणाला नव्हती. आणि कोणास तशी असली तरी त्यास एका राजवटीखाली एकत्र कोणीच आणू शकले नाही. इंग्रजांनी हा देश एकत्र आणल्यावर, त्यांनी त्याच्या केंद्रीय स्थानाचा पुरेपूर उपयोग करून घेतला व त्याच्या संरक्षणासाठी त्यांनी काही विशेष तजविजी केल्या. त्यांचा थोडक्यात विचार करणे येथे सयुक्तिक होईल.

१९ व्या शतकात ब्रिटनचे साम्राज्य जगभर पसरले. त्यात हिंदी महासागराभोवती व पॅसिफिक समुद्राच्या चीनी किनाऱ्याशी होणाऱ्या व्यापारादी बाबतीत त्यांचे हितसंबंध वाढले. इजिप्तपासून दक्षिण आफ्रिकेपर्यंत, दोनतीन प्रदेश सोडून, आफ्रिकेचा पूर्व समुद्रकिनारा इंग्रजांच्या हाती होता. एडनवर स्वामित्व प्रस्थापित करून त्यांनी अरबस्थानाच्या मस्कत-ओमानपर्यंत स्थानिक शेखांना व मेसोपोटेमियास आपल्या वर्चस्वाखाली आणले होते. इराणचा दक्षिणेकडील अर्धा हिस्सा, तेव्हाच्या झारशासित रशियाशी समझोता करून, आपल्या प्रभावक्षेत्रात ठेवला होता. इराणच्या आखातात सापडलेल्या तेलखाणी या बहुतांशी इंग्रज कंपन्यांच्या मालकीच्या होत्या. त्यांचे पाय पूर्वेस ऑस्ट्रेलिया व न्यूझीलंडपर्यंत पसरले होते.

या पूर्वेकडील साम्राज्याच्या मध्यभागी म्हणजे केंद्रस्थानी हिंदुस्थान होता. ब्रिटन्‌पासून हे सर्व प्रदेश ५ हजार मैलांहून अधिक दूर असल्यामुळे या भूखंडातच ब्रिटन्‌च्या बलाचे एक मोक्याचे,

सुरक्षित व बलशाली आधारस्थान उभारणे अवश्य होते.

या देशाचा विस्तार, येथील लोकसंख्या, लष्करी शिक्षण दिल्यास मोठे सेनाबल उभारण्याची शक्यता, नैसर्गिक संपत्ती व त्यापासून औद्योगिक उत्पादन करण्याची पात्रता, नौदलासाठी उपयुक्त बंदरे आणि आफ्रिकेपासून चीनपर्यंतच्या भूविस्तारातील मध्यस्थान या सर्व दृष्टीने अशा आधारस्थानास हा देश फायद्याचा होता. त्यासाठी सुशिक्षित सेना, इजिप्तपासून चीनपर्यंत तिच्या बलाचा उपयोग करण्यासाठी सुरक्षित दळणवळण मार्ग व वाहतूक साधने यांचीच आवश्यकता होती. तशी सेना त्यांनी येथे उभी केली व त्या वेळी ब्रिटन हे समुद्रावर अतिबलवान राष्ट्र असल्याने हिंदुस्थानपासून दोन्ही दिशांकडील समुद्रमार्ग त्यांना विनाविरोध वापरता आले. हिंदी महासागर हा जणू ब्रिटन्‌चा खासगी तलाव झालेला होता असे म्हणावयास हरकत नाही. १९व्या शतकापासून दुसऱ्या महायुद्धाच्या काळापर्यंत भारतीय सेना इजिप्त, सुदान, इराक, पूर्व आफ्रिका, ब्रह्मदेश, मलाया, चीन इत्यादी अनेक देशांत ब्रिटन्‌च्या हितसंबंधांच्या जोपासनेसाठी वापरली गेली.

हिंदुस्थानात उभारलेल्या या लष्करी बलाचा फायदा इतर युरोपीय साम्राज्यवाद्यांनाही मिळाला. युरोपातील आपसातील तंटे सोडता, त्या सर्व साम्राज्यवाद्यांचा एकमेकांस आधार असे. त्यांची साम्राज्ये टिकविण्याचे प्रयत्न दुसऱ्या महायुद्धाच्या अखेरीसही इंडोचायनात व इंडोनेशियात झाले. पण हिंदुस्थान स्वतंत्र होताच ही सर्व साम्राज्ये गडगडली त्यावरून या देशाच्या महत्त्वाची कल्पना येईल.

अशा या शस्त्र-बलाच्या प्रक्षेपणाचे मूलस्थानच सुरक्षित नसेल तर त्या बलाचा उपयोग इतरत्र करता येणार नाही, यासाठी हिंदुस्थानच्या रक्षणाची विशेष काळजी घेणे अवश्य होते. त्या कालीही या देशाला रशियाचीच भीती होती. त्याप्रीत्यर्थ त्यांनी दोन गोष्टी केल्या–

१. हिंदुस्थानची भू-सीमा त्यांनी रक्षणासाठी सुलभ अशा

पर्वतराशींपर्यंत तीन्ही दिशांस भिडवली व त्यांतील खिंडीवर आपला कबजा ठेवला आणि

२. त्या सीमांपलीकडील भूभागावर आपले राजकीय वजन ठेवून आणि तेथील राजवटी दुबळ्या ठेवून त्यांचा आघात-शोषक प्रदेश म्हणून उपयोग करून घेतला. (अफगाणिस्तान व तिबेट).

हिंदुस्थानच्या जल-सीमांचे रक्षण ब्रिटनचे आरमार सिंगापूर, एडन, आदी बंदरांहून करीतच होते. त्यांच्या १०० वर्षांच्या वर कारकीर्दीत हिंदुस्थानावर एकदाच परकीय स्वारीचा प्रत्यक्ष प्रसंग आला आणि तोही ब्रिटनच्या नाविकदलाची हिंदी महासागरावरील पकड जाऊन जपानने सिंगापूर, मलाया व ब्रह्मदेश हे प्रदेश काबीज केल्यावर.

ही ऐतिहासिक सत्ये, महत्त्वाची आणि बोधप्रद आहेत. हिंदुस्थानच्या राजकीय सीमा जरी हिंदुकुश, हिमालय पर्वतांवर व चिंदविन नदीवर असल्या तरी या देशाच्या संरक्षण-सीमा पश्चिमेस अफगाणिस्तान व रशियाच्या सीमेवर व तैग्रिस नदीवर; उत्तरेस ल्हासाच्या पलीकडे व पूर्वेस सालविन नदीवर होत्या. त्या संरक्षण योजनांमागे अर्थातच भूगोलशास्त्राचे विश्लेषणात्मक ज्ञान होते. त्यापासून आजही आपल्याला धडे घेण्यासारखे आहेत.

ब्रिटनच्या राजवटीच्या वेळचा अखंड भारत आता राहिलेला नाही. पाकिस्तानच्या निर्मितीमुळे आपल्या अर्ध्याअधिक सीमा संरक्षणसुयोग्य नाहीत. एवढेच नव्हे तर त्या कृत्रिमरीत्या आखलेल्या सीमांमुळे आपल्या राज्याच्या अनेक भागांस धोके उत्पन्न झालेले आहेत. केवळ राजकीय स्वातंत्र्य मिळविणे व कसेही करून शक्यतो त्वरित ब्रिटन्‌ला येथून घालविणे याच उद्देशाच्या मागे लागून, आपण भूगोलशास्त्राला विसरलो. नाहीतर या देशाच्या विभाजनाला आपण अधिक निकराने विरोध केला असता असे वाटते. कारण या विभाजनामुळे पूर्वीच्या सुरक्षित पर्वतकोटांच्या आत पाकिस्तानसारखे, आपल्याशी शत्रुत्व करणारे व इतर

शत्रुराष्ट्रांना आपल्या विरुद्ध आक्रमणास साहाय्य करण्यास उद्युक्त होणारे राष्ट्र या भूमीवर उभे झाले आहे.

तिबेटसारखा त्या काळचा आघातशोषक प्रदेश आता त्या-उलट त्या आघातांचेच आधारक्षेत्र झाला आहे. पूर्वी ब्रिटनच्या स्वामित्वाखाली असणारा ब्रह्मदेश आपल्यास पूर्वेकडून संरक्षण देत असे, तो स्वतंत्र झाला असला तरी अत्यंत दुबळा असल्यामुळे, त्याच्या उत्तर विभागातून आपल्यास धोका उत्पन्न झाला आहे. नेपाळचे भवितव्य चीनच्या सैन्याच्या तिबेटातील अस्तित्वामुळे अनिश्चित आहे. एवढेच नव्हे तर त्याच्या संरक्षणाची जबाबदारी आपल्यावर पडलेली आहे.

ब्रिटनची हिंदीमहासागरावरील पकड ढिली झालेली आहे. त्याचे सुवेझच्या पूर्वेकडील लष्करी अस्तित्व १९७१ नंतर शिल्लक राहणार नाही. त्यांची जागा जबरीने कोण भरून काढतो याची काळजी आता स्थानिक राष्ट्रांना लागलेली आहे.

रशियासारख्या मर्मभूमिशासक व जागतिक स्वामित्वासाठी आतुर झालेल्या राष्ट्राच्या आरमारासाठी एडनचे द्वार मोकळे होणार आहे व ब्रिटनने सिंगापूर सोडल्यावर तेही द्वार सताड उघडते की काय, याची शंका येऊ लागली आहे.

या विपरीत घटना झाल्या किंवा होत असतानाही भारताचे या भूक्षेत्रातील महत्त्व कमी झालेले नाही. कारण पृथ्वीवरील भौगोलिक रूपरेखा बदलत नाहीत. फरक झाला आहे तो केवळ कृत्रिम सीमात, दळणवळणाच्या वेगात, शस्त्रास्त्रांच्या विध्वंसक्षमतेत, स्थानिक राष्ट्रांच्या बलाबलात व त्यामुळे उत्पन्न झालेल्या नव्या कूट-प्रश्नात. अजूनही भारताचे कीलकस्थान त्यामुळे कायमच आहे. नव्या राजकीय परिस्थितीत, येथील भौगोलिक सत्यांची योग्य दखल घेऊन, आपल्या जगद्व्यापी राष्ट्रीय संबंधात त्याबर-हुकूम बदल करणे अवश्य झाले आहे. ते सर्व आपल्या राज-व्यवहार चातुर्यावर अवलंबून आहे.

त्याबद्दल योग्य स्थली विचार करू. सध्या भारताच्या कीलक-

स्थानाला पोषक अशी इतर परिस्थिती काय आहे ती पाहू.

जागतिक दळणवळण मार्ग

नकाशा क्र. २ मध्ये पूर्व गोलार्धातील पूर्व-पश्चिम मुख्य जलमार्ग व वायुमार्ग दाखविले आहेत. आपण सुरुवातीस भारत हा देश पूर्व गोलार्धातील भूमीच्या साधारणपणे मध्यस्थानी कसा आहे ते पाहिले. त्या केंद्रीय स्थानामुळेच हे दोन्ही प्रकारचे मार्ग या देशाच्या जवळून किंवा या देशावरील आकाशातून का जातात हे लक्षात येईल. त्याचप्रमाणे युरेशियातील निरनिराळ्या द्वीप-कल्पांमधील आपसांतील दळणवळणावर त्याचे काय परिणाम होतात हेही उघड होईल.

जलमार्ग

पश्चिम युरोपीय द्वीपकल्पांपासून दक्षिण युरेशिया व पूर्व युरेशियाच्या द्वीपकल्पांना जोडणारे जलमार्ग अथवा पश्चिम रशियाच्याही व्यापार वाहतुकीचे जलमार्ग मुख्यत: दोन आहेत.

पहिला, भूमध्य समुद्रातून सुवेझ कालव्यावाटे तांबड्या समुद्रात येतो. तेथून एडनच्या आखातातून अरबी समुद्रात उतरून इराणच्या आखातातील किंवा भारत-पाक बंदरांकडे जातो. त्या पलीकडे जाण्यासाठी तो सिलोनला वळसा घालून, उत्तर सुमात्रा व मलाया यामधील सामुद्रधुनीतून सिंगापूरला पोचतो. आणि तेथन पॅसिफिक महासागरात बँकाक्, सायगाव, हनॉय्, चीनची बंदरे, जपान व अखेर व्ह्लाडिव्हॉस्टॉकपर्यंत जाऊन मिळतो.

दुसरा जलमार्ग, अटलांटिक महासागरातून आफ्रिकेला वळसा देऊन वरीलप्रमाणे भारत-पाक बंदरांकडे वळतो किंवा तेलवाहतुकीसाठी इराणच्या आखातात शिरतो. त्या पलीकडे अतिपूर्वेस जावयाचे असल्यास सुमात्रा बेटाच्या उत्तरेकडून किंवा

दक्षिणेकडून सिंगापूरला पोचतो व तेथून चीन, जपानआदी देशांकडे जातो.

सध्या सुवेझ कालवा बंद असल्यामुळे (किंवा पुढे केव्हाही तो बंद झाल्यास) या दुसऱ्या मार्गालाच अधिक महत्त्व आलेले आहे. रशियाच्या बोटीही सध्या काळ्या समुद्रातून जिब्राल्टरवाटे या दुसऱ्या मार्गावरूनच येतात. परंतु हा मार्ग लांबचा आहे व म्हणून कालहारी आहे. लष्करी दृष्ट्या अशा कालहरणामुळे अनेक तोटे होऊ शकतात.

दक्षिण आफ्रिकेपासून ऑस्ट्रेलियाला सरळ जाणारा मार्ग सोडल्यास, असे दिसून येईल की, या दोन्ही मार्गांवरील वाहतूक हिंदी महासागरात एडन-कराची-कोलंबो आणि कलकत्ता-पेनांग-कोलंबो या दोन त्रिकोणांत दाटलेली आहे. वाटेत त्यावरील बोटींना पाक-भारतांतील बंदरे वा कोलंबो यांचा वापर करावा लागतो. हे सर्व मार्ग भारताच्या किनाऱ्याजवळ आहेत. भारताच्या भौगोलिक स्थानाचा फायदा घेऊन अरबी समुद्र व बंगालचा उपसागर यांतील या वाहतूक-त्रिकोणांत म्हणजे सर्वसाधारणपणे विषुववृत्ताच्या उत्तरेकडील हिंदी महासागरात, भारतीय नौदलाने आपले कार्यक्षेत्र वाढविले तर त्यांवर नजर ठेवता येईल. निदान हे जलमार्ग वापरणाऱ्या सर्व राष्ट्रांना त्याची योग्य ती जाणीव होईल व त्याचे अवश्य तेच परिणाम होतील.

ब्रिटन्‌ची सुवेझच्या पूर्वेकडून माघार

या घटनेचा उल्लेख या भाषणात अनेकदा आलेला आहे. पण त्याचे कारण असे की, आज हिंदी महासागराभोवतालच्या राष्ट्रास अत्यंत अस्वस्थ करणारी ही घटना आहे. या भागात ब्रिटनचे साम्राज्य जरी शिल्लक राहिलेले नसले तरी, सिंगापूरमधील त्यांच्या नौदलाच्या आणि भू-सेनेच्या अस्तित्वामुळे मलाया-सिंगापूर वगैरेंना एक प्रकारचा दिलासा मिळत होता. त्यांच्याशिवाय सध्या

हिंदी महासागराच्या भोवतालच्या राष्ट्रांत नाव घेण्यासारखी केवळ चार नौदले आहेत–पाकिस्तान, इंडोनेशिया, भारत व थोड्या दूरचा ऑस्ट्रेलिया यांची. त्यांपैकी कोणाचेच नौदल फारसे प्रबळ नाही किंवा अद्ययावत शस्त्रास्त्रांनी सुसज्ज नाही. तेव्हा ब्रिटनच्या माघारीनंतर या भागात एक पोकळी निर्माण होणार आहे हे शब्दशः खरे नसले तरी, हा सागराचा भाग थोडाफार भकासच होणार आहे असे कबूल करणे भाग आहे. रशिया किंवा अमेरिका यांच्या एखाद्या लहानशा अद्ययावत काफिल्याविरुद्ध त्यापैकी एकही राष्ट्र टक्कर देऊ शकणार नाही.

स्थानिक राष्ट्रांनी समाइकरीत्या ती रिकामी जागा भरून काढण्याची आज फारशी शक्यता नाही; कारण या चार देशांची एकजूट अनेक कारणांमुळे होऊ शकत नाही. त्याचे एकमेकांबद्दलचे संशय किंवा सीमावादांमुळे उत्पन्न झालेले आपसांतील संघर्ष हे त्यांच्या आड येतील. त्याशिवाय आपला अलिप्ततावाद तर कोणाशीही संरक्षणार्थ संघटना करण्याच्या विरुद्ध आहे.

ब्रिटन्‌ने माघार घेतल्यावर या ठिकाणी पोकळी होणार नाही असे आपल्या राष्ट्रीय नेत्यांनी घोषित केलेले आहे. पण ती का होणार नाही ? ती कशी टाळता येईल ? तशी ती होते आहे असे वाटल्यास ती भरणार कोण ? याबद्दल मात्र आपण मुग्ध असतो. हिंदी महासागराच्या रिकाम्या आखाड्यात तुम्ही उतरू नका असे जगातील महान राष्ट्रास आपण आक्रोश करून सांगत असलो तरी ते आपले ऐकतील एवढी आपल्या शब्दाला किंमत आहे का ? चीन-पाक युतीच्या संदर्भात चीनी पाणबुड्या येथे संचारू लागल्या किंवा कराची, चित्तागाव ही त्यांनी आपली आधारस्थाने बनविली तर, आपण एकट्याने त्यास प्रतिबंध करू शकू का ? खचित नाही. मात्र काय करावयाचे याचे उत्तर कोणीच देत नाही. कारण खरी उत्तरे दिल्यास समाइक कृती का करीत नाही, असा प्रश्न उभा राहील. मग आपल्या अलिप्ततेचे काय ?

रशिया ही संभाव्य पोकळी भरून काढण्यास उतावीळ

झालेला आहे. त्याच्या आरमारातील काही युद्धनौका हिंदी महासागरात आज वावरत आहेत. यु. स्टेट्स्चे ७ वे आरमार दक्षिण चीनी समुद्रात आहे, पण हिंदी महासागर त्याच्या कार्यक्षेत्रात अंतर्भूत करण्याची त्यांची तयारी दिसत नाही. ते योग्यच आहे, कारण त्यांनी आपले बल सर्वत्र विखुरल्यास ते कोठेच प्रबल राहणार नाहीत. स्थानिक राष्ट्रांनीच संघटित होऊन हिंदीमहासागराचे पूर्वेकडील द्वार रोखले तर ते त्यांना हवे आहे. त्या संघटनेस ७ वे आरमार बहुधा पाठबळ देऊ शकेल.

अशी द्वारपालाची भूमिका घेण्यासाठी प्रचंड बल लागते असे नाही. तेथील बंदरे व आसपासचा समुद्र यांत आपल्या अस्तित्वाची जाणीव करून द्यावयाची असते. त्या नाविक तळाचा उपयोग एखाद्या अडखळ-तारेसारखा (trip wire) असतो. बाहेरच्या नौदलांना ती सूचना असते की तुम्ही दुसऱ्यांच्या क्षेत्रात अतिक्रमण करीत आहात व आम्ही आरडाओरड करू व तसे केल्यास त्याचे परिणाम जगातील जनमतावर होतील. एवढाच त्याचा उपयोग असतो.

त्यासाठीच व त्यास स्वतःच्या हितसंबंधांची काळजी असल्यामुळे दूरच्या ऑस्ट्रेलियाने पुढाकार घेऊन न्यूझीलंड, मलेशिया, सिंगापूर व ब्रिटन् यासह १९७१ नंतरच्या सुरक्षा योजनांबाबत विचारविनिमय सुरू केला आहे. त्यात प्रत्यक्षात काय ठरले हे पूर्णपणे उघड झाले नसले तरी, ऑस्ट्रेलिया व न्यूझीलंड यांची काही भू-सेनापथके मलायात व सिंगापूरमध्ये राहावी व सिंगापूर बंदरात त्यांचे आरमार असावे असा त्या संवादांचा सूर दिसतो. त्यास ब्रिटन् अवश्य साहित्याची मदत करील, असे वाटते.

आपल्या केंद्रीय भौगोलिक स्थानामुळे अशा संवादात आपण पुढाकार घ्यावयास हवा होता, कारण आपल्याला आपल्या भोवतालच्या जलविस्तारात परकीय येण्याने धोका आहे. पण त्याला आपला अलिप्ततावाद व सध्याचे रशियाचे दडपण या दोन्ही गोष्टी आड आल्या असाव्यात. आपल्या धोरणांमुळे आपण हिंदी महासागर

हा महान राष्ट्रांच्या नाविक दलांचे संघर्षक्षेत्र होण्यास प्रोत्साहन देत आहोत. त्यापेक्षाही महत्त्वाचे असे की, आपण आपल्या शेजाऱ्यांच्या रक्षणाबद्दल बेफिकिरी दाखवून आपली परराष्ट्रीय व्यवहारातील क्रियाशीलता व आपल्यासारख्या केंद्रस्थानीय व इतरांहून बलवान राष्ट्राचे महत्त्व घालवीत आहोत.

रशियाला त्याच्या विस्तारेच्छेस प्रतिबंध करणारी कोणतीही संघटित कृती आवडत नाही. तेव्हा आपल्या अलिप्ततावादाची तारीफ करून तो आपल्याला समाइक संरक्षणयोजना आखण्यापासून परावृत्त करीत असतो. आणि आपण भोळेपणाने आपल्या धोरणांच्या केलेल्या स्तुतीने खूष होऊन निष्क्रिय राहतो.

वायुमार्ग

साम्यवादीय जगताच्या बाहेर वायुमार्गांचा अधिकतम उपयोग करणारी राष्ट्रे मुख्यत्वेकरून यु. स्टेट्स् व पश्चिम युरोपीय आहेत. त्यांचे दळणवळण जगभर पसरलेले आहे. युरोपीय द्वीपकल्पे व पूर्व युरेशिया यामधील वायुमार्गांत असे दोन प्रदेश आहेत की, जेथे हे मार्ग एकत्रित होतात व पुन्हा अनेक दिशांस पसरतात. (नकाशा क्र. २ पाहा). असा पहिला प्रदेश सुवेझच्या भोवतालच्या अरब राष्ट्रांचा आहे व त्यानंतर दुसरा भारत हा आहे.

विमानांची संख्या, त्यांचा वेग व भारवाहकता वाढत चालली असल्यामुळे वैमानिक वाहतुकीला, मुलकी क्षेत्रातील प्रवास व व्यापार यासाठी आणि लष्करी क्षेत्रात शक्तिसंकलनाची गती व वेग यासाठी, अधिकाधिक महत्त्व प्राप्त होत आहे. विमानांनी अजून समुद्रयानांची जागा घेतली नसली तरी त्वरित पोहचीसाठी त्यांचे महत्त्व आगळे आहे. १९६२ साली चीनच्या आक्रमणाच्या वेळी यु. स्टेट्स् व ब्रिटन् यांनी अवश्य शस्त्रास्त्रे आपल्याला पोहोचविली. तेव्हा त्या मदतीच्या वेगाला, म्हणजे "काळा"ला, महत्त्व होते, म्हणून त्यांना वैमानिक वाहतुकीवरच भर द्यावा लागला.

असे निकडीचे प्रसंग यापुढेही अनेकदा उद्‌भवण्याचा संभव आहे.

वायुमार्गांच्या वापरात वाटेतील देश मात्र विघ्ने आणू शकतात. उदाहरणार्थ, युरेशिया खंडाच्या अनेक द्वीपकल्पांमधील दळणवळण वहिर्गत-रेषांवरून (exterior-lines) चालते. त्यापैकी कोणत्याही दोन द्वीपकल्पांमधील वायुमार्गात जर त्यांच्या दळणवळणास काहीही कारणांमुळे विरोधक देश असले, तर त्या देशांवरील आकाशक्षेत्रात त्या उड्डाणास ते मज्जाव करू शकतात व जबरीने त्या क्षेत्रांचा वापर केल्यास त्यास सशस्त्र विरोधही करू शकतात. तेव्हा त्या त्या वायुमार्गाखालील भूमीवरील राष्ट्रांचा राजकीय कल कसा आहे याला महत्त्व येते. विशेषतः राजकीय संघर्ष व युद्ध सुरू झाल्यावर ते विशेषच लागू पडते.

यावरून दिसून येईल की वायुमार्गाने होणाऱ्या पूर्वगोलार्धा-वरील दळणवळणाच्या मार्गात भारत केंद्रस्थानी असल्याने युद्ध-कालात आपली सहानुभूती कोणत्या बाजूस वळेल याला महत्त्व आहे. जरी आपण अलिप्त असलो तरी पाश्चिमात्यांशी संरक्षण कराराने बद्ध झालेल्या युरेशियाच्या इतर द्वीपकल्पांतील किंवा द्वीपांवरील राष्ट्रांमधील हवाई दळणवळण शांतिकालात व विशेषतः युद्धकालात आपल्या भूमीवरूनच चालणार आहे. असे युद्ध पौर्वात्य गटातील राष्ट्रांशी झाले तर आपले धोरण काय असेल, याची पाश्चिमात्यांना खात्री वाटत नाही. म्हणूनच, हिंदीमहासागरातील भूमध्यरेषेच्या आसपास असणाऱ्या अनेकविध लहान बेटांची, हवाई मार्गांच्या संदर्भात, पाश्चिमात्य राष्ट्रे (विशेषतः ब्रिटन् व अमेरिका) पाहणी करीत आहेत. त्यापैकीच मालदीव बेटांच्या दक्षिणेस दिएगो गार्सिया बेटावर एक वायुमार्गावरील मजल-सराई (staging post) उभारण्याचा त्यांचा विचार होता व अजूनही तो तसा असावा. पूर्वपश्चिम वायुमार्गांची युद्धकाळातील अखंड सुरक्षितता हवी असल्यास, दक्षिण आफ्रिकेपासून पूर्वेस मलाया, थायलंड किंवा दक्षिणेस ऑस्ट्रेलिया यांच्याशी संसर्ग ठेवण्यासाठी वाटत अशी सराई अवश्य आहे .शांतिकालात ही सराई जरी

अनावश्यक वाटली तरी युद्धकालात तिचा उपयोग युद्धमान राष्ट्रांच्या आपसातील मिलापासाठी करावा लागेल. या नव्या मार्गाने उत्तर आफ्रिका, पश्चिम आशिया किंवा मध्य आफ्रिका यामधील अनिश्चित राजवटींच्या आकाशक्षेत्रात वर-उड्डाण (overfly) करण्याची आवश्यकताच नाही. त्याचप्रमाणे भारतावरचा मार्गही टाळता येतो. असे उड्डाण दक्षिण आफ्रिकेच्या मार्गेच शक्य असल्या-मुळे तेथील राष्ट्रांस त्यांच्या अंतर्गत वर्णीय धोरणांवद्दल फारसे न डिवचण्याची काळजी पाश्चात्त्य घेत असतात.

अशा तऱ्हेची सराई हिंदी महासागरात उभारण्यास आपण आपला विरोध दर्शविलेला आहे, पण त्याकडे कोणी लक्ष देईल असे नाही. पाश्चात्त्यांच्या अशा कृतीस आपण विरोध करीत असलो तरी हिंदी महासागरात व त्या भोवतालच्या भूक्षेत्रात होऊ घातलेल्या मर्मभूमिशासक रशियाच्या प्रवेशास आपण विरोध करण्यास धजू असे वाटत नाही. भूमध्य समुद्रात रशियाचे आरमार इजिप्तची बंदरे वापरून ठाण देऊन वसले आहे. त्या बाबतीत ना आपला अलिप्ततावादी मित्र नासर याने, ना आपण विरोध दर्शविला. पुढच्या पायऱ्या तांवडा समुद्र व नंतर अरबी समुद्र याच आहेत. त्यावेळीही आपल्यावर वाढत चाललेल्या रशियाच्या दडपणाच्या परिस्थितीत आपण आपली नाराजी व्यक्त करू शकू असे वाटत नाही. फार काय, रशिया करीत असलेल्या युद्धसाहित्याच्या मदतीच्या वदल्यात, इजिप्तने दिली आहेत त्याप्रमाणे, आपली कोचीन, गोवा वगैरे बंदरे त्यांना आधारस्थाने म्हणून वापरास आपण खुली केली नाहीत तरच आश्चर्य !

१५

भारत– उत्तरार्ध

नैसर्गिक संपत्ती

राष्ट्रबलाच्या मापनात जनता व तिची संख्या ही नैसर्गिक संपत्तीचा मूलभूत पायाच मानली पाहिजे. त्या जनतेच्या बुद्धीच्या व कर्तृत्वाच्या साहाय्यानेच इतर नैसर्गिक साधन-सामग्रीचे उत्पादन व राष्ट्राचे औद्योगीकरण होत असते. ते योग्य रीतीने होण्यासाठी जनतेची सामाजिक व शैक्षणिक प्रगती झालेली असावी लागते. आपल्या देशाची लोकसंख्या चीन सोडून इतर कोणत्याही राष्ट्रापेक्षा अनेक पटीने मोठी

आहे. तेव्हा मनुष्यबळाची आपल्याला तूट पडेल असे वाटत नाही. त्यामध्ये आधुनिकीकरणासाठी कर्तृत्व व जिद्द मात्र उत्पन्न केली पाहिजे. पण आपल्या वाढत्या लोकसंख्येपासून काही धोकेही उत्पन्न होऊ शकतात व आपल्या समाजात इतर काही दोष आहेत तेही राष्ट्रास घातक ठरू शकतात, हे दिवसानुदिवस उघड होऊ लागले आहे.

सध्या वाढत आहे त्याच प्रमाणात आपली लोकसंख्या वाढत राहिली तर तीसाठी पुरेसे अन्नोत्पादन या देशात शक्य होणार नाही. औद्योगिक विकासाच्या गतीलाही सीमा असल्यामुळे बेकारी अतोनात वाढेल व परिणामी आर्थिक प्रगतीऐवजी त्यात घटच होईल. तसे झाल्यास आपले परावलंबित्व इतके वाढत जाईल की, आपल्याला आपल्या अन्नदात्यांचे व अर्थदात्यांचे मिंधे होऊन बसावे लागेल. या बाबतीत या देशाचे एक भयानक चित्र डोळ्यासमोर उभे राहते. कारण बेकारी व दारिद्र्य म्हणजे अखेरीस अराजक व क्रांती हे एक अटळ समीकरण आहे.

आपला समाजही एकसंधी नाही. त्यात धार्मिक, सांस्कृतिक, वांशिक, पोटजातीय, भाषिक इत्यादी अनेक भेदभाव आहेत. येथील प्रदेशांच्या अनेक वेगवेगळ्या ऐतिहासिक पार्श्वभूमींमुळे त्यात एकात्मीयता व संघटितपणा आलेला नाही. स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी काही वर्षे दिसू लागलेली एका अभेद्य भारतीय समाजाची भावना आपल्या दुष्कृत्यांमुळे गेल्या वीस वर्षांत पार नाहीशी झाली आहे. भाषावार प्रांतरचना व भाषिक वाद हे तसे तडे विस्तृत करणारे सर्वांत अधिक प्रबल कारण झाले आहे.

राष्ट्राच्या औद्योगिक विकासाची गती आवश्यकतेपेक्षा मंद चालली आहे. त्यासाठी अनेक कारणे देण्यात येतात. पण ही मंदी बहुतांशी तो विकास कोणत्या तत्त्ववादानुरूप करावयाचा यालाच विकासाच्या मूल उद्दिष्टापेक्षा अधिक महत्त्व दिल्यामुळे व परिणामी राज्यकर्त्यांच्या धरसोडीच्या धोरणामुळेच आलेली आहे. शिक्षणप्रसार अजून समाधानकारक नसला तरी त्यामुळे विकास रोखला

जात आहे असे नाही. बुद्धी-गळती होत असूनही तांत्रिक पदवीधर हजारोंनी बेकार आहेत याचे दुसरे कारण काय ?

या सर्व गोष्टी अर्थातच राष्ट्राच्या बलवर्धनाला घातक आहेत; पण मी म्हणेन की, त्या कायम असतानादेखील भारताच्या मनुष्यबलाला, येथे होत असलेल्या औद्योगिक प्रगतीला, 'वासरात लंगडी गाय शहाणी' म्हणून का असेना, पण दक्षिण युरेशियाच्या राष्ट्र-मेळाव्यात विशेष महत्त्व आहे. चीनच्या लोकसंख्येला व त्यांच्या दक्षिण-प्रसाराला तोंड देऊ शकेल असे भारत हे एकच राष्ट्र आहे. पण त्या चीनविरोधी आघाडीचे क्षेत्र किंवा हिंदी महासागरात आपला प्रभाव वाढविणाऱ्या राष्ट्रांविरुद्ध प्रतिकारी कृती भारतापुरत्याच संकुचित ठेवल्या तर त्यांना सीमाबद्ध करणे साध्य होणार नाही. आपल्या शेजारच्या बलहीन राष्ट्रांसही आपल्या प्रतिकारक्षमतेपासून धीर मिळाला पाहिजे, तरच आपल्या भौगोलिक स्थानाचा व आपल्या विकासाचा योग्य उपयोग झाला असे म्हणता येईल. त्यांना आपण सेनाबलाची मदत सध्या देऊ शकत नसलो तरी त्यांच्या विकासाला हातभार लावून, त्यास हरत-हेची इतर मदत आपण करू शकतो. सामाजिक व आर्थिक विकास हीच लष्करी बलामागील शक्ती असते.

आपल्या दोन्ही बगलांवरील समुद्रांच्या पलीकडे आफ्रो-आशियाई राष्ट्रांशी आपले संबंध निकट ठेवण्याची, त्यांच्याशी व्यापारविनिमय करण्याची व आपसातील दळणवळणाचे मार्ग सुरक्षित राखण्याची जबाबदारी आपली आहे. केंद्रीय स्थान असणे हे भोवतालच्या राष्ट्रांबरोबर सहकार्य करण्यास उपयुक्त ठरते, तसेच त्या केंद्रास घेरणारे जर आपल्यास विरोधी बनले तर त्या केंद्राची गळचेपी पण तेवढ्याच सुलभतेने होऊ शकते. म्हणूनच आपल्या बगलांवरील, आपल्यास घेरणारी राष्ट्रे आपल्या हितसंबंधास व आपल्या विशिष्ट राजकीय मूल्यास बाधक बनत नाहीत याची काळजी घेणे अवश्य आहे.

आपला देश खनिज व वनज संपत्तीच्या बाबतीत जगातील

इतर अनेक देशांच्या मानाने समृद्ध आहे. तिचे नवनवे साठे सापडत आहेत. तांबे, शिसे, जस्त त्याचप्रमाणे पोलादाच्या मिश्रणासाठी अवश्य अशा काही टंगस्टेनसारख्या धातू आपल्या देशात पुरेशा किंवा अगदीच मिळत नाहीत. पण आपल्या भोवतालच्या भूभागांकडे नजर फिरविली तर, त्यापैकी बहुतेक धातू अरबी समुद्र व बंगालच्या उपसागरापलीकडे आपल्या लगतच्या देशात उपलब्ध आहेत असे दिसून येईल.

भूतेलाच्या बावतीत बराच प्रयत्न करून आपल्याला थोडे-फार यश आले आहे, पण ते आपल्या मागणीच्या १५ टक्केच कसेबसे आज सापडते. पण जगातील तेलाचा प्रचंड साठा आपल्यापासून एक हजार मैलाच्या आत इराणच्या आखाताभोवती आहे. त्याच-प्रमाणे रबराचे ८० टक्के उत्पादन मलाया व इंडोनेशियात होते.

थोडक्यात सांगावयाचे म्हणजे, आपल्या उत्तर हिंदी महा-सागराभोवतालच्या प्रदेशांतील नैसर्गिक संपत्ती आपल्या देशात पैदा होणाऱ्या वस्तूस पूरक आहे. याचा अर्थ असा की, काही थोड्या चिजा सोडता समाइक सहकार्याने हा विस्तृत भूभाग स्वावलंबी होऊ शकतो. त्यांच्यातील परस्पर मैत्री व संघटना, शिवाय परस्पर दळणवळण यांना महत्त्व येते. त्यांत बाहेरील राष्ट्रांनी येऊन संघर्ष उत्पन्न करू नयेत यासाठी आपल्या भौगोलिक स्थानाचा पुरेपूर उपयोग मात्र केला पाहिजे.

या सर्व प्रदेशाची समाइक संपत्ती व त्यामुळे प्रयत्नांती येणारी सुबत्ता लक्षात घेतल्यास, आपण औद्योगिक क्षेत्रात मारलेल्या आघाडीचे महत्त्व लक्षात येईल. आपल्या ज्ञानाचा फायदा आपण आपल्या शेजाऱ्यांस करून दिला पाहिजे. आफ्रिकेपासून तो व्हिएट-नामपर्यंत केवढी तरी मोठी बाजारपेठ आपल्या उंबरठ्यावर आहे. आज त्यापैकी बहुतेक राष्ट्रे यंत्रोत्पादित माल व युद्धसाहित्य दोन्ही गटांतील विकसित राष्ट्रांकडून विकत घेतात. त्यांची जागा घेण्यास आपण हळूहळू सिद्ध झाले पाहिजे आणि त्या राष्ट्रांत उद्योगधंद्यांच्या उभारणीसाठी प्रयत्न केले पाहिजेत. दुसऱ्या शब्दात

सांगावयाचे म्हणजे या दक्षिण युरेशियाच्या द्वीपकल्पांतील व पूर्व आफ्रिकेतील राष्ट्रांना शान्तिकालात व युद्धकालात लागणाऱ्या तांत्रिक ज्ञानाच्या व साहित्याच्या पुरवठ्यासाठी हा देश एक औद्योगिक आधारस्थान झाले पाहिजे; तरच त्याला भूकेंद्र किंवा कीलक ही संज्ञा सार्थ होईल.

ब्रिटनच्या येथील राजवटीच्या काली त्यांच्या व इतर युरोपीय राष्ट्रांच्या साम्राज्यांच्या रक्षणार्थ भारताचे जे महत्त्व होते, तसेच ते आता, त्यांच्या साम्राज्यातून बाहेर पडून स्वतंत्र झालेल्या देशांच्या स्वातंत्र्यरक्षणासाठी भारत हे एक औद्योगिक आधारस्थान व राजकीय स्फूर्तिस्थान बनवून टिकविता येईल. पण त्यासाठी आपल्या राष्ट्राची अंतर्गत परिस्थिती आपल्या शेजाऱ्यांत आपल्याबद्दल विश्वास उत्पन्न होईल अशी स्थैर्याची दिसली तरच ते शक्य होईल. आणि त्यासाठी आपल्या राजकीय भूमिकेत धडाडीने व वस्तुनिष्ठतेने बदल घडवावा लागेल. आपण इतरांचे मिंधे आहोत असा त्यांचा समज झाल्यास ते साध्य होणार नाही; एवढेच नव्हे तर आपल्या-बरोबर त्या इतरांसही आपण खाली खेचू. गेल्या महायुद्धानंतर या सर्व देशांच्या स्वातंत्र्यासाठी आपण कारणीभूत झालो तसेच आता त्यांच्या स्वातंत्र्यसमाप्तीसाठीही कारणीभूत होऊ.

पाकिस्तान व चीन

या उपखंडाचे विभाजन झाल्यावर उत्पन्न झालेले पाकिस्तान हे राष्ट्र या द्वीपकल्पातच आहे व त्याचे परिणामी धोके आपल्या-साठी उत्पन्न झाले आहेत. गेल्या बावीस वर्षांतील घडामोडींची आपणा सर्वांस पूर्ण माहिती असल्यामुळे मी काही विशेष महत्त्वाच्या बाबींचाच येथे ऊहापोह करणार आहे.

पाकिस्तानी सीमेचे संरक्षण योजनांवर परिणाम

आपल्या दोन राष्ट्रांमध्ये रेखाटलेली कृत्रिम सीमा ही

कोणत्याही भौगोलिक रूपरेखांनुसार काढलेली नसल्यामुळे ती सर्वत्र सहजभेद्य आहे. शिवाय पाक व चीन ही दोन्ही राष्ट्रे आपल्याशी शत्रुत्व करीत आहेत व त्यांचे संगनमताने आक्रमण होईल अशीही संभाव्यता आहे. त्यामुळे आपला सीमारक्षणाचा प्रश्न अधिक गुंतागुंतीचा झाला आहे. पाकशी व चीनशी असलेल्या सीमा या दोन अगदी वेगळ्या प्रकारच्या भूक्षेत्रातून जातात– वाळवंट किंवा सखल मैदान व अत्युच्च पर्वत.

भू-सेनेची युद्धक्षमता तिच्या संख्येवर, तिला पुरविलेल्या शस्त्रास्त्रांवर व तिला विशिष्ट युद्धप्रकारासाठी दिलेल्या तांत्रिक शिक्षणावर अवलंबून असते. पर्वत-युद्ध-प्रकार व मैदानातील यांत्रिक व गतिमान (mechanized and mobile) युद्धप्रकार यांत पुष्कळच फरक आहे. त्यांच्यासाठी उभारलेल्या पथकांच्या रचनेत, युद्धसाहित्यात व त्यांना दिलेल्या रणकौशलाच्या शिक्षणात (tactical training) तो फरक दिसून येतो. त्याचप्रमाणे समुद्रसपाटीपासून ५००।६०० फुटांवरील मैदानात लढणारे सैनिक, लगेच १० ते १५ हजार फुटांवर, हिमालयात, त्यांना हवामानसराव (acclimatization) झाल्याशिवाय त्याच जोमाने लढू शकत नाहीत. त्यासाठी त्यांना सहा आठवड्यांचा काल लागतो असे अनुभवांती दिसून आले आहे. १९६२ साली चीनी आक्रमण रोखण्यासाठी घाईने मैदानातून नेफात पाठविलेली पथके कुचकामी ठरली त्याचे एक कारण हेही होते.

तेव्हा या दोन संभाव्य युद्धक्षेत्रांत लढण्यासाठी उभारलेल्या सेना एकमेकांस त्वरित साहाय्यार्थ पाठविणे योग्य नसल्यामुळे, आपले एकूण सैन्य कोणा एका शत्रूविरुद्ध संकलित करून वापरणे शक्य होत नाही. आपल्या सरसेनापतींचे क्रियास्वातंत्र्य त्यामुळे संकुचित होते व त्या त्या सीमांवर उपलब्ध असलेल्या व काही काल सरावलेल्या सेनांवरच त्यांना विसंबून राहावे लागते. त्याचा परिणाम असा होतो की, आपल्या सेनेस कोठेच निर्णायक यश मिळविण्यासाठी अवश्य असे अधिकतम बल केंद्रित करता येत नाही.

अर्थातच आपली सेनासंख्या अधिक वाढविली तर ते शक्य होईल, पण त्यामुळे एकतर आपला संरक्षण खर्च बेसुमार वाढेल व या भूक्षेत्रात बलाबलाची तौलनिक स्पर्धा सुरू होईल. त्यासाठी जगातील प्रगत राष्ट्रे येथे शक्तिसमतोल राखण्यासाठी आपल्या प्रतिस्पर्ध्यास शस्त्रास्त्र-साहाय्य करतील. हे एक दुष्ट चक्र आहे. असो, सध्या तरी आपल्याला दोन्ही आघाड्यांवर रक्षणात्मक पवित्रा (defensive attitude) घेण्यापलीकडे काही करणे शक्य दिसत नाही.

दोन आघाड्यांचे धोके

दोन आघाड्यांवर एकाच वेळी युद्ध करणे हे कोणत्याही राष्ट्राला नेहमीच घातक ठरते. राज-व्यवहार-चातुर्याने आपली संघर्षक्षेत्रे मर्यादित करावी व त्यापैकी एक आघाडी कमी व्हावी असे प्रयत्न तो करीत असतो. तसे आपणही करणे अवश्य आहे. अर्थात् आपला सध्याचा तो विषय नाही, परंतु आहे ती परिस्थिती कायम राहिल्यास स्वसंरक्षणाचा भार वाढेल, विकासाचा वेग मंदावेल व राष्ट्राचे सर्व लक्ष त्या विस्तृत संरक्षणक्षेत्राकडेच वेधल्यामुळे इतरत्र दृष्टिक्षेप करावयास अवसर मिळणार नाही. आणि मिळाला तरी आपल्या सीमांव्यतिरिक्त इतरत्र काही करण्याची ताकद शिल्लक न राहिल्याने, आंतरराष्ट्रीय राजकारणातील अनेक निर्णयांवर दौर्बल्याची छाप पडेल. तशी काहीशी आपली परिस्थिती झालेली आहे. त्याला उपाय शोधले पाहिजेत.

पाकिस्तानातील राजकीय क्रांती

पाकिस्तान या शेजारच्या राष्ट्रात स्थैर्य नांदावे व लोकशाही टिकावी हे आपल्याला फायद्याचेच आहे. परंतु त्यांच्याही समस्या काही कमी बिकट नाहीत. आपण एका पाकिस्तान्याच्या भूमिके-

वरून विचार केल्यास, हिंदुस्थानची फाळणी ज्या रीतीने झाली, तीमुळे त्या राष्ट्राचे दोन तुकडे होऊन त्यामधील संधान-मार्ग केवळ समुद्रावरून अडीच हजार मैल लांबीचा झालेला आहे एवढेच नाही तर तो भारताच्या किनाऱ्यालगतच्या क्षेत्रात त्यास वळसा देऊन जातो. यामुळे पाकिस्तानच्या संरक्षणयोजनांवरही त्याचे परिणाम होतात.

या दोन पाकिस्तानी घटकांतील जनता जरी बहुतांशी एकधर्मीय असली तरी वंशाने, वर्णाने, बोलीने, चालीरीतीने, आचारविचाराने त्यांतील लोक अगदी वेगळे आहेत. त्यांच्यातील अंतरामुळे त्यांच्यात एकात्मीयता येणे भविष्यकाळातही अशक्यप्राय झाले आहे.

भारताविरुद्ध असणाऱ्या द्वेषामुळे, आततायीपणा करून चीनला पाकिस्तानने आपल्या पूर्व प्रदेशातील घरात घेतले. त्याचे परिणाम आता उघड होऊ लागले आहेत. चीनसह संयुक्त आघाडी उभी करण्याच्या प्रयत्नात राजकीय अंधळेपणाने त्यांनी त्यांच्या राष्ट्राचा पूर्वेचा अर्धा भाग घालविला आहे असे दिसते. सध्या सेनाबल वापरून तेथे जबरीने स्थैर्य आणण्यात त्यास थोडे यश आले तरी, ते फारसे टिकाऊ होईल याची खात्री वाटत नाही.

या घटनांपासून आपल्याला आनंद होण्याचे कारण नाही. आपल्याही राष्ट्राच्या पुढील विभाजनाला ती एक साधक घटना ठरणार आहे. पश्चिम व पूर्व बंगाल हे दोन्ही बंगाली भाषी आहेत. त्या दोन्ही भागात आता जोर करू पाहणाऱ्या नव्या मार्क्सवादी तत्त्ववादामुळे, हिंदू व इस्लाम हे धर्म जाऊन, कट्टर साम्यवाद हा एक नवा धर्मही तेथे येता दिसत आहे. आपण हिंदुस्थानची फाळणी धर्माच्या भूमिकेवर मान्य केली. तशीच उर्वरित भारतात भाषेच्या आधारावर प्रांतरचना केली. ते सर्व प्रांत भूगोलशास्त्रीय राष्ट्राच्या व्याख्येबरहुकुम स्वतंत्र राष्ट्रे झाली आहेत. आपले केंद्रीय सरकार हेच काय ते एक राज्य आहे. या भाषावादामुळे पश्चिम बंगाली जनतेला शेजारच्या भारतातील बिहारीपेक्षा किंवा ओरियांपेक्षा पूर्व पाकिस्तानी माणूस अधिक जवळचा वाटला तर नवल नाही

ते लोक वंशाने, बोलीने, आचारविचाराने व त्यांच्या ब्रह्मपुत्रा व गंगा या मोठ्या नद्यांच्या जल–सिंचित भूमीच्या साम्यामुळे अधिक जवळचे आहेत. तेथील चहा, ताग आदी पिके व त्यावर आधारलेले उद्योगधंदे, या बाबतीत ते दोन भाग एकमेकांस पूरक आहेत. त्यांच्यातील पूर्वापार दळणवळण तेथील नद्यांवाटे अधिक सुकर आहे. तेव्हा भूगोलशास्त्रदृष्टचा ते दोन्ही जनता-गट एकाच राष्ट्राचे घटक होतात. आता राजकीयष्दृटचा आपण त्यास विरोध करू तो वेगळा. पण मी असेच म्हणेन की, धर्मवार राष्ट्ररचना आणि भाषावार प्रांतरचना या आपल्या दोन मूळ धोरणातून उत्पन्न झालेली ही घटना आहे. तेव्हा अशा या एकभाषिक व एकवंशीय राष्ट्रास आपण कोणत्या तत्त्वाबरहुकूम विरोध करणार आहोत हे मला तरी समजत नाही !

पश्चिम बंगालातील फेरनिवडणुकीतील भरघोस यशापेक्षा मौलाना भाषाणी यांच्या पूर्व बंगालातील चीनधार्जिण्या उठावा-बद्दल श्री. ज्योतीं बसूंना अधिक आनंद झाल्याचे त्यांनी आपल्या एका भाषणात सांगितले, त्याबद्दल आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. त्यांच्या मनातील अंखड बंगालबद्दलच्या भविष्यकालीन उद्दिष्टाचा अंदाज करता येतो.

यात चीनची भूमिका काय ? गेल्या वीस वर्षांतील अनुभवाने असे दिसते की चीन स्वतः कोणाशीही कधीच प्रत्यक्ष युद्ध उकरून काढीत नाही. तो शक्यतो स्थानिक जनतेकडूनच आपले कार्य परहस्ते (by proxy) साधून घेतो. तो आतापर्यंत पाकिस्तानकरवी आपल्याविरुद्ध संघर्ष साधत होता. आता पूर्व पाकिस्तानच्या व पश्चिम बंगालच्या जनतेकरवी भारत व पाकिस्तान या दोघांविरुद्ध आपली उद्दिष्टे साधून घेत आहे. त्यात तो यशस्वी झाला तर पूर्व-पश्चिम बंगाल यांचे आसामसह एक साम्यवादी गणराज्य तेथे प्रस्थापित होईल. आपली केंद्रीय सत्ता सध्याप्रमाणेच दुबळी-पांगळी राहिली आणि पाकिस्तान पूर्व बंगालवरील आपले आधिपत्य टिकवू शकला नाही तर, त्यास फारसा काळ लागेल असेही वाटत नाही.

१६

महान राष्ट्रांची भारताबद्दल धोरणे

मर्मभूमिशासक रशियाने किनारभूमीच्या रोखाने योजिलेल्या विस्तारवादाच्या संदर्भात किंवा यु. स्टेट्स्च्या साम्यवादी विस्ताराला सीमाबद्ध करण्याच्या (containment) संदर्भात भारताचे महत्त्व आगळे आहे हे काही अंशी उघड झालेच असेल. पण या महत्त्वामुळेच आपल्याला त्यांची धोरणे अनेकदा तापदायी होतात. इजिप्तला पाश्चात्त्यांचा ताप झाला तो सुवेझ कालव्याच्या महत्त्वामुळे. इराणच्या आखाताभोवती पाश्चिमात्यांनी आपले स्वामित्व

ठेवले ते तेथील तेलोत्पादनाच्या क्षमतेमुळे. आता या दोन्ही
राष्ट्रांच्या अहमहमिकेतील चालींचे लक्ष्यराष्ट्र आपण होत आहोत
ते आपल्या वर वर्णन केलेल्या केंद्रीय स्थानामुळे.

अण्वस्त्रांच्या भीतिसमतोलामुळे ती दोन महान राष्ट्रे एक-
मेकांसमोर युद्धपवित्रा टाळत असली तरी, जगातील अनेकविध
अविकसित राष्ट्रांना आपल्या प्रभावक्षेत्रात ओढण्याचे त्यांचे प्रयत्न,
एकमेकांवर मात करीत,अहर्निश चालू असतात. स्थानिक वखेडयांचा
त्यांना फायदा मिळतो. स्ववलवृद्धी किंवा स्थानिक शक्तिसमतोल,
आफ्रो-आशियाई राष्ट्रांपैकी कोणीच स्वतःच्या तांत्रिक ज्ञानाने
किंवा औद्योगिक कर्तृत्वाने उभारू शकत नाही. तेव्हा त्यांना देऊ
केलेल्या आर्थिक व विशेषतः युद्धसाहित्याच्या मदतीने त्यास आपले
अंकित वनविता येते. "साम्राज्यशहा", "हुकूमशहा"असे एकमेकास
म्हणून स्वतःच काय ते शांतीचे पुरस्कर्ते आहोत असे ते दोघेही
भासवीत असतात. त्या शब्दप्रयोगांना काडीचीही किंमत नाही.
ते जागतिक प्रचाराखातर एकमेकांस शिव्याशाप देण्यासाठी वापरा-
वयाचे असतात. १८ व्या किंवा १९ व्या शतकातील पाश्चात्त्यांची
साम्राज्यशाही व आता आलेली साम्यवादीय साम्राज्यशाही यात
फरक नाही. फार काय, उलट ही नवी साम्राज्यशाहीच अधिक
कडवी व निष्ठुर आहे हे हंगेरी व च्छेकोस्लोव्हाकिया या "स्वतंत्र"
राष्ट्रांवरील आक्रमणांच्या उदाहरणावरून दिसून येते. रशियाने
"साम्यवादी राष्ट्रकुला"तून कोणासही फुटू द्यावयाचे नाही यासाठी
उघडपणे मांडलेला ब्रेझनेव्ह यांचा "मर्यादित आधिपत्या"चा
(limited sovereignty) सिद्धान्त हा एखाद्या कट्टर साम्राज्य-
शहासही लाजविणारा आहे. त्याचप्रमाणे यु. स्टेट्स् हे लोकशाही-
प्रेमी राष्ट्र म्हणून प्रचार करीत असताना, साम्यवादेतर हुकमशहांना
व वर्णीय राज्यांना मदत करीत नाही असे नाही.

आपापल्या जागतिक हितसंबंधासाठी ते कोणास, का व
कशी मदत देतील हे एक न उकलणारे कोडेच झालेले आहे. कधी
तर दोघां स्थानिक पण परस्परविरोधी राष्ट्रांस शस्त्रास्त्रांची मदत

करून समतोल उत्पन्न झाल्यावर, "आता एकत्र सुखासमाधानाने नांदा" असा वडीलधारा उपदेश करावयास ते कमी करीत नाहीत. एके काळी पाकिस्तानला शस्त्रसाहाय्य करीत असताना काश्मीरचा प्रश्न शांततेने सोडवा असे यु. स्टेट्स् आपल्याला सांगत असे. आता त्या प्रकरणातून त्यांनी आपला हात काढून घेतला आहे. त्या जागी भारताला शस्त्रे पुरवीत असतानाच पाकिस्तानला तशीच शस्त्रे देऊन रशिया आम्हा दोघांस "ताश्कंद कराराची" आठवण करून देत असतो. आपण न ऐकल्यास किंवा त्यांच्या धोरणांना कोठेही, केव्हाही विरोध केल्यास शस्त्रांचा ओघ दुसऱ्या पक्षाकडे अधिक वळविता येतो. हाही एक प्रकारचा कुटिल-दहशतीचाच (blackmail) प्रकार आहे.

पाकिस्तानला तीन देशांकडून आजपर्यंत मदत मिळालेली आहे. प्रथम अमेरिकेने दिली ती सेंटो व सिॲटो या दोन्ही संघटनांतील त्या दोहोस जोडणारे राष्ट्र म्हणून; साम्यवादाला प्रतिबंध करण्यासाठी. म्हणजे त्यावेळी मुख्यतः रशियाच्या प्रसारा-विरुद्ध वापरण्यासाठी. ती भारताविरुद्ध वापरण्यास त्यांचा नकार होता पण तरीही ती वापरली गेली. नंतर १९६५ मध्ये ती शस्त्रे बरीच नाश पावल्यानंतर त्यांना नवी शस्त्रे मिळाली ती चीनकडून. ती उघडपणे भारताविरुद्ध वापरण्यासाठी दिली गेली. आता त्यास रशियाकडून रणगाड्यांसह अनेक शस्त्रे मिळत आहेत ती अमेरिका व अिंग्रज या साम्राज्यशहाविरूद्ध वापरण्यासाठी की पूर्व पाकिस्तानात चीनी आपली पकड बसवीत आहेत त्याविरुद्ध किंवा भारताविरुद्ध लढण्यासाठी हे नकळे. भारताविरुद्ध ती वापरण्यास मनाई केलेली आहे असे रशियाचे संरक्षणमंत्री ग्रेच्कॉव्ह यांनी आपल्याला आश्वा-सन दिले आहे. त्यांच्या संस्कृती-मंत्री श्रीमती फुर्टसेव्हा यांनी मद्रा-सला वृत्तपत्रकारांस उलट प्रश्न विचारला की:"पूर्वी आग्नेय आशिया-वर साम्राज्यशहांनी आपले राज्य स्थापिले होते तसे ते पुन्हा येथे येणार नाहीत यावर तुमचा विश्वास आहे का ?" त्यासाठीच आम्हा दोघा राष्ट्रांस रशिया शस्त्रास्त्र मदत करीत आहे असा त्यांच्या बोलण्याचा

रोख दिसला. त्यावरून आपण अगदीच दुधखुळे आहोत असा त्या बाईंचा समज झालेला दिसतो. पाकिस्तानला दिलेली या तीन्ही राष्ट्रांची शस्त्रे दात्यांच्या इच्छेप्रमाणे वापरली गेली तर पाकिस्तानला आपल्या सैन्याचे तीन विभाग करावे लागतील व प्रत्येकी एक एका विभागाला रशियाशी, भारताशी व यु. स्टेट्स् व ब्रिटन् यांशी लढावे लागेल ! या सर्व अति घातक घटना नसत्या तर या विनोदपूर्ण प्रकाराचे हसू आले असते. पण हे कोडे उकलण्यासाठी प्रश्न विचारणार कोण व कोणाला ? भीक मागत असता दात्याला प्रश्न विचारता येत नाहीत, तेव्हा ते सांगतात ते ऐकून स्वस्थ बसण्याशिवाय आपल्याला गत्यंतर नाही.

परावलंबनामुळे देशाच्या स्वातंत्र्यावर गदा येते ती अशी, मग ती मदत फुकट असो की विकत असो. शस्त्रे फुकट किंवा विकत, देणे किंवा न देणे हे दात्या राष्ट्राच्या मर्जीवर असते. आम्ही म्हणत आलो आहोत की कोणीही दिलेल्या मदतीला कळसूत्रे (strings) बांधलेली नकोत. रशिया त्यांच्या मदतीस केवळ सूत्रे बांधत नाही तर आपल्या गळ्याभोवती फास लावतो आहे. त्या फासाचे आमच्या परराष्ट्र-धोरणांवर व अंतर्गत राज्य कारभारावर अती गंभीर परिणाम होत आहेत. जगातील कोणत्याही घटनां-बद्दल सत्य मतप्रदर्शन करण्याचे स्वातंत्र्यही आपणास आता शिल्लक राहिलेले नाही. च्छेकोस्लोव्हाकियावरील स्वारी नंतर आपण आपल्या दाबलेल्या गळ्यातून कशीबशी नापसंती व्यक्त केली. पाकिस्तानला शस्त्रसाहाय्य होत आहे त्या बाबतीत आपला निषेध गुळमुळीतच होतो आहे. (पाकिस्तान बगदाद करारात सामील झाल्यावर अमेरिकेची मदत त्यास सुरू झाली. त्यावेळी आपण केलेल्या निषेधाशी सध्या रशियाच्या नेत्यांसह चाललेल्या अतिसौम्य बोलाचालींची तुलना करा.)

या शस्त्रास्त्रांच्या किमतीची परतफेड म्हणून रशियाला आपल्या मालाच्या निर्यातीचे प्रयत्न होत आहेत. त्यांच्या किमती रशिया आपल्या इच्छेप्रमाणे घटवितो. आपले आगगाडीचे मालाचे

डबे त्यांना जगातील कोठल्याही देशातील किमतीपेक्षा स्वस्त दराने हवे आहेत असे ऐकिवात आहे. रशियाच्या पूर्व युरोपीय मांडलिकांसह उभारलेल्या साम्यवादी आर्थिक संघटनेमध्ये (Comecon) मालाचे उत्पादन, त्याची विक्री, त्याचा भाव वगैरे बाबतीत त्या संघटनेच्या छोटचा सभासदांवर रशियाने कशी पकड बसविली आहे ते जगजाहीर आहे.त्याचाच अनुभव आपल्यालाही कालांतराने येणार आहे यात शंका नाही.

जगातील शीतयुद्धाचे युग आता संपत आलेले आहे. त्याजागी आज दिसत आहे ते युग आहे महान राष्ट्रांतील समझोत्याचे व प्रभावक्षेत्रांचे (detente and spheres of influence). त्यामुळे आपणास दिसेल की भारताला शस्त्रांची मदत रशियाकडून येत असता शिवाय पाकिस्तानलाही ती आता सुरू झाल्यावरही यु. स्टेट्स्ने त्याबद्दल एक चकार शब्द काढलेला नाही. नुकतेच श्री. निक्सन् ब्रिटनमध्ये असता त्यांना ॲलिस्टेअर बकन्*हे भेटले. त्यांनी निक्सन् यांना सांगितल्याचे ऐकतो की, "भारताला आता तुम्ही रशियाच्या प्रभावक्षेत्रात सोडून द्या.तेथे काही विशेष करणे शक्य दिसत नाही."

असो. हा प्रश्न राजकीय आहे आणि तो राज्यशास्त्राच्या पंडितांनी विचार करून सोडवावयाचा आहे. आपण भूगोल-शास्त्रानुरूप काय परिस्थिती आहे तीच पाहात आहोत.

रशियाचा उद्देश उघड आहे. मॅकिंडर यांच्या सिद्धान्ताप्रमाणे त्यांना जगद्वीपावर सत्ता गाजवावयाची आहे. त्या संदर्भात भारताचे महत्व ते जाणून आहेत, पण त्याची व आपली समाइक सीमा कोठेच नाही. तेव्हा पश्चिम युरोप, तुर्कस्तान इत्यादींवर प्रत्यक्ष दबाव आणता येतो तसा या द्वीपकल्पावर आणणे शक्य नाही. तेव्हा तो इतर उपायांनी आणणे अवश्य आहे. ते असे :

१. भारत अजूनही अतितांत्रिक शस्त्रास्त्रांच्या बाबतीत

---

* इन्स्टिटयूट फॉर् स्ट्रॅटेजिक् स्टडीज् या संस्थेचे माजी संचालक व आता इंपीरियल् डिफेन्स कॉलेजचे सर्वाधिकारी.

परावलंबी आहे. १९६२ नंतर अमेरिकेने चीन विरूद्ध देऊ केलेली मदत १९६५ च्या भारत-पाक युद्धानंतर बंदच झाली त्याचा फायदा घेण्याचे रशियाने ठरविले. त्या दृष्टीने त्यांचा येथे प्रवेश होऊ लागला आहे. (इजिप्तशी तुलना करा.)

२. शस्त्रे दिली म्हणजे त्यांचे सुटे भाग, दारूगोळा यावर स्वतःची पकड ठेवता येते. त्याचप्रमाणे भारताने कोटचवधी रुपये खर्च करून उभारलेले मिग् विमानांच्या बांधणीचे कारखाने स्वयंपूर्ण नसल्याने त्यासाठी लागणाऱ्या सुटचा भागांचा ओघही मन मानेल तेव्हा थांबविता येतो.

३. पण भारतास फारसे बलवान होऊ देणेही रशियास योग्य वाटत नाही. कारण तसा तो झाला तर त्याचे लक्ष इतरत्र वळेल आणि तो दक्षिण आशियात कदाचित संघटित शक्ती उभी करील. तेव्हा या द्वीपकल्पात शक्तिसमतोलासाठी एक प्रबल प्रतिपक्ष पाकिस्तानच्या रूपाने उभा केला पाहिजे.

४. स्वसंरक्षणासाठी भारताचा अतोनात खर्च होत राहणे अवश्य आहे. त्यामुळेच तेथे आर्थिक सुबत्ता येणार नाही. साम्यवादास अवश्य असे वातावरण निर्माण होईल. आणि रशियाची पकड अधिकाधिक घट्ट होत जाईल.

५. भारत व पाक दोघांसही मदत केल्यास त्या दोघांसही आपल्या इच्छेनुरूप खेळविता येणे शक्य आहे.

६. एकदा पाकिस्तानात रशियाचे बस्तान बसले की त्याचा उपयोग दक्षिण कोरियाविरुद्ध उत्तर कोरिया वा दक्षिण व्हिएटनामविरुद्ध उत्तर व्हिएटनाम, याप्रमाणे अप्रत्यक्ष दबाव आणण्यासाठी करता येईल. पाकिस्तानास खुष्कीच्या मार्गाने मदत करणे अधिक सोपे आहे.

७. प्रथम अरबी समुद्रात व नंतर सिंगापूरवाटे हिंदी महासागरात रशियाचे आरमार घुसले की पश्चिम आशियातील तेलआदींच्या वाहतुकीवर त्याची पकड बसेलच. पण त्याहूनही त्यांच्या येथील बलशाली अस्तित्वामुळेच या भागावर अनेक प्रकारे

दहशत बसविता येईल.

आणि

८. भारतावर रशियाचा प्रभाव पडला की, दक्षिण युरेशियातील इतर अनेक राज्ये आपोआप त्याच मार्गाने जातील.

पाकिस्तानमध्ये आता अयूब जाऊन लष्करी राजवट जनरल याह्याखानांच्या हाती गेली आहे. रशियाच्या मदतीच्या सौद्याच्या बाबतीत याह्याखानच प्रमुख होते असे समजते. तेव्हा या नव्या राजवटीत रशियाची पाळेमुळे तेथे किती खोल रुजतात त्यावर लक्ष ठेवण्यासारखे आहे.

यु. स्टेट्स्चे डलेस् यांच्या वेळचे किनारभूमीवरील राष्ट्रांसमवेत मर्मभूमीभोवती कडे उभारण्याचे धोरण आता राहिलेले नाही. पण तेही भारताचे केन्द्रस्थानीय महत्त्व जाणून आहेत. त्याबद्दल त्यांचे भारतातील राजदूत चेस्टर बोल्स यांच्या एका लेखातील उताराच देतो. *या लेखात प्रथम जागतिक राजकीय परिस्थितीचा आढावा घेऊन, ते लिहितात–

" या (परिस्थितीच्या) चौकटीत, राजकीय दृष्टचा स्थिर व आर्थिक दृष्टचा स्वजीवी राष्ट्र म्हणून भारताचा उदय हा निर्णायक महत्त्वाचा आहे असे माझे मत आहे. जर का भारतात होणारा लोकशाही स्थापनेचा प्रचंड प्रयोग अपयशी झाला तर आशिया खंडात शांती व स्थैर्य लाभणे अशक्य आहे. कारणे उघड आहेत;

" भारताची लोकसंख्या आफ्रिका व लॅटिन अमेरिका यांच्या जोडसंख्येपेक्षा अधिक आहे. आशियातील साम्यवादेतर लोकसंख्येपैकी अर्ध्याहून जास्त जनता भारतात राहते.

" भारताने गेल्या वीस वर्षांत राजकीय स्वातंत्र्य राखले आहे आणि चार निवडणुका घेऊन खरीखुरी संसदीय लोकशाही

---

* " Are We Relevant to the Future " by Chester Bowles in American Review, January 1969.

टिकविली आहे. संपूर्ण आफ्रिका, आशिया व लॅटिन अमेरिका यांतील कशीवशी डझनभर राष्ट्रेच लोकशाही-राज्यशासित आहेत, याची आपल्याला जाणीव झाली म्हणजे भारताची ही कार्यसिद्धी विशेष महत्त्वाची वाटते.

"भारताचा राजकीय दृष्टचा स्थिर व आर्थिक दृष्टचा स्वजीवी समाजरचनेचा प्रयत्न असफल झाला आणि हे मिश्र, कधीकधी निराशाजनक वाटणारे व जगातील षष्ठांश जनसंख्येचे राष्ट्र जर का, एका पिढीपूर्वी चीन गेला त्या मार्गाने, निसरडचा उतरणीला लागले तर, आग्नेय आशियात आपण कितीही रक्त सांडले किंवा कितीही पैसा ओतला तरी त्या भागात स्थैर्य आणण्यास आपण असमर्थ होऊ."

या उताऱ्यावरून भारताच्या भौगोलिक स्थानाच्या महत्त्वाची जाणीव यु. स्टेट्स्ला किती तीव्रपणे झालेली आहे ते लक्षात येईल. या देशाला साम्यवादाच्या खाईत घसरू द्यावयाचे नाही व एक प्रबळ लोकशाहीप्रधान राष्ट्र म्हणून टिकवावयाचे हा त्यांचा उद्देश आहे याबद्दल शंका असण्याचे कारण नाही. त्यांनी योजलेले उपाय आपल्याला चुकीचे वाटतात व अधूनमधून त्यांनी घेतलेल्या भूमिकेला आपला विरोध असतो; तो कधीकधी योग्यच असतो. पण येथील स्थैर्य त्यांच्या स्वतःच्या हितसंबंधांना पूरक आहे आणि साम्यवाद विस्ताराला रोखण्यासाठी हेच एक राष्ट्र उपयोगी पडू शकेल हे त्यांच्या धोरणांमागील सूत्र आहे हे कबूल करावे लागेल.

आता या दोन महान राष्ट्रांच्या वेगवेगळ्या धोरणांमुळे आलेल्या परिस्थितीतून आपल्या हिताचा मार्ग कसा शोधावयाचा हा आपल्यापुढील गहन प्रश्न आहे खरा. पण तो राज्यशास्त्राचा आहे. भूगोलशास्त्राचा नव्हे. तरीसुद्धा अखेरीस काही विचार मांडावेसे वाटतात.

१७

भारताच्या भौगोलिक स्थानाशी समर्पक राजकीय धोरणे

आपण पूर्व गोलार्धाचा राजकीय व लष्करी भूगोलशास्त्राबरहुकूम अगदी ओझरता आढावा घेतला. यापेक्षा त्यात अधिक विस्तृत किंवा खोल शिरणे दिलेल्या वेळेत शक्यच नव्हते. पण तसे करणे अवश्य आहे हे सांगणे नलगे. या वरवरच्या परीक्षणामुळेही जागतिक घटनांचा एक चित्रपट डोळ्यांसमोरून जातो. आपल्या पुढे प्रश्न हा आहे की, आपण यापुढ दिग्दर्शित होणाऱ्या

राजकीय चित्रपटाकडे केवळ एक प्रेक्षक म्हणून पाहात रहावयाचे की तो तयार होत असतानाच, त्यातील इतर पात्रां बरोबर स्वतः भाग घेऊन, आपल्या हितसंबंधांना धोका येण्याचा संभव असेल अशी चित्ररचना बदलून टाकण्याचा प्रयत्न करावयाचा.

आपण स्वतःस आणखी असे विचारावयास हवे की, आपण आपल्यासाठी घडविलेली लोकशाही राज्यपद्धती, आपल्या समाजाची जीवनपद्धती किंवा आपली विशिष्ट मूल्ये यांवर आपली श्रद्धा आहे किंवा नाही. आणि असल्यास ती टिकविण्यासाठी आपण काय करावयास तयार आहोत ? (देशातील सध्याची स्थिती पाहून प्रश्न मात्र उभे होतात की, आपली जीवनपद्धती कोणती, आपली मूल्ये कोणती आणि आपली श्रद्धा तरी कशावर आहे ?) राष्ट्राचे रक्षण म्हणजे केवळ सीमांचे रक्षण नव्हे, तर त्याहीपेक्षा ते राष्ट्रीय मूल्यांचे असते. सीमांवरील काही प्रदेश गेला तरी राष्ट्र शिल्लक राहते, केव्हा तरी तो गेलेला प्रदेश पुन्हा जिंकता येतो. पण मूल्येच गेली तर राष्ट्राचा पायाच ढासळतो. तेव्हा त्या मूल्यांवर निष्ठाच नसेल तर, 'जे जे होइल ते ते पहावे । तुका म्हणे उगी रहावे ।।' हेच धोरण उत्तम. सर्वच जनता उगी राहिली तर अंतर्गत वर्गकलह, क्रांती आणि रक्तपात टळेल. जगद्वीपावरील प्रचंड साम्राज्याचे आपण एक घटक होऊन राहू. ब्रेझनेव्ह यांचा "मर्यादित आधिपत्याचा" सिद्धान्त,आपल्यासही लागू होईल. परंतु सध्यातरी आपल्या विशिष्ट जीवनमूल्यांवर आधारलेले राष्ट्राचे अस्तित्व टिकविण्याची जिद्द बहुजनसमाजात शिल्लक आहे असे धरून चालू या.

नेहरूंनी सप्टेंबर १९४६ मध्ये केलेल्या आकाशवाणीवरील भाषणातील उतारा मी सुरवातीस वाचून दाखविला. त्यांत त्यांनी म्हटले होते की, "हिंदुस्थानचे भौगोलिक स्थान असे आहे की, हा देश पश्चिम, दक्षिण व आग्नेय आशियाचा कीलक आहे." त्या वेळी हिंदुस्थानची फाळणी झालेली नव्हती. ब्रिटनने एकछत्राखाली आणलेले हिंदुस्थान कायम होते.त्या वेळी त्यांच्या साम्राज्य-रक्षण योजने-

तील हिंदुस्थानच्या कीलकरूपी भूमिकेची जाणीव नेहरूंच्या नेतृत्वाखालील त्यावेळच्या हंगामी सरकारला झाली असावी. पर्वतांच्या तटबंदीने सुरक्षित देश, त्या पलीकडील आघातशोषक भूविभाग आणि शेजारच्या देशास त्यामुळे येणारा धीर याची प्रतीती त्यांना आलेली असावी. पण ती विस्तृत दृष्टी काही कारणांनी संकुचित झाली व स्वत:च्याच शब्दांचा त्यांना नंतर विसर पडला असावा, म्हणूनच स्वातंत्र्यानंतर शेजारच्या आशियाई राष्ट्रांना एकत्र आणून त्यांचा भारत हा कीलक होऊ शकला नाही.

त्या वेळी महायुद्ध नुकतेच संपले होते. जगातील पूर्व-पश्चिम गटवाद, शीतयुद्ध, पोलादी पडदा वगैरे शब्दप्रयोग कोणत्याही भाषेत वापरात आलेले नव्हते. शांतिकालीन संरक्षण-संघटनांचा जन्म झाला नव्हता. त्यानंतर भारताची फाळणी झाली आणि जगातील अनेक राष्ट्रांची दोन गटांत उभारणी स्पष्ट होऊ लागली. शस्त्रविहीन युद्धाचा शीतयुद्ध हा एक नवीनच प्रकार अस्तित्वात आला. तिसऱ्या महायुद्धाची ही तयारी आहे की काय अशी शंका नेहरूंच्या मनात येऊ लागली. लष्करी साहाय्याचे तहनामे, सांघिक-शस्त्रबळ याच गोष्टी युद्धाला कारणीभूत होतात अशी कल्पना त्यांच्या मनात ठाम बसली. त्यांची तशी कल्पना झाली म्हणूनच त्याचा शब्द न् शब्द मानणाऱ्या भारतात ती प्रसृत झाली. संरक्षण-संघटना आपल्याला अस्पृश्य वाटू लागल्या. आम्हाला स्वत:च्या विकासाला वेळ हवा होता. कोणत्याही युद्धात पडावयाचे नव्हते. तेव्हा आपण प्रथम तटस्थता (neutrality) व नंतर तो शब्द न आवडल्याने की काय, जवळजवळ त्याच अर्थी अलिप्ततावाद (non-alignment) पत्करला. आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील यूनोबाहेरील कोणत्याही सहकार्यात लष्करी योजनांचा वास आपल्यास येऊ लागला. त्यामुळे आपण या भागात एकाकी पडलो व आपल्या कीलकस्थानाला मूठमाती दिली गेली. खरे म्हटले तर, आर्थिक व सामाजिक सहकार्यातूनच, तसे जोडलेले संबंध टिकविण्यासाठी, त्यांतील सहभाग्यांच्या संरक्षणाच्या कल्पनेची उत्पत्ती होते. शिवाय सारासार

विचार करता, जगातील संरक्षण संघटनांमुळे तरी त्यांतील सभासदांचे गेल्या अनेक वर्षांत काय नुकसान झाले आहे ? त्यांच्या संघटनेत नसताही आपण रशियाचे जितके मिंधे झालेले आहोत, तेवढे जगातील संरक्षण संघटनांतील सभासद त्यांच्यातील प्रबल राष्ट्रांचे होत नसतील. एका संघटनेतील लहानमोठी राष्ट्रे (वॉर्सा संघटना सोडून) समान दर्जाची मानली जातात व त्यांना काही न पटल्यास त्यांच्या समाइक सभांमध्ये ती राष्ट्रे आपला आवाज उठवू शकतात. त्याऐवजी सस्त्रसाहाय्याकरता एकाच्या गळी पडल्याने त्या दोघांतील संबंध दीन व दाता यासारखे असतात, आणि दात्याला आपली जरब दीनावर ठेवता येते. त्या दोघांमधील परस्पर-संबंध खाजगी असल्याने जागतिक लोकमतावर त्याचे काहीही परिणाम होऊ शकत नाहीत किंवा त्यांचे पाठबळ मिळत नाही.

शिवाय गेल्या १५–२० वर्षांत, आफ्रो-आशियातील भूप्रदेशात दोन स्वतंत्र राष्ट्रांमध्ये नाव घेण्यासारखी अशी पाच युद्धे झाली. त्यांपैकी चार अलिप्ततावादी म्हणविणाऱ्या राष्ट्रांविरुद्ध झाली–दोन इजिप्तविरुद्ध व दोन (कच्छचे लहानसे युद्ध जमेस धरता तीन) आपल्याविरुद्ध. केवळ एक कोरियातील युद्ध अनलिप्त देशाविरुद्ध झाले व त्यांच्या यु. स्टेट्स्‌शी असलेल्या संरक्षण करारामुळेच द. कोरिया आज टिकून आहे. तेव्हा संरक्षणकरार केल्यामुळे युद्धे होतात या म्हणण्यात फारसे तथ्य दिसत नाही.

अलिप्ततावादाचे फायदेतोटे हा आपला सध्याचा विषय नाही. आपण एखाद्या संरक्षण संघात पूर्वीच मिळालो असतो तर काय झाले असते यावर खल करीत बसणे म्हणजे वेळेचा अपव्ययच म्हणावे लागेल. आज तर असे दिसत आहे की, एके काळी उभारलेल्या संरक्षण-संघटनांतून त्यातील सभासद बाहेर पडत आहेत आणि ते संघ विस्कळीत होत आहेत. पण त्याचे कारण, अधिक धोक्याच्या समयी त्या लहानमोठ्या देशांना त्या संघटनापासून संरक्षण मिळाले, त्या छत्राखाली त्यांनी आपली आर्थिक प्रगती केली व त्या संघटनां-मुळेच त्यांच्या क्षेत्रात आक्रमणाची शक्यता कमी झाली, हेच आहे.

अशा परिस्थितीत आज आपण या जुन्या पद्धतीच्या संघटनांत मिळावयाचे ठरविले तरी आपला त्यात शिरकाव होणार नाही. परंतु त्यापासून अलिप्त राहूनही आपल्या शेजाऱ्यांसह एक लोकशाही आघाडी युरेशियाच्या दक्षिण व आग्नेय भागात शक्य झाली असती, पण तीही आपण केली नाही आणि नेहरूंनी नाव दिलेला हा आशियाचा कीलक कोणाशीच जुडण्यासाठी किंवा इतरांना आपसात जोडण्यासाठी वापरला गेला नाही. तो तसाच गंजत एकटाच पडून राहिला आहे. आता तर त्या गंजामुळे त्याचा भुगा होतो की काय अशी भीती वाटते आहे.

हा पूर्वीचा वारसा अजून कायम आहे. आज या आपल्या भूकेंद्राला वा कीलकराष्ट्राला आपल्या शेजाऱ्यांमध्ये पत राहिलेली नाही. नुकत्याच बॅन्कॉक येथे भरलेल्या आशियाई राष्ट्रांच्या अर्थमंत्र्यांच्या बैठकीला आपल्याला बोलावणे नव्हते; फार काय, मागच्या बैठकीप्रमाणे एक प्रेक्षक म्हणूनही भारतास आमंत्रण मिळाले नाही. तेव्हा आपले काही तरी चुकते आहे की काय, असे आपल्या राज्यकर्त्यांस वाटू लागल्याची चिन्हे मात्र दिसू लागली आहेत. त्याची उघड कबुली देण्याची हिंमत किंवा शीलबल कोणातच नसले, तरी आता आपल्या महामंत्र्यांच्या व इतरही मंत्र्यांच्या वाऱ्या जपानपासून ऑस्ट्रेलिया-न्यूझीलंडपर्यंत होऊ लागल्या आहेत व तेथील मंत्रीही दिल्लीस भेटी देताना दिसतात. नुकतीच झालेली इराणच्या शहांची भेटही त्या दृष्टीने महत्त्वपूर्णच म्हणावी लागेल. त्याचप्रमाणे आर्थिक वा औद्योगिक सहकाराच्या समाइक योजना हळूहळू विचारार्थ घेतल्या जात आहेत. मंत्रिमंडळातील डाव्या-उजव्या किंवा वरखालच्या पडलेल्या फाटाफुटीमुळे अनेक योजना अमलात येण्यास कालहरण होत असले तरी, पूर्वीची धोरणे आम्ही बदलीत नाही असे वरवर दाखवून, अशा सहकार्यास सुरुवात झाली आहे. एकदा भारतीय भांडवल परदेशी गुंतले व त्यांच्या सहकार्याने तेथील कच्च्या मालावर आधारित आपले उद्योग उभे झाले की, त्या देशांच्या रक्षणाचा, राजकीय

स्थैर्याचा वगैरे प्रश्न आपोआपच उभे राहतात. आपले हितसंबंध त्यायोगे आपल्या सीमांबाहेर इतरत्र पसरू लागतात आणि त्यांच्यासह समाइक रक्षणाची जबाबदारी टाळता येत नाही.

असो. नुकत्याच झालेल्या मंत्रिमंडळातील खांदेपालटीत, एकास स्वतंत्र परराष्ट्रमंत्री व दुसऱ्यास परराष्ट्र-व्यापार मंत्री केले गेले आहे. परराष्ट्र संबंधाबरोबरच परराष्ट्राशी व्यापार व औद्योगिक सहकार्य या गोष्टी आता अवश्य वाटू लागल्या असाव्या. विशेष महत्त्वाचे असे की, त्या दोन्ही तरुण मंत्र्यांना मंत्रिमंडळाचे पूर्ण-सभासदत्व दिले गेले आहे. तेव्हा त्या विषयांचे महत्त्व राज्य-कर्त्यांस पटू लागले असावे. मंत्रिमंडळातील व्यक्तींच्या आपसातील पायखेचीपेक्षा राष्ट्राचे हित हा अधिक लक्ष देण्यालायक विषय आहे असे त्या मंडळास वाटू लागल्यास, कदाचित आपल्या कीलकस्थानाच्या महत्त्वाचे, त्या स्थानास आज उत्पन्न झालेल्या धोक्यांचे व त्या धोक्यांच्या निवारणाचे विचार होऊ लागतील व योग्य ते निर्णय घेतले जातील अशी आशा करण्यास जागा आहे. दक्षिण युरेशियात आपली जवळजवळ नाहीशी झालेली राजकीय प्रतिष्ठा त्यामुळे पुन्हा प्रस्थापित होण्यास मदत होईल.

स्वावलंबनाची आवश्यकता

आज जगातील अविकसित राष्ट्रे इतरांची मिंधी होतात याचे कारण ती अनेक बाबतींत परावलंबी असतात, हेच आहे. या संदर्भात आपल्या वरील परीक्षणावरून उघड दिसते की, दक्षिण युरेशियातील राष्ट्रांना खरोखर कशाची आवश्यकता असेल तर ती स्थानिक नैसर्गिक संपत्तीच्या व कर्तुत्वाच्या जोरावर केलेल्या राष्ट्रबलवर्धनाची. राष्ट्रबल म्हणजे आर्थिक बल, लष्करी बल व जनमतबळ यांचा संयोग. राष्ट्राचा स्वतःच्या पायावर उभे राहण्याजोगा आर्थिक विकास आणि परराष्ट्रास आक्रमणापासून परावृत्त करण्यायोग्य लष्करी बळ या दोन्ही गोष्टी तर हव्यातच; पण त्या-

बरोबरच राष्ट्रनेत्यांमागे जनमताचे पाठबळ असणेही तेवढेच किंवा त्याहूनही अधिक महत्त्वाचे असते. असंतुष्ट सामाजिक परिस्थितीत देशात स्थैर्य नांदू शकत नाही, तर स्फोटक व क्रांतिकारक प्रवृत्ती निर्माण होतात आणि जोपर्यंत अंतर्गत स्थैर्य नाही तोपर्यंत जागतिक व्यवहारात त्या राष्ट्राला प्रतिष्ठा येणे शक्य नाही. काही महिन्यांपूर्वी " इंडियन् एक्स्प्रेस् " मध्ये मी एक लेख वाचला. तो श्री. नंदन कागल यांचा असावा. त्यात त्यांनी लिहिले होते, " जर आपल्या केंद्रीय सत्तेच्या शब्दाला आपल्याच देशात त्रिवेंद्रम, मद्रास किंवा कलकत्ता येथे मान दिला जात नाही तर, तो तसा वॉशिंग्टन् किंवा मॉस्को येथे दिला जावा अशी अपेक्षा करणे व्यर्थ आहे." मी असे म्हणेन की, वॉशिंग्टन्-मॉस्को राहू द्या पण कोलंबो, रंगून किंवा सिंगापूर येथे आपल्या शब्दाला आज किंमत आहे का ? याची कारणे शोधता त्यांपैकी दोन, अंतर्गत दुबळेपणा व राज्यशासनाची शासन करण्याची अपात्रता ही असली तरी त्याहून, आपली पत अंतर्गत व बहिर्गत क्षेत्रांत आपल्या परावलंबनामुळेच बहुतांशी गेलेली आहे, हे त्याचे मुख्य कारण आहे. काही राजकीय पक्ष बलवान होऊन केंद्राला मन मानेल तेव्हा झिडकारतात, कारण त्यांना पाठबळ देणाऱ्या राष्ट्राचे आपण मिंधे आहोत आणि त्या पक्षास त्याची पूर्ण जाणीव आहे. त्यांच्याविरुद्ध उपाययोजना करण्याची हिंमत आपल्यात राहिलेली नाही.

अविकसित राष्ट्राला विकासासाठी थोडीफार मदत लागते हे निर्विवाद आहे, पण त्यायोगे आपल्या गळ्याभोवती फास लावून घेऊन आपले जागतिक क्षेत्रातील क्रियास्वातंत्र्य किंवा मतस्वातंत्र्य घालविण्यापेक्षा, तो थोडा मंदगतीने झाला तरी. स्वावलंबनाने विकास घडवून आणणे,अधिक इष्ट मानले पाहिजे. त्यासाठी आपल्या भोवतालच्या समान परिस्थितीत असलेल्या इतरांशी केलेला सहकार अधिक उपयुक्त ठरेल. आणि त्यासाठी आपणच पुढाकार घेतला पाहिजे.जर त्यासह आपण आपली राजकीय मूल्ये

रक्षिण्याचा प्रयत्न करीत आहोत हे जगजाहीर झाले तर, त्या विशिष्ट मूल्यांवर श्रद्धा असणाऱ्या विकसित राष्ट्रांची मदत आपल्यास व इतरासही होईल.

भारताच्या भौगोलिक स्थानामुळे आपल्यावर विशेष जबाबदाऱ्या पडलेल्या आहेत. त्यांना बाजूस सारून चालणार नाही. निसर्गानेच त्या उत्पन्न केलेल्या आहेत व त्या वातावरणातच आपल्याला जगावयाचे आहे— नव्हे, त्यात धैर्याने अेकत्र राहावयाचे आहे. सध्याच्या प्रभावक्षेत्रवर्धनाच्या युगात आपण पुढाकार घेऊनच त्यास समाइकरीत्या तोंड देणे शक्य होईल. एकलग राहून नव्हे. त्यासाठी अवश्य असे मूलभूत भौगोलिक गुणविशेष आपल्या स्थानामुळे आपल्याला उपलब्ध आहेत.

आपला प्रयत्न प्रथमतः दक्षिण व आग्नेय आशियातील राष्ट्रासह लोकशाही मूल्यांवर आधारित संघटना उभी करण्यासाठी झाला पाहिजे. नंतर त्यात जपान व ऑस्ट्रेलियासारखी तंत्रविकसित आशियाई राष्ट्रे येऊ शकतील. मला अखेरीस चित्र दिसावेसे वाटते ते जपान-ऑस्ट्रेलिया-भारत या भौगोलिक त्रिकोणात अंतर्भूत असलेल्या सर्व राष्ट्रांसह एका एकसंध, एकनिष्ठित व परस्परसाहाय्यक समाजाचे. पण हे सर्व करण्यासाठी प्रथम आपल्या गळ्याभोवती घालून घेतलेल्या परकीय फासातून आपली सुटका करून घेतली पाहिजे व स्वतःवर घातलेली कृत्रिम राजकीय बंधने सोडून मोकळे झाले पाहिजे. त्याला हिंमत व धडाडी लागेल व आपल्या राजव्यवहारातील क्रियास्वातंत्र्य प्रस्थापित करावे लागेल. तसे न केल्यास या भारताचे भविष्य मला तरी भकास दिसते आहे.

१८

अखेरचे चार शब्द

या व्याख्यानांना मी सुरुवात केली ते असे सांगून की, "या भाषणांमुळे आमच्या भूगोलशास्त्र--पंडितांत या विषयाबद्दल कुतूहल उत्पन्न व्हावे व त्यांनी आम्हा अजाणांना त्याबद्दल अधिक काहीतरी शिकवावे." त्याच सुरावर ही भाषणे मी आता संपविणार आहे.

सुशिक्षित समाजाची उदासीनता

गेल्या जवळजवळ बावीस वर्षांच्या स्वातंत्र्यानंतरच्या काळात युद्ध वा संरक्षण यांशी संबंधित समाजशास्त्रांच्या क्षत्रात अखिल

भारतात फारसे अभ्यासकार्य झालेले नाही. फार काय अशा अभ्यासाची आवश्यकताही अनेकांना पटलेली नाही. त्या विषयावर हाताच्या बोटांवर मोजण्याइतकीही ग्रंथनिर्मिती झालेली नाही. आणि झाली ती –दोनचार पुस्तके वगळता– उथळ आहे.

कालमापनाने आपल्यापासून चार-सहा तासांच्या अंतरावर असलेल्या आपल्या दोन्ही बगलांवरील प्रदेशात युद्धे झाली किंवा अजूनही चालू आहेत, परंतु त्यावद्दलची माहिती आपण अमेरिकेत किंवा ब्रिटन्मध्ये प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांत वाचतो. त्या दोन्ही दिशांस नजर फिरविल्यास आम्हा भारतीयांच्या नजरेला तेथील चित्रे कशी दिसतात यावर येथील अभ्यासकांनी, काही थोडे लघुलेख सोडता, केलेले विवेचन मला तरी वाचावयास मिळालेले नाही.

आपल्या देशातील जनतेची ही उदासीनता व त्यामुळे होणारी अभ्यासाची आबाळ का व्हावी ही बाबही विचारार्ह आहे. कोणत्याही देशात समाजातील मध्यम वर्गच अभ्यासू, चौकस व विचारी असतो. तो वर्ग आपल्या देशात अनेक कारणांमुळे निष्क्रिय व निष्प्रभ झालेला आहे. त्याच्यात नैराश्य पसरले आहे व त्यामुळे समाजात एक प्रकारचा 'अपरिहार्यता गंड' (inevitability complex) उत्पन्न झाला आहे. " हे असे चालायचेच. आपण काय करणार ?" अशी थोडक्यात या वर्गाची भूमिका दिसते. भारतातील एकूण परिस्थितीची प्रतिक्रिया म्हणून की काय, या वर्गाची दृष्टी इहलोकीच्या घटनांपेक्षा परलोकाकडे, मोक्षमार्गाकडे वळत चालली आहे. माझ्या लहानपणीही पाहिला नव्हता इतका या वर्गाचा भक्तिमार्गाकडे ओढा आज मला दिसून येतो. भजने-कीर्तने, वाऱ्या-जत्रा हे प्रकार अधिक दृढभावाने सुरू झाले आहेत, तसेच महाराज व बुवा यांचे जणू पेव फुटले आहे आणि त्यांच्यामागे, माझा विश्वासही बसणार नाही अशी मंडळी लागलेली दिसतात. लष्करात माझ्या हाताखाली एके काळी उत्तम काम केलेल्या एका अधिकाऱ्याची गतवर्षी पुण्याहून बदली झाली. त्यावेळी त्याने पुणे सोडण्यापूर्वी बडोद्यास जाऊन आपल्या गुरूला बदलीच्या ठिकाणी जाण्याच्या प्रवासाचा दिवस कोणता

असावा हे विचारले. विचाऱ्याला आलेल्या हुकमांमुळे त्य शुभदिवशी निघता आले नाही. ही त्या अधिकाऱ्यानेच स्वत मला कथन केलेली कहाणी आहे. लढाईच्या सुरुवातीचं काळवेळही युद्धकाळांत त्याचा गुरूच सांगणार की काय ही भीती मला वाटते. तसेच आपल्या महाविद्यालयातील किंव विद्यापीठातील कित्येक विद्वान् शिक्षकांचा फुरसतीचा वेळ राष्ट्रास उपयुक्त विषयांच्या अभ्यासासाठी खर्च न होता आळंदी-पंढरी इत्यादी क्षेत्रांच्या वाऱ्या करण्यात खर्च होतो. अशी आज आपल्य सुशिक्षित समाजाचीं सार्वत्रिक परिस्थिती झालेली आहे.

असो. स्वतःच्या मोक्षप्राप्तीसाठी प्रयत्न करीत असत राष्ट्राचा कपाळमोक्ष होण्याची वेळ जवळ येते आहे याची त्यांन कल्पना नसावी. अद्ययावत होण्यासाठी झटत असलेल्या राष्ट्रात अशा प्रवृत्ती घातक समजल्या पाहिजेत. केवळ, " हरि-हरि " करीत बसण्याने देशात सुस्थिती येईल असे मानणे मूर्खपणा आहे.

जगातील सध्याच्या अशाश्वत वातावरणात व विशेषत आपल्या देशांतर्गत अस्थिर परिस्थितीत या देशास तारून न्यावयाचे असेल तर, राजकारण व संरक्षण या जोड विषयां-बद्दल लोकशिक्षण हाती घेणे व जनमत तयार करणे हे लोक-शाहीतील महत्त्वाचे कार्य आहे. पण ते त्याशी संबंधित विषयांच्या विद्वानांनीच धैर्याने हाती घेतले पाहिजे. पूर्वी काय झाले, आपल्या अनेक दिवंगत नेत्यांनी काय केले, ते योग्य होते की नव्हते याबद्दल, त्यापासून बोध घेण्यापलीकडे, ऊहापोह करीत बसणे हा वेळेचा अपव्यय होईल. आपली दृष्टी भूतकाळापेक्षा भविष्याकडे वळली पाहिजे तशीच ती भारताच्या भोवतालच्या विस्तृत क्षेत्रात फिरली पाहिजे. गेल्या दोनचारशे वर्षांच्या इतिहासापेक्षा पुढील दोनचार वर्षांतच आपल्या देशाचे काय होणार आहे, याचा चिकित्सक अभ्यास अधिक उपयुक्त होईल. तशा अभ्यासास आपल्या विद्वानांनी आता तरी सुरुवात करावी अशी माझी त्यांना विनंती आहे.

यापेक्षा अधिक मी काय सांगू ?

मेजर जनरल य. श्री. परांजपे यांचा जन्म ८ जानेवारी १९०९ रोजी जबलपूर (मध्यप्रांत) येथे झाला. नागपूरच्या पटवर्धन हायस्कूल व कॉलेज ऑफ सायन्समध्ये त्यांचे शिक्षण झाल्यावर, सँढर्स्टच्या रॉयल मिलिटरी कॉलेजसाठी १९२९ साली त्यांची निवड झाली. १९३० मध्ये त्यांना किंग्ज कमिशन मिळाले. युद्धकालामध्ये पश्चिम आशिया, इजिप्त इत्यादी देशांत महत्त्वाची कामगिरी त्यांनी बजावली. छत्री-सैनिक म्हणूनही त्यांना अनुभव आहे. पाचव्या पायदळ विभागाचे जनरल ऑफिसर कमांडिंगच्या पदावरून १९५८ मध्ये ते सैन्यातून निवृत्त झाले.

निवृत्तीनंतर पुणे विद्यापीठात ' युद्धाभ्यास ' विषय सुरू करण्यात यश मिळविले. युद्ध व संरक्षण या विषयावर त्यांचे वाचन व लेखन सतत चालू असते.

या त्यांच्या व्यासंगाचे परिणत स्वरूप म्हणजे या पुस्तकात संरक्षणाची सिद्धता व राष्ट्राची संरक्षणनीती, ही त्या राष्ट्राच्या व भोवतालच्या भूखंडाच्या भौगोलिक स्वरूपावर व त्यावरून निघणाऱ्या निकषावर कशी अवलंबून असते हे उत्तम रीतीने दिग्दर्शित केलेले आढळेल.

* * *

व्हीनस प्रकाशन

'तपश्चर्या'

३८१ क, शनवार पेठ : पुणे ३०